THE BOOK WAS DRENCHED

UNIVERSAL LIBRARY
OU_192344
UNIVERSAL LIBRARY

अर्वाचीन

# मराठी वाङ्मयसेवक

[ द्वितीय खण्ड ]


— ग्रंथकर्ता —

गंगाधर देवराव खानोलकर



प्रथमावृत्ति ] १९३८ [ मूल्य २। रुपये

: प्रकाशक :
ंगाधर देवराव खानोलकर,
स्वस्तिक पब्लिशिंग हाऊस,
केळेवाडी, मुंबई, ४

Checked 1965

सर्व अधिकार स्वाधीन

( प्रथमावृत्ति )
१९३८

: मुद्रक :
रघुनाथ दिपाजी देसाई,
न्यू भारत प्रिंटिंग प्रेस,
६, केळेवाडी, मुंबई, ४.

# प्रस्तावना

बरोबर आठ वर्षांच्या अवधीनंतर 'वाङ्मयसेवका'चा हा द्वितीय खण्ड प्रसिद्ध होत आहे. वास्तविक एवढया मुदतींत ग्रंथाचें काम पूर्ण व्हावयास पाहिजे होतें. परंतु अशा कामास लागणारें स्वास्थ्य मला लाभूं न शकल्यामुळें ग्रंथ शक्य तेवढया लवकर पूर्ण करण्याची इच्छा असूनहि, काम लांबणीवर पडलें.

आज, कांहीं योगायोगामुळें, हातीं घेतलेलें हें काम निर्वेधपणें पूर्ण करतां येईल अशी परिस्थिति जुळून आली आहे. आणि त्यामुळेंच 'वाङ्मयसेवका'चा हा द्वितीय खण्ड प्रसिद्ध करणें शक्य होत आहे.

'वाङ्मयसेवका'चे आणखी दोन खण्ड निघावयाचे आहेत. ते वर्ष-दीड वर्षाच्या अवधींत प्रसिद्ध करूं शकेन असा मला विश्वास वाटतो. तृतीय खण्डाचें साहित्य सध्यां जुळविलें जात असून, मार्च १९३९ चे सुमारास तो प्रसिद्ध होईल.

प्रथम खण्डाप्रमाणेंच, या द्वितीय खण्डांतहि, खालीलप्रमाणें लेख मुद्दाम लिहून घेऊन, प्रसिद्ध केले आहेत.

| | |
|---|---|
| **बालकवि ठोमरे** | प्रो. माधवराव पटवर्धन |
| **नाट्यछटाकार 'दिवाकर'** | के. नारायण काळे |
| **देवल** | वि. स. खांडेकर |
| **धनुर्धारी** | खं. सा. दौंडकर |
| **देशमुख ( लोकहितवादी )** | श्री. के. क्षीरसागर |
| **वाग्भट नारायण देशपांडे**<br>**रामचंद्र वा. नाडकर्णी**<br>**विठ्ठल जिवाजी नाडकर्णी** | रा. म. आठवले |
| **नाथमाधव** | वि. द. घिंदरकर |
| **दत्तात्रय बळवंत पारसनीस** | प्रो. श्री. रा. पारसनीस |

वरील लेखकांनीं केवळ स्नेहभावानें मला जी मदत केली आहे त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहें. या लेखकांप्रमाणेंच, मजवर निरपेक्ष लोभ ठेवणारे व मीं हातीं घेतलेल्या प्रस्तुत कामाकडे आत्मीयतेनें पाहणारे माझे दोघे स्नेही श्री. राजाराम सखाराम शिरवलकर व श्री. वासुदेव विष्णु भट यांचाहि मी तितकाच ऋणी आहें. या दोघांनीं, प्रत्येक चरित्राखालीं दिलेली संदर्भसूची तयार करतांना जी स्वयंस्फूर्तीनें मदत केली ती मला फार मोलाची वाटते. श्री. रा. म. आठवले यांच्या लेखनसाहाय्याचा वर उल्लेख आलाच आहे. त्यांनीं केवळ लेखनसाहाय्य केलें इतकेंच नव्हे, तर एकंदर संपादनकार्यांत मला फार महत्त्वाची मदत केलेली आहे. माझ्या या सर्व मित्रमंडळीबरोबरच, ज्यांच्या कळकळीमुळें व आत्मीयतेमुळें 'वाङ्मयसेवका'चा हा खण्ड इतका आकर्षक निघूं शकला, त्या 'न्यू भारत प्रिंटिंग प्रेस'च्या चालकवर्गाचाहि मी अत्यंत आभारी आहें. त्यांच्या पाठिंब्यामुळेंच प्रस्तुतचा खण्ड प्रसिद्ध होत आहे व पुढील खण्ड वेळेवर प्रसिद्ध करण्याची उमेद मीं धरली आहे.

ता. २ आगष्ट १९३८,
मुंबई.

सर्वांचा नम्र
**गंगाधर देवराव खानोलकर**

# अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक

— द्वितीय खण्ड —

# अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक

## द्वितीय खण्ड

**टिळक बाळ गंगाधर** [१८५६–१९२०] मुत्सद्दि, वैदिक संशोधक, वृत्तपत्रकार. यांचा जन्म रत्नागिरी येथें झाला. यांचें दुय्यम व उच्च शिक्षण पुणें येथें झालें. डेक्कन कॉलेजांतून १८७७ सालीं ते बी. ए. झाले. १८७९ सालीं एल् एल्. बी ची परीक्षा पास होऊन १८८० सालीं त्यानीं पदवी घेतली. या परीक्षेचा अभ्यास करीत असतां त्यानीं हिंदुधर्मशास्त्राचा अभ्यास केला. या शास्त्राचे मुख्य ग्रंथ व त्यांजवरील टीका त्यांनीं अत्यंत सूक्ष्मपणें अभ्यासिलीं. या अभ्यासाचा उपयोग टिळकांना पुढें, सार्वजनिक आयुष्यक्रम स्वीकारल्यावर धार्मिक व सामाजिक वादांत फार झाला. शास्त्रार्थाचे वादांत ते सहसा हार गेले नाहींत याचें कारण हा पूर्ववयांतील अभ्यासच होय. एल् एल्. बी. झाल्यावर वकिलीच्या धंद्यांत न शिरतां, आपण मिळविलेलें ज्ञान जेणेंकरून समाजाच्या उपयोगीं पडेल, असा कांहींतरी उद्योग हातीं घेण्याचें त्यांनीं ठरविलें. त्यांचे विद्यालयीन स्नेही गोपाळराव आगरकर यांच्याशीं त्यांची या बाबतींत बरीच चर्चा होऊन, त्यासंबंधींचा निश्चित विचारहि ठरल्यासारखा होता. याच सुमारास निबंधमालाकार विष्णुशास्त्री सेवानिवृत्त होऊन पुण्यास स्वतंत्र शाळा काढण्याचा विचार करीत होते. टिळक व आगरकर यांस हें कळतांच त्यांनीं शास्त्रीबुवांची गांठ घेतली व ‘ शाळा काढणार असल्यास आपण दोघेहि येऊन मिळूं ’ असें त्यांनीं त्यांस आश्वासन दिलें. शास्त्रीबुवांस अशा तऱ्हेचे नव्या विचारांचे सहकारी पाहिजेच होते. त्यांनीं त्यांचें आनंदानें स्वागत केलें. पूर्वसंकल्पाप्रमाणें शास्त्रीबोवांनीं ता. १ जानेवारी १८८० रोजीं नवी शाळा उघडली. या दिवशीं टिळक शिक्षक म्हणून हजर होते. आगरकर येऊं शकले नाहींत. त्यांचा एम्. ए. चा अभ्यास चालू होता; तो पुरा होतांच ते शाळेस मिळणार होते. शाळा स्थापन झाल्यावर लौकरच एक वर्षानें ‘ केसरी ’ व ‘ मराठा ’ हीं पत्रें सुरू करण्यांत आलीं. आगरकरांकडे

'केसरी' चें व टिळकांकडे 'मराठ्या' चें संपादकत्व देण्यांत आलें. टिळक 'केसरीं' तहि मधून मधून लिहीत. हें त्यांचें लिहिणें बहुधा कायदा व धर्मशास्त्र यासंबंधींचें असे. १८८२ सालीं कोल्हापूरचें बर्वेप्रकरण उपस्थित झालें. या प्रकरणीं केसरी-मराठ्यांत आलेल्या कडक टीकेबद्दल टिळक व आगरकर यांस चार महिन्यांची साध्या कैदेची शिक्षा झाली. या शिक्षेमुळें या दोघांचेंहि नांव सर्वतोमुखीं होऊन ते व त्यांनीं आरंभिलेलें कार्य यासंबंधीं लोकांत आदरभाव उत्पन्न झाला. सामान्य माणसापासून तों राजेरजवाड्यांपर्यंत सर्वांची त्यांस सहानुभूति मिळूं लागली. या सहानुभूतीचा उपयोग संस्थासंवर्धनाकडे त्यांनीं मोठ्या कुशलतेनें करून घेतला. १८८४ सालीं 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी' अस्तित्वांत आली व तिचेतर्फे 'न्यु इंग्लिश स्कूल' चालविण्याचें व एक स्वतंत्र कॉलेज स्थापण्याचें निश्चित करण्यांत आलें. या निश्चयाप्रमाणें ता. २ जानेवारी १८८५ रोजीं फर्ग्युसन कॉलेज उघडण्यांत आलें. कॉलेजांत गणित व संस्कृत हे विषय ते शिकवीत. 'मेघदूत' व भर्तृहरीचें 'नीतिशतक' हीं पुस्तकें मार्मिकपणें शिकविण्यांत त्यांचा मोठा हातखंडा असे.

फर्ग्युसन कॉलेजांत टिळकांनीं १८८५-९० पर्यंत अध्यापनाचें काम केलें. पुढें डेक्कन एज्युकेशन सोसायटीचें धोरण व तिचा कारभार यांसंबंधीं इतर सहकाऱ्यांशीं तीव्र मतभेद झाल्यामुळें त्यांनीं राजिनामा दिला व केसरी-मराठा हीं पत्रें आपल्या ताब्यांत घेऊन स्वतंत्र आयुष्यक्रमास सुरवात केली. हीं पत्रें ताब्यांत घेतांना त्यांस त्यांवर असलेला सात हजार रुपयांच्या कर्जाचा बोजाहि अंगावर घ्यावा लागला. वर्तमानपत्र हें मतप्रसाराचें व सार्वजनिक चळवळीचें उत्कृष्ट, महत्त्वाचें व जोरदार साधन असल्यामुळें हा बोजा आपखुषीनें त्यांनीं स्वीकारला. हा बोजा दूर होण्यास दहा वर्षें लागलीं. एवढया काळांत कुटुंबपोषणाकरितां त्यांस अन्य उद्योग करावा लागला. त्यांनीं कायदेशिक्षणाचा एक वर्ग काढला. या वर्गामध्यें ते हिन्दु कायदा, एव्हिडन्स ॲक्ट, इक्विटी वगैरे विषय शिकवीत. या विषयांपैकीं हिन्दु कायद्यावरील त्यांचीं व्याख्यानें इतकीं उत्कृष्ट होत कीं, गांवांतील तरुण वकीलहि तीं ऐकावयास नित्यनियमानें येत. या कायद्यासंबंधींचें त्यांचें वाचन भरपूर, ताजें व आजतागायत असे. या कायद्याचें एक कलमबंदी सार तयार करण्याचा त्यांचा विचार होता. पण पुढें पुण्यांत १८९७ त प्लेगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळें कायद्याचा वर्ग

बंद पडला. व नवनव्या सार्वजनिक जबाबदाऱ्या आंगावर पडूं लागल्या, त्यामुळें हा विचार तसाच राहिला.

" डेक्कन एज्युकेशन सोसायटींतून सेवानिवृत्त झाल्यावर टिळकांनीं जी पहिली महत्त्वाची सार्वजनिक कामगिरी करून लोकप्रियतेचा ओघ आपल्याकडे वळवून घेतला, ती क्राफर्ड-मामलेदार प्रकरणीं ( १८८८–८९ ) होय. तिनें त्यांच्या उद्योगशीलतेचा पुरावा पुण्याच्या लोकांस पटविला. क्राफर्ड-प्रकरणांत मुख्यतः साहेबमजकूर दोषी असतां ते शिक्षेवांचून सुटले व बिचाऱ्या मामलेदारांवर मात्र बडतर्फी आदळली. हा अन्याय सहन न होऊन त्यांनीं अर्ज लिहून व सभा भरवून मामलेदारांची दाद पार्लमेंटपर्यंत लावून मुंबई सरकारकडून ' मामलेदार्स इंडेम्निटी ' ॲक्ट पास करवून घेतला. १८९१ सालीं संमतिबिलाच्या युद्धप्रसंगीं टिळकांनीं डॉ. भांडारकर प्रभृति पंडितांशीं वाद केला. त्यांत त्यांची कुशाग्रबुद्धि, संस्कृत ग्रंथांचें परिशीलन व वादविवादाची उत्कृष्ट हातोटी लोकनिदर्शनास आली. ' संमतीचें वय ' वाढविण्यास तात्त्विक व नैतिक दृष्ट्या टिळकांची संमति होती. पण ते व सुधारक मंडळी यांच्यांतील वादाचा मुख्य मुद्दा सरकारनें धार्मिक विषयांत हात घालूं नये, सुधारणा इष्ट असली तरी ती लोकमतानें घडवून आणावी एवढाच होता. या वादामुळेंच टिळकांचें नांव मुंबई इलाख्याबाहेर प्रथम प्रसिद्धीस आलें. १८९२–९४ या सालीं हिंदु–मुसलमान लोकांमधील तंटे विकोपास गेले. या प्रसंगीं खरा दोष वास्तविक सरकारी अधिकाऱ्यांकडे असून त्यांच्या चिथावणी-मुळें मुसलमान लोक दुराग्रह धरितात हें मत सर्व लोकांना मान्य होतें, व केवळ मुसलमानांचीं मनें बिथरतील म्हणून हिंदूंच्या सभा वगैरे भरवूं नये, असें म्हणणें चूक असें टिळकांचें मत होतें. टिळकांनीं केलेल्या त्यावेळच्या उद्योगामुळें, विशेषतः त्यांनीं प्रसिद्ध केलेल्या कांहीं सरकारी कागदपत्रांमुळें, सरकारचा पक्षपात चव्हाट्यावर आला; आणि बिचाऱ्या हिंदु लोकांना आपला कोणीतरी वाली आहे असें कळून आलें. गणपत्युत्सवाचें मूळ हिंदु-मुसलमानांच्या तंट्यांत होतें हें म्हणणें क्षणभर खरें म्हणून घेऊन चाललें तरी उत्सवाच्या मुळाशीं योग्य प्रकारचा हिंदुत्वाचा स्वाभिमानहि होता. शिवाय मुसलमानांचीं मनें दुखविलीं गेलीं हें वर्णन तेव्हां थोडेंबहुत खरें असलें तरी, त्यावेळीं टिळकांनीं स्वीकारलेलें धोरण मुसलमानांपेक्षां सरकाराविरुद्धच अधिक होतें आणि तें योग्यहि होतें अशी

कबुली अलीकडे मुसलमान पुढाऱ्यांनीं उघड दिली असून, त्यायोगानें टिळकां-वरील पूर्वीच्या काल्पनिक दोषारोपांचें परस्पर खंडन झालें आहे. अफझुल-खानवधासंबंधीं अशीच गोष्ट आहे. त्या वादांत टिळकांनीं स्वीकारलेला पक्ष राष्ट्र या नात्यानें मराठ्यांच्या स्वाभिमानाला योग्य असाच होता. प्रो. करकेरिया वगैरे तिऱ्हाईत पार्शी इतिहासकारांनीं याच पक्षाला पुष्टि दिली होती, व अलीकडे स्वतः इंग्रज इतिहासज्ञ लोकहि किंचित् निःपक्षपात दृष्टीनें पाहूं लागल्याबरोबर त्यांनाहि शिवाजीची तरफदारी करावी लागली, हें किंकेड, रॉलिन्सन प्रभृतींच्या लेखांवरून ध्यानांत येण्यासारखें आहे."

"१८९४ सालीं सुप्रसिद्ध बापट–कमिशन–प्रकरणांत ब्रिटिश सरकारचा प्रत्यक्ष संबंध नव्हता. तथापि हें कमिशन नेमून बापटांचें पारिपत्य करण्याबरोबरच खुद्द बडोदाधिपति सयाजीराव यांच्यावर कोणास काय शिंतोडे उडवावयाचे होते व पोलिटिकलखात्याला आपला हात कसा साधून घ्यावयाचा होता या गोष्टी इकडे लोकांना फारशा माहीत नाहींत. पण बापटांना फरारी होणें कसें भाग पडलें, टिळक व वासुदेवराव जोशी ( चित्रशाळा छापखान्याचे मालक ) यांनीं धोका सोसून बडोद्यास ठाणें मांडून बापटांना कसें सहाय्य केलें व त्यांत अप्रत्यक्षरीत्या महाराजांचा बचाव कसा झाला, टिळकांनीं रात्रीचा दिवस करून बापटांचे वकील रा. खरे वगैरेंना बिनमोल सहाय्य कसें केलें, व प्रतिपक्षी फेरोजशहा मेथा वगैरे वकीलांचा पाडाव कसा केला या गोष्टींचा कोणी इतिहास लिहिल्यास खरोखरच तो मोठा मनोरंजक होईल. मित्रकार्याकरितां झीज सोसण्याचे टिळकांचे गुण बाबामहाराजप्रकरणीं पुढें जे दिसून आले त्याचा आगाऊ पुरावा बापट–कमिश-नच्या इतिहासांत मिळण्यासारखा आहे."

"१८९५ सालापूर्वीच टिळकांची कामगिरी महाराष्ट्राला इतकी पसंत पडली होती कीं, मध्यभागाला कायदेकौन्सिलांत निवडणुकीची एक जागा मिळतांच ती मतदारांनीं टिळकांना मिळवून दिली, व फिरून दोन वर्षांनंतर नवीन निवडणूक आली तेव्हांहि त्यांनीं टिळकांनाच निवडलें. १८९७ सालीं प्लेगमुळें, विशेषतः प्लेगनिवारक जुलमी उपायामुळें, लोक व सरकार यांच्यामध्यें जें भांडण जुंपलें त्यांत तक्रारीपणाचा पहिला मान पुण्यानें मिळविला. यावेळीं टिळकांनीं केलेली लोकसेवा बरीचशी विधायकहि होती व त्यांच्या प्रयत्नानें खासगी प्लेगइस्पितळें

वगैरे निघून झडत्या वगैरेचा जाच कमी झाला. टिळकांची लोकसेवा नेहमीं विकृत करून दाखविण्याची सरकारास खोड होती, त्याप्रमाणें रँडसाहेबांच्या खुनाची जबाबदारी त्यानें टिळकांच्या चळवळीवर लादण्याचा प्रयत्न केला. पण अखेर पोलीसखात्याकडूनच त्याचें परस्पर निराकरण झालें! रँडच्या मागून पुण्यांत लोकांचें मन सांभाळून प्लेगचा कारभार करण्याचें नवीन धोरण अमलांत तर आलेंच, पण मुंबईस व इतर ठिकाणीं आणखी मारामाऱ्या झाल्यावर टिळकांनीं केलेली तक्रार योग्य असून आपल्या कारभाराचें धोरण खरोखरच सदोष आहे ही गोष्ट सरकारास मान्य करावी लागली, व त्यापुढें प्लेगप्रतिबंधक उपायांच्या नांवानें जुलमी कृत्यें करण्याचें सर्वस्वी बंद झालें. सरकारची चूक पुढें खरी ठरो, पण १८९७ सालीं टिळकांवर झालेल्या खटल्यामुळें त्यांना एक वर्ष तुरुंगवास मात्र नाहक भोगावा लागला; व अखेर प्रो. मॅक्समुल्लर प्रभृतींच्या मध्यस्थीनें त्यांची सुटका झाली. हिंदुस्थानांत राजद्रोहाचा महत्त्वाचा असा हा पहिलाच खटला होय. त्यानें टिळकांबद्दल सर्व हिंदुस्थानभर सहानुभूति उत्पन्न केली, त्यांच्याकरितां परस्पर फंड जमा झाले, मुंबईचे व्यापारी त्यांना जामीन राहिले, कलकत्त्यास जमलेल्या वर्गणीनें रवाना झालेल्या बॅरिस्टरांनीं त्याचा डिफेन्स दिला, सरकारला राजद्रोहाच्या कायद्याची भाषा दुरुस्त करावी लागून स्वतःस सर्व जनतेकडून अन्यायी व खुनशी म्हणवून घ्यावें लागलें; अशा रीतीनें या प्रकरणांतील नैतिक विजय टिळकांनाच लाभला." [ न. चिं. केळकर, लो. टिळकांचें पुण्यस्मरण, पृष्ठ ७८–८० ].

टिळकांचें यापुढील आयुष्य लोकांची बाजू घेऊन सरकारशीं व त्याच्या हातास हात लावून, स्वकीयांच्या कल्याणावर निखारा ठेऊन स्वतःची पोळी पिकवून घेणाऱ्या स्वार्थसाधु स्वदेशियांशीं अविरत झगडण्यांत गेलें. १८९५ पासून राष्ट्रीय सभेंत ते प्रत्यक्ष काम करूं लागले होते. लंबीं लंबीं भाषणें व प्रत्यक्ष कृतींत कधींहि न उतरले जाणारे ठराव पास करणाऱ्या या सभेचीं सर्व सूत्रें आपल्या पक्षाच्या हातांत त्यांनीं युक्तीयुक्तीनें आणून तिच्यांत सरकारला वचक बसेल असें सामर्थ्य आणलें.

१९०५ मध्यें वंगभंगाविरुद्ध सुरू झालेल्या चळवळीला टिळकांनीं जोराचा पाठिंबा दिला व त्या संधीचा फायदा घेऊन देशांत निर्भेळ स्वातंत्र्याची तीव्र लालसा उत्पन्न केली, स्वदेशी, स्वराज्य, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या चतुःसूत्रीची घोषणा

त्यांनीं आसेतुहिमाचल केली व साऱ्या देशाला खडबडून जागें केलें. याचा परिणाम, त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला ( १९०८ ) उभारण्यांत झाला. हा खटला वकील न देतां टिळकांनीं स्वतः चालविला. यांत त्यांना सहा वर्षांची शिक्षा झाली. या शिक्षेमुळें त्यांची लोकप्रियता सर्व हिंदुस्थानभर विलक्षण वाढली.

टिळकांना शिक्षेचीं सहा वर्षें मंडालेच्या कारागृहांत काढावीं लागलीं. या सहा वर्षांचा उपयोग त्यांनीं ग्रंथलेखन व अध्ययन यांकडे केला. 'गीतारहस्य' हा त्यांचा विद्वन्मान्य ग्रंथ याच कारागृहांत लिहिला गेला.

१९१४ सालीं त्यांची मंडालेहून सुटका झाली. सुटकेनंतर स्वस्थ न बसतां त्यांनीं आपल्या पक्षाची पुनर्घटना करून, १९१६ सालीं राष्ट्रीय सभेंत प्रवेश केला व तिला आपल्या पक्षाची करून होमरूलची चळवळ धडाडीनें सुरू केली. याच सालीं त्यांचीं वयाचीं साठ वर्षें संपून त्यांस ६१ वें वर्ष लागल्यामुळें लोकांनीं त्यांचा हीरकोत्सव साजरा केला. व एक लाख रुपयांची थैली त्यांस अर्पण केली. पण या थैलींतील एक पैलाहि न शिवतां तिचा उपयोग राष्ट्रकार्याप्रीत्यर्थ करण्याचें त्यांनीं जाहीर केलें.

१९१८ सालीं मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणांचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला. या रिपोर्टांत सुचविलेल्या सुधारणा निराशाजनक, अपुऱ्या व असमाधानकारक आहेत असें त्यांनीं आपलें स्पष्ट मत प्रसिद्ध केलें व त्याचप्रमाणें १९१९ त अमृतसर येथें भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनांत तशा अर्थाचा ठरावहि त्यांनीं पास करून घेतला. मात्र या सुधारणांवर बहिष्कार घालावा अशा मताचे मात्र ते नव्हते. याच वर्षी सर व्हॅलेंटाइन चिरोल यानें 'इंडियन अन्रेस्ट' या पुस्तकांत स्वतःविषयीं लिहिलेल्या अब्रूनुकसानकारक मजकुराबद्दल त्याजवर खटला करण्यासाठीं टिळक विलायतेस गेले. हा खटला त्यांचे विरुद्ध गेला व त्यांस चिरोलचा सर्व खर्च भरून द्यावा लागला. विलायतेंत असतां त्यांनीं उदयोन्मुख हिंदुस्थानच्या आकांक्षा तेथील लोकांसमोर स्पष्टपणें मांडल्या व तेथील जनमत अनुकूल करून घेण्याचा बराच खटाटोप केला. विलायतेहून परत आल्यावर १९२० सालीं नव्या सुधारणांचा फायदा घेऊन अधिक सुधारणा मिळविण्याच्या हेतूनें 'कॉंग्रेस डेमोक्रॅटिक' पक्षाची स्थापना केली व कार्यक्रमहि आंखला. पण पुढें एकाएकीं त्यांची प्रकृति बिघडली व ता. १ ऑगस्ट १९२० रोजीं मुंबईस त्यांचें देहावसान झालें.

# टिळक बाळ गंगाधर

महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासांत एक थोर मुत्सद्दी म्हणून टिळकांचें नांव जितक्या प्रामुख्यानें झळकेल, तितक्याच प्रामुख्यानें महाराष्ट्राच्या वाङ्मयेतिहासांतहि एक थोर पंडित म्हणून त्यांचें नांव झळकेल. ग्रंथ असे त्यानीं तीनच लिहिले, व त्यांतील दोन इंग्रजींत. पण या तिन्ही ग्रंथांनीं आंतर्राष्ट्रीय लौकिक संपादिला. मराठ्यांची बुद्धिमत्ता राजकारणाप्रमाणेंच विद्येच्या क्षेत्रांतहि अत्यंत प्रभावी आहे याची साक्ष या तीन ग्रंथांनीं जगाला पटवून दिली.

टिळक केवळ परिस्थितीमुळें राजकारणांत ओढले गेले. तसे ते ओढले गेले नसते तर त्यांचें सर्व आयुष्य विद्याव्यासंगांत व शास्त्रसंशोधनांत गेलें असतें. त्यांची खरी आवड व त्यांचा खरा आनंद ग्रंथाध्ययनांत होता. " माझ्या मनाची खरी हौस पाहिली तर प्रोफेसर होऊन ग्रंथ लिहिण्याची; मी केवळ परिस्थितीच्या जुलमानें राजकारणात पडलों व संपादक बनलों, ' असे उद्गार टिळक आपल्या अंतेवासियांकडे अनेकदां काढीत. ही हौस, राजकारणाच्या धुमाळींतहि थोडीशी जरी फुरसत मिळाली तरी ते पुरवून घेत. प्रसिद्ध जर्मन पंडित मॅक्समुल्लर यास लिहिलेल्या एका पत्रांत आपण आपला फुरसतीचा वेळ प्राचीन वैदिक संस्कृति व वाङ्मय यांच्या संशोधनांत घालवितों असें त्यांनीं म्हटलें आहे. " हें त्यांचें विधान प्रत्यक्ष अनुभविण्याची संधि त्यांचा निकट परिचय असलेल्या पुष्कळ लोकांस पूर्वी आलेली आहे. इकडे राजकारणांत अटीतटीचा सामना चाललेला असावा, एखादें स्थानिक भांडण हातघाईवर आलेलें असावें, घरींदारीं चळवळीची दंगल चालू असावी, बाहेरच्या दालनांत हमरीतुमरीचे वाद सुरू असावे, अशाहि स्थितींत एखादे वेळीं आंतल्या दालनांत टिळक आरामखुर्चीवर पडून हातांत एखादें वेदविद्याविषयक, किंवा जुना खाल्डिया, असीरिया, इराण यासंबंधीचें पुस्तक घेऊन तें वाचण्यात इतके गढून गेलेले असावे कीं, बाहेर चाललेल्या वादाची त्यांस दादहि नसावी, किंवा कोणी त्याना हाक मारली तरी तिकडे त्यांचें लक्षच जाऊं नये. " ( न. चिं. केळकर, टिळकचरित्र खण्ड १, पृष्ठ ६२६)

टिळकांनीं हौस म्हणून चालविलेल्या व्यासंगाचीं फळें ' ओरायन, ' ' आर्टिक होम इन् दी वेदाज् ' व ' गीतारहस्य हे तीन ग्रंथ होत. पहिल्या दोन ग्रंथांत वेदकालनिर्णय व आर्यांचें मूल वसतिस्थान यांसंबंधींची चर्चा केली असून, तिसऱ्या ग्रंथांत निष्कामकर्मयोगाचें तत्त्व प्रतिपादिलें आहे. या तिन्ही ग्रंथांनीं विचारक्षेत्रांत

विलक्षण खळबळ उडवून दिली. या तीन ग्रंथांखेरीज ' ए मिसिंग व्हर्स इन् सांख्यकारिका ' हें छोटें पुस्तक व खाल्डियन लोक व वेदांगज्योतिष यांवरील त्यांचे निबंध प्रसिद्ध आहेत.

टिळकांनीं ' गीतारहस्या 'खेरीज इतर ग्रंथ इंग्रजींत लिहिले असल्यामुळें त्यांचें येथें विवेचन न करतां, मराठींत त्यांचें जेवढें लेखन झालें त्याचेंच करणें इष्ट. टिळकाचें लेखन दोन प्रकारचें झालें. एक ग्रंथलेखन व दुसरें वृत्तपत्रीय लेखन. या दोन्हींचा स्वतंत्रपणें विचार करावयास हवा.

**गीतारहस्य**—टिळकांना राजद्रोहाच्या आरोपावरून १९०८ सालीं शिक्षा होऊन, त्यांची ब्रह्मदेशांत मंडालेच्या तुरुंगांत रवानगी झाली. या ठिकाणीं असतां या ग्रंथलेखनाविषयींची योजना त्यांच्या डोक्यांत घोळूं लागली. गीतेचें अध्ययन त्यांचें पुष्कळ वर्षांपासूनचें होतें. तिजवरील संस्कृत भाष्यें, टीका, व मराठी व इंग्रजींतील विवेचनपर ग्रंथ त्यांनीं बारकाईनें वाचून काढले होते. या वाचनानंतर गीता निवृत्तिपर नसून कर्मयोगपर आहे अशी त्यांची ठाम समजूत झाली. या समजुतीस इतरत्र कोठें पाठिंबा मिळतो किंवा काय हें पाहण्यासाठीं त्यांनीं महाभारत, वेदान्तसूत्रें, उपनिषदें आणि वेदान्तशास्त्रावरील महत्त्वाचे संस्कृत व इंग्रजी ग्रंथ अवलोकिले. या अवलोकनानंतरहि त्यांची ही समजूत अधिकच दृढ झाली. या संबंधींचा ऊहापोह व्हावा या हेतूनें त्यांनीं चारपांच ठिकाणीं व्याख्यानें दिलीं व कांहीं विद्वानांशीं वादविवाद केला. या विषयासंबंधींचे आपले विचार सुव्यवस्थित रितीनें लिहून काढण्याचा त्यांचा बरेच दिवसांचा मानस होता. पण सार्वजनिक उद्योगाच्या व्यापामुळें त्यांस ग्रंथलेखनास आवश्यक असलेलें स्वास्थ्य मिळूं शकलें नाहीं. हें स्वास्थ्य सहा वर्षांच्या तुरुंगवासाच्या द्वारा त्यांस मिळतांच गीतेवरील ग्रंथ लिहिण्याचें काम हातीं घेण्याचें त्यांनीं ठरविलें. १९१०–११ च्या हिंवाळ्यांत या ग्रंथाचा कच्चा खर्डा त्यांनीं तयार केला व पुढें जसजसे विचार सुचतील तसतशा त्यांत सुधारणा करून, १९१४ सालीं तुरुंगांतून सुटका होतांच आवश्यक साधनें नीट अभ्यासून त्याला व्यवस्थित स्वरूप दिलें व तो १९१५ त प्रसिद्ध केला.

गीतारहस्यानें नव्या व जुन्या विचारसरणीच्या लोकांत विलक्षण खळबळ उडवून दिली. आजवर कोणत्याहि मराठी ग्रंथावर झाल्या नाहींत एवढया टीका, प्रतिटीका व प्रशंसा या ग्रंथावर झाल्या. प्रतिकूल टीका पुष्कळच झाल्या. प्रतिकूल

टीका करणाऱ्यांत पुराणमताभिमानी तसेच सुधारकहि होते. पूर्वाचार्यांचे सिद्धान्त खोडून काढले म्हणून पूर्वोक्त लोक संतापले, तर उत्तरोक्त लोक टिळक विरुद्ध पक्षाचे असल्यामुळें ' नावडतीचें मीठ अळणी ' या न्यायानें नाक मुरडूं लागले. या ग्रंथावर पक्षभेदातीत अशी उच्च भूमिका स्वीकारून फारच थोड्या विद्वानांनीं व्यासंगपूर्वक समतोल अशी टीका केली.

मराठी तत्त्वज्ञानपर वाङ्मयांत गीतारहस्य हा ग्रंथ अपूर्व आहे. "ही अपूर्वता तीन प्रकारची आहे. पहिली अपूर्वता ही कीं भगवद्गीतेचें निरूपण पौराणिक अशा प्रश्नोत्तरपद्धतीचें असल्यानें, त्यांतील पूर्वापार संबंध व अर्थ नित्य-पाठकांच्याहि लक्षांत येत नाहीं, तो संबंध व अर्थ एका बाजूनें शास्त्रीय पद्धतीच्या निरूपणानें व दुसऱ्या बाजूनें अध्यायसंगतीनें स्पष्ट झाला आहे. या दोन्ही भागांतून उरलेली संदिग्धता, श्लोकवार भाषांतर शेवटीं दिलें आहे, त्यानें नाहींशी झाली आहे. दुसरी अपूर्वता ही कीं, शास्त्रीय पद्धतीच्या निरूपणांत प्राचीन, व अर्वाचीन पाश्चात्य, धर्म व नीति यांचीं आधारभूत तत्त्वें जमेस धरून त्यांहून गीतेंतील धर्म व नीति यांची तत्त्वें कोणत्याहि दृष्टीनें हार जाणार नाहींत हें सकारण व सोदाहरण सिद्ध केलें आहे. हा भाग जितका प्रबोधक आहे तितकाच मनोरंजकहि आहे. पण तो काळजीनें वाचला पाहिजे. बहुश्रुत, बव्हधीन वाचकासहि यांतील पुष्कळशी माहिती नवीनच वाटेल. नावानें निर्दिष्ट केलेल्या ग्रंथांतील पूर्वापार-संबंध पाहून मनन करण्याचा कोणी निश्चय करील, तर तो जसजसे ग्रंथ पाहात जाईल, तसतशी गीतारहस्यकारांच्या दांडग्या अध्ययनाची, अचूक स्मृतीची विषयोपन्यास करण्याच्या अप्रतिम शैलीची त्यास साक्ष पटत जाईल. ग्रंथ वाचीत असतां असा भास होतो कीं, एखादा कायदेपंडित आपलें मुद्देसूद, सर्वांगांनीं पूर्ण केलेलें भाषण आवेशानें मेजावर हात आपटून करीत आहे कीं काय? इतक्या लांब व आवेश-युक्त प्रवचनांत विस्मृतीनें कांहीं अल्पस्वल्प दोष राहिले नसतील असें थोडेंच! क्वचित् अजाणतां व क्वचित् जाणतांहि औपरोधिक उद्गार निघाले आहेत, ते इतके थोडे आहेत म्हणून नवल वाटतें! स्वभाव दुरतिक्रम आहे हें समचित्तटीकाकारांनीं विसरतां कामा नये. या ग्रंथांतील तिसरी अपूर्वता ही आहे कीं, ब्रह्मनिरूपणाचा विषय रूक्ष, निद्रेस आव्हान करणारा, असा असून हा ग्रंथ कादंबरीसारखा मनोरंजक झाला आहे. ज्ञानेश्वरी दृष्टांतांनीं सुबोध व मनोरंजक झाली आहे. पण प्रकृत ग्रंथांत दृष्टांताचें बहुतेक नांवच नाहीं. वाटेवर या असें न्यायाधिश म्हणतील या भीतीनें

चतुर वकील पुराव्यानें. सिद्ध झालेल्या किंवा प्रतिपक्षानें कबूल जबानींत मान्य केलेल्या गोष्टींवरच भिस्त ठेवून भाषण रचितो, त्याप्रमाणेंच या ग्रंथाची रचना आहे. म्हणून हा ग्रंथ मराठी वाङ्मयांत लेखनकौशल्याचा अपूर्व मासला वाटतो. (वि. मो. महाजनि, विविध-ज्ञानविस्तार, जानेवारी १९३६ ).

**केसरींतील लेख**—वृत्तपत्रांच्या संपादकाची लेखणी नेहमींच सर्वसंचारी असावी लागते. देशाच्या हितानहिताशीं संबद्ध असलेल्या सर्व विषयांत मन घालून, त्याला आपलें मत द्यावें लागत असतें. निदान हिंदुस्थानांतील संपादकांची तरी स्थिति अशी आहे. विलायतेंत, वृत्तपत्राचा मुख्य संपादक पत्राची मांडणी व त्यांत येणारे लेख ठरलेल्या धोरणानुसार आहेत कीं नाहीं एवढेंच पाहतो. क्वचित् आपल्या आवडत्या विषयावर अग्रलेखहि लिहीत असतो. पण सर्व विषयांवर तो लिहीत नाहीं. अग्रलेख लिहिणारें जें सहसंपादकमण्डळ असतें, त्यांत भिन्न भिन्न विषयांतील तज्ज्ञ असतात. त्यांतील त्या त्या विषयाच्या तज्ज्ञाकडून तो अग्रलेख लिहून घेतो. आंतरराष्ट्रीय राजकारण, आर्थिक उलाढाली, साहित्य, संगीत, कला वगैरे संबंधींच्या चळवळीवरील लेख एकाच व्यक्तीच्या लेखणींतून बाहेर पडलेले सहसा आढळत नाहींत. असें संपादकमण्डळ असण्याइतकी संपन्न स्थिति, देशी भाषांतील वृत्तपत्रांची सहसा नसल्यामुळें मुख्य संपादकाला आपली बुद्धि सर्वगामी बनवावी लागते. टिळकहि त्याला अपवाद नाहींत. केसरींतील लेखांपैकीं तीन चतुर्थांश लेख राजकीय असले तरी एक चतुर्थांश संकीर्ण लेखांत समाज, धर्म, तत्त्वज्ञान, चरित्र, काव्य, भाषा, संशोधन, शिक्षण अशा भिन्न भिन्न विषयांवर त्यांनीं वेळोवेळीं लिहिलेले लेख आढळतील. आणि या प्रत्येकांत त्यांचें स्वतःचें असें निश्चित मत प्रगट झालेलें दिसेल. टिळकांची ग्रंथपरीक्षणाची पद्धत तर अलीकडील धांवऱ्या व चावऱ्या वृत्तीच्या संपादकांनीं व पुस्तकपरीक्षणकारांनीं आदर्श म्हणून पुढें ठेवण्याजोगी आहे. त्यांची परीक्षणाची पद्धत पुढीलप्रमाणें आढळते. परिचय, चर्चा, गुणदोषदिग्दर्शन व मार्गदर्शन. पहिल्यानें पुस्तकांतील विषयाची ओळख करून द्यावयाची, तदनंतर त्या विषयाचें महत्त्व कितपत आहे याची सांगोपांग चर्चा करून त्याला अनुसरून मांडणी कशी झाली आहे, त्यांत गुण कोणते व दोष कोणते हें दाखवून, आपल्याला स्वतःला साकल्यानें त्या विषयाबद्दल काय वाटतें व त्यासंबंधीं अधिक संशो-

घन, संस्करण वा अभ्यास होणें आवश्यक असल्यास कोणत्या मार्गानें व्हावयास पाहिजे याचें स्पष्ट दिग्दर्शन करावयाचें, असें त्यांच्या परीक्षणात्मक लेखांचें स्वरूप आढळतें. उदाहरणार्थ, 'अबलोन्नति लेखमाला, 'ब्राह्मण आणि त्यांची विद्या,' प्रो. रानडे यांचा 'नवा इंग्रजी व मराठी कोश'' 'महाभारत,' 'बाणभट्ट व श्रीहर्ष' हे लेख पहा. हे लेख त्या त्या ग्रंथकारांनाच नव्हे, तर तशा तऱ्हेचे ग्रंथ भावी काळांत लिहिणाऱ्या ग्रंथकारांनाहि त्या त्या विषयाचा अभ्यास करण्याची नवी दिशा दाखविण्याइतक्या योग्यतेचे वठले आहेत. टिळकांनीं लिहिलेल्या राजकीय लेखांचा प्रकार मात्र याहून भिन्न आहे. राजकीयेतर लेखांत, दोन्ही पक्षांचा पूर्वग्रहविमुक्त अशा मनानें विचार करून शांतपणें निर्णय लिहिणाऱ्या न्यायाधिशाप्रमाणें भासणारे टिळक, राजकीय लेखांत आपाततः निराळ्या स्वरुपांत दिसूं लागतात. प्रतिपक्षाला हाणून पाडून, किंबहुना त्याचें निर्मूलन करून, स्वपक्ष दृढमूल व विजयी करावयाचा या एकाच हेतूनें प्रेरित होऊन जालिमांतील जालीम शस्त्रास्त्रांनीं सज्ज होऊन लढणाऱ्या योद्धयाप्रमाणें ते या लेखांत भासतात. प्रतिपक्षाची विचारसरणी वाचकांसमोर ते या लेखांत ठेवितात, पण ती गुणग्रहणाकरिता किंवा प्रशंसेकरितां नव्हे, तर प्रहार करून तिच्या चिंधड्या उडविण्याकरितां. त्यांचा पक्षाभिनिवेश कांहीं कांहीं वेळां इतका प्रखर झालेला दिसतो कीं त्यांत प्रतिपक्षाचें वय, त्याची विद्वत्ता किंवा विभूतिमत्व लक्षांत आणून त्याचेसंबंधीं ठेवावयाची आदरभावनाहि पार जळून गेलेली दिसते. राजकीय लेखांपैकीं जे तात्त्विक स्वरूपाचे असे लेख आहेत त्यांचें वळण वेगळ्या तऱ्हेचें आहे. राजकीय शिक्षकाच्या भूमिकेवर उभें राहून जितकें तर्कशुद्ध, सुबोध, हृदयाला भिडणारें व बुद्धीला जागृत करणारें असें लिहितां येईल तितकें लिहिण्याचा त्यांनीं अशा लेखात आटोकाट प्रयत्न केला आहे.

टिळकांनीं हातांत लेखणी घेतली ती वाङ्मयसेवेच्या हेतूनें कधीं घेतली नाहीं; राजकीय कर्तव्याचा एक महत्त्वाचा भाग म्हणून घेतली. आणि अंतःकरणांतून कळकळीनें जें जें निघालें तें कळकळीनें कागदावर टिपलें. आपल्या भाषेला नटविण्याचा, सजविण्याचा मुद्दाम म्हणून त्यांनीं कधीं प्रयत्न केला नाहीं. यामुळें त्यांच्या लेखनांत चिपळुणकरांच्या लेखनांतील डौल, आगरकरांच्या लेखनांतील सौष्ठव, शिवरामपंत परांजप्यांच्या लेखनांतील कल्पनेची भरारी हीं आढळणार नाहींत; पण या तिघांहिपेक्षां पांडित्य, तर्कशुद्धता व ओज हीं मात्र

निःसंशय अधिक आहेत. निश्चयीपणा, ठसठशीतपणा व सुबोध विवेचन हे त्यांच्या भाषेचे विशेष होत. लेखांवर मथळ्यांची व सुभाषितांची मार्मिक योजना करण्यांत टिळकांचा हातखंडा असे.

टिळकाचें बरेंचसें लेखन प्रासंगिक असलें तरी एका विशिष्ट विचारसरणीचे ते प्रमुख प्रतिपादक असल्यामुळें त्याला, वाङ्मयिक नाहीं, तरी ऐतिहासिक महत्त्व फार आहे.

**टिळकांचें वाङ्मयः—**

( १ ) वेदकालनिर्णय. १९०८
( २ ) आर्यलोकांचें मूलस्थान, १९१०
( ३ ) गीतारहस्य, १९१५ जून, १९१५ सप्टेंबर, १९१८, १९२३
( ४ ) लो. टिळकांचे केसरींतील लेख, खंड १; १९२२
( ५ ) लो. टिळकांचे केसरींतील लेख, खंड २; १९२४
( ६ ) लो. टिळकांचे केसरींतील लेख, खंड ३; १९२६
( ७ ) लो. टिळकाचे केसरींतील लेख, खंड ४; १९३०
( ८ ) मद्रास, सीलोन व ब्रह्मदेश येथील प्रवास १९००, १९१०
( ९ ) स्वराज्यावरील मोहीम, ( व्याख्यानें ) भाग १ ते ४ प्रकाशकः— अ. ह. गद्रे.
( १० ) टिळक-सूक्तिसंग्रह, १९२६
( ११ ) हिंदुधर्माचें स्वरूपलक्षण, १९२८

**चरित्र, चर्चा, अभ्यासः—**

( १ ) लोकमान्य टिळक यांचें चरित्र, खण्ड १, २, ३, न. चिं. केळकर, १९२३, १९२८
( २ ) लो. बाळ गंगाधर टिळक चरित्र, केशव बाबाजी सहस्रबुद्धे १८९७
( ३ ) लो. बाळ गंगाधर टिळक चरित्र, कृष्णाजी आबाजी गुरुजी, १९०६
( ४ ) लो. बाळ गंगाधर टिळक चरित्र, सीताराम केशव दामले, १९०८
( ५ ) गेलीं आठ वर्षे, आप्पाजी विष्णु कुळकर्णी, १९०९
( ६ ) लो. बाळ गंगाधर टिळक चरित्र आणि संस्मरणीय उक्ति, ल. रा. पांगारकर, १९०९

( ७ ) लोकमान्य बा. गं. टिळक चरित्र; गं. कृ. लेले व वा. त्र्यं. आपटे, १९२१
( ८ ) लो. बाळ गंगाधर टिळक चरित्र, दा. ग. पाध्ये, १९२१
( ९ ) लो. टिळक, व्यक्ति कामगिरी व शिकवण. अ. वा. मराठे १९३३.
( १० ) टिळक-जीवन-रहस्य, बा. मा. आंबेकर.
( ११ ) लो. बाळ गंगाधर टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका; खंड १–२ संग्राहक–स. वि. बापट. १९२४-१९२५
( १२ ) गीतारहस्यावर टीकात्मक निबंध, वा. रा. कोठारी १९१५
( १३ ) गीताधर्म अर्थात रहस्यखण्डन, यशवंत व्यंकटेश कोल्हटकर १९१६
( १४ ) गीतारहस्य-निरीक्षण, 'गोविंदसुत' १९१७
( १५ ) गीता भाष्यार्थ–रहस्य-निरीक्षण, विष्णुशास्त्री बापट. १९२१
( १६ ) तुल्यं तु दर्शनम् अर्थात् गीतारहस्यनिर्णय, 'महाराष्ट्रीय' १९२२
( १७ ) गीतारहस्यावरील टीकाकार,; चर्चा, आचार्य पाक्षिक वर्ष २ रें; पृष्ठ १६९ ते १७६, १८५ ते १९२, २१२ ते २१४, २२६ ते २३१, २४० ते २४३. १९१५
( १८ ) टिळकांचें भगवद्गीतारहस्य, चिं. वि. वैद्य, लोकशिक्षण ( जुनें ), वर्ष ३ अंक ११ सन १९१५
( १९ ) टिळकांचें कर्मयोगशास्त्र व प्रार्थनासमाजाची दृष्टि–सुबोधपत्रिका, १३ जून १९१५
( २० ) गीतारहस्य-निरीक्षण, प्रो. वि. गो. विजापूरकर, नवयुग, वर्ष २ रें, अंक १०, सन १९१५
( २१ ) जनहितवादावरील टिळकांची टीका, वा. म. जोशी, नवयुग, वर्ष २, अंक १०, सन १९१५
( २२ ) गीतारहस्य-परीक्षण, वि. गो. महाजनि, विविधज्ञानविस्तार, पुस्तक ४७, अंक १, २, ३; सन १९१६
( २३ ) श्रीशंकराचार्य व रहस्यकार, श्री. कृ. बेलवलकर, विविधज्ञानविस्तार पुस्तक ४९ अंक १–२ सन १९१८
( २४ ) श्रीशंकराचार्य व रहस्यकार टिळक, विविधज्ञानविस्तार, पुस्तक ४९, अंक २, सन १९१८

(२५) रहस्यनिरीक्षण-' महाराष्ट्रीय ', विविधज्ञानविस्तार, पुस्तक ४९, अंक १०, सन १९१८

(२६) ' कर्मयोगो विशिष्यते, ' चिं. वि. वैद्य, विविधज्ञानविस्तार, पुस्तक ४९ अंक ४ सन १९१८

(२७) गीतारहस्याचें परीक्षण, ग. कृ. खापर्डे, चित्रमयजगत्, ऑगस्ट १९१५

(२८) लो. टिळकांच्या गीतारहस्याचें महत्त्व, चिं. वि. वैद्य, चित्रमयजगत्, जानेवारी १९१६

(२९) रहस्य-सिद्धांत-मंडन, कृष्णशास्त्री घुले, चित्रमयजगत्, सप्टेंबर १९१६

(३०) गीतारहस्याचे टीकाकार—बा. गं. टिळक, केसरी २६ आक्टोबर, १९१५

(३१) कर्मयोग कीं कर्मसंन्यास; शं. दा. पेंडसे, केसरी, अंक २९ ते ३२; सन १९२१

(३२) गीतारहस्य व टीकाकार; म. म. जोशी; केसरी अंक ३१, ३३, ३४; सन १९२२

(३३) भगवान शंकराचार्य व लोकमान्य रहस्यकार, ग. ह. कुळकर्णी, उद्यान; फेब्रुवारी १९१९

(३४) बाळ गंगाधर टिळकांचा जयजयकार, शं. ग. पुरोहित, १९०८

(३५) लो. टिळकांचा स्वर्गीय संदेश, ल. ना. जोशी १९२१

(३६) लो. टिळकांची वेदविषयक कामगिरी, के. ल. ओगले १९२४

(३७) लो. टिळकांचीं धर्मविषयक मतें १९२५

(३८) लो. टिळकांची भाषाशैली, ग. वि. केतकर १९३१

(३९) लो. टिळकांचें पुण्यस्मरण, न. चिं. केळकर १९२७

(४०) लो. बा. गं. टिळक, व. ना. नाईक, नवयुग, जुलै १९२०

(४१) आचार्य टिळकांची विद्वत्ता, प्रो. अ. बा. गजेंद्रगडकर, नवयुग, ऑगस्ट १९२०

(४२) लो. बा. गं. टिळक, दा. वि. गोखले, चित्रमयजगत्, जुलै, १९२०

४३) लो. टिळकांचें जीवितरहस्य—ज. स. करंदीकर चित्रमयजगत्, जुलै १९२०

( ४४ ) टिळक व आगरकर—ग. त्र्यं. माडखोलकर, केसरी १ ऑगस्ट १९२२
( ४५ ) टिळकांच्या यशाचें मर्म—न. चिं. केळकर रत्नाकर जुलै १९२६
( ४६ ) लो. टिळक चरित्र परीक्षण, न. र. फाटक, विविधज्ञानविस्तार पु. ५५ अंक १,३,४,५. सन १९२४
( ४७ ) वरील टीकेस उत्तर—न. चिं. केळकर, केसरी ५ ऑगस्ट १९२४
( ४८ ) ,, प्रत्युत्तर, न. र. फाटक; विविधज्ञानविस्तार, पुस्तक ५५, अंक ९; सन १९२४
( ४९ ) लो. टिळक चरित्र, उत्तरार्ध; परीक्षण, न. र. फाटक, विविधज्ञान-विस्तार पु. ५९ अंक ३ ते ५, सन १९२८

**लक्ष्मीबाई टिळक** [ १८७३-१९३६ ] कवयित्री व व्यक्तिस्मृति-लेखिका. कवि नारायण वामन टिळक यांच्या पत्नी. टिळकांच्या सहवासामुळें कांहीं फुटकळ काव्यरचना यांचेकडून घडली. टिळकांनीं ओवींत 'ख्रिस्तायन' नांवाचें अनेक अध्यायात्मक दीर्घ काव्य रचावयास घेतलें होतें. त्यांच्या आकस्मिक मृत्यूनें तें अर्धवट राहिलेलें काव्य यांनीं, मूळचा ओघ कोठेंहि न बिघडूं देतां, अनेक वर्षें खर्च करून, पुरें केलें. पण ज्या एका वाङ्मयकृतीनें त्यांनीं आपलें नांव मराठी वाङ्मयांत अमर करून ठेविलें आहे, ती त्यांची महत्त्वाची कृति म्हणजे '**स्मृति-चित्रें**' हा चतुर्खण्डात्मक ग्रंथ होय. "आपल्या आयुष्यांतल्या घडामोडीचीं स्मृतिचित्रें प्रायः साऱ्याच वृद्धांच्या मनश्चक्षूंसमोर उभीं असतात. पण तीं शब्द-सृष्टींत रंगविण्याची कुशलता फार थोड्यांच्या ठिकाणीं असते. रमाबाई रानडे यांच्या 'आठवणी' चांगल्या आहेत, पण त्याहीपेक्षां लक्ष्मीबाईंची स्मृतिचित्रें अधिक मोहक आहेत. ह्या स्मृतिचित्रांत भाषेचा साधेपणा व विचारांचा प्रांजल-पणा हे दोन गुण अत्युत्कट आहेत. पतीच्या, स्वतःच्या व इतर संबंधी माणसांच्या कृतींचें स्वभाववर्णन अगदीं हुबेहुब व यथार्थ केलें आहे. साधेपणाला सत्याची जोड दिली आहे. त्याचे हे ग्रंथ आपल्या सहजपणामुळें व सत्यत्वामुळें चिरकाल लोकप्रिय होऊन राहतील. मराठी वाङ्मयाला ते भूषणभूत झाले आहेत. ग्रंथ चरित्रपर असून कादंबरीपेक्षां मनोहर आहे. कला आणि सत्यता यांचें त्यांत गोड मिश्रण आहे. किंबहुना, सत्यतेलाच कलेचें सहजसौंदर्य प्राप्त झालें आहे." ( ल. रा. पांगरकर )

"यथातथ्य चरित्र लिहिणें म्हणजे तारेवरची कसरत आहे. लेखकाचा स्वभाव भिडस्त व संकोची असला तर वर्ण्य व्यक्तीच्या गुणास योग्य उठाव मिळत नाहीं व मिळमिळीत आणि फिकट अशी मूर्ति निर्माण होते. लेखक स्तुतिप्रिय असल्यास तो वर्ण्य व्यक्तीच्या दोषांस अशी मुरड घालून तुरपून घेतो किंवा चुण्या पाडून अशी टीप मारतो कीं छिद्रान्वेषी दृष्टीलाहि दोषांच्या ठिकाणीं गुणच प्रतीयमान व्हावेत. अशा रीतीनें अतिमानुष अवास्तव मूर्ती निर्माण होते. या दोनहि अंतिम टोकांच्या दोषांपासून 'स्मृतिचित्रें' अलिप्त आहेत. निःसंकोच मनमोकळेपणानें श्री. लक्ष्मीबाईनीं सर्व वृत्तांताचें चित्र रेखाटल्यामुळें रे. टिळकांचा स्वभाव, स्वतः लेखिकेची मनःस्थिति व तत्कालिन परिस्थिति यांचें आपणांस यथार्थ दर्शन होतें. साधी घराऊ भाषा व सूक्ष्म मार्मिक विनोदाची जरतार यामुळें या ग्रंथास अव्याज मनोहर रूप प्राप्त झालें आहे. बाबा पदमजींचा 'अरुणोदय' व कै. रमाबाई रानडे यांच्या 'माझ्या आयुष्यांतील आठवणी' यांत घराऊ, साधी भाषा असली तरी पहिल्यांत विनोद, व चटकदारपणा नाहीं व दुसऱ्यांत तुलनेनें मनमोकळेपणा कमी आहे. म्हणून 'स्मृतिचित्रां' ना मराठी वाङ्मयांत अनन्य साधारण स्थान आहे."
( प्रो. र. श्री. जोगळेकर )

**लक्ष्मीबाई टिळक यांचें वाङ्मयः**—स्मृतिचित्रें–भाग पहिला (१९३४); भाग दुसरा (१९३५); भाग तिसरा (१९३६); भाग चौथा (१९३६);

**ठेंगे गोविंद मल्लिनाथ** [ १८७२–१९३३ ] निबंधलेखक. यांचें मूळ घराणें गोव्यांतलें. पाऊणशें वर्षांपूर्वी यांचे वडील मुंबईस येऊन स्थाईक झाले. गोविंदरावाचें सर्व शिक्षण मुंबईसच झालें. वुइल्सन कॉलेजांतून बी. ए. झाल्यावर त्यांनीं सेक्रेटरिएटमध्यें नोकरी धरली व आपल्या अंगच्या गुणांवर साध्या कारकुनाच्या जागेपासून ते असिस्टंट सेक्रेटरीच्या हुद्यापर्यंत चढले. प्रख्यात वाङ्मयसेवक सूर्याजीपंत महात्मे हे यांचे मामा होत. त्यांच्याच सहवासानें ठेंग्यांना वाङ्मयाची गोडी लागली. पुढें मनोरंजनचे संपादक काशीनाथपंत मित्र यांची व गोविंदरावांची गांठ पडून त्यांच्या लेखनकार्यास प्रत्यक्ष सुरुवात झाली. 'ट्राईन'च्या पुस्तकाच्या आधारानें लिहिलेली त्यांची 'सुखाचा शोध' ही लेखमाला, तसेंच 'रोमन वीरपुरुषांच्या कथा'; हें त्यांचें 'मनोरंजन'मधील महत्त्वाचें लेखन होय. याशिवाय त्यांनीं पुस्तकपरीक्षणाचें कामहि कांहीं काळ केलें होतें. हरीभाऊंची 'करमणूक' व डी काशिनाथ कंपनीचें 'नवयुग' यांच्याशींहि त्यांचा संबंध असे.

## ठोमरे त्र्यंबक बापूजी ( बालकवि ) [ १८९०-१९१८ ]

बालकवींचा जन्म १८९० सालीं खानदेशांत झाला. त्यांचें शालेय शिक्षण सुव्यवस्थित झालें नाहीं. त्यांना काव्य वाचण्याचा पहिल्यापासून नाद होता. १९०७ सालीं म्हणजे वयाच्या १७ व्या वर्षींच जळगांवीं भरलेल्या कविसंमेलनांत अध्यक्ष कान्होबा रणछोडदास कीर्तिकर यांच्या हस्तें त्यांचा 'बालकवि' म्हणून सन्मान झाला. पोटासाठीं त्यांनीं 'पंडितगिरी' म्हणजे गोऱ्या मिशनऱ्यांची मराठी शिकवणी मधूनमधून केली. प्रपंचांत त्यांची ओढाताणच झाली. त्यांना गृहसौख्य लाभलें नाहीं, तथापि कविवर्य केशव महादेव सोनाळकर, नारायण वामन टिळक, गोविंदाग्रज यांच्या सहवासांत त्यांना पुष्कळ स्नेह-सौख्य मिळालें. ते सोनाळकरांना लिहिलेल्या एका पत्रांत * ( पृ. ११२ ) म्हणतात, "तिनें ( माझ्या उदास परिस्थितीनें ) माझ्या उदार मित्राच्या पवित्र हृदयाची कल्पना फारच चांगल्या तऱ्हेनें करून दिली. या परिस्थितीनें काळ्या झालेल्या हृदयाच्या प्रभावळीवर माझ्या मित्राचें प्रेम-चित्र किती खुलून दिसतें !" अखेर अखेर एका मोहक स्त्रीवर त्यांची अत्यंत भक्ति जडली. ते स्वतःला 'रमाबाईचा बाळ' म्हणवून घेत. ता. १ नोव्हेंबर १९१७ रोजीं लिहिलेल्या पत्रांत, त्या आईची भेट होण्याची संधि आली असतां पत्र उशिरां मिळाल्यामुळें ती संधि आतां गेली असेल अशा भीतीनें त्यांच्या हृदयाची जी कालवाकालव झाली ती हृदयस्पर्शी शब्दांत व्यक्त झाली आहे. ते लिहितात, "आईची भेट झाली असती, मोठ्यानें गळा काढून रडलों असतों, मनाच्या वेदना कमी केल्या असत्या, दुःख हलकें झालें असतें, जीवाला शक्ति मिळाली असती,—पण हा संकेतार्थ केव्हां सुटणार ?......माझ्या आईची भेट हेंच मी माझें परम भाग्य समजतों......मी तूर्त जिवंतपणींच मरण अनुभवित आहें, आणि म्हणूनच आईच्या भेटीची मला फार आवश्यकता आहे." ( पृ. ११६ )

"जळफळतें सारें धगधगुनी अशान्तिच्या वणव्यानीं
ये ये ये देवी, दे हृदयीं प्रेमा विकसन बाई !" ( पृ. ८० )

---

* टीपः—या लेखांत कवितांच्या अंतीं दिलेले पृष्ठांक रा. अधिकारी यांनीं संपादिलेल्या प्रतींतील असून पत्रांचे पृष्ठांक निफाडकरी प्रतींतील आहेत.

या ओळी जींत आहेत ती ' रंजनीस आव्हान ' ही कविता याच वेळीं रचिली गेली. प्रेमविषयक व्यक्तीवर कोणता प्रेमी दिव्यत्व पावित्र्यादि दैवी गुणांचे आरोप करीत नाहीं ? रमाई ही बालकवींना वत्सलतेची, पवित्र शान्तीची, दिव्य प्रीतीची खाण वाटे; पण ती एक स्खलनशील मानवी व्यक्तीच होती, हें प्रत्ययास येऊन मनास प्राणान्तिक धक्का बसण्याच्या आधींच बालकवि १९१८ सालीं अपघातांत सांपडून त्यांचा तत्काळ अन्त झाला. त्यांच्या विषयीं दुर्दैवानें याहून अधिक साधार व विश्वसनीय माहिती उपलब्ध नाहीं.

बालकवींची ' अरुण ' ही कविता मासिक मनोरंजनाच्या १९११ सालच्या जुलै महिन्याच्या अंकांत प्रसिद्ध झाली; आणि ' सन्ध्यारजनी ' व ' फुलराणी ' या कविता ऑगस्ट व सप्टेंबरच्या अंकांत लागोपाठ आल्या. ' बालकवि ' म्हणून त्यांची सम्भावना याच्या आधींच चार वर्षे १९०७ सालीं जळगांवीं कविसम्मेलनांत झाली होती. त्यांची ' आनन्दी–आनन्द ' ही कविता १९०९ सालच्या मनोरंजनाच्या दिवाळी अंकांत प्रकाशित झाली. १९१० सालच्या दिवाळी अंकांत 'ओवाळणि घालीं आई' ही कविता आली. त्यावेळीं तिच्यांतील स्वप्नमय लालित्यानें कांहीं तरुण रसिकांच्या मनावर मोहनी घातली होती. ती मोहनी फार टिकली नाहीं व पसरलीहि नाहीं; आणि ' बालकवींची कविता ' या नांवाचे जे दोन काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत आणि ज्यांपैकीं एकावर ' समग्र ' असा छाप आहे, त्या दोन्ही संग्रहांत या कवितेचा पत्ता नाहीं ! बालकवींच्या ' अरुण ' या कवितेनें १९११ सालीं तरुण वाचकवर्गाचें मन आपल्याकडे प्रथम कायमचें ओढून घेतलें, आणि त्यांच्या ' फुलराणी ' नें त्यांना मराठी काव्यरसिकांच्या अंतःकरणांत अढळपद मिळवून दिलें.

बाल्य आणि तारुण्य यांच्या सीमेवर नवतीचा कांहीं प्रान्त असतो. नवनवतीच्या कालांत मन अत्यन्त संस्कारक्षम व तरल असतें. तीव्र सहानुभूति असते पण समतोलपणा नसतो. एखाद्या गोष्टीच्या सर्व बाजू बारकाईनें पाहतां येत नाहींत. जीव सुखाभासानेंहि हुरळून जातो व दुःखाभासानेंच कोळपून जातो. प्रेम, सत्य वगैरे शब्दांनींच मोह पडतो, आणि भाषेंत स्वाभाविकपणेंच उत्सर्ग व अतिशयोक्ति हीं येतात. वर्डस्वर्थ, शेली, रामतीर्थ, विवेकानन्द, जेम्स ॲलन्, राल्फ वाल्डो ट्राइन्, मेरी कॉरेली वगैरे लेखक-लेखिकांचे ग्रंथ, अर्थ नीट न समजतांहि

वाचण्यांत मन रंगतें. स्वतांत प्रथमच जागृत होणाऱ्या कांहीं भावनांच्या व शक्तींच्या जाणीवेनें मोठा चमत्कार वाटतो. चित्त बावरतें. सृष्टि दिव्य तेजानें नटलेली भासते व तिच्यांत मानवी संसाराचें रम्य प्रतिबिंब दिसतें. श्रेय प्रेय हीं अभिन्न वाटतात. प्रत्यक्ष जगाची व जगांतील दुःखांची योग्य कल्पनाहि होत नाहीं; आणि कल्पना-सृष्टींत तर स्वार्थत्याग, वियोग, वियोगजन्य शोक सारेच मधुर, कमनीय दिसतात. शोकाच्याच स्वप्नांत विहरण्यांत मौज वाटते. जगांतीलच काय, विश्वांतील साऱ्या दुःखावर, साऱ्या वैषम्यावर प्रेम हें एक सुलभ व रामबाण औषध आहे असा समज होतो, आणि हें प्रेमसुद्धां अकामुक, अपार्थिव, त्यागाच्या पंखांवर जगाच्या बंधनांच्या पलीकडे फडफडणारें असें असतें. आत्मश्रद्धा फाजील बळावते आणि पृथ्वीचा स्वर्ग करण्याची हाव सुटते. हा सर्व नवतीचा—वाढतें रक्त, उमलतें मन आणि अज्ञान यांच्या संगमाचा प्रभाव असतो. प्रत्यक्ष सृष्टीचें ज्ञान हळुहळू पण अपरिहार्यपणें होऊं लागलें कीं मन गोते खाऊं लागतें. उत्साहाची भरती ओहोटी सुरू होते, कर्तव्याचें आचरण केलें पाहिजे असें वाटूं लागतें; परंतु त्या संशयाच्या व उदासीनतेच्या आवर्तांत अंगीकृत कार्य निकरानें करीत राहण्याची तपश्चर्या घडत नाहीं. प्रकृतिमानाप्रमाणें कमी अधिक अशी स्थिति प्रत्येक मनुष्याची नवतीच्या काळांत होते; आणि या काळांतील निरनिराळ्या मनोवृत्तींचें हृदयंगम वर्णन, प्रसादयुक्त मृदुमधुर भाषेनें केलेलें, बालकवींच्या कवितेंत पहा-ययाला मिळतें. म्हणूनच समानधर्मी सर्व अरुण-तरुणांना आणि आपल्या गतबाल्याकडे प्रेमानें सिंहावलोकन करणाऱ्या वृद्धाना सुद्धां बालकवींच्या कविते-विषयीं आपुलकी वाटते.

बालकवींचा ‘ अरुण ’ हा कोणत्या ऋतूंत व कोणत्या स्थळीं पाहिलेला आहे याचा बोध होत नाहीं, अशी टीका प्रथम प्रो. गणेश सदाशिव भाटे यांनीं केली व नंतर सृष्टिविषयक काव्याकडे एका विशिष्ट दृष्टीनें पाहणाऱ्यांकडून करण्यांत येत असते. परंतु येथें अमुक एक ठिकाणचा अमुक एक अरुण विवक्षित नाहीं, म्हणूनच कवितेच्या शेवटीं भव्य गिरी, वनराजी, सरोवर, नदी, प्रपात, पिंवळीं कुरणें इत्यादि उल्लेख एकसमयावच्छेदानें आले आहेत. कित्येकदां बाहुलीच्या वर्णनापेक्षां, तिला पाहून लहान मुलीच्या मनात कोणत्या भावना उचंबळतात व ती त्या बाहुलीविषयीं काय कल्पना करून घेऊन तिच्याशीं कसा संवाद करिते याचेंच वर्णन अधिक जिव्हाळ्याचें वाटतें. ‘ अरुण ’ या कवितेंतहि सृष्टीचें रेखीव रंगीत

आलेखन अभिप्रेत नाहीं. स्थूलमानानें तिचें चटकदार चित्र निघालें कीं पुरे आहे. येथें सृष्टीचें यथातथ्य छायाचित्र नाहीं तर बालकवींच्या संस्कारक्षम मनावर उमटलेलें प्रतिबिम्ब आहे. या स्थूल सृष्टिवर्णनांत तन्मयता दिसते. सृष्टिसौंदर्यानें बालकवि वेडावून जात. ते एके ठिकाणीं म्हणतात,

" सृष्टि मला हासविते,
स्वर्गसौख्य दाखविते,
शान्तीतें पालविते,
आनन्दें डोलविते;
मन माझें टाकि गडे नित्य गुंगुनी " ( पृ. १२ )

लहान मुलीला जसा बाहुलीच्या घरकुलांत, ' लटुपटीच्या घरदारीं ' संसाराचा स्वर्ग दिसतो तसा बालकवींना सृष्टीच्या मुग्ध मधुर व्यापारांत अल्लड प्रेमाचा नर्मविलास दिसे. त्याच्या दिव्य मांगल्यांत ते रंगून, बुडून जात. दिशांचा, तारकांचा एकमेकींशीं चाललेला थट्टा-विनोद त्यांना स्पष्ट ऐकूं येई व ते त्याचें हृदयंगम वर्णन सफाईनें करूं शकत.

" तेजानें न्हाणिते जगाला कोण सखे बाई !
नवल अगाई ! तेजोमय तूं ! तेजोमय मीहि ! "
परस्परांना दिशा म्हणाल्या प्रेमळ वचनांनीं,
विरहकाल सम्पला गा गडे, प्रेमाचीं गाणीं !
" या मेघाच्या कुञ्जामध्यें ही लपली कोण ?
तिला बोलवा पुरे—गडे ग ! हा तुमचा मान !
अम्ही गवळणी हृदयरसांनीं पूजूं प्रेमाला,
प्रेमकाल हा ! म्हणोत कोणी अरुणोदय याला.
पूर्वदिशेशीं गोफ खेळतो कृष्णगडी बाई !
उधळित सोनें सर्व तयाच्या लागूंया पायीं.
मधुस्मितानें विश्व भरूं ग ! शङ्कित कां म्हणुनी ?
सर्व सारख्या ! हासावें मग कोणाला कोणी ? " ( पृ. ८ )

' सन्ध्यारजनी ' या कवितेमधील चन्द्रोदयकालींचें वर्णन पहा;

अर्ध्या मिटल्या अर्ध्या उघड्या असल्या नयनांनीं,
कुणास बघती दिशा कळेना मन्दस्मित करुनी !
तुमची राणी बसे सारखी तुम्हां न्याहळीत,
गगनाच्या चौकांत चला हो, या रजनीनाथ !
धवल चन्द्रिके ! दे आलिंगन दिव्य यामिनीला,
बहिणी बहिणी तुम्ही सुखानें चन्द्राशीं खेळा !
कां तारांनो, तुम्ही लाजतां ? हा मङ्गल काल !
निर्मत्सर व्हा, प्रेमसङ्गमीं पोहा चिरकाल !
ब्रह्माण्डाचा गोल धरी या प्रेमाचा फेर,
फुलें शान्तिचीं अहा उधळलीं जगतीं चौफेर !" (पृ. १३)

'फुलपाखरूं-फुलवेली' या कवितेंतील फुलपाखरास उद्देशून काढलेले उद्गार किती लाडिक व हृदयस्पर्शी आहेत !

"थाम्ब गडे, धावु नको इकडे तिकडे !
कलिका ही, मुग्ध हृदय उकली पाहीं !
प्राणच तूं, एक तिचा जीवनहेतू !
थाम्ब तरी— कठिणचि गे नरजाति खरी !" (पृ. १३)

'फुलराणी' (पृ. १७) ही नितान्तसुन्दर कविता तर अथपासून इतिपर्यंत अवतरणीय व संस्मरणीय आहे. सन्ध्यावाताच्या एका विनोदी वचनानें फुलराणी कशी जागृतभाव व नष्टनिद्र होते व रात्रभर कशी प्रणयस्वप्नात रंगते व दुसऱ्या दिवशीं सकाळीं तिचें सोनेरी रविकराशीं कसें थाटानें लग्न लागतें या गोष्टीचें बहारीचें वर्णन या कवितेंत आहे. 'निर्झरास' या कवितेंत हिरवळींतून लपत छपत वळसे घेणाऱ्या निर्झरास पाहून बालकवींना

"मुरलीच्या काढित ताना
वृन्दावनिं खेळे कान्हा
गोपि तुझ्या हिरव्या वेली
रास खेळती भवतालीं" (पृ. १५)

असा भास होतो. 'तारकांचें गाणें (पृ. २९) या कवितेंत तारकांच्या अल्लड

लीला वर्णिल्या आहेत. ‘ सन्ध्यातारक ’ ( पृ. २३) या कवितेंत रजनीनें आपल्या मुग्ध तान्हुल्यास गाइलेली लाडिक अङ्गाई आहे. या गोष्टी जितक्या रमणीय आहेत तितक्याच त्या मराठी कवितेंत अभिनव आहेत. ‘ सृष्टीची भाऊबीज ’ ही जी टिळकांची कविता १९०९ सालीं मनोरंजनाच्या दिवाळी अंकांत प्रसिद्ध झाली तिच्यांत अल्लड प्रेमाचा नर्मविलास दिसतो. ही कविता बालकवींना स्फूर्तिदायक झाली असण्याचा सम्भव नाहीं असें नाहीं. तथापि बालकवींच्या कवितेंतील रंग कांहीं और, अभूतपूर्वच आहे.

सृष्टीचें बारकाईनें निरीक्षणपूर्वक वर्णन विवक्षित नसल्यामुळेंच बालकवींच्या हातून सृष्टिवर्णनांत मजेच्या चुका घडल्या आहेत. इन्द्रधनूला ते गोफ गुम्फिला म्हणतात; दिशा डोलतात; पूर्वदिशा अधोवदन होते; स्वर्भूच्या वदनावर दंवमाला टपटपते; भूदेवी आपल्या तोंडावरून दंवबिन्दूंचा पडदा दूर करिते; प्रपाताचा शब्द मंजुळ असतो; रजनी सन्ध्येच्या आन्दोलीं बसून झोके घेते; कोकिळ तानांवर ताना घेतो; निर्झर पखवाज वाजवितात, इत्यादि अनेक वर्णनप्रमाद दाखवितां येतील. बालकवींचें तें वय स्थूलदृष्टीनें पाहून दृश्यावर भाळण्याचें होतें; विशिष्ट प्रियवस्तूचें रंगून बारकाईनें निरीक्षण करीत बसण्याचें नव्हतें. शिवाय सृष्टीचें मानुषीकरण करितांना चेष्टांचा वा भावनांचा करावयाचा आरोप सत्यावर नाहीं तर निदान सत्याभासावर तरी अधिष्ठित असावयाला पाहिजे. या दण्डकाकडे क्वचितच कोणी प्रौढ कवि लक्ष देत असल्याकारणानें बालकवींच्या काव्यांत असले प्रमाद आढळले तरी त्यांत आश्चर्य नाहीं. ते समर्थनीय नसले तरी अक्षम्य वाटत नाहींत.

बालकवींची सृष्टीशीं ओळख नव्हती असें मुळींच नाहीं.

( १ ) “ श्रावणमासीं हर्ष मानसीं हिरवळ दाटे चोहिंकडे  
क्षणांत येतें सरसर शिरवें क्षणांत फिरुनी ऊन पडे !  
झालासा सूर्यास्त वाटतो, सांज अहाहा तों उघडे,  
तरु शिखरांवर, उंच घरांवर पिवळें पिवळें ऊन पडे !” (पृ.५)

( २ ) “ व्योमपटीं, जलदांची झाली दाटी,—  
कृष्ण कुणी काजळिच्या शिखरावाणी !  
नील कुणी इन्द्रमण्याच्या कान्तिहुनी !  
गोकर्णी मिश्र जांभळे तसे कुणी;

तेजांत धूमाचे उठती धोत,
चकमकती पाण्डुरही त्या परिस किती !" (पृ. ६)

( ३ ) गिरिशिखरें वनमालाही
दरी दरी घुमवित येई
कड्यावरुनि घेऊन उड्या
खेळ लतावलयीं फुगड्या
घे लोळण खडकावरती
फिर गिरगिर अंगाभवतीं,
जा हळुहळु वळसे घेत
लपतछपत हिरवाळींत,
पाचूचीं हिरवीं रानें
झुलव गडे झुळुझुळु गानें !
वसन्तमण्डप वनराई
आंब्याची पुढती येई.
श्रमलासी खेळुनि खेळ
नीज सुखें क्षणभर बाळ !
हीं पुढचीं पिवळीं शेतें
सळसळती, गाती गीतें.
गर्द सावल्या सुखदायी
वेलींची फुगडी होई !
इवलालीं गवतावरती
रानफुलें फुलती हंसती
झुलवित अपुले तुरे तुरे
निळी लव्हाळी दाट भरे " (पृ. १४)

बालकवींनीं सृष्टीच्या निकट उभें राहून तिचें दर्शन घेतलें होतें, आणि तिची मूर्ति हृदयांत सांठवून ठेविली होती हें सिद्ध करावयाला इतके उतारे पुरे आहेत. ते कधीं घरांतल्या घरांत बसून केवळ काल्पनिक सृष्टीच्या मंगल मोहात गुंगले नव्हते !

प्रेमाचा विषय असलेल्या चालत्या बोलत्या व प्रेमविषयक अनुभवांवर कविता लिहिण्यापेक्षां बालकवींनीं अमूर्त प्रेमभावाचेंच वर्णन अधिक केलें आहे. कदाचित् ते म्हणतात त्याप्रमाणें

"हृन्मञ्जूषीं भाव गुप्त जे भरले, जनसंमर्दीं
कथील का कधिं उच्च रवानें कवि हृदयाचा दर्दी (पृ. ५७)

हें एक या गोष्टीचें कारण असूं शकेल; अथवा समाजाच्या सद्यःस्थितींत योग्य सन्धीचा अभाव हेंहि एक कारण असूं शकेल. अरुणोदय हा त्यांना प्रेमकाल वाटे व या प्रेमाच्या लाटेखालीं मस्तक नमवावें असा हितवाद ते सांगतात. कारण प्रीतिदेवता ही ब्रह्माण्डाची राणी आहे आणि प्रेम हाच जगतांत सत्यधर्म आहे. निष्प्रेम मनाला कोठेंहि सुख नाहीं, उलटपक्षीं प्रेमसमाधींत

अद्वैताचें राज्य गडे
अविच्छिन्न मग चोहिंकडे !" (पृ. १६)

प्रीतीचा हृदयांत वास हा न्यूनतेला पूर्णत्व देण्यासाटीं असतो. परंतु प्रीति ही सुलभ नाहीं.

" प्रीति हवी तर तळहातावर घे कापुनि मान !
प्रीति निर्मिली तुला वाटतें का दुबळ्यासाठीं ?
प्रीतिदेवि जगदेववीर जो जाय तयापाठीं
सह्य जिवाला होय जाहला जरि विद्युत्पात,
परी प्रीतिचा घात भयंकर दुसरा कल्पान्त !" (पृ. ८२)

प्रीतिविषयक व्यक्तीच्या दर्शनाचा, चुम्बनालिंगनाचा प्रेमी •भक्ताच्या मनावर जो परिणाम होतो. त्याचें वर्णन 'प्रेमाचा पहिला भास' (पृ. ३४) आणि 'जादुगारीण' (पृ. ८५) या कवितांत आलें आहे. बालकवि म्हणतात,

" तव पुण्यदर्शनें केलें  निमिषांत जिवाचें सोनें
देहाचा दास मरून  प्रेमाचा उरला जीव
प्रेमांतच झाला सारा  विश्वाचा अन्तर्भाव." (पृ. ३४)
बन्दा दास तुझा  हा असला  दगडाचा घडलेला
पुतळी जादूची  बनतांची  जीवकला मग त्याची

सोडुनि मातीला  अवलीला  तुझ्या हृदयज्योतीला
पाहुनियां गिरक्या  घेइल ती  तुझ्याच भंवतीं भंवतीं (पृ. ८५)

नवनवतींतील प्रेमाभासाच्या परिणामाचें हें वर्णन हृदयंगम आहे. 'प्रेम-लेख' (पृ. ३०) हें सुनीत क्षणैक चमत्कृतिजनक वाटलें तरी अकृत्रिम व हृदयंगम वाटत नाहीं. पण 'भटकणें' हें दूरस्थ हृदयस्वामिनीस उद्देशून लिहिलेलें साधें विरहगीत मात्र करुणरसानें थबथबलेलें आहे.

'तव हाताचा गोड जाहला स्पर्श मला जेधवां
तुझिया भजनीं मात्र वाहिलें तेव्हांपासुनि जिवा
गेला भडकुन राही जाउन वनस्मशानीं जरी
या गगनाची शपथ, लोचनीं तुझीच मूर्ती वरी.' (पृ. ३३)

वीज (पृ. ४४) ही भगिनीस संबोधून रचिलेली श्लोकत्रयी अशीच हृदयस्पर्शी आहे.

बालकवींचीं सृष्टिगीतें मोहक आहेत. बालकवींच्या मनाविषयीं त्यांच्याच शब्दांत असें म्हणतां येईल.

* बाल-विहग आनन्द मूर्तिमान् झुलतो गगनांत !" (पृ. २०)

ते एक प्रकारच्या उदात्त संपन्नतेंत कांहीं काळ विहरले.

"कीं स्वर्गीच्या दिव्यांचें हें फुटलें भाण्डार
जणूं वाटतें स्वर्गच त्यासह खालीं येणार !" (पृ. ७)

नवनवतीच्या चुंबनीय आकांक्षा त्यांनीं कशा मोहक भाषेनें वर्णिल्या आहेत पहा !

(१) सुंदरतेच्या सुमनांवरचें दंव चुंबुनि घ्यावें,
चैतन्याच्या गोड कोवळ्या उन्हात हिंडावें;
प्रीतिसारिका गीत तियेचें ऐकावें कानीं,
बनवावें मग धुंद रंगुनी काव्यसुधापानीं !
अंधाराचे पाश मनाचे हे गळुनी जावे
चित्त वाटतें तरळ तुझ्यापरि खगबाळा व्हावें !" (पृ. २०)

---

* Like an unbodied joy whose race is just begun."
—Shelley.

(२) सुखदुःखें चुंबित गावें.
सुमकोशीं आपोआप
क्षण घ्यावी साखरझोप.
डोलतची जागें व्हावें
हासतची गुंगत जावें
सत्याचें स्वप्न पहावें
सत्यानें स्वप्नें घ्यावें.
स्वप्नींहि स्वप्नें बघत
स्वप्नांतच व्हावा अन्त !
मरण्याचें स्वप्नहि गोड,
जगण्याचें स्वप्नहि गोड !
भासाचीं सर्वहि सुमनें
चला चला चुम्बित वदनें
होइल मग सर्वचि गोड
मरण गोड ! जगणें गोड ! (पृ. ४७–४८)

परंतु त्यांचीं उदासीनतेचीं गाणीं अधिक जिव्हाळ्याचीं वाटतात. हीं उदासीनतेचीं गाणीं अथांग करुणरसानें परिप्लुत आहेत. सृष्टि सुंदर होती, आहेहि; पण मागें तिला पाहून मनाला 'आनन्दी–आनन्द' वाटला, तर आतां तिचें दर्शन घेऊनहि मन उदासीन, आपल्याच दुःखांत निमग्न आहे. सुंदर सृष्टि आणि उदासीन दुःखी मन यांचा सविरोध मिलाफ 'पाखरास' (पृ. २७) या सुंदर गीतांत पहावयाला मिळतो. हें गाणें बालकवींनीं जणूं काय स्वतःच्या जीवास उद्देशून लिहिलें आहे असें वाटतें.

" चुम्बित गुलाबी गाल मधुर सन्ध्येचा
कर वरती आला सुन्दर रविरायाचा;
जग समाधिस्थ जणुं सर्व सर्व हें होतें !
परि शान्तिलेशही नव्हता ठाऊक तूतें !
बैसून कुठेंतरि काटेरी झुडुपांत
तव हूं-हूं-हूंचें होतें गीत वहात !

येईल एक परि धन्य दिवस सौख्याचा
जो करिल तुझ्यासह अन्त तुझ्या गीताचा !
फिरवून भरारा गोफण तो झाडील,
कांद्यांवर उपडें भग्न हृदय पाडील !
मग एकच धडकी, एकच अन्तिम बोल
गाऊन तुझें हें जळतें हृदय निवेल !" (पृ. २८)

या शब्दांत कांहीं भविष्यवाणी होती काय ?

या उदासीनतेच्या गीतांकडे एकंदरीनें पाहतां महाराष्ट्राचें अक्षम्य दुर्लक्ष्यच झालें आहे. कांहीं टीकाकारांची दृष्टि प्रतिष्ठित व्याजोदात्त ब्रह्मानन्दी सत्कवितेपुरती संकुचित असते; आणि लोक बहुशः एकानें एक चांगलें म्हटलें कीं त्यालाच चांगलें म्हणण्याइतकी आपली शोधक रसिकता प्रकट करीत असतात ! 'पाखरास,' (पृ. २७), 'भटकणें' (पृ. ३३), निराशा (पृ. ४६), 'प्रीति व कर्तव्य' (पृ. ५६), उदासीनता (पृ. ६१), 'संशय' (पृ. ६३), 'काळास' (पृ. ६५), 'हृदयाची गुंतागुंत' (पृ. ७६), 'रजनीस आव्हान' (पृ.८०) वगैरे उदासीनतेच्या कवितांचा अभ्यास केल्याखेरीज नवतींतील उदासीनतेचें पूर्ण ज्ञान व्हावयाचें नाहीं.

सृष्टि मोहक असूनहि बालकवींच्या मनाला समाधान लाभेना. ते म्हणतात,

कोठुनि येते मला कळेना
    उदासीनता ही हृदयाला
काय बोचतें तें समजेना
    हृदयाच्या अन्तर्हृदयाला
एथें नाहीं तेथें नाहीं
    काय पाहिजे मिळवायाला ?
कुणीकडे हा झुकतो वारा ?
    हाका मारी जीव कुणाला !" (पृ. ६१)

बरें, सृष्टीकडे पहावें तर

(१) सुंदर सगळें मोहक सगळें,
खिन्नपणा परि मनिंचा न गळे,
नुसती हुरहुर होय जिवाला—
    कां न कळे कांहीं." (पृ. ४६)

(२) सृष्टीचा परि भाव कळेना
तेजोमार्गी चित्त वळेना." (पृ. ५३)
(३) अपूर्णतेनें पूर्ण निराशा हृदयाची होते
अमृत मुखाशीं नेतां नेतां विषमय हो येथें.
खराखुरा आनन्द असे कीं सर्वच आभास ?
पडतें कोडें लागे वेडें चित्त रडायास " (पृ. ३९)

केव्हां केव्हां त्यांना वाटे

" प्रीति माझ्या हृदयांत करी वास
न्यूनतेला पूर्णत्व द्यावयास " (पृ. ५४)
" प्रेमधर्म हा धर्म विसरलों, भकलों सैराट
म्हणुनिच पडलों गिळित भूवरी दुःखाचे घोट. " (पृ. ६३)

या प्रीतीच्या बाबतींतहि फसगत होई;

" प्रीतीचा पथ हा भयाकुल दिसे सौंदर्यसौदामिनी
डोळ्यांना क्षण तेज दाखवुनियां अस्तंगता हो क्षणीं;
चित्तामाजि विकारसिन्धु खवळे चांचल्य जीवीं भरे
नेत्रांतून उदास तेज जगतीं वेड्यापरी बावरे. " (पृ. ५६)

मग मध्येंच ते

" पुरे संबंध प्रेमाचा। नको हा खेळ प्रेमाचा!" (पृ. ५८)

असे विसंवादी उद्गार काढीत! अमरपणाचें ज्यांना वेड लागलें होतें तेच एखादेवेळीं 'हृदयाची गुंतागुंत' (पृ. ७६) सुटली नाहीं कीं उद्वेगानें म्हणत,

" मज व्यर्थ नको तीं अमरपणाचीं गाणीं
कुणि उठवा असल्या गहनांतुनि हलवोनी. " (पृ. ७७)

दुर्दैवानें त्यांच्या मनावर केशवसुतांचा, विशेषतः केशवसुती गूढगुंजनाचा भयंकर परिणाम झालेला होता. आधुनिक मराठी कवींपैकींच काय, एकंदर मराठी कवींपैकीं जर कोणाची छाप बालकवींच्या कोमल मनावर पडली असेल तर ती केशवसुतांची होय. केशवसुतांच्या बाबतींत गूढगुंजनाचें पर्यवसान शोकांत झालें आणि तीच गत बालकवींची झाली.

## ठोमरे त्र्यंबक बापूजी

बालकवींना केशवसुतांसारखीच कवित्वाची सतत व रोगट जाणीव होई. सृष्टि हीच खरी कवयित्री व तिच्या मानानें मनुष्यकवि म्हणजे केवळ गणमात्रा जुळविणारा पामर नर, या विचारानें केशवसुतानीं गुङ् गुङ् गुङ् गुङ् असें तन्मयतेचें गान गाणाऱ्या भृंगाची महती गाण्याच्या भरात " अस्मद्गान नव्हे गान, तें गाना चिंध्यादान " अशा शब्दांनीं आपलें लघुत्व प्रकट केलें आहे, तर बालकवींनींहि ' निर्झरास ' या कवितेंत

" मी कवितेचा दास, मला
कवी बोलती जगांतला,
परि न झरे माझ्या गानीं
दिव्यांची असली श्रेणी
तूंच खरा कविराज गुणी
सरस्वतीचा कण्ठमणी ! ( पृ. १५ )

असे उद्गार काढून तेंच आत्मलाघव व्यक्त केलें आहे. उलटपक्षीं केशवसुतांनीं ज्याप्रमाणें ' आम्ही कोण ' या कवितेंत, आम्ही देवाचे लाडके आहोंत असें बजावून कविप्रौढी वर्णिली आहे त्याप्रमाणें ' धर्मवीर ' या कवितेंत बालकवींनीं

" देवाचे पंचीप्राण
आम्ही ! रे भिवविल कोण ?
काळाचे कवि हे काळ,
काळ-दिशा अमुचा खेळ !
तेजानें भरलीं अंगें
नेउं जगा तेजामागें ! " ( पृ. ५१ )

अशी आपली महती गाइली आहे. केशवसुताचा ' नवा शिपाई ' रूढी विरुद्ध तुतारी फुंकून आपलें शांततावादी विश्वबंधुत्व जाहीर करितो तर बालकवींचा ' धर्मवीर 'हि

" रूढीचें चढलें कीट
धर्मावर, परजा नीट

असें विनवून

"कोणि असो कुठला पाहूं
कां ? आम्ही पसरूं बाहू !
देशाचाही बन्ध नसे
विश्व सर्व अमुचेंच असे" (पृ. ५१)

अशी द्वाही पुकारतो. सृष्टीच्या अनन्त व्यापारांत विलसणाऱ्या आदिशक्तीस व कवितासुंदरीस बालकवि हे केशवसुतांप्रमाणेंच अभिन्न मानीत.

"प्रिय कविते अमर तुतें, तेजाची तूंच उज्वले, खाणी
मर्त्य जगीं अमर तुझी विश्वाला स्फूर्ति देतसे वाणी
रविकिरणीं भासतसें कीं निर्झरताण्डवांत नाचतसें,
पुष्पावर हासतसें रूप तुझें क्षणिक मानवास दिसे." (पृ. १)

कवीचा दिव्य विचार बालकवींना स्वर्लोकींचा देवदूत, गूढगूढाचीं शब्द, परोक्षाचा सोपान, मर्त्य जगताचा प्राण आणि कविता ही विश्वात्मक देवाची वाणी व विश्वात्मक दिव्यांची खाणी वाटे हें त्यांच्या 'कवीचा विचार' (पृ. ५३) या कवितेवरून दिसून येतें. सृष्टींत दिव्य भास दिसून केशवसुतांना तन्मयतेंतील अलौकिक निर्वाणीचें सुख मिळे असें वाटे. त्यावेळीं मनुष्य द्वंद्वातीत दिक्कालातीत विश्वमय कसा होतो या 'प्रकाश गेला तिमिर हरपला' अशा अवर्णनीय स्थितीचें वर्णन त्यांनीं 'सतारीचे बोल' या कवितेंत केलें आहे. बालकवीहि म्हणतात.

(१) "निर्झरमय काननमय गायनमय दिव्य जाहला देह
सृष्टीचेंहि पुरेना विचराया स्वैर त्याजला गेह;
मग गूढ अमूर्ताचीं मधुगीतें गोड गावया लागे,
आनन्दरूप झाली मानवता मृत्यु राहिला मागें. (पृ. १)

(२) "सृष्टि निमाली, स्वर्गहि नुरले
प्रेममात्र मंगलमय भरलें
तेज हरपलें, तम मालवलें
उन्मनींत मन तन्मय मुरलें" (पृ. २५)

हे सर्व क्षणांत नाहींसे होणारे दिव्य भास मला धरितां येतील तर पृथ्वीचा सुरलोक मी सत्वर बनवून टाकीन असें केशवसुत म्हणतात, तर बालकवीहि १९१२ सालीं लिहिलेल्या आपल्या पत्रांत म्हणतात कीं, " मानवी आशाकल्पना ध्येयें यांची सत्यता जर जगांत नेहमीं अनुभवाला आली असती तर आम्ही स्वर्ग एका क्षणांत—या मर्त्य जगांत सुद्धां—निर्माण केला असता. " पण ऐन तारुण्यांतच तें दिव्य भासाचें सुख लोपून एक प्रकारच्या निराशेनें केशवसुतांना घेरिलें आणि त्या हरपलेल्या श्रेयासाठीं तळमळत, हाका मारीत असतांनाच केशवसुतांना मृत्यूनें शान्त केलें. हीच अवस्था बालकवींची झाली. ' दिव्य रसीं विरणें जीव, जीवित हें त्याचें नांव ' अशा जीवितासाठीं तळमळत असतांनाच ते म्हणतात,

" काव्यदेवता अन्तरली मज गरिबाला आज;
काळ लोटला हाय किती मन वरिताहे लाज.
सुंदरतेच्या मोहनांत मन अमुचेंही नाचे
बंधहि होती शिथिल, हरपतें भानहि जगताचें.
जीव ओढतो वरवर जाया चैतन्यापाठीं
हाय ! सुटेना दृढ देहाच्या परि बसल्या गांठी ! " ( पृ. २१ )

" कांहीं दावुनि भास जात निघुनी माझ्या पुढें ते तरी
तेथें जाउनिया पुन्हाहि बघतां तेथेंहि कांहीं नसे. " (पृ. ५१)

मध्येंच ते श्रद्धेच्या व आशेच्या भरांत म्हणत

" सर्वही आघात येवो मजवरी
सुखी राहो परी देव माझा.
नको स्वर्गवास जनधनकीर्ति
प्रेमाची संपत्ति प्रेमरूप. " (पृ. ३४)

तर ता. १२ जून १९१५ रोजीं लिहिलेल्या पत्रांत ते एखाद्या नास्तिकाप्रमाणें लिहितात, " पुढें काय आहे कोणास ठाऊक ? आत्मा, ईश्वर, ब्रह्म, माया, पुनर्जन्म, सगळीं स्वप्नें आहेत. तीं बालमनाचें समाधान करूं शकतील, त्यांचा त्यांच्यावर विश्वास बसेल; पण निदान माझा तरी त्यांच्यावर विश्वास राहिला नाहीं." ( पृ. ११५ ). असें ते लिहितात, पण जगाविषयीं उदासीन व सृष्टीशीं तल्लीन

होऊन जडाच्या पलीकडे जाण्यांतच परम सुख आहे ही जी गोष्ट केशवसुतांची कविता वाचून त्यांच्या मनावर वज्रलेप झाली होती तिच्यावरचा त्यांचा विश्वास खरोखर उडेना.

"जडतेला खिळुनी राही
हृदयबन्ध उकलत नाहीं !" (पृ. १५)

अशी बालकवींची ओरड आहे. वाढत्या मुलाच्या भोंवतीं तुरुंगाचें तिमिरजाल अविरल होत जातें असें वर्डस्वर्थ म्हणतो त्याप्रमाणें बालकवींना दोष सारा जडतेचा, जगताचा, देहाचा वाटे.

'मायाजालीं परि अवघडला
आत्मराज तेजोमय पहिला,
एक सुराचें गीत तुझें तें
कळुनि येइना तेणें त्यातें.

रम्य उषेच्या पहिल्या किरणीं
कीं रजनीच्या गभीर गानीं
दिव्य दर्शनें मोहुनी जातें
परि न बधे मन तेथें तूतें.

सृष्टीचा मनिं भाव कळेना
तेजोमार्गी चित्त वळेना
म्हणुनि असें उद्विग्नपणें तें
हाक मारितें अखंड तूतें." (पृ. ५३)

आपल्याच कल्पनांनीं खुळावल्यामुळें या विचित्र संसाराविषयीं गैरसमजूत तारुण्याच्या पहिल्या प्रहरांत कोणाची होत नाहीं ? या नैराश्यतिमिरजालांतून बालकवींची सुटका झाली असती तर पुढील आयुष्यांत, ते जिवंत कवि असल्यामुळें, निराळ्या तऱ्हेची पण बावनकशी बहारीची काव्यरचना त्यांच्या हातून झाली असती. पण मग ते 'बाल–कवि' राहिले नसते. ते यथार्थतेनें बालकवि, नवतीचे कवीच रहावयाचे होते.

"स्वप्नींहि स्वप्नें बघत
स्वप्नांतच व्हावा अन्त !" (पृ. ४८)

— असें म्हणणाऱ्या बालकवींच्या मनांत जडतेच्या बन्धनापलीकडे जाण्याचीं, मरणाचीं, आत्महत्येचींहि स्वप्नें – जीं केशवसुतांच्या मनांत कधींहि तरंगलेलीं दिसत नाहींत तीं – तरंगत होतीं. अशाच एका नैराश्यजन्य स्वप्नांत तरंगत ते नसिराबादेहून खास त्यांचे प्रिय मित्र कवि सोनाळकर यांना भेटावयाला येत असतांना भादली स्टेशनावर, त्यांचा अन्दाज चुकला म्हणून असेल, अथवा क्षणैक मोहाला ते एकदम बळी पडले म्हणून असेल, पण आगगाडीखालीं त्यांना मृत्यु आला !

गूढगुंजनाखेरीज इतर बाबतींतहि केशवसुतांच्या कवितेची दाट छाया बालकवींच्या कवितेवर पडलेली दिसते. केशवसुतांच्या प्रमाणेंच बालकवींची स्वर्ग, विश्व, ब्रह्माण्ड, स्वर्भूसंगम हीं आवडतीं तोंडीलावणीं दिसतात. केशवसुतांनीं ‘ म्हातारी’वर उत्प्रेक्षामाला रचिली तर बालकवींनीं अरुणाच्या लालीवर, रजनीच्या तारकांवर, व सन्ध्यादूत बालविहगावर उत्प्रेक्षामाला रचिल्या. केशवसुतांनीं ‘ फूलपाखरूंमरण पाहिलें आहे का कोणीं ? ’ म्हणून प्रश्न केला, तर बालकवींनीं ‘ नाहिं खरें जगतीं मरण, काव्य-पांखरूं बघा खुण ! ’ म्हणून ठासून उत्तर दिलें. केशवसुतांनीं हूं हूं करणाऱ्या घुबडावर नैराश्यगीत लिहिलें, तर बालकवींना हूं हूं करणाऱ्या ‘ पाखरास ’ ( पारव्यास ? ) संबोधून नैराश्यगीत लिहिण्याची स्फूर्ति झाली. नैर्ऋत्येकडील वारा केशवसुतांना कान्तेचीं ‘ श्वासांहीं लिहिलीं ’ अशीं पत्रें देतो तर बालकवीहि म्हणतात कीं ‘ श्वासांच्या कवनीं लिही प्रियतमा ही प्रेमलेखावली. ’ बारकाईनें शोधीत बसणाऱ्याला आणखीहि साम्यस्थळें आढळतील; परंतु या साऱ्या साम्यस्थळाचा विचार करूनहि बालकवींची कविता ही केशवसुतांच्या कवितेची प्रतिकृति आहे असें मुळींच वाटत नाहीं. साम्य दिसतें तें साधर्म्यामुळें, पूर्वसंस्कारामुळें अहेतुकपणें आलेलें आहे. वस्तुतः सहज संभावना, ओघ, मार्दव, माधुर्य इत्यादि गुणांत बालकवि हे केशवसुतांच्यापेक्षां निःसंशय श्रेष्ठ आहेत. केशवसुतांच्या प्रतिभेचें रत्न अधिक मोठें व विविधरंगी असेल, पण बालकवि या हिरकणीचें पाणी कांहीं और आहे. बालकवींचें जें वैशिष्ट्य ‘ फुलराणी ’ या कवितेंत पूर्णावस्थेंत आढळतें त्याचा केशवसुती कवितेशीं कांहीं संबंध नाहीं. गूढगुंजनाच्या बाबतींत एवढेंच म्हणतां येईल कीं ज्याप्रमाणें वर्डस्वर्थकृत अमरत्वाचे भास, शेलीकृत चण्डोल वगैरे इंग्रजी कवितांचा

केशवसुतांच्या मनावर खोल परिणाम घडला होता, त्याप्रमाणें केशवसुतकृत ' नवा शिपाई ' ' तुतारी ' ' झपूर्झा ' ' हरपलें श्रेय ' इत्यादि कवितांचा खोल ठसा बालकवींच्या मनावर उमटला होता. त्यामुळें बालकवींच्या नववयांतील सहज स्वप्नाळूपणाला मोठा मजेचा बहर आला खरा, पण संततची शोकपर्यवसायी दिशाभूल व्हावयाला त्यामुळेंच साहाय्य झालें. गूढगुंजनी सिद्धान्ताचें स्वरूपहि ' हरपलें श्रेय ' या कवितेंत अधिक स्पष्ट, काव्यमय व हृदयंगम दिसतें. त्यांतून तें ' क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति ' या परिचित आर्य कल्पनेवर अधिष्ठित असल्या-कारणानें अधिक आपलेपणा, खरेपणा वाटतो. गूढगुंजनापुरतेंहि असें म्हणतां येईल कीं बालकवि हे केशवसुती गूढगुंजनाच्या लतेचें एक अत्यन्त सुकुमार व रमणीय असें फूल होतें !

स्फूर्ति येईल तेव्हांच बालकवि हातांत लेखणी घेत आणि स्फूर्ति ओसरतांच ते ती खालीं ठेवीत. त्यांच्या कितीतरी कविता अपूर्ण राहिल्या आहेत. ते स्फूर्तीनेंच लिहीत याचा अर्थ असा नव्हे कीं एकदां जें लिहिलें तें लिहिलें, त्यांत मग एक अक्षराचाहि पालट करावयाचा नाहीं असा त्यांचा बाणा असे. ' कवि-बाळें ' या कवितेचीं दोन रूपान्तरें प्रसिद्ध आहेत. ' निर्झरास ' या कवितेसंबंधींहि ते एका पत्रांत लिहितात—" निर्झर या कवितेंत लिहितां-लिहितां फिरून फारच फरक झाला आहे, व पहिल्या व दुसऱ्या निर्झरापैकीं कोणता चागला हें माझें मलाच कळत नाहीं. "

" लवकरच दुसरें एक काव्य रजपूत सरदाराचें ( नांव काय द्यावें हें समजत नाहीं. ) पुरें करून आपणाकडे पाठवितों." – असें ते त्याच, अहमदनगराहून १४ जानेवारी १९१३ दिनीं लिहिलेल्या पत्रांत म्हणतात. ' वीरगडी ' ' शाहीर' ' दौलतरावांची मंजुळा ' ' वीर मराठा ' ' रणघोष' ' निःश्वास ' इत्यादि अपूर्ण कविता याच रजपूत सरदाराच्या काव्यापैकीं आहेत कीं काय कळत नाहीं. त्या एखाद्या संकल्पित शृंगारवीररसमिश्रित दीर्घ काव्यापैकीं आहेत हें खास. यांतील कांहीं भाग मधून-मधून मजेदार व वाचनीय आहेत; परंतु हें दीर्घ काव्य पूर्ण होऊन प्रसिद्ध झालें असतें तर त्याला ' फुलराणी'चें यश लाभलें असतें कीं नाहीं याची शंका वाटते. बालकवींची प्रतिभा जिवन्त असली तरी तिचें सामर्थ्य मर्यादित होतें. त्या सामर्थ्याच्या मर्यादा कोणत्या होत्या याच्याविषयीं ' बालकवींची

कविता ' या पुस्तकास लिहिलेल्या प्रस्तावनेंत रा. श्रीपाद महादेव माटे यांनीं स्पष्ट, समतोल व चटकदार विवेचन केलें आहे. रसिक जिज्ञासूंनीं ती प्रस्तावना अवश्य वाचावी अशी तिची योग्यता आहे.

प्रो. माधवराव पटवर्धन.

**बालकवींचें वाङ्मय** – ( १ ) बालकवींची कविता, प्रकाशक, ए. या. निफाडकर, १९२३. ( २ ) बालकवींची कविता, प्रकाशक, गो. गो. अधिकारी, १९२५.

**चरित्र, चर्चा, अभ्यास**:—

( १ ) महाराष्ट्राचा बालकवि, चरित्र, रे. ना. वा. टिळक; मनोरंजन, मे १९१८. पृष्ठ ४२५–४३२

( २ ) बालकवींची कविता—वि. ल. बर्वे; उद्यान, जुलै १९२०.

( ३ ) बालकवींची समग्र कविता—' शारदाश्रमवासी '; महाराष्ट्रसाहित्य, मार्च–एप्रिल १९२४.

( ४ ) बालकवींची कविता—के. ल. टेंभुर्णीकर; काव्यचर्चा, पृ. २५७–२७०.

( ५ ) बालकवींची कविता—प्रो. ना. के. बेहरे, काव्यचर्चा, पृष्ठ २७०–२८०.

( ६ ) बालकवींची कविता—ग. त्र्यं. माडखोलकर; आधुनिक कविपंचक, पृष्ठ १४३–१७६.

( ७ ) बालकवि ठोमरे यांचीं अप्रकाशित काव्यें ( १ ) संग्राहक ' दिवाकर ', रत्नाकर, नोव्हेंबर १९२६.

**डुकले अनंत चंद्रोबा** ( १८२९–१८८४ ) ' सर्वसंग्रह 'कार माधव चंद्रोबा डुकले यांचे हे बंधु होत. यांचा जन्म गोमांतकांत कळंगुटी गांवीं झाला. आपल्या बंधूबरोबर, हे तीन-चार वर्षांचे असतांना मुंबईस आले व पुढें दोन-तीन वर्षें त्यांचा मराठी व गुजराथी अभ्यास झाला. नंतर टांकसाळींत तीन रुपयांवर नोकरी धरून इंग्रजी शिक्षणास १८४४ सालीं त्यांनीं सुरवात केली. १८५१ सालीं ते वैद्यविद्येची शेवटची परीक्षा उत्तीर्ण झाले. इंदूर, भोपाळ, सिंध इत्यादि ठिकाणीं असिस्टंट सर्जनची नोकरी बजावून ते १८५७ सालीं मुंबईस परत आले; नंतर ते देवीखात्याचे सुपरिंटेंडेंट होते.

अनंत चंद्रोबा युनिव्हर्सिटीचे फेलो असून, व्हाइसरॉयांच्या ऑनररी सर्जन यां पदाचा मानहि त्यांस लाभला होता. त्यांना सिंधी व फारशी या भाषा उत्तम अवगत होत्या. माधव चंद्रोबा यांच्या 'सर्वसंग्रह' या पुस्तकास त्यांनीं साहाय्य केलें आहे, यापलीकडे त्यांची स्वतंत्र अशी वाङ्मयात्मक कामगिरी दिसत नाहीं.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः—**

मनोरंजन, दिवाळीचा अंक, १९१०.

**डुकले माधव चंद्रोबा** ( १८२५-१८८५ ) 'सर्वसंग्रह'कार. यांचा जन्म गोमांतकांत कळंगुटी गांवीं सन १८२५ सालीं झाला. पुढें चरितार्थासाठीं यांना टांकसाळींत नोकरी धरावी लागली; परंतु विद्येची स्वभावतःच आवड असल्यामुळें नोकरीशिवाय बाकीचा वेळ ते शिकण्यांत घालवूं लागले. कांहीं दिवस यांनीं विलायती औषधें आणून तीं गुजराथी व्यापाऱ्यांस पुरविलीं आणि एक दवाखानाहि उघडला.

माधव चंद्रोबा यांच्या वाङ्मयकृती दोनच आहेत, परंतु त्या महत्त्वाच्या आहेत. एक ' सर्वसंग्रह ' व दुसरी ' शब्दरत्नाकर '. सन १८६० च्या मार्च महिन्यांत त्यांनीं 'सर्वसंग्रह' मासिक शिळाछापावर सुरू केलें. या मासिकांतून त्यांनीं मोरोपंतकृत आर्या-भारत, रामायणें, केकावलि, मंत्रभागवत आणि त्याचप्रमाणें आनंदतनय, वामनपंडित, तुकाराम, रामदास, मुक्तेश्वर वगैरे कवींचीं काव्यें प्रसिद्ध केलीं. बऱ्याच जुन्या कवींच्या कविता, पदें वगैरे संग्रहित करण्याचा क्रमहि सुरू ठेविला. ही कविता त्यांनीं महत्प्रयासानें मिळवून शुद्ध करून तिला अर्थनिर्णायक विपुल टीपाहि दिल्या.

' शब्दरत्नाकर ' हा एक मोठा संस्कृत-मराठी कोश आहे. या कोशाचें काम १८६१ सालीं सुरू होऊन १८७० सालीं पूर्ण झालें. कोशाच्या शेवटीं एक पुरवणी-कोशहि जोडण्यांत आला आहे.

**डुकले माधव चंद्रोबा यांचें वाङ्मयः—**( १ ) सर्वसंग्रह, १८६०. ( २ ) शब्दरत्नाकर ( कोश ) १८७०.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः—**

( १ ) मनोरंजन, दिवाळी अंक १९१०.

**डोंगरे पुरुषोत्तम भास्कर** (मृत्यु सन १९०८) नाटककार. यांचा नक्की जन्मकाल मिळत नाहीं, तथापि 'मृत्युसमयीं यांचें वय सुमारें ५५ वर्षांचें असावें' असें 'रंगभूमि'कार म्हणतात. यावरून यांचा जन्म १८५३ च्या सुमारास झाला असावा. हे राहणारे अलीबागचे असून, पुण्याच्या सिटी हायस्कूलमध्यें विद्याभ्यास झाल्यानंतर त्यांनीं अलीबागेसच सरकारी नोकरी धरली व अव्वल कार· कुनाच्या जागेपर्यंत चढले. पुढें हे एक दुकान घालून उदरनिर्वाह करीत असत. जरठोद्वाह ( सन १८९० ), भीमसिंग-पद्मिनी (१८८९), चंद्रसेना, चंद्रहास ( सन १९०३ ), सैरंध्री अशीं पांच नाटकें यांनीं लिहिलीं. यांपैकीं पहिलीं दोन नाटकें गद्य असून चंद्रसेना चंद्रहास व सैरंध्री हीं संगीत आहेत. चंद्रसेना 'स्वदेशहितचिंतक नाटक मंडळी'नें रंगभूमिवर आणलें आणि 'चंद्रहासा'चे प्रयोग 'किर्लोस्कर मंडळी' करीत असे. डोंगरे हे कवीहि होते. त्यांच्या कविता 'विविधज्ञानविस्तार' आणि 'काव्य-रत्नावली' या मासिक पुस्तकांतून प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यांच्या 'अंबुकण' या कवितेंत पावसाचा एक बिंदु प्रथम समुद्रांत पडला व नंतर त्याच्या शिंपल्यांत जन्म पावून तो राजाच्या मुकुटावर कसा अधिष्ठित झाला त्याचें वर्णन आहे. सिंहगडच्या मोहिमेवरहि त्यांची कविता त्या वेळच्या वळणाप्रमाणें बहिर्मुख आणि पंडिती थाटाची आहे.

'जरठोद्वाह' या नाटकांत एखादी तरुण मुलगी म्हाताऱ्याची बायको झाली म्हणजे तिची कशी अनुकंपनीय स्थिति होऊन दुर्दशा उडते त्याचें वर्णन केलें आहे. नाटकाचा हेतु चांगला आहे. परंतु रचनेंत कौशल्य दृष्टीस पडत नाहीं. भाषा जुन्या वळणाची असून सुबोध आहे. परंतु बऱ्याच ठिकाणीं ग्रंथकर्त्यांनें सदभिरुचीचे नियम हटकून उल्लंघिले आहेत. या नाटकांतील नायिका दुसऱ्या एका तरुण पुरुषावर अनुरक्त असते आणि अनेक प्रयत्न करूनहि त्याची तिला प्राप्ति होत नाहीं. आणि शेवटीं तिला पश्चात्ताप होतो. नाटकांची योग्यता अजमावून पाहण्याचे कसोटीचे नियम आज जरी पुढें गेले असले, तरी त्यांत विशेष गुण निघतील असें वाटत नाहीं. स्वभावपरिपोष व रचना या बाबतींत नाटक अगदींच सामान्य असून ग्राम्यपणाचा तर कलंक मोठाच आहे.

अल्लाउद्दीन चितोडची राणी पद्मिनी हिची मागणी करितो आणि पद्मिनी आपलें सत्त्व राखण्याकरितां जोहार करिते या ऐतिहासिक कथानकावर 'भीमसिंग-पद्मिनी' या नाटकाची उभारणी झालेली आहे. हेंहि नाटक सामान्य आहे.

'चंद्रसेना' नाटकाचें कथानक परिचित आहे. श्री. डोंगरे यांचें हें एक शोकपर्यवसायी नाटक आहे. हें नाटक उपरिनिर्दिष्ट नाटकांपेक्षां बरें साधलें आहे. तथापि खुद्द रामचंद्र मारुतीची प्रार्थना करितो (पृष्ठ १२४) हें लोकसमजुतीच्या विरुद्ध आहे. चंद्रसेनेच्या तोंडचीं कांहीं वाक्यें नमुनेदार आहेत; उदाहरणार्थ, 'अग आम्ही स्त्रिया जिथपर्यंत नीट आहोंत तिथपर्यंत सुईपेक्षां सरळ, पण एकदां वांकड्या झाल्यावर मग विळीपेक्षां सुद्धां बांकदार' (पृ. ८७).

'चंद्रहास' नाटक 'किर्लोस्कर मंडळी' कांहीं वर्षें करीत असे. मूळ कथानक चांगलें असूनहि रचनाकौशल्याच्या अभावीं तें कसें फुकट जातें याचा नमुना या नाटकांत दृष्टीस पडतो.

डोंगरे यांचीं नाटकें सामान्य प्रतीचीं असलीं तरी महाराष्ट्रीय रंगभूमीच्या इतिहासांत त्यांना एक प्रकारें ऐतिहासिक महत्त्व आहे.

**डोंगरे यांचें वाङ्मयः—**

(१) भीमसिंग आणि पद्मिनी, १८८९. (२) जरठोद्वाह, १८९०. (३) चंद्रसेना, १८९७ (४) चंद्रहास, १९०३ (५) सैरंध्री.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः—**

(१) चरित्र, शं. बा. मुजुमदार, महाराष्ट्रीय नाटककार, पृष्ठ ४९—५६.

(२) चंद्रसेना (संगीत नाटकत्रयमधून), श्री. कृ. कोल्हटकर, विविधज्ञानविस्तार, पुस्तक २९, अंक ४ स. १८९८.

**डोंगरे वासुदेव नारायण** (१८५०–१९०५) नाटककार व नट. यांचा विद्याभ्यास मुंबईच्या विल्सन हायस्कुलांत मॅट्रिकपर्यंत झाला. ते अण्णा किर्लोस्कर यांचे समकालीन होते. १८८० सालीं संगीत नाटकाची टूम निघाल्याबरोबर यांनीं १८८१ सालीं स्वतःच्या नांवानें एक संगीत मंडळी काढली. या मंडळीकरितां स्वतःच कांहीं नाटकें यांनीं लिहिलीं. हीं नाटकें संस्कृत नाटकांचे बहुधा संक्षेप असत. या नाटकांपैकीं 'इंद्रसभा' हें नाटक, त्यांत नृत्य व गायन भरपूर असल्यामुळें बरेंच लोकप्रिय झालें होतें. यांची नाटक मंडळी 'बॉम्बे रॉयल ऑपेरा कंपनी' या नांवानें विख्यात होती. डोंगरे यांनीं स्वतंत्र असें एकच नाटक लिहिलें. हें नाटक म्हणजे वेश्यागमनाच्या दुर्व्यसनावर लिहिलेलें 'रंगी नायकीण' हें प्रहसनवजा नाटक होय. (आधारः— रंगभूमि वर्ष ५)

**डोंगरे वा. ना. यांचें वाङ्मयः—**

( १ ) शाकुंतल, ( २ ) इंद्रसभा, ( ३ ) रत्नावली १८८३, ( ४ ) मालती-माधव १८८५, ( ५ ) रंगी नायकीण १८८५, ( ६ ) वेणीसंहार १८९०, ( ७ ) मृच्छकटिक.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः—**

चरित्र, शं. बा. मुजुमदार, महाराष्ट्रीय नाटककार, पृष्ठ १४५–१४७.

**ढवळे परशुराम.** कवि. वसतिस्थान रत्नागिरी. सुमारें सत्तर वर्षांपूर्वी होऊन गेला. यानें सरस्वती गंगाधरकृत श्रीगुरुचरित्र नामक जो प्रसिद्ध मराठी ग्रंथ आहे त्यांतील सगळें कथानक आर्यावृत्तांत रचिलें आहे. याशिवाय 'गुरु-चरित्रसारमनोरमा' या नांवाचें कामदा वृत्तांतील बावनश्लोकी लहानसें प्रकरण यानें लिहिलें आहे. 'महाराष्ट्र-कवि-चरित्र'कार श्री. आजगांवकर या कवीच्या काव्या-संबंधीं पुढीलप्रमाणें (म. क. च. भा. २, पृ. २३८) लिहितात – "केवळ काव्य या दृष्टीनें पाहतां परशुराम कवीचें गुरुचरित्र फारसें वाखाणण्यासारखें आहे असें नाहीं. यमकपूर्तीसाठीं त्यास शब्दांची ओढाताण करावी लागली आहे. व्याकर-णास असंमत असे समास बरेच आढळतात, व भाषाप्रभुत्वहि बेताचेंच दिसतें. तथापि एकंदरींत ग्रंथ फार भाविकपणें लिहिला असून तो भाविकपणानेंच वाचला असतां वाचकांस खात्रीनें आनंददायक होईल यांत मुळींच संशय नाहीं. 'गुरु-चरित्रसारमनोरमा' हें लहानसें प्रकरण आपल्या नांवाप्रमाणें खरोखरच मनोरम व भक्तिरसप्रधान आहे."

**ढवळे परशुराम यांचें वाङ्मयः** – ( १ ) श्रीगुरुचरित्र, १८८६. ( २ ) गुरुचरित्रसारमनोरमा, १९०३

**चरित्र, चर्चा, अभ्यासः—**

चरित्र, ज. र. आजगांवकर, महाराष्ट्र कवि-चरित्र, भाग २ रा. पृष्ठ २३५ ते २४४.

**तर्खडकर दादोबा पांडुरंग** [ १८१४–१८८२ ] व्याकरणकार. यांचा जन्म मुंबईंत शेतवलींत झाला. मूळचें वसतिस्थान वसईजवळचें तर्खड खेडें. यांचे आजे रोजगारानिमित्त मुंबईस येऊन राहिले व पुढें दादोबांच्या वडिलांनीं शेतवलींत एक घरहि विकत घेतलें. दादोबांचे वडील एक भाविक गृहस्थ होते. त्यांचा पंढरपुरसंप्रदायी वैष्णवमार्गाकडे फार ओढा असे. त्यांचें भजन, कीर्तन,

पुराणवाचन नित्य चाले. दादोबांना यामुळें वडिलांच्या सान्निध्यांत मराठी काव्याची गोडी लागली व मायभाषेबद्दल आपुलकी वाटूं लागली.

दादोबांचें प्राथमिक मराठी शिक्षण निरनिराळ्या छोट्या शाळांत झालें. इंग्रजी शिक्षण १८२२ सालीं स्थापन झालेल्या 'बॉम्बे नेटिव एज्युकेशन सोसायटी'च्या शाळेंत झालें. या वेळेस जर्विस, सदाशिव काशीनाथ छत्रे, बापूशास्त्री शुक्ल वगैरे विद्वान या शाळेंत अध्यापक होते. अध्यापकांपैकीं बापूशास्त्री शुक्ल हे वाचन, लेखन व व्याकरण शिकवीत. दादोबांनीं आपल्या आत्मचरित्रांत यांचेविषयीं पुढील प्रमाणें लिहिलें आहे:—"हे शास्त्री संस्कृत व्याकरणांत मोठे प्रवीण होते. हे नवनिच, मला वाटतें गुरुजवळून अध्ययन करून पुण्यांत व इतर ठिकाणीं शास्त्र्यांच्या सभा पाहून आलेले होते. त्यांस हें परभु, शेणवी, सोनार, वैश्य अशा ज्ञातीच्या मुलास मराठी व्याकरण शिकविण्याचें काम फार हलकें वाटत होतें. जर पेशवाई असती, तर ते असें काम शंभर रुपये दरमहा घेऊन करते ना, मग चाळीस रुपयांस कोठून? परंतु आपल्या विद्वत्तेचे भोक्ते कोणी राहिले नाहींत म्हणोन उदरनिर्वाहाकरितां त्यांस असा रोजगार पाहणें जरूर पडलें. या शास्त्रीबावांची आमच्या शाळेंत नेमणूक होण्याचेपूर्वी रामचंद्रशास्त्री जानवेकर व दुसरे जर्विस साहेबाचे हाताखालचे एक-दोन पंडित यांहीं मिळून प्रश्नोत्तररूपानें एक लहानसें मराठी व्याकरण रचिलें होतें. व्याकरण वर्गांत व मराठी शाळेच्या पहिल्या-दुसऱ्या वर्गांत या व्याकरणाच्या प्रती लिहून त्यावरून मुलें व्याकरण शिकत होतीं; परंतु आमच्या मराठी शाळेवर बापूशास्त्री शुक्ल आल्यावर त्यांनीं त्या व्याकरणाची गरज न ठेवितां आपण तोंडानें मुलांकडून वाक्यें वाचवून त्याचें व्याकरण सांगूं लागले. ते पंचोपाख्यान, विदुरनीति, सिंहासनबत्तिशी, इसापनीति व बालमित्र हे ग्रंथ एकामागें एक आम्हांकडून वाचवून घेऊन आमच्या वर्णोच्चाराकडे लक्ष देऊन त्यांत जे कठिण शब्द येत त्यांचा अर्थहि ते आम्हांस नीट स्पष्ट रीतीनें सांगत. केव्हां-केव्हां मोरोपंताच्या आर्या व वामनाचे एक-दोन श्लोक व संस्कृत श्लोकहि ते मोठ्या प्रेमानें आम्हांस शुद्ध लिहितां यावें याकरितां म्हणून दाखवीत. मला स्वभाषेविषयीं इतकी गोडी लागली यास मुख्य कारण आमचे तीर्थरूपांची दिनचर्या व दुसरे हे बापूशास्त्री."

दादोबा शिक्षणक्रम आटोपल्यावर कांहीं दिवस जावरा संस्थानच्या नबाबाकडे शिक्षक म्हणून राहिले होते. तदनंतर त्यांस 'एल्फिन्स्टन इन्स्टिटयूट' मध्यें उप-

शिक्षकाची नोकरी मिळाली. पुढें ते मुख्य शिक्षक सुपरिंटेंडेंट व डेप्युटी कलेक्टर या हुद्यांपर्यंत वाढत गेले. १८६२ त त्यांनीं पेन्शन घेतलें. पेन्शन घेतल्यानंतरहि स्वस्थ न बसतां मोठी खटपट करून दादोबांनीं श्रीकृष्णशास्त्री तळेकर यांच्या मागें एज्युकेशनल ट्रॅन्सलेटरची जागा मिळविली. त्यांना सरकारकडून रावबहादुर हा किताब मिळाला होता.

मराठींत पद्धतशीर व्याकरण ग्रंथ लिहिण्याचा पहिला प्रयत्न दादोबांचाच होय. प्रसिद्ध पंडित बाळशास्त्री जांभेकर यांनींहि तसा प्रयत्न चालविला होता, परंतु त्यांच्या अकालीं झालेल्या मृत्युमुळें त्यास मूर्तस्वरूप आलें नाहीं. दादोबांची व्याकरणविषयक ज्ञानाची आरंभींची पुंजी बेताचीच होती. इंग्रजींतील गायचें व लिन्डेचें व्याकरण एवढींच काय तीं पुस्तकें त्यांनीं वाचलेलीं होतीं. परंतु त्या काळांत त्यांना या विषयावर जेवढे श्रम करतां येणें शक्य होते तेवढे त्यांनीं केले. ' यांत त्यांनीं संस्कृत व्याकरणाची पद्धत केवळ कारणापुरती घेऊन इंग्रजी व्याकरणपद्धतीचें अनुकरण केलें आहे आणि सर्व प्रकरणें व्यवस्थित व सुसंगत लिहिलीं आहेत. यांमध्यें साहजिकच इंग्रजी आणि संस्कृत या दोन पद्धतींचा घोटाळा झाला आहे.' दादोबांच्या या व्याकरणावर कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं जुन्या 'शालापत्रकां'तून विस्तृत व खरमरीत टीका केलेली आहे. व्याकरणाखेरीज त्यांचें विशेष प्रसिद्ध पुस्तक म्हणजे ' केकावली'वरील त्यांच्या ' यशोदा–पांडुरंगी' टीकेचें होय. हा ग्रंथ पाल्हाळिक असून त्याची भाषाहि बरीचशी क्लिष्ट आहे.

**तर्खडकर दादोबा पांडुरंग यांचें वाङ्मयः—**

( १ ) मराठी भाषेचें व्याकरण १८३६, १८५०, १८५६, १८६२, १८६७. ( २ ) लघुव्याकरण १८५० ( ३ ) केकावली–यशोदा पांडुरंगी टीकेसह १८६५, १९३१. ( ४ ) महाराष्ट्र भाषेच्या व्याकरणाची पूरणिका १८८१. ( ५ ) परमहंसिक ब्रह्मधर्म १८८१. ( ६ ) शिशुबोध १८८४. ( ७ ) धर्मविवेचन. ( ८ ) विधवाश्रुमार्जन १८५७. ( ९ ) इंग्लिश व्याकरणाची मूळ पीठिका १८६३.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः—**

( १ ) आत्मचरित्र – संपादक, ल. रा. पांगारकर, विविधज्ञानविस्तार, जुलै, १९१५.

( २ ) आत्मचरित्र – विविधज्ञानविस्तार, जुलै ते डिसेंबर १९२७; मार्च ते जुलै १९२८.

**तळेकर श्रीकृष्णशास्त्री** [ १८२६–१८८० ] कोशकार व व्याकरणकार. यांचे वडील रघुनाथशास्त्री हे दशग्रंथी ब्राह्मण होते. श्रीकृष्णशास्त्री यांनीं पुण्याच्या संस्कृत पाठशाळेंत अलंकारशास्त्राचा चांगला अभ्यास केला; आणि त्या काळच्या चालीप्रमाणें दक्षिणा मिळविली. पुढें दिवसानुदिवस इंग्रजीचें महत्त्व वाढूं लागलें. महादेवशास्त्री कोल्हटकर, कृष्णशास्त्री चिपळूणकर, विष्णुशास्त्री पंडित इत्यादि मंडळी क्यांडी साहेबांच्या वर्गांत इंग्रजी शिकूं लागली, तेव्हां श्रीकृष्णशास्त्री हेहि इंग्रजीचा अभ्यास करूं लागले. पण दुर्दैवानें वडील वारल्यामुळें त्यांस अभ्यासक्रम मधेंच सोडावा लागला. क्यांडीसाहेबांचा यांचेवर बराच लोभ होता; त्यामुळें त्यांस त्यांनीं इंग्रजी कारकुनाची जागा दिली. या जागेवर असतां मोल्सवर्थला 'मराठी-इंग्रजी कोश' तयार करण्याचे कामीं यांनीं चांगलें साह्य केलें. कांहीं वर्षें हे पंडितपणाचें म्हणजे साहेब-लोकांस मराठी शिकविण्याचें काम करीत असत. पुढें बेळगांव हायस्कूलांत त्यांस संस्कृतचा शिक्षक नेमण्यांत आलें. या ठिकाणीं असतां त्यांनीं संस्कृत भाषेचें व्याकरण मराठींत लिहिलें. बेळगांवहून यांची क्यांडीच्या हाताखालीं ट्रान्सलेशन एक्झिबिशनर म्हणून बदली झाली. या जागेवर असतां त्यांनीं क्यांडीला बरीच मदत केली. हे पुढें मराठी ट्रान्सलेटरच्या हुद्यापर्यंत पोंचले. यांनीं तयार केलेला 'इंग्रजी-मराठी कोश' प्रसिद्ध आहे. ( आधारः – विविधज्ञानविस्तार, पु. १२ )

**तळेकर यांचें वाङ्मयः**—( १ ) इंग्लिश-मराठी कोश, १८६१. ( २ ) संस्कृत भाषेचें व्याकरण, १८६६.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः**—

मृत्युलेख, विविधज्ञानविस्तार–पु. १२; अं. ५ ते ७, १८८०.

**तेलंग मंगेश जिवाजी** [ १८७२–१९०९ ] निबंधकार. यांचें मूळ गांव बेळगांव जिल्ह्यांतील खानापूर. १८९२ सालीं हे 'डेक्कन कॉलेजां'तून बी. ए. झाले. १८९७ सालीं एल्एल्. बी. ची परीक्षा दिली. वकिलीचा धंदा करीत असतांनाच 'धुरीण' व 'चिकित्सक' हीं साप्ताहिकें हातीं घेऊन तीं त्यांनीं उत्तम रीतीनें चालविलीं. इतिहास, तत्त्वज्ञान व वेदान्त या विषयांवरील यांचा व्यासंग व्यापक व मार्मिक होता. यांची भाषा सुंदर, भारदस्त व खोंचक असे. यांचे अनेक निबंध 'विविधज्ञानविस्तारां'त प्रसिद्ध झाले आहेत.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः—**

( १ ) चरित्र, मनोरंजन एप्रिल १९०९.

( २ ) मृत्युलेख, विविधज्ञानविस्तार पु. ४०, अं. २, सन १९०९

**तेंडोलकर बाबाजी अनंत** [ मृत्यु १९२७ ] प्राचीन काव्य-संग्राहक व प्रकाशक. सुमारें ३७ वर्षांपूर्वी यांनीं स्वतःचा एक मोठा छापखाना स्थापन करून भागवत दशम स्कंधावरील कृष्णदयार्णवांच्या प्रचंड ( यांतील ओंवी संख्या जवळजवळ ४२००० आहे ) 'हरिवरदा' टीकेचें प्रकाशन केलें. यांच्या पूर्वजांत आनंद संप्रदायाचा अनुग्रह असल्यामुळें त्यांनीं ह्या ग्रंथाची हस्तलिखित प्रत मोठ्या परिश्रमानें नाशिकांतून मिळविली होती. त्यांनीं आपल्या छापखान्यास 'श्री हरिवरदा' हेंच नांव ठेविलें होतें. या छापखान्यांतून त्यांनीं मोरोपंतांचे समग्र ग्रंथ, वामनपंडिताची कांहीं कविता, कांहीं रामदासी कविता, व कित्येक प्राचीन ग्रंथ प्रकाशित केले. पुढें हेच ग्रंथ निर्णयसागरनें अधिक सुबकपणें छापण्याचें सुरू केल्यामुळें तेंडोलकरांचे ग्रंथ विक्रींत मागें पडले आणि त्यांना त्यांत हजारों रुपयांची ठोकर बसली. यामुळें ग्रंथसंपादनाचा व्यवसाय अजिबात सोडून देऊन ते अन्य व्यवसायांत पडले.

**त्रिलोकेकर सोकर बापूजी** [ १८३६-१९०८ ] आद्य संगीत नाटककार. यांचा जन्म मुंबई येथें झाला. तेव्हां, लोकशिक्षणाची व्यवस्था हिंदुस्थानांतल्या इंग्लिश राज्यांत बरोबर लागली नव्हती. हिंदुस्थानांतल्या प्रजाजनांस उच्च प्रतीचें शिक्षण इंग्रजी भाषेच्या द्वारें द्यावें किंवा देशभाषांच्या द्वारें द्यावें याचा निर्णय नुकता लागून इंग्लिश भाषा त्यांस चांगल्या प्रकारें शिकविण्याचा विचार ठरला होता. आणि देशभाषांच्या शाळांची स्थिति अगदीं प्राथमिक होती. मराठी क्रमिक पुस्तकांना ठिकाण नव्हता. अंकलिपि, जागती जोत, वाटसरांच्या गोष्टी, लिपिधारा, इसापनीति, वाचनपाठमाला, बालमित्र, अशीं किरकोळ पुस्तकें मुलांकडून वाचवीत असत. एक पद्धति म्हणून कांहीं बसलेली नव्हती. अशा शाळांत सोकर बापूजींचा मराठी अभ्यास झाला. त्यांत त्यांना किती व कसा मार्मिकपणा संपादितां आला असेल याची सहज कल्पना करितां येण्यासारखी आहे. तेव्हां ईयत्ता नव्हत्या, इंग्रजी शाळेंत प्रवेश होण्यास अमकें आलेंच पाहिजे असें कांहीं नव्हतें, त्यामुळें, आणि इंग्रजी शिकण्याकडे लोकांचा ओढा फार

असल्यामुळें, मराठी थोडेंसें कळूं लागल्यावर सोकर बापूजी 'एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूशन' ह्या नांवाच्या इंग्रजी शाळेंत जाऊं लागले. तेथें त्यांचा अभ्यास चांगला झाला, आणि त्यांची परीक्षा उतरून तेव्हांच्या वहिवाटीप्रमाणें ते नॉर्मल स्कॉलर झाले. त्या वर्गांत त्यांना थोडा पगार मिळत असे, आणि त्यांस शिक्षकाचें काम शिकवीत असत. तेथल्या अभ्यासाच्या विषयांत त्यांनीं चांगलें प्रावीण्य संपादिलें. नंतर कांहीं दिवस त्यांनीं 'प्रभु सेमिनरी' या शाळेंत शिक्षकाचें काम करून चांगला लौकिक मिळविला. तेथून निघून त्यांनीं १८५७ त 'एल्फिन्स्टन इन्स्टिटयूशन'मध्यें शिक्षकाची जागा पतकरिली. तेथें पांच-सात वर्षें काम केल्यावर हायकोर्टांत ऐशी रुपये दरमहावर ट्रान्सलेटर झाले. त्यांस मराठीखेरीज गुजराथी, इंग्रजी इत्यादि भाषा मार्मिकपणें कळत असल्यामुळें त्याची हुशारी पाहून तेथील न्यायाधीशांनीं, त्यास पायरी-पायरीप्रमाणें बढती देऊन दरमहा ४६० रुपयांपर्यंत चढविलें. १८९७ सालीं हे सेवानिवृत्त झाले.

सोकर बापूजींस गाण्याचा फार नाद होता. त्यांनीं त्याचें शास्त्रीय पद्धतीनें अध्ययन केलें होतें. या अध्ययनाचा उपयोग त्यांनीं संगीत नाटकें रचण्याकडे केला.

१८७१ त मुंबईच्या 'एल्फिन्स्टन कॉलेजां'तील विद्यार्थ्यांनीं केवळ करमणुकीकरितां संस्कृतांत गद्यपद्यात्मक 'शाकुंतल' नाटकाचा प्रयोग करून दाखविला. त्यांतल्या पात्रांनीं आपापल्या वांट्याचीं भाषणें बोलून दाखवून तद्वाचक पद्येंहि तालासुरावर उत्तम रीतीनें गाइलीं. तीं ऐकून श्रोतृसमुदायास अत्यंत संतोष वाटला आणि मोठें कौतुक झालें. त्यावरून सोकर बापूजींच्या मनांत असें आलें कीं हा पर्याय मराठींत झाला तर करमणूकची करमणूक आणि बोधाचा बोध हीं दोन्ही साधतील. त्याप्रमाणें त्यांनीं १८७९ त मराठी गद्यपद्यात्मक 'नलदमयंती' लिहून प्रसिद्ध केलें. त्याचे प्रयोगहि रंगभूमीवर झाले.* ते चांगले उतरले. तो नवा नाटकप्रकार त्या वेळच्या रसज्ञांस फार आवडला. शंकर मोरो रानडे, वासुदेवराव डोंगरे इत्यादि मर्मज्ञ नाट्यकलापटूंनींहि त्यांची फार तारीफ केली. त्याच वर्षीच्या ११ 'ऑगस्टच्या 'इंदुप्रकाशा'नें म्हटलें आहे: – "आमच्या नाटक-

---

* हे प्रयोग 'हिंदुसन्मार्गबोधक मंडळी'नें नाट्यकलाभिज्ञ शंकर मोरो रानडे, संगीतशास्त्रज्ञ वासुदेव नारायण डोंगरे आणि नारायण हरि भागवत वगैरे नाटकप्रिय लोकांच्या देखरेखीखालीं व शिकवणीनें केले." (मराठी रंगभूमि, पृष्ठ ८८).

पद्धतींत ग्रंथकर्त्यांनीं ही एक सुधारणा केली असें म्हणण्यास प्रत्यवाय दिसत नाहीं. तरी अलिकडील नाटकी तऱ्हेची सुधारणा होऊन उत्तरोत्तर नाट्यकलेची वास्तविक योग्यता समजावून देण्यास हा ग्रंथ जास्त साधनीभूत होईल असें आम्हांस वाटतें." आणि तसें पुष्कळ अंशीं झालें आहे असा इतिहास आहे. वास्तविक पाहिलें असतां मराठींतल्या संगीत नाटकाचा खरा आरंभ हा होता. तेव्हां मराठींतले आद्य संगीत नाटकाचार्य सोकर बापूजी हे होत. येथें हेंहि सांगणें आवश्यक वाटतें कीं अण्णासाहेब किर्लोस्करांच्या संगीत नाटकांचे प्रयोग त्याच्या पुढच्या वर्षापासून म्हणजे १८८० पासून होऊं लागले. आणि तेव्हांपासून त्यांत अनेक प्रकारच्या सुधारणा होऊन आतां त्यास अगदीं वेगळें स्वरूप मिळालें आहे. तो एक वेगळा धंदा झाला आहे. तें समाजाच्या मनोरंजनाचें एक मोठें साधन होऊन बसलें आहे. ( आधार – बालबोध, जून १९०९. )

" रा. त्रिलोकेकर यांनीं 'नलदमयंती' हें नाटक श्रीमहाभारत व भट्ट प्रेमानंदकृत नलोपाख्यान यांच्या आधारें रचिलें असून त्यांत त्यांनीं आर्या, साक्या, दिंड्या निरनिराळ्या वृत्तांतील श्लोक यांचा भरणा जास्त घातला आहे. तथापि त्यांत कांहींकांहीं जुन्या चालींवरचींहि पद्यें घातलीं असून 'पतिविण मजला सौख्य गमेना। काय करूं मजला कांहीं सुचेना' इत्यादि दमयंतीच्या तोंडचीं व याखेरीज आणखीहि दुसरीं कांहीं पद्यें सरस साधिलीं आहेत.

त्रिलोकेकर यांचीं नाटकें करणाऱ्या 'हिंदुसन्मार्गबोधक मंडळी'त बापू खरे हे सूत्रधार, कलि, ऋषि वगैरेंचीं कामें उत्कृष्ट करीत असून त्यांचें गाणेंहि मोहक होतें. याखेरीज अण्णा मंत्री, कोठारे वगैरे इसम दुसरीं कामें करीत असत. ही मंडळी नाटकाचा धंदा करणारी नव्हती. आपापले उद्योग संभाळून मौजेखातर नाटकें करीत असत. त्यामुळें नाटकें चांगलीं होऊन खेळास पांच-सहाशें रुपयेपर्यंत उत्पन्न होत असे. त्रिलोकेकर यांनीं संगीत 'हरिश्चंद्र' या नांवाचेंहि एक नाटक लिहिलें आहे. त्याची पहिली आवृत्ति १८८० मध्यें निघाली असून ती किर्लोस्करांच्या प्रयोगापूर्वीच छापलेली आहे. या नाटकांत हरिश्चंद्राचा छळ चालला असतां त्यानें म्हटलेलीं पद्यें व तारामतीच्या शोकाचीं पद्यें हीं सरस असून या नाटकाचे प्रयोगहि प्रेक्षणीय होत होते असा उल्लेख आहे." (मराठी रंगभूमि, पृष्ठ ९०।९१) या दोन नाटकांखेरीज त्यांनीं 'सावित्री' नांवाचेंहि एक नाटक लिहिलें आहे.

**त्रिलोकेकरांचें वाङ्मयः**– (१) नलदमयंती नाटक, १८७९; (२) हरिश्चंद्र नाटक, १८८०; (३) सावित्री नाटक, १८९२; (४) गणेश हरिहरस्तव, (१८९७)

**चरित्र, चर्चा, अभ्यासः**—

(१) नलदमयंती नाटक (परीक्षण), विविधज्ञानविस्तार, पुस्तक १२, अंक ४, सन १८८०.

(२) हरिश्चंद्र नाटक (परीक्षण), विविधज्ञानविस्तार, पुस्तक १५, अंक ५ ते ७, सन १८८३.

(३) नलदमयंती नाटक (परीक्षण), नेटिव ओपिनियन, १ जून १८७९.

**दडकर पांडुरंग बाळकृष्ण** [ १८७३–१९२३ ] कवि. यांचा जन्म सावंतवाडी येथें सरदार घराण्यांत झाला. पोर्तुगीज व सावंतवाडकर भोंसले यांचेमध्यें झालेल्या लढायांत यांचे आजे पांडबा दडकर यांनीं अनेक वेळां अतुल पराक्रम दाखवून भोंसल्यांची बाजू सांवरली आहे. दडकरांचें प्राथमिक शिक्षण सावंतवाडी येथें व उच्च शिक्षण मुंबई येथील 'सेंट झेविअर' हायस्कूल व कॉलेज यांत झालें. सावंतवाडीस हे वकिली करीत असत. इंग्रजी व फ्रेंच या भाषांवर त्यांचें चांगलेंच प्रभुत्व होतें. कविता रचण्याचा नाद त्यांना लहानपणापासून जडला. सेंट झेविअर कॉलेजांत एफ्. ए. च्या वर्गांत असतां १८९१ सालीं त्यांनीं 'रजपूतकन्या तारा' या नांवाचें एक काव्य लिहून प्रसिद्ध केलें होतें. या काव्याची या वेळीं अनेकांकडून प्रशंसा झाली. यांनीं स्फुट कविता बरीच लिहिली असून ती 'मासिक मनोरंजन' 'नवयुग' 'काव्यरत्नावलि' वगैरे मासिकांतून प्रसिद्ध झाली आहे. हे इंग्रजींतहि काव्यरचना करीत.

**पां. बा. दडकर यांचें वाङ्मयः**—

(१) रजपूतकन्या तारा. (काव्य)

**दप्तरदार विठोबाअण्णा** [ १८१३–१८७३ ] संतकवि. जन्म कऱ्हाड येथें झाला. यांचे पूर्वज पेशवाईंत दप्तरदार असल्यामुळें यांस दप्तरदार हें आडनांव पडलें. यांची बरीचशी ग्रंथरचना मराठीपेक्षां संस्कृतांतच झाली. यांच्यासंबंधीं रा. आजगांवकर आपल्या 'महाराष्ट्रकविचरित्रां'त (भाग ३, पृ. १९४) पुढीलप्रमाणें लिहितात—" मोरोपंताच्या मागें जुन्या पद्धतीनें कविता

करणारे जे कवी होऊन गेले, त्यांत विद्वत्तेनें व सदाचरणानें व काव्यगुणांनीं युक्त असा कवि विठोबाअण्णासारखा दुसरा झाला नाहीं. अण्णांची विद्वत्ता अवर्णनीय होती. मोरोपंत, सोहिरोबा इत्यादि कवींची कविता त्यांनीं लक्षपूर्वक वाचली होती हें त्या कवींसंबंधानें त्यांनीं जे उद्गार काढले आहेत त्यांवरून उघड होतें. अण्णांच्या 'सुश्लोकलाघवां' तील श्लोकांचा उपयोग करून रसिक हरदास लोक आपल्या कीर्तनास कसा रंग आणितात याचा अनुभव पुष्कळांस असेल. अण्णांनीं आपल्या संस्कृत काव्यांप्रमाणें मराठींत एकहि मोठें काव्य लिहिलें नाहीं ही गोष्ट खरी; पण त्यांची जी काय मराठी कविता उपलब्ध आहे तिचें अवलोकन केलें असतां कवि या नात्यानें अण्णांची योग्यता फार मोठी आहे असें म्हटल्याशिवाय राहवत नाहीं. त्यांच्या कवितेंत विद्वत्ता, रसिकता, प्रेम, भक्ति, गेयता हे गुण सारख्या प्रमाणांत असल्यामुळें ती कविता वाचतांना रसिकांच्या चित्तवृत्ती क्षणभर वेडावल्याखेरीज राहत नाहीं."

पुणें येथें १८६८ सालीं शंकराचार्यासमोर, 'विधवाविवाह सशास्त्र कीं अशास्त्र' यासंबंधीं जो प्रसिद्ध वाद झाला त्यांत अण्णांनीं प्रामुख्यानें भाग घेतला होता. या वादांत उपयोगीं पडावा म्हणून श्रुतिस्मृतींतील वचनें ज्यांत संग्रहित केलीं आहेत असा 'विवाहतत्त्व' नांवाचा ग्रंथ त्यांनीं तयार केला होता. 'सुश्लोक-लाघव' व 'पदसंग्रह' हे यांचे दोन प्रकाशित ग्रंथ होत.

**विठोबाअण्णा दप्तरदार यांचें वाङ्मयः—**

( १ ) सुश्लोकलाघव (सार्थ) १९१७, १९२२. ( २ ) विवाहतत्त्व. ( ३ ) पदसंग्रह.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः—**

( १ ) चरित्र – ज. र. आजगांवकर, महाराष्ट्र कविचरित्र भाग ३ रा, पृष्ठ १७३ ते २०५.
( २ ) चरित्र – केरळकोकिळ, सप्टेंबर १८९३.
( ३ ) चरित्र – वि. वा. महाडेश्वर, मुमुक्षु, ऑगस्ट १९२७.

**दात्ये रघुनाथशास्त्री** [ १९ वे शतकाचा पूर्वार्ध ] यांनीं सरकारी हुकुमानें हिंदुधर्मशास्त्रावरील मिताक्षरा, व्यवहाराध्याय व मयूख दायभाग यांचें मराठींत अक्षरशः भाषांतर करून सन १८४४ त प्रसिद्ध केलें.

**दामले मोरो केशव** [ १८६८–१९१३ ] व्याकरणकार व निबंधकार. प्रसिद्ध कवि केशवसुत यांचे हे बंधु. १८९३ सालीं इतिहास व तत्त्वज्ञान हे विषय घेऊन हे मुंबई विश्वविद्यालयाचे एम्. ए. झाले. १८९४ ते १९०७ पर्यंत उज्जैन येथील 'माधव कॉलेजां'त यांनीं लॉजिक व फिलॉसॉफी या विषयांचे प्रोफेसर म्हणून काम केलें. पण पुढें तें कॉलेज बंद झाल्यामुळें त्यांनीं १९०८ सालीं नागपूर येथील 'सिटी स्कूल'वरील सरकारी जागा पत्करिली. १९१३ सालीं मे महिन्याच्या सुटींत नागपूरहून पुण्यास येत असतां वाटेंत रेल्वेच्या अपघातांत यांचा अंत झाला. यांनीं लिहिलेला महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे 'शास्त्रीय मराठी व्याकरण' ( १९११ ) हा होय. हा ग्रंथ फारच विस्तृत म्हणजे ९९० पृष्ठांचा आहे. मराठी व्याकरणाची शास्त्रीय पद्धतीनें रचना व्हावी हा याचा उद्देश आहे. यांत पूर्ववैय्याकरणांच्या कृतींचें जागोजाग परीक्षण आलेलें आहे. या पुस्तकावर इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांनीं परीक्षणात्मक, सूचनात्मक व संशोधनात्मक असा एक विस्तृत निबंध लिहिला आहे. या निबंधाचा पूर्वभाग गोवें प्रांतांतील फोंडें गांवीं एके काळीं निघणाऱ्या 'प्राचीप्रभा' या मासिकांत क्रमशः प्रसिद्ध झाला असून उत्तर भाग 'सुबंतविचार' या नांवानें 'भारत इतिहाससंशोधक मंडळा'तर्फे १९१२ सालीं प्रसिद्ध झाला आहे. राजवाड्यांनीं या निबंधाच्या शेवटीं जें मतप्रदर्शन केलें आहे व व्याकरणकारांस व तशा तऱ्हेचा प्रयत्न करणाऱ्यांस ज्या सूचना केल्या आहेत त्या महत्त्वाच्या असल्यामुळें येथें देत आहों.

" दामल्यांची तिङन्तप्रक्रिया येथून तेथून प्रमादग्रस्त आहे. दामल्यांची सुबंतप्रक्रिया तर तिङन्तप्रक्रियेहूनहि दोषग्रस्त आहे. समासप्रक्रियेंतहि व्यंगें आहेतच. एकशेष समास व कृदन्त समास मराठींत कसे होतात हें दामल्यांच्या अवलोकनांतहि नाहीं. एवंच दामल्यांचें सर्वच व्याकरण येथून तेथून दुष्ट. इतरांच्याहून दामल्यांचा ग्रंथ सरस. तेव्हां त्या इतरांचे ग्रंथ तर शास्त्रदृष्टीनें हातीं धरण्यासारखेहि नाहींत. हा शेरा फक्त अवलोकनासंबंधानें झाला. शास्त्रसरणीसंबंधानें तर व्याकरणशास्त्रांत दामले कोठेंच नाहींत. उत्सर्ग व अपवाद कसे रचावे याचें स्वप्नहि दामल्यांना नाहीं. तेव्हां, दामल्यांना एवढीच शिफारस आतां करावयाची आहे कीं पाणिनीय शास्त्राचा त्यांनीं अभ्यास करावा. तो अभ्यास घोकंपट्टी



माधव चंद्रोबा डुकले



दादोबा पांडुरंग तर्खडकर



शंकर बापूजी त्रिलोकेकर



मोरो केशव दामले

करणाऱ्या जुनाट शास्त्र्यांच्या धर्तीनें करून कांहींएक फायदा होणार नाहीं. पाणिनीनें 'अष्टाध्यायी' कोणत्या पद्धतीवर रचिली आहे त्याचा अभ्यास करणें श्रेयस्कर आहे. भट्टोजीच्या 'कौमुदी'चीहि पद्धति मराठीच्या व्याकरणशास्त्राला उपकारक नाहीं. शास्त्र म्हणजे सामान्य सिद्धान्तांची परंपरा. कांहीं एक कार्य आहे व तें कांहीं नामांना, सर्वनामांना, धातुरूपांना व अव्ययांना होत आहे. तर सत्कार्यप्रीत्यर्थ नामें, सर्वनामें, धातुरूपें व अव्ययें एके ठिकाणीं आणिलीं पाहिजेत. तात्पर्य, व्याकरणशास्त्र रचावयाचें म्हणजे प्रथम अत्यंत सामान्य कार्यांचा शोध करावयाचा, नंतर त्याहून कमी सामान्य कार्यांचा शोध करावयाचा, आणि शेवटीं सर्वांहून कमी व्यापक अशा सामान्य कार्यांचा शोध करावयाचा. आणि सरते शेवटीं जेथें सामान्य कार्य सांपडत नाहीं तेथें निपात करावयाचा. पाणिनीय 'अष्टाध्यायी'च्या दृष्टीनें भट्टोजीची 'कौमुदी' फक्त रूपसिद्धीचा ग्रंथ आहे. नामें, सर्वनामें धातू, समास, वगैरेंच्या रूपांची सिद्धि करितांना त्याच त्या सूत्रांची अनुवृत्ति भट्टोजीला पदोपदीं करावी लागते. म्हणजे भट्टोजीची प्रत्येक प्रक्रिया एकएक स्वतंत्र ग्रंथ आहे व त्या त्या प्रक्रियेला 'अष्टाध्यायी'तील त्याच त्या सूत्रांची पुनरुक्ति करावी लागते. त्यानें होतें काय कीं कार्याचें सामान्यत्व व्याकरण पढणाऱ्याच्या लक्षांत येत नाहीं व त्याची शास्त्रदृष्टि पोसत नाहीं. 'कौमुदी'च्या उजेडानें व्याकरण पढणाऱ्या घोक्यांच्या हातून व्याकरणशास्त्राची प्रगति आजपर्यंत का झाली नाहीं याचें कारण भट्टोजी दीक्षित होत. भट्टोजीची 'कौमुदी' रूपसिद्धीच्या दृष्टीनें सर्वोत्तम आहे; परंतु शास्त्रदृष्टीनें अधम आहे. शुद्धरूपें कशीं करावीं व कशीं साधावीं ही कला कौमुदी शिकविते. म्हणजे भट्टोजीची 'कौमुदी' हा कलाग्रंथ आहे. आणि कलाग्रंथ जे पढतात ते कलावन्त होतील व नानाप्रकारचीं लहानमोठीं प्रसिद्धाप्रसिद्ध रूपें साधतील, परंतु व्याकरणशास्त्रज्ञ होणार नाहींत. पाणिनीचा शास्त्रदृष्टीनें अभ्यास करावयाचा म्हणजे 'अष्टाध्यायी'वरून अधिकरणावरच केला पाहिजे. प्रत्येक अधिकरण म्हणजे तद्विषयक सामान्यकार्यांची उतरती किंवा चढती परंपरा आहे. स्वतः सर्व अधिकरणेंहि सामान्यकार्यांची एक मोठी परिणालिका आहे. ह्या पाणिनीय धर्तीवरच मराठी व्याकरणशास्त्राची इमारत उभारली पाहिजे. आतां दामल्यांनीं आपल्या व्याकरणाचे जे भाग पाडले आहेत ते 'कौमुदी'च्या धर्तीवर पाडिले आहेत, 'अष्टाध्यायी'च्या धर्तीवर पाडिले नाहींत. म्हणजे एका संस्कृत व्याकरणकलाग्रंथाचें दामल्यांनीं अनुकरण केलें आहे. अर्थात् त्यांचा ग्रंथ प्रायः

रूपसिद्धीचा आहे, सामान्यसिद्धान्तपरंपरारूप शास्त्राचा नाहीं. कोणत्याहि भाषेचें व्याकरणशास्त्र रचावयाचें म्हणजे शुद्ध रूपांची सिद्धि करीत बसावयाचें नाहीं. शास्त्र रचतांना रूपसिद्धि सहजच होत असते. शास्त्र म्हणजे मूलतत्त्वरूप बीजापासून संपूर्ण भाषावृक्षाचा विस्तार कोणत्या परिणालिकेनें कसकसा फैलावत गेला तें दाखवावयाचें. तें दाखवितांना प्रथमतः निरनिराळ्या भाषांच्या वैय्याकरणांना निरनिराळ्या अडचणी येतात. कित्येक भाषा रानटी लोकाच्या फक्त बोलण्यांतच तेवढ्या येणाऱ्या आहेत. त्यांचें व्याकरण रचावयाचें म्हणजे अक्षरसंकेतापासून सजवणी केली पाहिजे. कित्येक भाषांना अक्षरविन्यास उपलब्ध असतो, परंतु त्यांच्यांतील शब्दांचें व रूपांचें अवलोकन नीट झालेलें नसतें. अशा भाषांचें व्याकरण रचावयाच्या आधीं अवलोकन व अवलक्षण ऊर्फ ओळख या विषयाचा छडा व्याकरणरचकाला लावावा लागतो. व्युत्पत्तीचें म्हणजे शब्दांच्या परंपरेचें कार्य कित्येक भाषांचें होऊन गेलेलें असतें. त्याचें फक्त वर्गीकरण व सामान्यनियमसंकलन एवढेंच काम वैय्याकरणाकडे राहतें. येणेंप्रमाणें परिस्थित्यनुरूप ते ते निरनिराळे पूर्वसंस्कार त्या त्या भाषांच्या व्याकरणकाराला करावे लागतात. पाहणी झाली व ओळख पटली, म्हणजे नंतर वर्गण व नियमपरंपरा ह्यांना हात घालतां येईल. ही आपत्ति ओळखूनच प्रस्तुत टीकारूप संशोधनात्मक निबंध प्रस्तुत लेखकानें लिहिला आहे. ह्या टीकारूप संशोधनाचा उपयोग प्रथम करून, नंतर सिद्धान्तसोपानरूप शास्त्र जेव्हां केव्हां कोणी दीर्घोद्योगी शास्त्रचणक रचील तेव्हां त्याच्याशीं व्याकरणशास्त्राच्या गोष्टी बोलावयाला फुरसत होईल.

मराठी व्याकरणावर पुढील लोकांनीं लिहिलेलें आहे. १ दादोबा पांडुरंग तर्खडकर, २ कृष्णशास्त्री चिपळोणकर, ३ कृष्णशास्त्री गोडबोले, ४ Beames, ५ Hoernle, ६ भाडारकर. ह्यांपैकीं चिपळोणकर, गोडबोले, Hoernle व भांडारकर हे संस्कृत व्याकरणाचे ज्ञाते होते. दादोबा व Beames ह्यांना संस्कृत व्याकरण फारसें येत नव्हतें. जुन्या मराठीवर प्रस्तुत टीकाकारानें ( राजवाडे ) लिहिलें आहे. प्राकृत भाषांवर वररुचि, कात्यायन, हेमचंद्र व पिशेल ( जर्मन पंडित ) यांनीं लिहिलें आहे. वैदिक व संस्कृत भाषांवर पुढील लोकांनीं लिहिलें आहे. १ प्रातिशाख्यकार, २ यास्क, ३ पाणिनि, ४ कात्यायन, ५ पतंजलि, ६ नागोजी भट्ट, ७ सायण.

मराठी भाषेचें ज्याला शास्त्रीय व्याकरण लिहावयाचें असेल त्यानें वर दिलेल्या ग्रंथकारांचा चांगला परिचय केला पाहिजे. वैदिक, संस्कृत, प्राकृत व मराठी भाषांवर आणिक शेंकडों हिंदू व युरोपियन लोकांनीं संशोधनात्मक, टीकात्मक, तर्कात्मक, तुलनात्मक, नानातऱ्हेचे बरेवाईट लेख लिहिले आहेत.

आतां दामल्यांना एक सूचना करून हा परीक्षणात्मक, सूचनात्मक व विशेषतः संशोधनात्मक लेख संपवितों. साधकबाधक प्रमाणें पाहून निर्णय करण्याची हातोटी दामल्यांना बरीच चांगली अवगत आहे. आणि ह्या एका गुणाच्या जोरावर त्यांनीं मराठी भाषेचें व्याकरण लिहिण्यास कंबर बांधिली आहे. परंतु ह्या एकाच गुणाच्या साहाय्यानें मराठीचें व्याकरण सशास्त्र रचिलें जाण्याचा समय अद्याप प्राप्त झालेला नाहीं. अद्याप व्युत्पत्तिद्वारा शब्दांचीं व प्रत्ययांचीं व धातूंचीं रूपें यथातथ्य ओळखण्याचें काम व्हावयाचें आहे. तें जोंपर्यंत संपूर्ण झालें नाहीं, तोंपर्यंत एकट्या निर्णायक गुणाचा फारसा उपयोग होणार नाहीं. तेव्हां दामल्यांनीं पूर्ववैदिक, वैदिक, प्राकृत, अपभ्रंश, संस्कृत व जुनें मराठी ह्या भाषांच्या व्याकरणाचा अभ्यास करून, प्रथम शब्द, धातू व प्रत्यय यांचीं स्वरूपें ओळखण्याचें काम स्वतः करावें किंवा अन्य कोणी हें काम करीतोंपर्यंत व्याकरणरचनेचा हव्यास सोडून द्यावा. परंतु, त्यांनीं हें काम स्वतःच करावें हें श्रेयस्कर; कां कीं, प्रस्तुतकालीं आपल्या देशातील परिस्थितीच अशी आहे. कोणतेंहि शास्त्रीय काम करण्याला ह्या देशांत प्रायः अनेक तर सोडूनच द्या, पण अर्धाहि माणूस निर्माण झालेला नाहीं. तेव्हां श्रमविभाग होण्याची आशा करणें आणीक पन्नास शंभर वर्षें ह्या देशांत अयुक्त आहे......सबब, दामल्यांना अशी विनंति आहे कीं शब्दव्युत्पत्तीचें हें पूर्वकृत्य त्यांनीं प्रथम करावें आणि मग शास्त्रीय व्याकरण रचण्याच्या कामास लागावें.

व्याकरणशास्त्र हें समाजशास्त्राचें व इतिहासशास्त्राचें व मानववंशशास्त्राचें मोठें उपकारक आहे. समाजशास्त्रांत, इतिहासशास्त्रांत व मानववंशशास्त्रांत, तौलनिक व ऐतिहासिक व्याकरणाच्या साहाय्यानें जसा व्हावा तसा समर्पक उलगडा होत नाहीं. तौलनिक व ऐतिहासिक व्याकरण सिद्ध व्हावयाला वैयक्तिक व्याकरणाची आवश्यकता असते; सबब, वैयक्तिक व्याकरणशास्त्राची अत्यंत जरूर असते. अंतरें व प्रत्यंतरें व दाखले येथें देत नाहीं. इच्छा असेल त्यानें त्या त्या शास्त्रांच्या

इतिहासांतून व प्रांतांतून दाखले पाहून घ्यावेत. पंतजलीनें ‘महाभाष्या’च्या प्रारंभीं व्याकरणाचे दहावीस उपयोग दिले आहेत. तेहि वाटल्यास पाहावे. तात्पर्य, विद्यमान मराठी भाषेचें व्याकरण शास्त्रीय पद्धतीनें लिहिण्याचा दामल्याचा प्रयत्न राष्ट्राच्या प्रगतीस अत्यंत पोषक आहे. इतकेंच कीं हा प्रयत्न अनेक दोषांनीं अथपासून इतिपर्यंत ग्रस्त आहे. सबब, प्रो. दामल्यांनीं मराठी भाषेचें व्याकरणशास्त्र रचण्याकडे आपली कुशाग्र व व्यापक बुद्धि पुनः एकवार लावावी.”

दुर्दैवाची गोष्ट, कीं दामले लवकरच निवर्तले. त्यांची आयुमर्यादा आणखी कांहीं वर्षे वाढती, तर राजवाड्यांच्या या संशोधनात्मक टीकेचा चांगलाच उपयोग करून घेऊन निर्दोष अशी दुसरी आवृत्ति त्यांनीं काढली असती याबद्दल मुळींच शंका वाटत नाहीं. दामल्यांच्या पश्चात् त्यांच्या व्याकरणाची दुसरी आवृत्ति निघाली, पण ती निव्वळ पहिलीचेंच पुनर्मुद्रण आहे. राजवाड्यांच्या परीक्षणानुसार अवश्य त्या सुधारणा कोणा तरी अधिकारी वैय्याकरणाकडून करवून घेऊन जर ही द्वितीयावृत्ति काढण्यांत आली असती—निदान टीपांतून जरी त्या-त्या स्थलीं अवश्य तें परिष्करण देण्यांत आलें असतें—तर तें कितीतरी उपयुक्त ठरलें असतें. पण तसें होण्याच्या जागीं उलट पुनर्मुद्रणांत, पहिल्या आवृत्तींत नव्हते तेहि दोष, आणखी शिरले आहेत. शास्त्रीय स्वरूपाच्या ग्रंथाला हा प्रकार निःसंशय बाधकच होय. तथापि तसे अनेक दोष असूनसुद्धां दामल्यांच्या परिश्रमाचें महत्त्व त्यायोगें यत्किंचित्‌हि उणावणारें नसून ते परिश्रम पुढीलांच्या कारणीं लागल्यावांचून राहणार नाहींत हें निश्चित. गेल्या पन्नास वर्षांत जे फार थोडे विद्वान् शोधक होऊन गेले त्यापैकीं दामले हे एक होत. अर्वाचीन मराठी व्याकरणकारात, राजवाडे वगळल्यास, त्यांच्याएवढया योग्यतेचा व्याकरणकार झालाच नाहीं असेंच म्हणावें लागेल.

‘शास्त्रीय व्याकरणा’व्यतिरिक्त दामले यांचे ‘बर्ककृत आधुनिक असंतोष’ ‘विचार-परिभ्रमण’ ‘शुद्धलेखन व सुधारणा’ असे तीन विस्तृत निबंध प्रसिद्ध झाले आहेत. हे तिन्ही ‘ग्रंथमाला’ मासिकांत छापले गेले होते. यांनीं न्याय-शास्त्रावरहि पुस्तक लिहिलें असून तें गायकवाड सरकारनें दोन भागांत प्रसिद्ध केलें आहे.

**दामले मोरो केशव यांचें वाङ्मयः—** (१) शुद्धलेखनसुधारणा १९०५, (२) शास्त्रीय मराठी व्याकरण १९११, (३) अमेरिकेवरील

करासंबंधीं भाषण, ( ४ ) आधुनिक असंतोष, ( ५ ) विचारपरिभ्रमण, ( ६ ) न्यायशास्त्र निगमन १८९५, ( ७ ) न्यायशास्त्र विगमन १९०२,

**चरित्र, चर्चा, अभ्यासः—**

मृत्युलेख – चित्रमयजगत्, मे १९१३

**दामले सीताराम केशव** [ १८७८–१९२७ ] वृत्तपत्रकार व कादंबरीलेखक. यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यांत खेड येथें झाला. सुप्रसिद्ध कवि केशवसुत व व्याकरणकार मोरो केशव दामले याचे हे बंधु. मुंबईच्या 'बुइल्सन' कॉलेजांतून ते बी. ए. झाले व तेथेंच फेलो म्हणून काम करीत असतांना त्यांनीं आपला 'एल्एल्. बी.' चा अभ्यास संपविला. त्यांनीं 'फर्ग्युसन कॉलेजां'तहि प्रोफेसर म्हणून कांहीं दिवस काम केलें. पुढें 'ज्ञानप्रकाश'च्या संपादक वर्गांत कांहीं काळ घालविल्यावर ते राष्ट्रीय पक्षास येऊन मिळाले. हा काळ वंगभंगाच्या चळवळीचा होता. राष्ट्रीय पक्षाच्या प्रयत्नांनीं सर्व राष्ट्रभर नवचैतन्य निर्माण झालें होतें अशा प्रसंगीं लोकांच्या भावनावर चढलेल्या जुन्या कल्पनांचा गंज काढून टाकून त्यांच्यामधील जागृतीची धार सतत तिखट राखील असें एकादें दैनिक मुंबईसारख्या प्रमुख शहरीं सुरू करावें अशी प्रबळ इच्छा राष्ट्रीय पक्षाला वाटत होती. सीतारामपंत यांची लिहिण्याची हौस व त्यांचा उत्साह याची, राष्ट्रीय पक्षाचे प्रणेते लो. टिळक याना पूर्ण जाणीव असल्यामुळें त्यांनीं ताबडतोब सीतारामपंतांवर या नव्या दैनिकाची जबाबदारी सोंपविली, व मुंबई येथें दैनिक 'राष्ट्रमत' सुरू झालें. ( १९०८ ) या दैनिकाचें आयुष्य सरकारी दडपशाहीमुळें अगदींच अल्प – दोन वर्षे – ठरलें; तथापि या थोड्या कालांतहि 'राष्ट्रमता'नें सर्व मुंबई हालवून सोडिली व राष्ट्रीय पक्षानें टाकलेल्या विश्वासाचें चीज केलें. 'राष्ट्रमत' बंद पडल्यावर दामले पुन्हां पुण्यास गेले, व त्यांनीं तेथें वकीली चालविण्यास सुरवात केली. 'राष्ट्रोदय' नांवाचें मासिकहि ते कांहीं दिवस काढीत असत. त्याचें बरेंचसें वाङ्मय 'चित्रमय जगत्' या मासिकांत प्रसिद्ध झालें आहे. 'महायुद्धाचीं स्थित्यंतरें' या सदराखालीं 'चित्रमय जगत्' मध्यें येणारे त्यांचे माहितीपूर्ण लेख त्याकाळीं बरेच लोकप्रिय झाले होते. 'जग हें त्रिविध आहे', 'न्याय कीं अन्याय', 'दोनशें वर्षांपूर्वी', 'वसईचा रणसंग्राम' अशा चार बऱ्यापैकीं कादंबऱ्या त्यांनीं लिहिल्या आहेत. यांतील पाहिल्या दोन सामाजिक व दुसऱ्या दोन ऐतिहासिक आहेत. या

कादंबऱ्यांवर पंचवीस वर्षांपूर्वीच्या टिळकपंथीय सामाजिक व राजकीय विचार-सरणीची दाट छाया पडलेली आढळते.

राजकारण व वाङ्मय हे त्यांचे आवडते विषय असले तरी प्रसंगोपात त्यांनीं केलेली काव्यदेवीची उपासनाहि कौतुकास्पद आहे. 'वाचाळरावाचे विचित्र अनुभव' या पुस्तकांत त्यांच्या विनोदी वृत्तीचा मासला पाहावयास सांपडतो. १९१८ सालीं पुण्यास 'राजकारण' हें साप्ताहिक सुरू करून त्यांनीं वृत्तपत्रक्षेत्रांत पुन्हां पदार्पण केलें. असहकारितेच्या चळवळींत या साप्ताहिकानें चांगलीच कामगिरी बजाविली. पुढें मुळशी सत्याग्रहांत दामल्यांना कारागृहवास भोगावा लागला व हें पत्र बंद पडलें. शिक्षेमुळें झालेल्या श्रमांनीं त्यांची प्रकृति यानंतर दिवसेंदिवस खालावतच गेली व अखेर १९२७ सालीं पंडुरोगानें पुणें येथें ते निवर्तले.

**दामले सी. के. यांचें वाङ्मयः**—(१) टॉमस कार्लाईल, १९०३. (२) वाचाळरावाचे विचित्र अनुभव, १९१२. (३) जग हें त्रिविध आहे, १९१३. (४) न्याय कीं अन्याय, १९१५. (५) दोनशें वर्षांपूर्वी, १९१७. (६) तुरुंगाचे कोठडींतून, १९२३. (७) महात्मा गांधी, १९२४. (८) वसईचा रणसंग्राम, १९२५. (९) सभा, अध्यक्ष व सभासद, १९२७. (१०) घरचा कायदा, १९२७. (११) पुराव्याचा अॅक्ट.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः**—

चरित्र—चित्रमय जगत्, नोव्हेंबर १९२७

जग हें त्रिविध आहे (परीक्षण), ज. स. करंदीकर, लोकशिक्षण (जुनें) वर्ष २, अंक ८, सन १९१४

वसईचा रणसंग्राम (परीक्षण); मनोरंजन, पुस्तक ३१, अंक ९, सन १९२६

**दामले हरि कृष्ण** [१८५४–१९१३] भाषांतरकार, व ग्रंथप्रकाशक. जन्म भोर संस्थानांतील रावडी गांवीं. यांनीं खानदेशांत कांहीं वर्षें शिक्षकाचें काम केलें. पुढें विष्णुशास्त्री चिपळूणकर हे नोकरी सोडून आल्यानंतर त्यांची व दामले यांची गांठ पडली. त्या वेळीं शास्त्रीबुवांची 'न्यू इंग्लिश स्कूल' स्थापन करण्याची वाटाघाट चालू होती. अशा वेळीं दामलेहि शाळेंत शिक्षक म्हणून सामील झाले. या शाळेंत त्यांनीं दहा वर्षें काम केलें. तेवढ्या अवधींत त्यांनीं शास्त्रीबुवांच्या सहवासानें लेखनाचा, विशेषतः इंग्रजीवरून मराठींत भाषांतरें

करण्याचा व्यवसाय सुरू केला. 'न्यू इंग्लिश स्कूल' मधील नोकरी सोडल्यावर यांनीं विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचा किताबखाना हातीं घेतला तो अखेरपर्यंत फारच उत्तम रीतीनें चालविला.

**दामले हरि कृष्ण यांचें वाङ्मयः—**

( १ ) गलिव्हरचा वृत्तांत भाग १–४; ति. आ. १८९० चौ. आ. १९०८; १८८२; दु. आ. १८९१; १८९०.

( २ ) शिक्षणसार–दु. आ. १८८४; चौ. आ. १९०२.

( ३ ) जर्मन भाषेतील गोष्टी भाग १–२, १८८९.

( ४ ) नऊ रत्नें, १८८९, १८९०, १८९३ पां. आ. १९०७.

( ५ ) पार्वतीप्रकोप १८८२, १८९२.

( ६ ) मुलांस नवी देणगी १८९२, १८९३.

( ७ ) अजब ऐनेमहाल, खंड १–५, .१८९३, १८९४, १८९५, १८९७, १८९९.

( ८ ) अरबी भाषेतील सुरस व चमत्कारिक गोष्टी ( पितापुत्र चिपळुणकरांबरोबर ) १८९०, १९०३, १९२७.

( ९ ) इसापनीति भाग १–२, १८९१, १८९५; १८९५.

( १० ) सायंकाळची करमणूक १८९३, १९०१.

( ११ ) नीतिबोध १८९५.

( १२ ) हिंदुस्थानांतील योद्ध्यांच्या थोरवीच्या गोष्टी १९०३.

( १३ ) नवीन बहारदानीष १९०६.

( १४ ) थोरांच्या आख्यायिका.

( १५ ) डॉ. जोनाथन स्विफ्ट १८९०.

( १६ ) इसापकृत काल्पित गोष्टी.

( १७ ) सुबोध गोष्टी भाग १–३.

( १८ ) व्याकरण मार्गदर्शिका, १८९८, १९००, १९०१.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः—**

( १ ) पार्वतीप्रकोप काव्य – परीक्षण – विविधज्ञानविस्तार, पुस्तक १४, अंक ९, सन १८८२.

( २ ) अरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी–परीक्षण–विविधज्ञान-विस्तार, पुस्तक २२, अंक, ८ सन १८९०

**दिवाकर** [ १८८९–१९३१ ] नाट्यछटाकार. दिवाकर–शंकर काशीनाथ गर्गे. यांचा जन्म ता. १८ जान्युअरी सन १८८९ रोजीं झाला. 'दिवाकर' हे गर्गे घराण्यांत दत्तक होते. त्यांच्या जन्मदात्या वडिलांचें नांव गोविंद बळवंत दिवाकर. वयाच्या तिसऱ्या वर्षी 'दिवाकरां'ना आजीच्या – आईच्या आईच्या – मांडीवर दत्तक देण्यांत आलें. आपलें पहिल्या घराण्यांतील आडनांवच 'दिवाकर' टोपण नांवासारखें ते वापरीत असत.

सन १९०८ सालीं ते 'स्कूल फायनल'ची परीक्षा उत्तीर्ण झाले. 'नूतन मराठी विद्यालयां'त शिक्षकाची नौकरी धरण्यापूर्वी त्यांनीं दोन-तीन नोकऱ्या केल्या. कांहीं दिवस ते पुण्याच्या फौजदार कचेरींत 'कारकून' होते. डोळ्यांच्या अधूपणामुळें त्यांना ही नौकरी सोडावी लागली. त्यांच्या 'कारकून' या नाटिकेंतील नायक त्यांच्या या नौकरींतील अनुभवाचेंच दृश्यरूप आहे. फरासखान्यांतील ही नौकरी सोडल्यावर त्यानीं 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन' च्या शाळेंत सुमारें वर्षभर शिक्षकाची नौकरी केली; आणि नंतर ते 'नूतन मराठी विद्यालया'च्या शिक्षकवर्गांत सामील झाले, तेथेंच ते आमरण नौकरी करीत होते. तेथें असतानाच सन १९१८ मध्यें ते एस्. टी. सी. च्या परीक्षेंतून यशस्वी रीतीनें पार पडले. ता. १ ऑक्टोबर १९३१ रोजीं न्युमोनिआचे विकारानें त्यांचें देहावसान झालें.

हरिभाऊ आपटे शेक्स्पीयर वाचून मोठे झाले, तर आपणाला का होतां येणार नाहीं अशा ईर्षेनें त्यांनीं शेक्स्पीअरच्या अभ्यासाला सुरवात केली. कै. गणपतराव जोशी यांच्या शेक्सपीरिअन् भूमिकाच्या अभिनयाच्या दर्शनानें या ईर्षेचें दृढीकरण झालें; व कै. प्रि. वासुदेवराव पटवर्धन यांच्या उत्तेजनामुळें त्यांच्याकडून शेक्स्पीअरच्या ग्रंथाचें आलोडन पार पडलें. वासुदेवराव पटवर्धनांबद्दल त्यांना नितांत आदर असे. त्यांच्या विशिष्ट प्रकारच्या लिखाणाचें 'नाट्यछटा' हें नामकरण वासुदेवराव पटवर्धन यांनींच केलेलें आहे. नाट्यछटा प्रथम प्रसिद्धीला आणण्याचें श्रेय श्री. नरसिंह चिंतामण केळकर यांस आहे. 'महासर्प' व 'फाटलेला पतंग' या दोन नाट्यछटा ता. १५ एप्रिल सन १९१३ च्या 'केसरीं'त श्री. केळकरांच्यामुळें प्रसिद्ध झाल्या. दिवाकरांच्या एकंदर ४६ नाट्यछटा

प्रसिद्ध झालेल्या आहेत; त्यांपैकीं दहा ‘ केसरी ’त, एक ‘ करमणुकीं ’त, दोन ‘लोकमित्रां’त, सोळा ‘उद्यानां’त, सहा ‘मासिक मनोरंजनां’त, एक ‘ महाराष्ट्र साहित्यां ’त आणि दहा ‘ रत्नाकरा ’त आलेल्या आहेत. त्यांच्या लघुकथांपैकीं ‘ मसालेदार ताजा चिवडा ’ ( एप्रिल १९२४ ) व ‘ कर्माचा मन्या ’ ( जान्युअरी १९२५ ) या दोन मासिक ‘मनोरंजनां’त प्रसिद्ध झालेल्या असून ‘ अहो, मला वाचतां येतंय ! ’ ( ऑक्टोबर १९२५ ), ‘ पोराचा नाद झालं !’ ( नोव्हेंबर १९२६ ) ‘ दिवा मोठा कसा झाला ? ’ ( ऑगस्ट १९२७) ‘ आले कुठून......गेले कुठें ? ’ ( जुलै १९३१ ) या चार ‘ रत्नाकरात ’ आलेल्या आहेत. ‘ आपले सहकारी कृष्ण ’ व ‘ कविवर्य केशवसुताची मृत्युतिथि ’ हे दोन निबंधात्मक लेख अनुक्रमें ‘ उद्यान ’ ( फेब्रुवारी १९१७ ) व ‘ मासिक मनोरंजन ’ ( जान्युअरी १९२३ ) यांत आले असून चार ‘ केशवसुतचरित्रविषयक टिपणें ’ ‘ रत्नाकरां ’तून ( फेब्रुवारी १९२६, नोव्हेंबर १९३०, फेब्रुवारी १९३१, मे १९३१) प्रसिद्ध झालीं आहेत.‘ काव्यचर्चा ’ या ‘ महाराष्ट्रशारदामंडळा ’च्या ग्रंथांत त्याची ‘ कारकून ’ नाटिका ‘ मनोरंजना ’तून ( मार्च १९१५ ) प्रसिद्ध झाली आहे. याशिवाय कोणत्याहि एका विशिष्ट नांवानें ज्यांचें वर्गीकरण करतां येणें कठिण आहे असें त्याचें कांहीं-कांहीं लिखाण आहे. त्यापैकीं ‘ सगळेच आपण ह्यः ! ह्यः ! ’ चा अवतार. ‘ मासिक मनोरंजन ’ ( फेब्रुवारी १९१५ ) द्वारें झाला. ‘ प्रवासी ’नें ‘ उद्यानां ’तून ( जानेवारी १९१७ ) मार्ग चोखाळला व ‘ भर चौकात ’ ( मे १९२८ ) ‘ हे कोण दोघे ’ ‘ पाऊस ’ ( नोव्हेंबर १९२८ ), ‘ निजलेलें मूल ’ ( जून १९२६ ), ‘ सुटी, शाळेला सुटी ’ ( सप्टेंबर १९२९ ), ‘ ऐट नको करूं ’ ( जानेवारी १९२८ ) हीं रत्नें ‘ रत्नाकरा ’च्या लहरींतून रसिकांच्या हातीं पडलीं.

एवढाच काय तो ‘ दिवाकरां ’चा प्रसिद्ध असा वाङ्मयसंसार. ‘ नाट्यछटाकार ’ या एका विशेषणापलीकडे त्याच्याबद्दलची वैयक्तिक माहिती फारच थोड्यांना असण्याचा संभव आहे; कारण त्यांचा जीवनक्रम जनसंमर्दापासून अलिप्त असे. पुणें हेंच त्यांच्या साहित्यसंसाराचें कार्यक्षेत्र आणि त्या पुण्यांतहि ठराविक चार पेठांबाहेर त्यांनीं क्वचितच पाऊल टाकिलें असेल. या मर्यादित क्षेत्रातूनच त्यांनीं आपल्या लेखनांतील प्रसंगांची आणि पात्रांची निवड केली आहे.

बेतार्चे शिक्षण व प्रतिकूल आर्थिक परिस्थिति यांमुळें दिवाकरांचा स्वभाव कांहींसा समाजभीरु झाला होता. आपण पदवीधर नसल्यामुळें आपल्याला आपली योग्य किंमत मिळत नाहीं असें त्यांना वाटे. पण ते मत्सरी नव्हते. ते समाजाशीं मिसळण्याचें टाळीत, किंबहुना त्याची त्यांना भीति वाटे. पत्नीच्या निधनानंतर ते एखाद्या वानप्रस्थासारखे राहत. "समोरून, म्हणजे घराच्या डाव्या बाजूनें शनवार मारुतीवरून ओंकारेश्वराकडे जाणारा रस्ता आणि त्यालाच न्यू इंग्लिश स्कूलच्या बोर्डिंगवरून दक्षिणोत्तर येऊन मिळणारा बोळ. तिथेंच कोपऱ्यावर एक लहानसें घर टाकून मी बसतों ती माडी." असा त्यांनीं आपल्या निवासस्थानाचा निर्देश आपल्या 'अहो, मला वाचतां येतंय् !' या गोष्टींत केलेला आहे. या माडीपैकीं पूर्वेच्या बाजूला रस्त्यावर उघडणाऱ्या दोन खिडक्या असलेली एक चिमुकलीशी दोन खणी खोली, दिवाकरांकडून निवासस्थान, लेखनकार्यालय, शयनगृह व ग्रंथसंग्रहालय अशा चतुर्विध रीतीनें वापरली जात असे. पूर्वेकडील खिडक्यांना बांबूच्या बारीक कामठ्यांचे गुंडाळणारे पडदे लावलेले असत. अगदीं कोपऱ्यावरील खिडकीजवळ त्यांची लिहिण्याची घडवंची असे. फार तर ८×१० फुटांची ती खोली, आणि तींत पुस्तकांचीं कपाटें, लिहिण्याचें बैठें मेज, बिछाना वगैरे सामान खचून भरलेलें; पण तें अशा व्यवस्थित रीतीनें मांडलेलें किंवा रचलेलें असावयाचें कीं जराहि कोठें अडगळ किंवा अव्यवस्था वाटूं नये. रोज सकाळीं लेखनसाहित्य मांडून घ्यावयाचें, उठतांना पुन्हां सर्व सामुग्रीचा आणि उपकरणांचा उपसंहार करून तीं जागच्याजागीं अडकवून टाकावयाचीं ! हा क्रम ते रोज यंत्राप्रमाणें निरलसपणें पार पाडीत. पुस्तकांचीं कपाटें खचून भरलेलीं असावयाचीं. त्यांचा ग्रंथसंग्रह विविध व व्यापक होता. पुंस्तकांचें त्यांना एक प्रकारचें वेडच होतें. तुटपुंज्या वेतनांतून त्यांनीं केलेला ग्रंथसंग्रह एखाद्या धनिक ग्रंथ-संग्राहकालाहि मत्सर वाटावा असा आहे. चित्रांचाहि त्यांना नाद असे. त्यांनीं बरींच चित्रें संग्रहित केलीं होतीं. स्वतः ते चित्रकलेच्या तीन प्राथमिक परीक्षा उत्तीर्ण झालेले होते. त्यांच्या खोलीच्या भिंतींवर टॉलस्टॉय, कैसर, नेपोलियन, ब्राउनिंग, शेक्स्पीअर, टेनिसन्, इब्सेन, गॅल्सवर्दी, बायरन्, टागोर, गणपतराव जोशी, वासुदेवराव पटवर्धन वगैरे त्यांना आदरणीय वाटणाऱ्या व्यक्तींचीं छायाचित्रें लटकावलेलीं असत. त्यांची खोली म्हणजे व्यवस्था, टापटीप व सौंदर्य

यांचें आगर असून त्यांच्या पार्थिव व वाङ्मयिक संसाराचें तें अल्प प्रमाणांत प्रत्यक्षदर्शनच होतें असें म्हणतां येईल.

दिवाकरांचा हा वैयक्तिक आयुष्यक्रम जरी जनतेला अज्ञात असला तरी आपल्या लिखाणांतून त्यांनीं आपल्या आयुष्यांतील अनेक प्रसंगांचें व अनुभवांचें आविष्करण केलें आहे. त्यांचें संकलित लिखाण त्यांच्या मानसिक उत्क्रांतीचें शब्दचित्र असून त्यांतून त्यांच्या जीवनवृत्तांताचा धागा अनुस्यूत झालेला आहे. प्रत्येक प्रतिभासंपन्न लेखक कोणत्याना कोणत्या तरी स्वतःला सहज साध्य होणाऱ्या वाङ्मयप्रकाराचे द्वारा आत्मप्रकटन करीत असतो; पण दिवाकरांच्या, संकुचित जीवनक्रमानें जखडलेल्या प्रतिभेच्या प्रकटनाला योग्य व पूर्ण वाव मिळेल असा वाङ्मयप्रकार मराठींत अस्तित्वांत नसल्यामुळें त्यांनीं आत्मप्रकटनार्थ ‘ नाटय-छटा ’ हा नवीन वाङ्मयप्रकार निर्माण केला, व ब्राउनिंगच्या monologues च्या अभ्यासानें आणि जिव्हाळ्याच्या रसिक व विद्वान् मंडळींशीं चर्चा करून तो परिणतीस नेला.

‘ दिवाकरां ’चा बाह्य जगाशीं व जगाला हादरून टाकणाऱ्या प्रचंड घटनांशीं फारसा परिचय नव्हता. तात्त्विक स्वरूपाचें लेखन करण्याइतकी त्यांची प्रज्ञा परिणत नव्हती; त्यांनीं शास्त्रीय रीत्या वाङ्मयाचा व्यासंग केलेला नव्हता; त्यांना आपले विचार विनाकष्ट द्रुतगतीनें मांडतां येत नव्हते; पण त्यांचें अंतःकरण प्रेमळ व भावक्षम होतें; त्यांना सौंदर्यदृष्टि होती; शेजारीं घडलेल्या अगदीं क्षुल्लक घटनेनेंहि त्यांची दृष्टि अंतर्मुख होत असे; अंतःकरणांतील भावना व घडलेली गोष्ट यथार्थ रीतीनें व जशीच्या तशी आपण प्रकट केली आहे असें स्वतःचें समाधान होईपर्यंत आपल्या लिखाणावर पुनः पुन्हां सफाईचा हात फिरवीत राहण्याइतका ‘ धीर ’ त्यांच्या मनाला होता; व त्यांना नाटयदृष्टि होती. या सर्वांचा सहज व संकलित परिणाम म्हणजेच त्यांच्याकडून झालेली ‘ नाटयछटा ’ या वाङ्मयप्रकाराची निर्मिति होय.

दिवाकरांची सौंदर्यदृष्टि फारच चोखंदळ होती. भडक रंग किंवा अप्रमाण-शीरपणा यांचा त्यांना अतिशय तिटकारा असे. त्यांची चोखंदळ दृष्टि स्वतःच्या लिखाणाबाबत देखील तितकीच कांटेकोर असे. लिखाणांतला प्रत्येक शब्द, अर्थ ध्वनि व योजना या दृष्टींनीं पूर्णपणें समर्पक असल्याबद्दल स्वतःचें समाधान झाल्या-

शिवाय त्यांना चैन पडत नसे. योग्य शब्दासाठीं त्यांना तळमळ लागलेली असे. आपल्या लिखाणांतील एकाहि शब्दाची फिरवाफिरव केली तरी त्याची कळाशी बिघडल्यासारखी वाटेल इतकी आपल्या कृतींत शब्दांची जुळणी निर्दोष झाली पाहिजे अशी त्यांची महत्त्वाकांक्षा असे. त्यामुळें दुसऱ्यांनीं स्तुति केली तरी स्वतःला आपली ' छटा ' ' जमली ' असें वाटेपर्यंत ते ती कधींच हातावेगळी करीत नसत; त्यामुळें त्यांच्या कित्येक छटा लिहून झाल्यावर वर्षवर्षेहि तशाच दप्तरात पडून राहत. नाट्यछटेची नुसती कच्चीवरून पक्की नक्कल करण्यास आपणाला पाऊण तास लागतो असें ते सांगत, व त्यांत फारच थोडी अतिशयोक्ति असण्याचा संभव आहे. कारण पात्राच्या भाषणांत, विचारांत, वर्णनांत किंवा वैशिष्ट्यांत जराहि न्यून पडलेलें किंवा अवास्तविकता राहिलेली त्यांना खपत नसे.

अशा प्रकारें त्यांच्या लिखाणाचें बाह्य स्वरूप जरी ' वास्तव ' असलें तरी त्यांचें अंतरंग व तात्त्विक प्रतिष्ठान गूढगुंजनात्मक आहे. याचें कारणहि त्यांच्या विशिष्ट जीवनक्रमांतच आढळतें. त्यांच्या आयुष्यांत सुखाचे असे प्रसंग फारच थोडे. त्यांचे बहुतेक सर्व दिवस प्रतिकूल परिस्थितीशीं झगडण्यांत गेले. त्यामुळें त्यांच्या लिखाणावर नैराश्याची विषण्ण छाया पडलेली दिसते, व बौद्धिक तर्कवादापेक्षा गूढ अज्ञेयवाद व भावविभ्रम यांवरच त्यांचा अधिक भर असतो. त्यांच्या ' लेखनतंत्रा 'वर मात्र त्यांच्या पद्धतशीर टापटिपीच्या वागणुकीचें प्रतिबिंब स्पष्ट दृग्गोचर होतें. दिवाकराच्या नाट्यछटाचें मनोरमत्व या दोन परस्परविरोधी वैशिष्ट्यांत आहे.

दिवाकरांच्या गोष्टी व नाट्यछटा बहुतेक त्यांच्या परिचयांतील व्यक्तींच्या अगर स्वतःच्या अनुभवावर आधारलेल्या आहेत. आपल्या भोंवतालच्या टीचभर जगांतून इतके प्रसंग व इतक्या व्यक्ती त्यांनीं साहित्यविषय म्हणून निवडल्या यांत त्यांच्या निरीक्षणशक्तीचें अलौकिकत्व दिसून येतें. सामान्याला असामान्याचें रूप देण्याची हातोटी – लेखकाच्या कलेची जादूची कांडी – त्यांच्यापाशीं असल्यामुळें वाचकांना लौकिक तेंच अलौकिक वाटून त्याच्या मूळ स्वरूपाची ओळख न राहणें ही दिवाकरांच्या कलेची थोरवी आहे. ' To idealize the real ' हें त्यांच्या लेखनकलेचें प्रतिष्ठान आहे.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत देखील सामान्य बुद्धीचा पण चिकाटीचा आणि ध्येयवादी मनुष्य काय साध्य करूं शकेल याचें दिवाकरांचें कर्तृत्व हें उत्कृष्ट

उदाहरण आहे. जगाच्या बाजारांत दिवाकर हे दरमहा ६०–७० रुपये मिळविणारे ' नूतन मराठी विद्यालयां'त पहिल्या तीन इंग्रजी वर्गांना शिकविणारे शिक्षक होते; पण चिकाटी, पद्धतशीरपणा, शिस्त, आत्मविश्वास, आणि दलितांबद्दल सहानुभूति या गुणांच्या भांडवलावर दिवाकरानीं वाङ्मय–व्यापारांत स्वतःची पेढी भरभराटीला आणिली; इतकेंच नव्हे बाजारांतून बाहेर पडतांच स्वतःच्या छापाचा माल चालू ठेवून त्यांनीं आपल्यामागें आपलें स्वयंनिर्मित स्मारकहि ठेवून दिलें, यात संशय नाहीं.

के. नारायण काळे

**दिवाकर यांचें वाङ्मयः—**

( १ ) संपूर्ण दिवाकर – प्रकाशक दिवाकर बंधु–१९३४.

**चरित्र, चर्चा अभ्यासः—**

( १ ) मराठी लघुकथा, दि. वि. आमोणकर, रत्नाकर मार्च १९३०.

( २ ) कै. दिवाकर, 'अपरिचित', रत्नाकर, आक्टोबर – नोव्हेंबर, १९३१.

( ३ ) मित्रवर्य नाट्यछटाकार दिवाकर, द. वा. पोतदार, रत्नाकर, ऑक्टोबर, नोव्हेंबर, १९३१.

( ४ ) नाट्यछटाकार दिवाकर, प्रो. श्री. बा. रानडे; ज्योत्स्ना, ऑक्टोबर १९३७.

( ५ ) कै. दिवाकर आणि त्यांचें वाङ्मय, ग. त्र्यं. माडखोलकर ,,

( ६ ) दिवाकरांच्या वाङ्मयाचें स्वरूप, वा. ल. कुळकर्णी ,,

( ७ ) नाट्यछटाकार दिवाकर, भा. नी. सहस्रबुद्धे ,,

( ८ ) नाट्यछटाकार दिवाकरांचें स्वभावदर्शन; गिरीश ,,

( ९ ) चारदोन पानांत दिवाकर, प्रो. द. वा. पोतदार ,,

**दिवेकर सदाशिव महादेव** [ मृत्यु १९३० ] इतिहाससंशोधक. कल्याण येथें हे राहणारे. यांचें शिक्षण प्रीव्हिअसपर्यंत झालें होतें. यांच्या निर्वाहाचा धंदा म्हणजे स्वतः उभारलेल्या व प्रसृत केलेल्या व्यापारी देवघेवीचा. पण यांची इतिहाससंशोधनाची आवड इतकी जबरदस्त कीं व्यापारानिमित्त ते कोठेंहि बाहेर गेले तरी वेळांत वेळ काढून त्या-त्या प्रांतांतील इतिहासाचीं साधनें आत्मसात् करण्याकडे त्याचें लक्ष दक्षतेनें असे. 'शिवभारत' व 'पर्णालपर्वतग्रहणाख्यान' हे

त्यांनीं संपादून प्रकाशिलेले ग्रंथ त्यांच्या अशाच उद्योगाचें फल होत. इतिहाससंशोधनावर त्यांनीं पुष्कळच पैसा खर्च केला होता. त्यांची व्यापारी पेढी म्हणजे इतिहाससंशोधनाचीच पेढी असें त्यांचे कित्येक स्नेही म्हणत असत.

**दिवेकर स. म. यांचें वाङ्मयः—**

( १ ) पर्णालपर्वतग्रहणाख्यान, १९२३, ( २ ) शिवचरित्रप्रदीप, १९२५. ( ३ ) शिवभारत १९२७.

**चरित्र, चर्चा, अभ्यास.**

( १ ) शिवभारत – परीक्षण, केसरीसारसंग्रह १९२७–२८.

( २ ) शिवचरित्रप्रदीप, परीक्षण, केसरी, २ फेब्रुवारी १९२६.

**दीक्षित शंकर बाळकृष्ण** [ १८५३–१८९८ ] ज्योतिर्विद्, गणितज्ञ. यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यांतील मुरूड गांवीं झाला. यांचें मराठी व थोडेंसें इंग्रजी शिक्षण दापोली येथें झालें. १८७० सालीं हे पुणें येथील मराठी ट्रेनिंग कॉलेजांत पुढील अभ्यासाकरिता दाखल झाले. कॉलेजांतील अभ्यास संभाळून हे बाबा गोखल्यांच्या शाळेंत इंग्रजीहि शिकले, आणि १८७४ त मॅट्रिकची परीक्षा पास झाले. परीक्षा पास झाल्यावर यांनीं शिक्षणखात्यांत नोकरी धरिली. निरनिराळ्या हायस्कुलांत कांहीं वर्षें शिक्षकाचें काम केल्यावर त्यांची १८९४ त पुणें येथील ट्रेनिंग कॉलेजांत अध्यापक म्हणून कायमची नेमणूक झाली. पुण्यास येण्यापूर्वी धुळें येथील ट्रेनिंग कॉलेजांत ते अध्यापक होते. दीक्षितांस मूळपासूनच गणिताचा नाद फार. पुढें ठाण्याच्या हायस्कुलांत शिक्षक म्हणून काम करीत असतां प्रसिद्ध काव्यसंशोधक जनार्दन बाळाजी मोडक यांच्या सहवासानें त्यांस ज्योतिषशास्त्राची गोडी लागली. मोडक हे त्या वेळीं ठाणें हायस्कूलचे मुख्य अध्यापक होते. या वेळीं सायन – निरयनाचा वाद जोरानें चालला होता. मोडक हे सायनवादी होते. त्यांचा अभ्यासहि सूक्ष्म होता. त्यामुळें दीक्षितांस त्यांचा सहवास फारच उपयोगाचा झाला.

दीक्षितांनीं खालील ग्रंथ लिहिले आहेतः—

( १ ) विद्यार्थीबुद्धिवर्धिनी–शालेयः— रेवदंड्यास असतांना हें पुस्तक तयार झालें. यामध्यें मराठी सहाव्या पुस्तकांतील कवितांवर भरपूर माहितीनें भरलेली टीका असून मराठी कवितेच्या व्याकरणाची विशेष माहिती दिली आहे.

( २ ) सृष्टिचमत्कार–शालेय:–सहाव्या यत्तेस ( हल्लींची सातवी ) 'सृष्टिज्ञान' हा विषय असतो त्याचा अभ्यास करणारांसाठीं हें पुस्तक लिहिलेलें आहे. यांत सर्व विषय सुलभ भाषेंत सांगितले आहेत.

( ३ ) सोपपत्तिक अंकगणित–अपूर्ण:– गणिताविषयक शिकविणाऱ्यांकरितां हें पुस्तक लिहिलें आहे. यांत बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, लघुतम, तीन अपूर्णांकें व प्रमाणगणित इतक्या विषयांचें विवरण उपपत्तीच्या दृष्टीनें पूर्ण रीतीनें केलें आहे.

( ४ ) धर्ममीमांसा:– मॅक्समुल्लरच्या पुस्तकाचें भाषांतर. दोन भागांत प्रसिद्ध.

( ५ ) भारतीय ज्योतिषशास्त्र:– या ग्रंथांत भारतीय ज्योतिषाचा अगदीं वेद-कालापासून तों आतांपर्यंतचा सविस्तर इतिहास दिला आहे. त्यात आमचे लोकांचीं ज्योतिष्यांसंबंधीं काय मतें आहेत, त्यांत उत्तरोत्तर कसा फरक पडत गेला आहे, आमच्या ज्योतिष्यांच्या व अर्वाचीन पाश्चिमात्य ज्योतिष्यांच्या मतांमध्यें मेळ किंवा भिन्नपणा काय आहे, आमच्या गणिताची काय स्थिति आहे व त्यामध्यें सांप्रत चुका कोणत्या कारणानें पडत आहेत, पंचांग म्हणजे काय, व निरनिराळ्या पंचांगांचे गुणदोष कोणते, ह्या सर्व गोष्टी उत्तम रीतीनें सांगितल्या असून, शिवाय आमच्या देशांत होऊन गेलेले ज्योतिषशास्त्रविषयक सर्व ग्रंथ व ज्योतिषी यांची संपूर्ण माहिती दिली आहे. दीक्षितांनीं या ग्रंथांत आपलें बुद्धि-सर्वस्व खर्चिलें आहे. सायन-निरयण वादावरून त्यांचें लक्ष ज्योतिषाकडे गेल्यावर आमचे ज्योतिषाचा प्राचीन काळापासून शोध करण्यास त्यांनीं आरंभ केला. इतक्यांत ज्योतिषाच्या इतिहासावर एक ग्रंथ लिहिण्याविषयीं बक्षिस ठेवून 'दाक्षिणाप्राईज कमिटी'नें जाहिरात लाविली; व त्यामुळें दीक्षित यांनीं ग्रंथ लिहिण्यास सुरवात केली. याच सुमारास अशाच प्रकारच्या ग्रंथास गायकवाड सरकारनें बक्षिस लाविलें. गायकवाड सरकारास हिंदुपंचांगवर्णनाचें पुस्तक पाहिजे होतें. यासंबंधींची माहितीहि या पुस्तकांत समाविष्ट केली गेली असल्यामुळें दीक्षितास दोन्हीं बक्षिसें मिळालीं. या ग्रंथानें दीक्षिताचें नांव अजरामर केलें आहे.

" 'भारतीय ज्योतिषशास्त्र' या ग्रंथाची योग्यता शोधक विद्वानांच्या दृष्टीनें फार मोठी आहे. ज्यांच्या वाचनाकरितां अन्य देशांतील लोकांस देखील मराठी भाषेचें ज्ञान मिळविण्याची स्फूर्ति उत्पन्न व्हावी अशा योग्यतेचे जे थोडे ग्रंथ प्रस्तुत कालीं

मराठींत लिहिले गेले आहेत त्यांमध्यें या ग्रंथास अग्रस्थान द्यावें लागेल. या ग्रंथाचे दोन भाग आहेत. पैकीं पहिल्यांत वैदिककाल व वेदांगकाल यांतील ज्योतिःशास्त्राचा इतिहास असून दुसऱ्यांत ज्योतिपसिद्धांतकालच्या ज्योतिःशास्त्राचा इतिहास आहे. दुसऱ्या भागाचे गणितस्कंध, जातकस्कंध व संहितास्कंध असे तीन पोटविभाग पाडले आहेत. पहिल्या भागाच्या पहिल्या विभागांत वैदिक वाङ्मयांतील ज्योतिषविषयक उल्लेख असलेले मंत्र व वाक्यें हीं तत्तत्स्थलनिर्देशसहित उद्धृत करून वैदिक कालांतील ज्योतिर्ज्ञानाची परिमिति ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांतील वैदिक वाङ्मयाचें पर्यालोचन इतकें परिपूर्ण आहे कीं त्यानीं उद्धृत केलेल्या स्थळांखेरीज दुसरीं फारच थोडीं स्थळें इतरांच्या निदर्शनास आलीं आहेत असें रा. ब. चिंतामणराव वैद्यांसारख्या विद्वानांचेंहि स्पष्ट मत आहे. पहिल्या भागाच्या दुसऱ्या विभागांत अत्यंत महत्त्वाचा असा वेदांगकालीन ज्योतिषाचा विचार आहे. त्यांत चारी वेदांतील वेदांगज्योतिषाच्या पाठाचें विवेचन व अर्थनिष्कासन केलें असून त्यांत कै. दीक्षित यांची बुद्धिमत्ता व शोधकता उज्ज्वल रीतीनें दृष्टोत्पत्तीस येते. कै. मोडक, डॉ. थीबो वगैरे विद्वानांस कुंठित करणाऱ्या अनेक गोष्टींचा उलगडा त्यांनीं याच विभागांत केला असून तो भारतीय ज्योतिषाच्या प्राचीन कालच्या प्रगतीचा निश्चयात्मक इतिहास म्हणून कायमची मान्यता पावला आहे. हा एकच विभाग कै. दीक्षितांनीं लिहिला असता तरीहि तो विद्वज्जनांच्या प्रशंसेस पात्र झाला असता इतकी त्याची योग्यता आहे......ज्योतिर्विद् दीक्षित यांचे परिश्रम जसे अचाट तसेच ते प्रशंसनीयहि आहेत. नवीन-नवीन ग्रहाचा शोध करणारे, विश्वोत्पत्तीचा थांग लावूं पाहणारे, नवीन प्रमेयांची प्रणालिका विशद करणारे, गणितपद्धतीची नवीन मांडणी करणारे आणि प्राचीन ग्रंथांची प्रतिपत्ति व रहस्य उकलणारे असे ज्योतिषांतच अनेक प्रकारचे विद्वान् आहेत. त्यांत भास्कराचार्य, गणेश दैवज्ञ, केरूनाना छत्रे ह्यांनीं ग्रहगणिताची नवीन-नवीन मांडणी केली; आणि लो. टिळक व ज्योतिर्विद् दीक्षित यांनीं प्राचीन ग्रंथांचें पूर्ण संशोधन करून त्यांतील गुंतागुंतीचा उलगडा करून रहस्य बाहेर आणिलें. केवळ आपाततः किंवा वरवर अवलोकन करणें वेगळें आणि पूर्ण संशोधन करून निश्चित स्वरूपाचे सिद्धांत मांडणें हें वेगळें. पूर्ण संशोधनामुळेंच जशी लोकमान्यांच्या तशीच ज्योतिर्विद् दीक्षितांच्याहि शोधांत पूर्णता आणि निश्चितता ओतप्रोत भरलेली आहे.

तुलनाच करावयाची तर खुशाल म्हणतां येईल कीं शके ४२७ च्या सुमारास वराहमिहिराचार्यांनीं जें कार्य केलें तसेंच कार्य पण त्याहिपेक्षां व्यापक अर्थानें चौदाशें वर्षांनंतर ज्योतिर्विद् दीक्षितांनीं केलें. वराहमिहिरानें पांच सिद्धांतांचा अनुवाद केला; आणि गर्ग, पराशर, सत्याचार्य इत्यादिकांच्या मतांचा संग्रह करून ' बृहत्संहिता ' लिहिली. परंतु दीक्षितांनीं नुसता अनुवाद न करितां त्या-त्या ग्रंथांतील गुणदोषांचीहि चर्चा केली. तात्पर्य जो ग्रंथ होणें अत्यावश्यक होतें तो करून दीक्षित मोकळे झाले. " ( प्रो. वि. ब. नाईक, रा. वि. पटवर्धन; लोकशिक्षण, जुलै, १९३२ )

( ६ ) हिंदुपंचांगः – हा ग्रंथ मद्रास सिव्हिल सर्व्हिसमधील राबर्ट सुएल व दीक्षित यांनीं मिळून इंग्रजींत लिहिला, त्यांत आमच्या पंचांगासंबंधींच्या व कालगणनेच्या सर्व गोष्टींची माहिती आहे. हा ग्रंथ मुख्यतः युरोपियनांकरितां लिहिला आहे.

( ७ ) ज्योतिर्विलास अथवा रात्रीची दोन घटका मौज.

( ८ ) भारतभूवर्णनः – यांत हिंदुस्थानचें प्राचीन भूगोलवर्णन आहे.

या ग्रंथाशिवाय दीक्षित यांनीं इंग्रजी मासिकांतून ज्योतिषाचे विषयावर कालगणनेवर व कित्येक गोष्टींच्या कालनिर्णयावर अनेक लेख लिहिले आहेत व त्यांचे योगें त्यांची युरोपियन विद्वान् मंडळींत चांगली नांवाजणी झाली आहे. कित्येक लेखांत तर त्यांनीं नांवाजलेल्या युरोपियन विद्वानांबरोबर वाद करून त्यांचीं मतें खोडून काढलीं आहेत.

यांचें विस्तृत विवेचनात्मक चरित्र प्रसिद्ध होणें अत्यावश्यक आहे. १८६९ पासून यांनीं आपली रोजनिशी ठेविली होती. या रोजनिशींत ते आपल्या अभ्यासाबद्दल व लेखनाबद्दल लिहीत असत. या रोजनिशांचे साहाय्यानें त्यांचें चरित्र बरेंच सुलभतेनें लिहितां येईल. ( आधारः – मराठी शालापत्रक, १८९८ ).

**दीक्षित शंकर बाळकृष्ण यांचें वाङ्मयः—**

( १ ) ज्योतिर्विलास अथवा रात्रीची दोन घटका मौज १८९२, १८९३, १९०४.

( २ ) धर्ममीमांसा, भाग १–२, १८९५, १८९७.

( ३ ) भारतवर्षीय भूवर्णन १८९९.

( ४ ) भारतीय ज्योतिःशास्त्र.

( ५ ) विद्यार्थिबुद्धिवर्धिनी.
( ६ ) सृष्ट चमत्कार.
( ७ ) सोपपत्तिक अंकगणित.
( ८ ) हिंदु पंचांग.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः—**

चरित्र – शाळापत्रक, वर्ष ९ वें, मे व जून १८९८.

चरित्र – द. वि. आपटे, चित्रमयजगत्, जून १९३२.

कै. ज्योतिर्विद् शंकर बाळकृष्ण दीक्षित—प्रो. वि. ब. पटवर्धन व रा. वि. पटवर्धन, लोकशिक्षण ( नवें ) जुलै १९३२.

ज्योतिर्विलास ( परीक्षण ) शालापत्रक, एप्रिल १८९३.

**देव गजानन चिंतामण** [ मृत्यु १९३२ ] ग्रंथकार व ग्रंथप्रकाशक. यांनीं कांहीं नाटकें, कादंबऱ्या वगैरे ग्रंथरचना केली आहे. अण्णा किर्लोस्करांचें अपूर्ण नाटक – संगीत रामराज्यवियोग अंक १ ते ३ – यांनीं आपल्या कल्पनेप्रमाणें दोन अंक नवीन लिहून पूर्ण केलें.

**देव यांचें वाङ्मयः** – वसंतमंजरी; सं. मेघदूत; सं. विक्रम-शशिकला; सं. संशयसंभ्रम; सं. रामराज्यावियोग. अंक ४ व ५; सार्थ अमरकोश.

**देव बाळकृष्ण नारायण** [१८५८-१९३०] टीकाकार, निबंधलेखक व चरित्रकार. यांचा जन्म धुळें येथें झाला. यांचें शिक्षण इंदूर येथील गोविंदगुरूंच्या खासगी शाळेंत व विनायकराव कीर्तने यांच्या आश्रयाखालीं 'इंदोर इंग्लिश मद्रेसा'मध्यें झालें. कीर्तन्यांच्या सहवासांतच त्यांना वाचनाची गोडी लागली आणि त्यांच्या अफाट ग्रंथसंग्रहांतील विविध शास्त्रांतील अनेक ग्रंथांचा त्यांनीं अभ्यास केला. त्यांच्या विद्यार्थिदशेंत त्याचे स्फूर्तिदाते 'निबंधमाला'कार विष्णुशास्त्री चिपळूणकर हे होते. 'निबंधमालें'तील ओजस्वी भाषेच्या अभ्यासामुळें त्यांच्या लेखनाला उत्कृष्ट बाळसें चढलें. त्यांच्या बहुश्रुतत्वाची साक्ष त्यांच्या अल्पवयांतच दिसत होती. 'निबंधमालें'तून डॉ. जान्सनचें चरित्र प्रसिद्ध झाल्यावर त्यांनीं त्या चरित्रासंबंधीं कांहीं विधायक सूचना 'निबंधमाला'कारांकडे पाठविल्या होत्या यावरून त्यांच्या या वरील गुणांची उत्तम प्रचीति येईल. या सूचना

‘ निबंधमाले ’च्या ७५ व्या अंकांत प्रसिद्ध झाल्या आहेत. देवांचा पहिला मुद्रित लेख हाच होय. देव उच्च शिक्षणाकरितां पुण्याच्या ‘ डेक्कन कॉलेजां ’त एक दोन वर्षें राहिले होते; परंतु पहिल्या वर्षाच्याच परीक्षेंत लागोपाठ अपयश आल्यामुळें ते कॉलेज सोडून इंदूरास परत आले व तेथेंच त्यांनीं आपली सर्व हयात घालविली. कॉलेजांतील दोन वर्षें परीक्षेच्या दृष्टीनें जरी फुकट गेलीं असलीं तरी वाङ्मयिक आयुष्याच्या दृष्टीनें तीं तशीं गेलीं नाहींत. त्यांना शास्त्रीबुवांच्या प्रत्यक्ष सहकार्याचा लाभ घडला. त्याचप्रमाणें न्या. मू. माधवराव रानडे व रा. सा. माधवराव कुंटे प्रभृति विद्वानांच्या व्याख्यानश्रवणाचा त्यांना भरपूर फायदा घेतां आला. या थोर लोकांच्या साहचर्यामुळेंच त्यांना विद्याव्यासंगाची आसक्ति जडली.

“ ‘निबंधमालें’तून ते लेखप्रविष्ट झाले, पण ‘ निबंधमाले’च्या रचनेंतील दोष त्यांनीं न स्वीकारतां आपलें ध्येय आंखलें हा त्यांचा विशेष होय. ‘ निबंधमालें ’त ज्या विषयांची निर्भत्सना केली आहे ते विषय तुच्छ लेखण्यासारखे नसून उलट आदरास पात्र आहेत अशी त्यांची विचारसरणी अभ्यास, अनुभव इत्यादिकांच्या योगानें दृढत्व पावली होती. यांचे बरेच निबंध ‘ विविधज्ञानविस्तार ’ मासिकांतून व कांहीं ‘ ग्रंथमाला ’ वगैरे मासिकांतून प्रसिद्ध झाले आहेत. यांमध्यें त्यांचा चोहोंकडे गाजलेला महत्त्वाचा निबंध म्हणजे विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या चरित्रावरील होय. हा निबंध ‘ ग्रंथमालें ’तून बाहेर पडल्यावर शास्त्रीबुवांसंबंधाच्या देवांच्या सडेतोड विचारांमुळें शास्त्रीबुवांच्या अनन्य भक्तांना तो रुचला नाहीं, व त्यावर आवेशयुक्त टीकेचा हल्ला वासुदेवराव मुंडले यांनीं चढविला. वास्तविक आज उपलब्ध असलेल्या साधनांच्या साहाय्यानें शास्त्रीबुवांच्या चरित्राचें परीक्षण केल्यास देवांनीं त्यांच्या जेवढा गुणानुवाद केला आहे तितक्या गुणानुवादाच्या योग्यतेचा तो ग्रंथ नाहीं असें दिसून येतें. शास्त्रीबुवांचें तें चरित्र त्यांच्या सहोदरबंधूनें लिहिलें असल्यामुळें त्यांतील चुकांकडे जसें इतरांचें तसेंच देवांचेंहि दुर्लक्ष झालें. या चुका तपशीलाच्या आहेत. तथापि देव यांना शास्त्रीबुवांच्या दोषांची पूर्ण ओळख असल्यामुळें त्यांनीं हे दोष अत्यंत निर्भीडपणानें लोकांसमोर ठेवण्याचें धाडस केलें. देव याचा लोकांच्या डोळ्यांसमोर आलेला दुसरा लेख ‘ नाना फडणवीस ’ हा होय. सदर लेख ‘ विविधज्ञानविस्तारां ’तून प्रसिद्ध होऊन नंतर वेगळा पुस्तकरूपानें काढण्यांत आला होता. त्यांनीं हा लेख १९०३ सालीं लिहिला तोंपर्यंत पेशवाईसंबंधीं पुष्कळच कागदपत्र बाहेर आले होते. नाना फडणवीस हा पेशवाई-

अखेरचा कर्ता विख्यात पुरुष खरा, पण त्याची महति ज्या असामान्य कोटींत केली जाते त्या असामान्य कोटींत बसविण्याच्या लायकीची नव्हती हें दाखविण्याचें कार्य देव यांनीं केलें. चिपळूणकरांप्रमाणें नाना फडणवीसदेखील अर्वाचीन लोकप्रीतीचें केंद्र बनलें आहे. त्याचें स्मरण लखलखीत ताजें राहण्यासाठीं त्यांच्या भक्तांनीं पुण्यतिथीच्या उत्सवाला १९०० सालापासून आरंभ केला होता. पुण्यतिथीच्या उत्सवांतून त्या - त्या व्यक्तीच्या जीवितावर भक्तीच्या उग्र गंधानें दरवळणाऱ्या स्तुतिकुसुमांचा मुसळधार वर्षाव करावयाचा असा महाराष्ट्रांत एक नियम पडून गेला आहे. त्याला अनुसरून नाना फडणविसाला अवतारी पुरुषांच्या पदावर चढविण्याची लाट उत्पन्न झाली. सत्यानृताची कसोटीनें परीक्षा करणाऱ्या देवांसारख्या व्यक्तीला हा प्रकार आवडण्यासारखा नव्हता. त्यांनीं ऐतिहासिक साधनांचा सूक्ष्म अभ्यास करून आपला लेख लिहिला; त्याचे वाभाडे काढण्यास अर्थातच फडणीसभक्त सरसावले, व हा वाद बरेच दिवस चालू राहिला. आज नाना फडणीसांची योग्यता खरेशास्त्री किंवा प्रो. भानु यांच्या तद्विषयक भक्तीच्या मापानें जोखण्याचा काल निघून गेला आहे याचें प्रत्यंतर जिज्ञासूंना सरदेसाई यांच्या रियासतखंडांतील सवाई माधवरावांच्या खंडावरून दिसेल. देवांच्या अनेक निबंधांपैकीं या दोन निबंधांचा येथें उल्लेख केला आहे याचें कारण या त्यांच्या दोन निबंधांत त्यांच्या लेखनाचे सगळे गुण उतरले आहेत. देव हे चुटपुटत्या, चमकदार, दिखाऊ ज्ञानावर आपल्या बुद्धीची तृष्णा भागवून लेखणीचे फटकारे उडविणारे नव्हते. त्यांचा कोणताहि लेख पाहिल्यास तो त्यांनीं वाचकांस कांहींतरी नवीन सांगण्याच्या हेतूनें लिहिलेला असल्याबद्दल खात्री पटण्यास उशीर लागत नाहीं. त्यांच्या लेखांतील उताऱ्यांवरून त्यांच्या तयारीचें अनुमान काढावयाचें झाल्यास मेकॉले, मोर्ले वगैरे कित्येक इंग्रज टीकालेखकांचा त्यांनीं उत्कृष्ट अभ्यास केला होता असें ध्यानांत येतें. तथापि मेकॉलेचें पूर्वग्रहदुष्टत्व व परदोषांचें मर्मभेदक आविष्करण हे दोष टाळण्याची त्यांनीं सर्वत्र खबरदारी घेतली आहे. त्यांच्या लेखांत मेकॉलेच्या वाचकांना थरारून सोडणाऱ्या भराऱ्या नाहींत आणि मोर्लेचा अर्थगंभीर रसाळपणा नाहीं. विषयनिरूपणाचा व्यवस्थितपणा, विषयाच्या व्याप्तीचें बहुतेक बिनचूक आकलन इत्यादि पूर्वोक्त ग्रंथकारांचे गुण त्यांच्यांत भरपूर आहेत आणि यामुळेंच त्यांचे निबंध कायमच्या

वाचनीय स्वरूपाचे बठले आहेत. विशेषतः त्यांनीं लिहिलेले चरित्रविषयक निबंध वाङ्मयेतिहासाच्या दृष्टीनें मोलाचे आहेत." (आधार – विविधज्ञा. वर्ष ६१, अं.४.)

देवांच्या टीकात्मक लेखापैकीं ' जिवबादादा केरकर यांचें चरित्र ', भागवतकृत ' सयाजीराव गायकवाड यांचें चरित्र ', पारसनीसकृत ' ब्रह्मेंद्रस्वामीचें चरित्र ' रमाबाई रानडेकृत ' आमच्या आयुष्यांतील कांहीं आठवणी ', आपटेकृत ' जग हें असें आहे ' या ग्रंथांवरील टीकात्मक लेख विशेष महत्त्वाचे आहेत.

**देव यांचे कांहीं महत्त्वाचे निबंध व त्यांचे ग्रंथः—**

**निबंधः**—( १ ) दोन आख्यायिका – निबंधमाला, १८७७; ( २ ) मिसेस कृष्णाबाई सत्यनाथन् – वि. ज्ञा. वि. डिसेंबर १८९९; ( ३ ) सदाशिव काशीनाथ उर्फ बापूसाहेब छत्रे – वि. ज्ञा. वि. सप्टेंबर-आक्टोबर १९००; ( ४ ) विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचें चरित्र – परीक्षण - ग्रंथमाला जून १९००; ( ५ ) कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर याच्या चरित्रावर टीका – मुंडले व दामले यांस उत्तर – ग्रंथमाला जानेवारी १९०२; ( ६ ) जग हें असें आहे. परीक्षण – वि. ज्ञा. वि. एप्रिल १९०२; ( ७ ) रंगराव : परीक्षण – वि. ज्ञा. वि. फेब्रुवारी १९०४; ( ८ ) आनंदराव सखाराम बर्वे – वि. ज्ञा. वि. ऑगस्ट-सप्टेंबर १९०२; ( ९ ) तरुलता दत्त – वि. ज्ञा. वि. मे-जून १९०३; ( १० ) भगवद्गीतेंतील बुध्या : राजारामशास्त्री यांच्या इंग्रजी निबंधाचें भाषांतर – वि. ज्ञा. वि. जुलै १९०५; ( ११ ) अहिल्याबाई होळकर – वि. ज्ञा. वि. सप्टेंबर १९०५; ( १२ ) एकपाद कलि आणि कडक जातिबंध – वि. ज्ञा. वि. एप्रिल १९०८; ( १३ ) जिवाजी बल्लाळ उर्फ जिवबादादा केरकर यांचें चरित्र : परीक्षण – वि. ज्ञा. वि. जानेवारी व फेब्रुवारी १९०९; ( १४ ) थोरले सयाजीराव गायकवाड यांचें चरित्र : परीक्षण – वि. ज्ञा. वि. जुलै व ऑगस्ट १९०९; ( १५ ) अधिकारयोग : परीक्षण – वि. ज्ञा. वि. जुलै व ऑगस्ट १९१०; ( १६ ) सखाराम भगवंत बोकील ऊर्फ सखाराम बापू – वि. ज्ञा. वि. जानेवारी व मार्च १९११; ( १७ ) आमच्या आयुष्यांतील कांहीं आठवणी : परीक्षण – वि. ज्ञा. वि. फेब्रुवारी १९११; ( १८ ) हरि केशवजी – वि. ज्ञा. वि. जून व जुलै १९१२; ( १९ ) त्रिंबकजी डेंगळे व त्यांचे साथीदार – भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक शके १८३४; ( २० ) रामशास्त्री प्रभुणे – वि. ज्ञा. वि. एप्रिल, मे, जून व जुलै १९१४; ( २१ )

शांताराम अनंत देसाई – वि. ज्ञा. वि. जून १९२४; ( २२ ) रामचंद्र भिकाजी जोशी – वि. ज्ञा. वि. मे १९२७; ( २३ ) निबंधमाला नवी आवृत्ति : परीक्षण – वि. ज्ञा. वि. डिसेंबर १९१७; ( २४ ) धर्मदृष्टीनें मराठ्यांच्या इतिहासाचें पर्यालोचन – मालव साहित्य, वर्ष २ अंक ४, सन १९३१.

**ग्रंथः**— ( १ ) बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर यांचें चरित्र, १८९२; ( २ ) रामशास्त्री प्रभुणे, १८९२; ( ३ ) चिपळूणकर यांचे चरित्रावर टीका, १९०१; ( ४ ) नाना फडणवीस, १९०४; ( ५ ) रा. ब. विनायक जनार्दन कीर्तने यांचें चरित्र, १९०४; ( ६ ) राजाराम शास्त्री भागवत यांचें चरित्र, १९०९; ( ७ ) काव्यकोश; ( ८ ) देवांचे स्वभाव व सामर्थ्य.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः**—

( १ ) कै० बाळकृष्ण नारायण देव, ल. बा. देव, मालवसाहित्य वर्ष १ अंक ३ व ४ सन १९३०

( २ ) मृत्युलेख – विविधज्ञानविस्तार, एप्रिल १९३०.

( ३ ) कै० बा. ना. देव – विविधज्ञानविस्तार, एप्रिल - मे १९३०.

( ४ ) हेतु कीं परिणाम ? – मो. के. दामले, ग्रंथमाला, ऑक्टोबर १९००.

( ५ ) विष्णुशास्त्री चिपळूणकर यांजवर देव यांनीं सोडलेलें टीकास्त्र. वा. दा. मुंडले, ग्रंथमाला, नोव्हेंबर १९००.

( ६ ) ब्रह्मेंद्रस्वामीच्या चरित्रावर रा. अळेकर व रा. देव यांचा वादविवाद, विविधज्ञानविस्तार, फेब्रुवारी, एप्रिल, मे, जून, नोव्हेंबर, डिसेंबर १९०२.

( ७ ) कै० रा. ब. विनायक जनार्दन कीर्तने यांचें चरित्र : परीक्षण – वि. मो. महाजनी, विविधज्ञानविस्तार, मार्च १९०७.

( ८ ) नाना फडणवीस विरुद्ध देव, विविधज्ञानविस्तार (पुरवणी), जानेवारी १९११.

( ९ ) मालाकारांच्या प्रतिपक्षीयांचे नक्राश्रू, चित्रमयजगत्, मार्च १९१८.

**देवधर सीताराम गणेश** [ १८६१–१९२५ ] सुधारक पत्राचे एक संपादक व ग्रंथकार. यांचा जन्म सातारा शहरीं झाला. यांनीं बी. ए. पर्यंतचें सर्व शिक्षण स्वकष्टानें संपादिलें. कांहीं वर्षे शिक्षकाचें काम केल्यावर ते पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीस येऊन मिळाले. सोसायटीनें त्यांच्याच बळावर

सातान्यास शाळा काढिली. सातान्याच्या या शाळेचें चालकत्व देवधर यांजकडे वीस वर्षे होतें. आगरकरांच्या मतांशीं यांचीं मतें जुळणारीं असल्यामुळें आगरकरांनीं यांस 'सुधारका'च्या संपादकवर्गांत घेतलें होतें. हें काम त्यांनीं सतत ८।९ वर्षें केलें. हे गेल्या पिढींतील एक कर्ते सुधारक होते. १९०५ सालीं यांनीं एका गतधवेशीं विवाह केला. 'माझा जीवनवृत्तांत' या नांवाचें एक आत्मचरित्र यांनीं लिहिलें आहे. यांत एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांतील महाराष्ट्रांतील सामाजिक सुधारणांच्या लढ्यांचा इतिहास विस्तारानें आलेला असल्यामुळें या आत्मचरित्राला विशेष महत्त्व आलेलें आहे. यांनीं पुनर्विवाहाचा पुरस्कार करणारें 'सुविचारविजय' नांवाचें एक नाटकहि लिहिलें आहे.

**देवधर यांचें वाङ्मयः**—(१) सुविचारविजय नाटक; (२) माझा जीवनवृत्तांत, १९२७; (३) सुधारणारहस्य.

**देवल गोविंद बल्लाळ** [१८५४–१९१६] नाटककार. यांचा जन्म कोंकणांत आडिवरें गांवाजवळच्या एका खेड्यांत झाला. आणि बाळपण सांगलीनजीक असलेल्या हरिपुरांत गेलें. हरिपुरला संगमेश्वर या सार्थ नांवाचें एक देवालय आहे. आपल्या बाल्य-ग्रामांतील या देवालाच 'संगमनाथ' हें नांव देऊन शारदेंत देवलांनीं त्याला रसिकांपुढें आणिलें. दुय्यम शिक्षणाकरितां देवल बेळगांवला आपले वडील बंधु कृष्णाजीपंत यांच्याकडे गेले. कै. अण्णासाहेब किर्लोस्कर त्या वेळीं 'बेळगांवच्या सरदार हायस्कुलां'त शिक्षक होते. मराठी नाट्यवाङ्मयाला भूषणभूत अशा गुरुशिष्यांच्या पहिल्या जोडीची ओळख शाळेंतील गुरुशिष्य या नात्यानें झाली. गोविंदरावांना कविता व नाटकें यांचा लहानपणापासून नाद होता. शाळेंत असतांना त्यांनीं एक कविता करून ती किर्लोस्करांना दाखविली व 'बलवंत' गुरूंनीं त्यांना उत्तेजनहि दिलें. मॅट्रिकच्या परीक्षेंत पहिल्या खेपेला अपयश आल्यामुळें गोविंदराव कोल्हापुरला येऊन राहिले व तेथूनच १८७९ सालीं ते या परीक्षेंत उत्तीर्ण झाले. या परीक्षेचा इतिहासाचा पेपर त्यांनीं पद्यांत लिहिला होता अशी आख्यायिका आहे. पुढें महाश्वेता व शारदा यांचीं दुःखें रंगविणाऱ्या काव्यशक्तीनें आपल्या बालपणीं युद्धांचीं कारणें व तहांचीं कलमें यांच्याशीं खेळ करणें अगदींच असंभवनीय नाहीं. परंतु हीं पद्यमय उत्तरें वाचणारा रसिक परीक्षक देवलांना लाभला ही मात्र आश्चर्याची गोष्ट आहे. मॅट्रिक

झाल्यानंतर त्यांनीं 'सरदार हायस्कूल'मध्यें शिक्षकाची नोकरी धरिली; परंतु वरिष्ठ अधिकाऱ्यांचें व त्यांचें न पटल्यामुळें त्यांनीं ती लवकरच सोडिली. पुढें पुण्याच्या शेतकी शाळेंत दाखल होऊन ते १८८४ मध्यें शेतकीची परीक्षा पास झाले. पण सरस्वतीच्या नाट्योद्यानात सुंदर वेली लावणाऱ्या या मालाकारानें शेतकीखात्यांत जन्म घालवावा असा विधिसंकेत नव्हता. १८८४-८५ मध्यें श्री. भि. सरदेसाई यांच्या सहकार्यानें त्यांनीं 'कादंबरीकलाप' या नांवाचें मासिक काढिलें. याचवेळीं 'ललितकलोत्सव' नांवाच्या नाटकमंडळीला त्यांनीं आपलें 'मृच्छकटिक' नाटक दिलें.

नट व नाट्यशिक्षक या दोन्हीं नात्यांनीं त्यांचा लौकिक मोठा होता. 'वेणी-संहारां'तील अश्वत्थाम्याची व ऑथेल्लोमधील नायकाची भूमिका ते उत्तम वठवीत. एवढेंच नव्हे, तर 'केसरीफंडा'साठीं झालेला 'शाकुंतला'चा प्रयोग गौतमीचें पात्र नसल्यामुळें अडतो असें पाहतांच त्यांनीं तीहि भूमिका चांगल्या रीतीनें पार पाडली होती. देवलांनीं मिशा न काढतां काम करावयाचें ठरविल्यामुळें गौतमी-आतेनें त्या प्रयोगांत तोंडावरून पदर घेतला होता असें म्हणतात. या प्रयोगाच्या प्रेक्षकांत कोणी संशोधक नसावा असें दिसतें. नाहींतर 'दुष्यंताच्या वेळीं हिंदु-स्थानांत बुरखा होता काय?' या प्रश्नावर त्यानें चांगलीच झोड उठविली असती! पांचव्या अंकांत राजा शकुंतलेला ओळखीत नाहीं हें पाहूनसुद्धां या गौतमीआतेनें शांतवृत्तीच धारण केली असेल. नाहींतर रागाच्या भरांत तिच्या तोंडावरील पदर खालीं पडून 'आत्याबाईला मिशा असत्या तर' या म्हणीचा खराखुरा अनुभव शकुंतलेला आला असता! कै. भाऊराव कोल्हटकर यांची सुभद्रा व मंथरा या भूमिका, श्री. गोरे यांचें इंदिराकाकूंचें काम अगर श्री. बोडस व श्री. बालगंधर्व यांच्या 'मृच्छकटिक' व 'संशयकल्लोळ' नाटकांतील भूमिका ज्यांनीं पाहिल्या असतील त्यांना देवल अभिनयशिक्षणांत किती निपुण होते याची सहज कल्पना येईल.

१८८० पासून १९१६ पर्यंतच्या तीन तपांत त्यांनीं एकंदर सात नाटकें लिहिलीं. या नाटकांपैकीं तीन इंग्रजी नाटकांचीं रूपांतरें, तीन संस्कृत नाटकें व 'बाणाची कादंबरी' यांच्या साहाय्यानें रचिलेलीं व एक स्वतंत्र अशीं आहेत. मोरोपंत व वामन हे त्यांचे आवडते कवी असून ह. ना. आपटे व 'त्राटिका'कर्ते केळकर हे त्यांचे जिवलग स्नेही होते.

**दुर्गा** – ‘ इझाबला ’ या इंग्रजी नाटकावरून लिहिलेलें हें शोकान्त नाटक वाङ्मयसंसारांतील देवलांचें पहिलें अपत्य होय. ‘राजाराम कॉलेज’चे प्रिन्सिपॉल कँडीसाहेब यांनीं हें नाटक पसंत केलें होतें. हें नाटक प्रथमतः १८८६ सालीं प्रसिद्ध झालें. धंदेवाईक नाटक मंडळयांपेक्षां क्लबांकडूनच या नाटकाचे प्रयोग होण्याचें मुख्य कारण त्याचा छोटेपणा व सुटसुटीतपणा हेंच असावें. तुळाजीराव हा या नाटकांतला खलपुरुष आहे. तो आपल्या बापाच्या कानांत विष ओतून तेंच वडील भाऊ व भावजय यांच्या सुखांत कालवितो. दुष्ट तुळाजीराव, त्याचा निर्दय बाप जिवाजीराव, दुर्दैवी दुर्गा, दुर्गेवर खरेंखुरें प्रेम करणारा आनंदराव, आणि उपकारांची फेड करण्याकरितां दुर्गा आनंदरावाला आत्मदान करते न करते तोंच सात वर्षांनीं परत येणारा तिचा अभागी पति चंद्रराव या सर्वांचीं स्वभाव-चित्रें ठसठशीत साधलीं आहेत. त्यांत सूक्ष्मपणा मात्र फारसा नाहीं. स्वभाव-विकासापेक्षां प्रसंगवैचित्र्याकडेच मूळ नाटककारानें अधिक लक्ष दिल्यामुळें असें झालें असेल. काळ्या व कोंडाऊ हीं कुणबाऊ पात्रें देवलांनीं चांगलीं रंगविलीं आहेत. परक्या समाजातील नाटक आपल्या समाजाशीं जुळतें करून घेण्याचें कौशल्य देवलांच्या या पहिल्या प्रयत्नांत देखील दिसून येतें. ‘ शिवाजीच्या हातीं सिंहगड कांहीं एका दिवसांत नाहीं आला ! ’ हें एकच वाक्य त्यांच्या या कौशल्याची यथार्थ कल्पना आणून देण्यास समर्थ आहे.

**मृच्छकटिक** – ‘ शाकुंतल’प्रमाणें ‘ मृच्छकटिक ’ हेंहि संस्कृतवाङ्मयांतील एक अप्रतिम नाट्यरत्न आहे. ‘नवनीत’कार गोडबोल्यांनीं या रत्नाच्या सौंदर्याची कल्पना आपल्या भाषांतरानें मराठी वाचकांना आणून दिलीच होती. रंगभूमीच्या दृष्टीनें या नाटकाचें भाषांतर करण्यांत देवलांच्या भाषाप्रभुत्वाप्रमाणें त्यांची मार्मिकताहि प्रगट झाली.

मूळचें ‘मृच्छकटिक’ प्रयोगाच्या दृष्टीनें लांबट होतें. देवलांनीं त्याची मोठ्या कौशल्यानें छाटाछाट केली आहे. फुलाला न दुखवितां त्यांतील मधाचा थेंब न् थेंब संपादन करणाऱ्या भ्रमराप्रमाणें मूळ नाटकांतील रस त्यांनीं आपल्या रूपांतरांत आणिला आहे. संस्कृत ‘मृच्छकटिकां’तील द्यूतकारांचें भांडण त्यानीं गाळलें आहे; पण जुगारांत हरलेल्या संवाहकाला वसंतसेनेच्या घरीं आणून चारुदत्ताच्या उदात्त स्वभावावर प्रकाश पाडण्याचें व अशा रीतीनें वसंतसेनेच्या मनांतील चारुदत्ता-

विषयींच्या प्रेमाचा विकास करण्याचें कार्य मात्र त्यांनीं साधून घेतलें आहे. गोपाल-पुत्रक आर्यकाला रंगभूमीवर येण्याची तसदी त्यांनीं दिली नाहीं; पण जरूर तेथें त्याचा उल्लेख मात्र त्यांनीं केला आहे. गुलाबकळीला झांकून तिचें सौंदर्य कमी करणारें एखादें दुसरें पान तोडून टाकावें त्याप्रमाणें देवलांनीं कथानकाचें सूत्र, स्वभावरेखन व रसपरिपोष यांच्या दृष्टीनें अनावश्यक असा भाग गाळून टाकिला. संक्षेप करितांना त्यांच्या मार्मिकतेनें रसिकतेचा सल्ला पदोपदीं घेतला असल्यामुळें मूळ नाटकाचा आत्मा व शरीर हीं या नाटकांत जशींच्या तशींच उतरलीं आहेत एवढेंच नव्हे तर संस्कृत नाटकांतील सुंदर वस्त्राभरणेंहि—त्यांतील एकहि न चुकतां मराठींत आलीं आहेत.

किर्लोस्कराच्या 'शाकुंतला'पेक्षां देवलांच्या मृच्छकटिकां'तील गद्य अधिक सफाईदार आहे. ' सद्गुण आणि वैभव हीं फार दिवस एके ठिकाणीं राहत नाहींत.' 'नासक्या तळयांतच पुष्कळ पाणी असतें.' ' ह्या वेश्या म्हणजे जोड्यांतल्या खड्यासारख्या आहेत; लवकर निघत नाहींत व खुपल्यावांचून राहत नाहींत.' अशासारखीं वाक्यें वाचलीं म्हणजे मूळच्या काव्यमय अगर व्यावहारिक कल्पना पुनर्जन्मांतहि पूर्ववत् सुंदर राखण्यात देवल किती कुशल आहेत याचा प्रत्यय येतो. या नाटकांतील त्यांचें गद्य जितकें सुबोध तितकेंच सरस आहे. पदें वाच-तांना त्यांतील प्रसाद व कल्पकता याच्या संगमामुळें वाचकाला आपण गुलाबाच्या पायघड्यांवरून जात आहों असा भास होतो. ' नभ वर्षे तिमिरधारा ' ' दीन जनांचा जो कल्पतरु ' ' रजनिनाथ हा ' ' जो या नगरा भूषण खरा ' ' फुलें वेलींचीं ' ' लक्ष्मीसम चंचल या ' ' शाखा सद्गुण जया पालवी ' ' नोहे हा पवन जवन ' ' प्रिये कशी दैवाची ' ' जरि नाहिं कमल तें करीं ' इत्यादि पदें उत्कृष्ट पद्यांचे आदर्श आहेत. ' आमंत्रणें खाणें ' ' कुदशा भेसुरि ' असले कटु प्रयोग मुद्दाम शोधले तरी फारसे मिळणार नाहींत.

निर्मल जलाशयाचें काम आकाशाचें हुबेहुब प्रतिबिंब दाखविणें हेंच आहे. त्याला आकाशांतील मेघ अप्रिय असले तरी नाहींसे करतां येत नाहींत व तारका प्रिय असल्या तरी निर्माण करतां येत नाहींत. देवलांचीहि स्थिति अशीच झाली आहे. दारिद्र्यानें पीडलेल्या चारुदत्ताचा जीवश्चकंठश्च स्नेही मैत्रेय त्याचें सांत्वन करण्याऐवजीं एकदम ' बरें मित्रा, दारिद्र्य आणि मरण यांतून तुला कोणतें बरें

वाटतें ?' असा प्रश्न करतो त्या वेळीं तो त्याचा पूर्वजन्मींचा शत्रु असावा अशी शंका येते. दारिद्र्यवर्णन सविस्तर करावयाला मिळावें म्हणूनच शूद्रकानें हा मूर्खपणा मैत्रेयाच्या गळ्यांत बांधला असावा ! चारुदत्ताची उदारहृदय पत्नी धूता हिला शक्य तितकी पडद्याआड ठेवण्याचें कारण पडद्यापुढें चालणारा वसंतसेना व चारुदत्त यांचा शृंगार तिच्या दृष्टीला पडूं नये हेंच असण्याचा संभव आहे ! वसंतसेना व चारुदत्त यांना परस्परांविषयीं वाटणारें आकर्षण वैषयिक असल्याचे उल्लेख नाटकांत कितीतरी सांपडतील. वसंतसेनेला रदनिका मानून चारुदत्त आपला शेला रोहसेनाच्या अंगावर घालण्याकरितां तिच्याकडे देतो त्या वेळीं चारुदत्ताचा स्पर्श झालेला शेला आपल्या हातांत आला एवढ्यामुळेंच तिला आनंद व्हावयाला पाहिजे होता. पण वसंतसेना त्याचा वास घेऊन लगेच म्हणते – "मधुर जाति सुमनाचा वास यास येत असे । यौवनभर म्हणुनि याचा खास अजुनि पूर्ण असे ॥" चारुदत्तहि तिची ओळख पटतांच स्वतःशीं 'कुसुमचाप मनिं जागृत झाला' म्हणून गाऊं लागतो !

संस्कृत 'मृच्छकटिकां'त हीं अगर याच्यासारखीं दुसरीं वादग्रस्त स्थळें अनेक सांपडतील. पण छायाचित्रकार हा ब्रह्मदेव नसल्यामुळें त्याचें काम मूर्ति जशी असेल तसें तिचें छायाचित्र घेणें एवढेंच आहे. देवलांनीं हें काम अत्यंत कौशल्यानें केलें असल्यामुळें रहस्यपूर्ण कथानक, वैचित्र्यपूर्ण स्वभावचित्रें, विनोदपूर्ण प्रतिनायक, आणि काव्यपूर्ण प्रसंग यांनीं नटलेलें 'मृच्छकटिक' मराठी रंगभूमीचें चिरंतन भूषण झालेलें आहे.

**विक्रमोर्वशीय** – 'मृच्छकटिका'नंतर दोन वर्षांनीं ( १८८९ ) हें नाटक प्रसिद्ध झालें. 'विक्रमोर्वशीय' हें जन्मांच्या दृष्टीनें शाकुंतलाचें भावंड असलें तरी व्यवहारांत भावांभावांच्या गुणांत दिसून येणारें अंतर या दोन नाटकांच्या गुणांतहि दृष्टोत्पत्तीला येतें. कालिदासांत आधींच स्वभावांची विविधता कमी; त्यांतच उर्वशीच्या वियोगानें वेडा झालेला राजा वृक्षवेली व पशुपक्षी यांच्याकडे तिची चौकशी करीत अरण्यांत भ्रमतो हा काव्यमय पण नाट्यप्रतिकूल प्रसंग रंगविण्यांत सबंध चौथा अंक खर्च झालेला ! प्रेमोद्भव, प्रेमी जनांचा संगम, त्याचा वियोग इत्यादि आपल्या आवडत्या प्रसंगापलीकडे कालिदासानें यांत पाऊल टाकलेलें नाहीं. त्यामुळें देवलांचें हें नाटक रंगभूमीवर टिकलें नाहीं. यांतील गद्य 'मृच्छकटिका'-

इतकें सुरस वाटत नाहीं. पदांपैकीं 'वारी तिमिरासी' 'चापधर कुमार हा' वगैरे पदें संगीतप्रिय लोकांच्या जिभेवर नाचत राहण्याच्या योग्यतेचीं आहेत. कालिदासाच्या बहुतेक कल्पना त्यांचें सौंदर्य कमी होऊं न देतां देवलांनीं आपल्या भाषांतरांत आणल्या आहेत. तथापि त्यांची वाणी या नाटकांतील पद्यांत 'मृच्छकटिक' अथवा 'शापसंभ्रम' यांच्यासारखी सहज ओघानें जात आहे असें वाटत नाहीं. 'शाकुंतलाची माधुरी' चाखलेल्या मराठी वाचकांना 'विक्रमोर्वशीय' आवडलें नाहीं हा त्याचाहि दोष नव्हे अगर भाषांतरकर्त्या देवलांचाहि दोष नव्हे. द्राक्षांचा सुधारस जिव्हेवर नाचत असतांना जांभळें तोंडांत टाकण्याची इच्छा कोणाला होईल ?

**झुंझारराव** – शेक्सपीअरच्या ऑथेल्लोचें हें रूपांतर १८९० मध्यें लोकांपुढें आलें. कै० महादेवशास्त्री कोल्हटकरांनीं ह्या नाटकाला मराठी पेहराव पूर्वीच चढविला होता. देवलानीं रंगभूमीच्या दृष्टीनें त्याचें संस्करण केलें. कै० गणपतराव जोशी व शेक्सपीअरच्या नाटकांचे भोक्ते असे दुसरे काहीं नट रंगभूमीवर असेपर्यंत या नाटकाचे मधूनमधून प्रयोग होत असत. ह्या रंगावृत्तीमध्यें देवलांच्या लेखणीचा सफाईदारपणा थोड्याफार प्रमाणांत प्रगट झाला आहे. आधुनिक मराठी काव्यांतील 'चंद्रकांत' या लोकप्रिय वृत्ताचा उगम या नाटकांतील 'चंद्रकांत राजाची राणी' या गाण्यांत आहे.

**शापसंभ्रम** – बाणाच्या सुप्रसिद्ध 'कादंबरी'च्या आधारें देवलांनीं हें नाटक लिहिलें. 'विक्रमोर्वशीय' व 'मृच्छकटिक' यांच्या भाषांतरापेक्षां हें काम अधिक कठिण होतें यांत संशय नाहीं. पहिल्या दोन्हींना छायाचित्राची कला आवश्यक होती अशी कल्पना केली तर या कार्याला चित्रकाराचें कलमच पाहिजे होतें असें म्हणतां येईल. बाणभट्टाच्या 'कादंबरी'चें कथानक अत्यंत गुंतागुंतीचें. 'कादंबरीं'त बाणानें तीन जन्मांची कथा सविस्तर वर्णिली; पण देवलांना पांच तासांत रंगभूमीवर संपेल अशा बेतानें तिला नाट्यरूप द्यावें लागलें. ही तारेवरील कसरत करण्याचें कारण "मूळ संस्कृतांतील काव्याचें आपल्या अधिकारी पद्धतीनें मराठीकरण करण्याची देवलांची महत्त्वाकांक्षा फार प्रबल होती," असें श्री. व. शां. देसाई यांनीं म्हटलें आहे. 'शापसंभ्रमा'च्या प्रस्तावनेचें पहिलें वाक्य व नमनाच्या पहिल्या पद्यांतील 'रचना कादंबरी सुरम्या सीमा काव्याची । संक्षेपें संगीत

नाटकीं ती नटवायाची ॥ इच्छा जाणुनी शिवभूपाची तीतें अनुसरतों ॥' या ओळी खुद्द देवलांच्या हातच्या असल्यामुळें वरील विधानापेक्षां अधिक विश्वासार्ह वाटतात. इंदूरच्या शिवाजीराव महाराजांनीं ' कादंबरी 'च्या कथानकावर नाटक-रचना करण्याविषयीं एक हजार रुपयांचें बक्षीस लावलें व शिवराम महादेव परांजपे, लेंभे, के. मो. का. इत्यादि लेखकांच्या रूपांतरापेक्षां देवलांचें रूपांतर सरस ठरून तें बक्षीस त्यांना मिळालें ही ' शापसंभ्रमा 'ची खरी जन्मकथा आहे.

हातपाय बांधून एखाद्याला पोहावयाला टाकावें तशांतला या नाटकाच्या लेख-नाचा प्रकार आहे. आरशांतल्या प्रतिबिंबांत उजवीकडची वस्तु डावीकडे दिसली तरी तो जसा आरशाचा दोष नव्हे त्याप्रमाणें ' कादंबरीं 'तील चमत्कृतिजनक व रसपरिपोषक प्रसंगांची ' शापसंभ्रमां ' त उलटापालट झाली असली तरी त्याला देवलांचें नाट्यकौशल्य मुळींच जबाबदार होऊं शकत नाहीं. श्राव्य काव्यांत तिसऱ्या जन्मापासून प्रारंभ करून पूर्वजन्माकडे बाण नंतर वळला. दृश्य काव्यांत देवल हें कसें दाखवूं शकणार ? तथापि ' कादंबरी 'सागरांत अवगाहन करून सुंदर प्रसंगांचीं रत्नें व निवडक काव्यकल्पनांचीं मोत्यें त्यांनीं शक्य तितकीं बाहेर काढलीं असें म्हणावयाला हरकत नाहीं. 'शापसंभ्रम' वाचणाराला देवलांची मार्मिकता व सौंदर्यदृष्टि यांविषयीं कौतुक वाटावें इतकी सरसता या नाटकांत निःसंशय आहे. पुंडरीक व महाश्वेता यांच्या भेटीचा व प्रेमोद्गमाचा पहिलाच अंक पाहावा. तो एकप्रवेशात्मक असून जितका सुटसुटीत तितकाच सरस आहे. महाश्वेता व तिच्या सख्या यांच्यांतील आरंभींच्या विनोदसंभाषणांत कथानकाच्या पूर्वसूत्राचा परिचय मोठ्या कुशलतेनें करून देण्यांत आला आहे. तिसरा अंकहि एकप्रवेशात्मकच आहे. मूळ ' कादंबरीं 'त वर्णनावर फार भर असल्यामुळें ' शाप-संभ्रमां 'त सुंदर संवादांना फारसा अवसर मिळालेला नाहीं. चंद्रापीड व महाश्वेता आपला पूर्ववृत्तांत चंद्रापीडाला सांगते (– हा पूर्ववृत्तांत वाचकांना पूर्णपणें माहीत असतो –) एवढाच भाग चवथ्या अंकांत आला आहे. हा सबंध अंक गाळला तरी चालण्यासारखें आहे. नाट्यदृष्ट्या सुंदर तेवढ्याच काव्यकल्पना देव-लांनीं 'शापसंभ्रमां'त घेतल्या आहेत. मूळांतच कथानकाची उभारणी चमत्कृतीवर केली असल्यामुळें व शृंगाराखेरीज इतर रसांचा उठाव करण्याची शक्यता नस-ल्यामुळें हें नाटक सर्वांगसुंदर उतरलें नाहीं यांत नवल नाहीं. नाटकांतील पद्यें प्रसादपूर्ण व सुंदर आहेत. बाणाच्या मधुर कल्पकतेची जोड मिळाल्यामुळें ' मधुर

किती कुसुमगंध सुटला ' हे तरु कामीजन असती ' ' ही का देवी ' वनींची ! ' 'असा कोण रे मदन वारि त्यातें' ' सज्ज करुनि चाप मदन येत मागुनी ' 'धवल चांद्रिकाच काय पूर्ण सांचली ' ' सतनु करावा पुन्हां मदन तो ' वगैरे पदें अत्यंत सुंदर झालीं आहेत. ' असे वडिलांचें पत्र मला आलें ' असल्या गद्यवजा ओळी अगर ' हंस सुवंश मशाला ' सारखी सदोष शब्दयोजना फारशी आढळत नाहीं. महाश्वेतेशीं लगट करणाऱ्या वैशंपायनाला तरलिकेनें ' जाणून बुजून काळसर्पिणी-वर पाय कां देतोस ? ' असें म्हणणें, आकाशमार्गांतून जाणाऱ्या ऋषिशिष्यांनीं वर्णाश्रमधर्माविषयींच्या वादाला जाण्याच्या गोष्टी बोलणें ( सभांचे बंड तेव्हांहि होतेंच म्हणावयाचें !–), महाश्वेता व कादंबरी या गंधर्वकन्यकांच्या वडिलांनीं 'आम्ही कन्यापक्षाचे; आम्हांला कशाला इतका मान ?' असें हुंड्यानें गांजलेल्या विसाव्या शतकांतील बापाप्रमाणें उद्गार काढणें अशासारखे लहानसहान औचित्यदोष नाट-कांत आढळले तरी त्यांची गालबोटांतच गणना केली पाहिजे. नाटकाचें गद्य मधुर व सुबोध तर आहेच; पण ' चंद्राची कोर शंकरावांचून दुसऱ्या कोणाला पचणार ? ' असल्या वाक्यानीं त्याला सौंदर्याचीहि जोड मधूनमधून दिली आहे.

**शारदा** – ( १८९९ ) एकोणिसाव्या शतकाबरोबरच दुष्ट रूढींचाहि महा-राष्ट्रांत अंत होईल अशी भविष्यवाणी सांगणारें देवलांचें हें सुंदर नाटक सर्वस्वीं स्वतंत्र आहे. इंग्रजी शिक्षण व आगरकरांचें लेखन यांनीं समाजाच्या डोळ्यांत अंजन घातल्यामुळें त्या वेळीं त्याला आपले दोष दिसूं लागले होते. ज्याच्या अर्ध्या गोंवऱ्या स्मशानांत गेल्या आहेत अशा थेरड्याच्या गळ्यांत, जिचें अर्धें मन अद्यापि बाहुला-बाहुलीकडे ओढ घेत आहे अशी अल्पवयी कुमारिका बांधणें हें घोर पातक आहे अशी साहाजिकच सुशिक्षितांना जाणीव झाली. 'शारदे'आधीं बालावृद्धविवा-हावर एकदोन नाटकें महाराष्ट्रांत आलीं होतीं याचें कारण या रूढीचा हिडीस-पणा प्रत्येकाला पटूं लागला होता हेंच आहे. देवलांना हा विषय हातीं घेण्याला मात्र विचारापेक्षां प्रत्यक्ष प्रसंगापासूनच स्फूर्ति मिळाली असावी असें अनुमान काढाव-याला जागा आहे. त्यांची जन्मभूमि हरिपुर हिच्यांतील संगमेश्वराची आठवण करून देणारा 'शारदे'तील ' संगमनाथ ', गुडघ्याला बाशिंग बांधावयाला तयार झालेल्या म्हाताऱ्याला त्यांनीं दिलेलें जयधुंडिराज हें नांव, इत्यादि गोष्टींवरून म्हातारपणीं मुंडावळ्या बांधून मिरविणारा जवळपासचा संस्थानिक पाहूनच त्यांनीं हा विषय हातीं घेतला असावा असा तर्क केल्यास तो चुकीचा ठरणार नाहीं.

या नाटकानें 'सामाजिक नाटकांचे जनक' ही पदवी देवलांना मिळवून दिली. साधें कथानक, अगदीं घरगुती वाटणारे संवाद, खोंचदार संभाषणें आणि मार्मिक विनोद यांच्यामुळें हें नाटक आबालवृद्धांना प्रिय व्हावें हे स्वाभाविकच होतें. स्वतःच्या तोंडाचें बोळकें कृत्रिम दांतांनीं सजवून कुंदकळयांची दंतपंक्ति असलेली वधू शोधणारा आणि कूष्मांडपाकाच्या दोन वड्या पचत नसतांना सुंदर तरुणीरत्न गिळंकृत करूं पाहणारा या नाटकांतील भुजंगनाथ देवलांनीं कुशलतेनें रेखाटला आहे. शारदेसारख्या अल्पवयस्क मुलीच्या जन्माची होळी करून तिच्यावर आपली पोळी भाजून घेणारा मध्यस्थ भद्रेश्वर दीक्षित, पाटचा गोळा थेरड्याच्या पदरांत टाकून सोन्याचा गोळा स्वतःच्या पदरांत पाडून घेऊं इच्छिणारा लोभी कांचनभट, कसायाच्या हातांत सांपडलेल्या गाईप्रमाणें असल्या बापाच्या पोटीं जन्म घेणारी सुशील व सहृदय शारदा, यांचीं स्वभावचित्रें देवलांनीं नाजुक हातानें काढलीं आहेत. भुजंगनाथ, भद्रेश्वर व कांचनभट ह्या नांवांचा भाषेंत संप्रदाय म्हणून उपयोग होऊं लागला आहे ही एकच गोष्ट 'शारदा' नाटकानें लोकांच्या मनावर केलेल्या परिणामाची कल्पना आणून देऊं शकेल.

नायक कोदंड याची भूमिका मात्र व्हावी तितकी उठावदार झालेली नाहीं. भुजंगनाथ व भद्रेश्वर यांचें कारस्थान त्याला प्रथमतः योगायोगानें कळतें. श्रीमंतांच्या घरीं पुराणिक म्हणून राहिल्यानंतर पालथ्या घागरीवर पाणी ओतण्या-प्रमाणें तो त्यांना लग्न न करण्याचा उपदेश करतो व श्रीमंतांच्या चतुर्भुजपणाला अडथळा केल्याबद्दल स्वतःच चतुर्भुज होऊन बसतो. शारदेच्या आईची ओळख करून घेऊन भद्रेश्वराचें कारस्थान त्यानें हाणून पाडलें असतें तर तें त्याच्या बुद्धीला अधिक शोभलें असतें. नाटकांत शारदा व कोदंड यांची पहिल्या अंकानंतर, शारदा नाटकाच्या शेवटीं जीव द्यावयाला जाते तेथपर्यंत कोठेंहि गांठ पडत नाहीं. कोदंडानें इंदिराकाकूंच्या सहाय्यानें भद्रेश्वराला विरोध केला असता तर नाट्यदृष्ट्या सरस असे नवे प्रसंग नाटकांत येऊं शकले असते. कोदंडाचा मित्र हिरण्यगर्भ भद्रेश्वराच्या कैदखान्यांतून कोदंडाची सुटका करावयाला कुणीतरी मनुष्य पाहिजे होता म्हणूनच नाटकांत घातलेला दिसतो. श्रीमंत व शारदा यांचें गोत्र एकच असणें, कोदंडानें अविवाहित राहण्याची प्रतिज्ञा करणें, देशस्थ शारदा व कोंकणस्थ कोदंड यांच्या लग्नाचा ऊहापोह होणें, शारदेला न्हाण आल्यामुळें तिच्या आईनें 'मेल्या दुर्दैवानें भाजल्यावर डाग दिलान् हो'

असे उद्गार काढणें इत्यादि बालावृद्धविवाहाच्या दृष्टीनें विसंगत असे उपप्रश्न नाटकांत देवलांनीं उपस्थित केले नसते तर सध्यांपेक्षांहि नाटक अधिक रसोत्कट झालें असतें. आहे या स्थितींत नाटकाचें करुणपर्यवसान स्वाभाविक असतांना देवलांनीं त्याचा मारून-मुटकून गोड शेवट केला आहे. कलादृष्ट्या पाहिलें तर नाटकाचे पहिले तीन अंक बरेच निर्दोष आहेत. कथानक, स्वभावरेखन आणि रसोत्कर्ष यांच्यांतील वैगुण्यें शेवटच्या दोन अंकांत फार ठळक भासतात. ज्या थेरड्या सुदाम सावकाराचा नाटकांत पदोपदीं उल्लेख येतो त्याला काठी टेकीत कां होईना, रंगभूमीवर यावयाला लावलें असतें तर तो व त्याची बायको यांच्या साहाय्यानें कथानक संमिश्र व चटकदार करतां आलें असतें. या नाटकांतील पहिला अंक एकप्रवेशात्मक असून त्यांच्या मांडणींत देवलांचें रचनाचातुर्य स्पष्टपणें दृग्गोचर होतें. पहिल्या अंकांतील भुजंगनाथ, भद्रेश्वर व कोदंड यांच्या भेटीचे प्रसंग, दुसऱ्या अंकांतील शारदेचें व वल्लरीचें संभाषण आणि कांचनभट व इंदिराकाकू यांची शाब्दिक चकमक, कोदंडानें श्रीमंतांना केलेला अप्रिय पण पथ्य उपदेश, तिसऱ्या अंकांतील पहिला, तिसरा व पांचवा प्रवेश, आणि चौथ्या अंकांतील ' बाळे, काय करते आहेस ? ' या बापाच्या प्रश्नाला ' प्रेम अधिक कीं पैसा अधिक याचा विचार करीत आहें ' असें उत्तर शारदा देते तो प्रसंग हे सर्व प्रसादपूर्ण भाषा, खोंचदार प्रश्नोत्तरें, स्वभावविकास आणि कथानकाचा परिपोष इत्यादि दृष्टींनीं चांगले साधले आहेत. वल्लरी चंद्रिकेला मुका मुलगा झाल्याची हकीगत तिच्यापेक्षां पांच-सहा महिन्यांनीं मोठया असलेल्या व लग्नाची विवंचना करीत बसलेल्या शारदेला सांगते, अशा सूक्ष्म पण रसपोषक छटा देवलांच्या या नाट्यचित्रांत विपुल आहेत. या नाटकांतील गद्य सुबोध व संप्रदायशुद्ध भाषेच्या नमुन्यांनीं भरलेलें आहे. पद्यें सोपीं असलीं तरी कांहीं स्थळीं कल्पनाहीनतेमुळें नीरस वाटतात. ' कां न भक्षिसी गोमय ताजें ' असले हास्यास्पद प्रयोगहि थोडे-फार आढळतात. ' सुंदर खाशी ' ' जरि वरुनि धवट सोंवळा ' ' बाळपणींचा काळ सुखाचा ' ' सांवळा वर बरा ' ' सदय शांत ससि मरणा ' वगैरे पद्यें उत्कृष्ट आहेत.

**संशयकल्लोळ** – ( १९१६ ) मर्फीच्या ' All in the wrong ' या प्रहसना-वरून देवलांनीं ' फाल्गुनराव ' तयार केला. फाल्गुनरावाला संगीताची जोड मिळतांच त्याचें ' संशयकल्लोळा'त रूपांतर झालें. या नाटकांतील पात्रांचीं नावें

साधारणपणें कष्टसाध्यच; पण श्रीमंत लोक शेंकड्यावारी पैसे मोजून तसले रोग बरे करून घेतात; आणि गरिबांना पैशाच्या अभावीं खितपत राहून शेवटीं मृत्युमुखीं पडावें लागतें ! अशा गरीब लोकांकडून त्यांच्या मासिक पगाराहून किंवा उत्पन्नाहून अधिक – मग तें दहा-पंधरा रुपये कां असेना – एक पैहि न घेतां त्यांचे वाटेल ते भयंकर रोग वामनराव बरे करीत! अनेक अनाथांना तर त्यांनीं मोबदला न घेतां उपचार करून काळाच्या दाढेंतून सोडविलें आहे. हें शुश्रूषालय १९१५ सालीं महायुद्धामुळें औषधांच्या किंमती बेसुमार वाढून खर्च झेंपेनासा झाल्यामुळें बंद करावें लागलें. पण वाईटांतून बरें निघावें त्याप्रमाणें पाश्चात्य औषधांच्या महागाईमुळें वामनरावांचें लक्ष देशी औषधांकडे व आयुर्वेदीय संशोधनाकडे अधिक वेधलें. देशी औषधींच्या गुणधर्मांचा त्यांनीं सूक्ष्म अभ्यास आरंभिला. कित्येकांचे गुणधर्म प्रत्यक्ष प्रयोगानें नवीन शोधून काढले, तर दुसऱ्या कांहींचे पडताळून पाहिले. आर्यवैद्यकाबरोबरच युनानी वैद्यकाचेंहि अध्ययन व त्यासंबंधींचे प्रयोग त्यांनीं आरंभिले. त्यांनीं आपल्या बंगल्याच्या आवारांत कांहीं वनस्पती लाविल्या, आणि त्यांचा ते वेळोवेळीं उपयोग करूं लागले. त्यांचा देशी वैद्यकीचा संशोधनात्मक अभ्यास दिवसेंदिवस गाढ होत चालला. याचीं फळें म्हणजेच त्यांचे 'वनस्पतिशास्त्र' व 'रसायनशास्त्र' हे दोन ग्रंथ. हे ग्रंथ मराठी वैद्यकीय वाङ्मयाचीं निःसंशय भूषणें आहेत.

**देसाई वा. ग. यांचें वाङ्मयः** – (१) वनस्पतिशास्त्र; (२) भारतीय रसायनशास्त्र.

**देसाई शांताराम अनंत** [१८६७ – १९१४] तत्त्वज्ञ निबंधकार. जन्म रत्नागिरी जिल्ह्यांतील कुंभवडें गांवीं झाला. 'मुंबई विश्वविद्यालया'चे हे एम्. ए. होते. कायद्याचीहि पदवी त्यांनीं मिळविली होती. इंदूरच्या 'होळकर कॉलेजां'त हे वीस वर्षें प्रोफेसर होते. हिंदी व युरोपीय तत्त्वज्ञानावरील यांचा व्यासंग दांडगा होता. यांचे ग्रंथः – युरोपीय नीतिमीमांसेचा इतिहास, भाग १ – यांत ग्रीक नीतिमीमांसा; २. गहन विषयावर अल्प विचार; भाग १ (१९०६) – यांत प्राच्य व पाश्चात्य ज्ञानमार्ग, पदार्थविज्ञान विरुद्ध खिस्ती धर्म हे तीन विषय आले आहेत; ३. तुकारामाच्या अभंगरत्नांचे हार (१९१०) – यांत तुकाराम व सुप्रसिद्ध इंग्रजी तत्त्वज्ञ कवि ब्राउनिंग यांच्या कृतींची तुलना

करून त्यांतील विशेष व्यक्त केले आहेत आणि समर्थनपर उतारे दिले आहेत; ४. वैदिक तत्त्वमीमांसा, भाग १ ला, शंकराचार्य व रामानुजाचार्य (१९०९) – या लेखांत दोहों आचार्यांच्या मतांतलें ऐक्य कोणत्या गोष्टींत आहे तें दाखविलें आहे ( – मतभेदनिदर्शन दुसऱ्या भागांत करण्याचा त्यांचा विचार होता पण तो त्यांच्या आकस्मिक मृत्यूनें सफल झाला नाहीं. ); ५. सृष्टीची यांत्रिक उत्पत्ति; ६. वैदिक धर्माचें परमरहस्य (१९१०); ७. उपनिषदांतील वचनांचा संग्रह (१९१०). यांनीं इंग्रजींतहि ‘ A Study of Indian Philosophy’ व ‘Vedant of Shankaracharya expounded and vindicated ’. असे दोन ग्रंथ लिहिले आहेत. यांनीं १९०७ सालीं धर्म व तत्त्वज्ञान या विषयांस वाहिलेलें असें ‘विद्यार्थी’ नांवाचें त्रैमासिक सुरू केलें होतें. हें त्रैमासिक ६-७ वर्षे चाललें. यांचे बरेच निबंध ‘विविधज्ञानविस्तारां’त प्रसिद्ध झाले आहेत. [आधार – बा. ना. देव; विविधज्ञा. १९१४. ]

**चरित्र, चर्चा, अभ्यासः –**

( १ ) प. वा. प्रो. शांताराम अनंत देसाई – सुबोधपत्रिका १५, मार्च १९१४.

( २ ) शांताराम अनंत देसाई, बा. ना. देव – विविधज्ञानविस्तार, जून १९१४.

( ३ ) ग्रीक नीतिमीमांसा – परीक्षण, ले. बा. ना. देव, वि. विस्तार, पु. ३४ अं. ८–९, स. १९०३.

( ४ ) शंकराचार्य आणि रामानुजाचार्य – परीक्षण, वि. विस्तार, पु. ४२ अं. ९–१०, सन १९११.

( ५ ) देसाई शांताराम अनंत – चरित्र व कार्यविवेचन, ले. एक शिष्य, लोकशिक्षण ( जुनें ), वर्ष ३ अंक ७, सन १९१५.

**‘धनुर्धारी’ ( रामचंद्र विनायक टिकेकर )** [ १८६२ – १९०७ ] इतिहास, अर्थशास्त्र, व्यापार, बालवाङ्मय, धर्मनीति, चरित्र, कादंबरी, निबंध इत्यादि विषयक बहुरूपी लेखक. नाना विषयांचें ग्रहण करण्यांत ‘ धनुर्धारी ’ यांची बुद्धि जशी नांव घेण्याजोगी सर्वगामी दिसते तशी निरनिराळ्या वेळीं निरनिराळीं टोपण नांवें त्यांना घ्यावयास लावतांना नांव ठेवण्याइतका आपला चंचलपणा ती पटवतेच. टोपण नांव घेण्यापुरतें किंवा लेखनविषयापुरतेंच तिचें चांचल्य न थांबतां स्वतःचें व इतरांचें पोट भरण्याकरतां त्यांनीं वेळोवेळीं

जे-जे प्रयत्न आणि उद्योगधंदे केले त्यांतहि त्यांच्या तरल बुद्धीचा प्रभाव प्रकट झाल्यावांचून राहिला नाहीं. मात्र चंचल बुद्धीनें सरस्वतीच्या सर्व दालनांतून त्यांना स्वैर संचार करण्यास हात दिला म्हणूनच कीं काय चंचल लक्ष्मीनें त्यांना सर्व ठिकाणीं चांगलाच हात दाखविला, आणि पोटासाठीं पायपीटहि करावयास लावली ती इतकी कीं 'धनुर्धारी' यांचें आडनांव त्यांना गांवावरून मिळालें असूनसुद्धां रत्नागिरी जिल्ह्यांतील टिकें हें त्यांचें मूळ गांव होय ही गोष्ट पुष्कळांच्या नजरेआड झालेली आहे. वास्तविक त्यांचें सबंध नांव रामचंद्र विनायक टिकेकर, पण मराठी वाचकांना 'धनुर्धारी' या नांवानेंच ते अधिक परिचित आहेत.

'धनुर्धारीं'सारखा अष्टपैलू लेखक, पढिक विद्वान आणि पाटीभर पदव्या मिळविलेला पहिल्या पिढींतला सुशिक्षित शिष्ट असला पाहिजे अशी कोणाची कल्पना असल्यास ती खोटी आहे. 'धनुर्धारी' यांचें शिक्षण म्हणजे मराठी चार-पांच व इंग्रजी सहा ईयत्ता एवढेंच झालेलें! पण म्हातारीनें कोंबडा डालून ठेवण्याची शिकस्त केली तरी दिवस उगवावयाचा राहत नाहीं त्याप्रमाणें प्रतिकूल परिस्थितीनें जरी त्यांच्या पुस्तकी शाळाशिक्षणाला खो घातला तरी 'धनुर्धारी' यांची कर्तबगारी उजेडात आल्यावांचून राहिली नाहीं. धारवाडास शाळेंत असतांनाच भाषा व इतिहास या विषयांचें त्यांनीं विस्तृत वाचन केलें. पण शाळा-कॉलेजांतून बाहेर पडून आपला आवडता लेखनव्यवसाय स्वयंस्फूर्तीनें सुरू करण्यापूर्वी परिस्थितीनें त्यांना 'सदर्न मराठा रेल्वे'च्या धारवाड येथील अकाउंट ऑफिसांत डांबून टाकलें आणि खरडेघाशी व बेरजा-वजाबाक्या करावयास लावून त्यांच्या स्वाभाविक लेखनहौसेचा हिरमोड केला. घरच्या गरिबीमुळें व सर्वांत वडील भावंड होण्याची त्यांच्यावर पाळी आल्यामुळें 'धनुर्धारी' यांना मध्येंच शाळा सोडून नोकरी धरावी लागली.

एकट्या नोकरीच्या रुपेरी बेडीनें ते तितकेसे बांधले जाणार नव्हते कीं काय म्हणून लग्नाच्या सोनेरी शृंखलेनें लवकरच त्यांना जखडून टाकिलें! पण या दोन्ही बंधनात लग्नाची रेशमी गाठच शेवटीं सरस ठरून कांहीं आकस्मिक कारणावरून त्यांना नोकरीवर पाणी सोडावें लागलें. त्यांच्यांत कांहीं पाणी नसतें तर शेवटपर्यंत दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिण्यांतच त्यांना धन्यता वाटती आणि मराठी वाचकांपुढें त्यांचें नांवहि येतें ना! पण मुर्दाड ख्यालीखुशालीपेक्षां स्वाभिमानी

गरिबी पत्करून त्यांनीं नोकरी आणि धारवाड यांना रामराम ठोकला आणि आपल्या स्वभावप्रिय लेखनकलेचें चोज करण्याचें पुरतें ठरविलें. आरंभीं-आरंभीं 'किरात' वगैरे टोपण नांवांखालीं त्यांची लेखणी चमकूं लागली. हळुहळु 'केसरी'तून 'धनुर्धारी' या नांवानें लेख लिहिण्यास त्यांनीं सुरवात केली. त्यांच्या त्या वेळच्या लेखांच्या लोकप्रियतेवरून पुढें त्यांनीं 'धनुर्धारी' हेंच नांव कायम केलें आणि आजहि मराठी वाचक त्यांना त्याच नांवानें विशेष ओळखतात.

'धनुर्धारी' यांच्या वाग्बाणांचा मारा झाला नाहीं असा विषय आढळणें कठिण. तत्कालीन परिस्थितींतून बाहेर पडणाऱ्या अनेक बऱ्या-वाईट मुद्यांचा ते खरपूस समाचार घेतच, पण इतर विषयांवरहि लहान-मोठीं पुस्तकें लिहिण्याचें त्यांनीं बाकी ठेवलें नाहीं. त्यांच्या लिखाणाचे त्यांनींच पाडलेले भाग पाहिल्यास – 'महाराष्ट्र-कुटुंब संग्राहक पुस्तकावलि' 'स्वधर्म ज्ञान-प्रसारक पुस्तकमाला' 'कुलवधूंचा ज्ञानकोश' 'लहान मुलांचें पुस्तकालय' 'व्यापारी वाचनपाठ' 'शेत-शेतकी आणि शेतकरी' 'व्यापार-उदीम' हीं मासिकें 'पिराजी पाटील', 'वांईकर भटजी' वगैरे कादंबऱ्या तसेंच 'आमचीं गळिताचीं धान्यें' 'तंट्या भिल्लाचें चरित्र' वगैरे बहुविध लिखाण त्यांच्या सर्वगामी आणि सूक्ष्म बुद्धीचें उत्तम प्रत्यंतर आहे. शिवाय वाङ्मयक्षेत्रांत धडाडीनें शरसंधान करीत असतांनाच दुसऱ्याहि कित्येक उपयुक्त व्यवहारांकडे त्यांचें अवधान होतेंच. त्यांच्या लिखाणाचा विशेष हाच कीं त्यांत अनुभवाची प्रचीति आणि परोपकाराची तळमळ चहूंकडे पांगलेली दिसते. अडत, भुसार, किराणा, स्टेशनरी वगैरे दुकानें त्यांनीं चालविलीं; नाना तऱ्हेच्या इतर लहान-मोठ्या उलाढाली आणि शिकवण्याहि त्यांनीं केल्या. बहुविध विषयांवर मार्मिक आणि समर्पक रीतीनें लिहितांना त्यांच्या या अनुभवप्राप्त ज्ञानाचा पुढें त्यांना चांगला उपयोगहि झाला!

लहानसहान आणि सटरफटर व्यापारापुरती त्यांच्या उद्योगप्रियतेची आणि दुसऱ्यांना वायफळ पुस्तकी उपदेश करण्यापुरती त्यांच्या स्वदेशप्रीतीची धांव नव्हती. त्यांनीं आंखलेल्या व त्याचप्रमाणें मूर्तस्वरूपांत आणलेल्या कारखाने वगैरे घडामोडींतहि ती मनमोकळेपणानें खेळतांना दिसते. पोट भरण्याच्या निमित्तानें जेथेंजेथें जाण्याचा दुर्दैवानें त्यांच्यावर प्रसंग आला तेथेंतेथें आपल्या नांवाचें जिवंत स्मारक नकळत त्यांनीं करून ठेवलेंच. शेतकऱ्यांचीं गाऱ्हाणीं दूर कर-

ण्याच्या इराद्यानें अक्कलकोट संस्थानांत 'धि अक्कलकोट ॲग्रिकल्चरल सिंडिकेट' काढून, राजाश्रयाच्या अभावीं मोडकळीस आलेला विणकऱ्यांचा धंदा उचलून धरण्याकरितां सोलापुर शहरीं 'वीव्हर्स गिल्ड' स्थापून, तसेंच धांवत्या धोटयाचे माग बनवून व कापडाच्या जिन्स आणि बार्शी सारख्या ठिकाणीं गिरण्या सुरू करून त्या-त्या प्रांतांत त्यांनीं आपलें नांव मागें ठेविलें आहे. बाकी एवढया अफाट उलाढाली करूनहि ते स्वतः अकिंचनच राहिले ! इतकेंच नव्हे तर बऱ्याच ठिकाणीं चांगल्या कल्पना सुचविण्याचा व विशेषतः त्या व्यवहारांत उतरविण्याचा मोबदला म्हणून दैवानें त्यांच्या माथीं अपयश आणि कर्ज यांचें खापर फोडण्यास कमी केलें नाहीं ! पण ह्या बुडित उद्योगांतहि ज्यांचा त्यांच्याशीं नात्याच्या किंवा धंद्याच्या दृष्टीनें संबंध आला ते सारे मात्र गब्बर होऊन बसले ! उघडच आहे परिसाच्या स्पर्शानें लोखंडाचें सोनें हें व्हावयाचेंच !

कैकयीच्या दुस्वासानें रामाला वनवासाचें व लक्ष्मीच्या अवकृपेनें 'धनुर्धारी' यांना दारिद्र्याचें दुःख भोगावें लागलें; तरी वनवासांत रामाला आणि निर्धनतेंत 'धनुर्धारी' यांना नांव मिळवितां आलें ही गोष्ट विसरून चालणार नाहीं. पण या दरिद्री दगदगीचा त्यांच्या भावनावश मनावर संसारांतून लक्ष काढून घेण्याइतका शेवटीं परिणाम झालाच. पुढेंपुढें ते अगदीं विरक्त बनले आणि इतके दिवस स्वतःच्या आणि इतरांच्या ऐहिक सुखाकरितां केलेला सारा उत्साह त्यांनीं परमार्थचिंतनाकडे खर्चीं घालण्यास सुरवात केली. त्यांच्या भाविक मनाची मजल गुरुमंत्र घेण्यावरच थांबली नाहीं. लातूरनजीक तडवळ मुक्कामीं 'रामदासी पंथा'ची दीक्षा घेण्याचा त्यांचा मनोदय होता. त्या हेतूनें त्या पंथाचीं देवळें व मठ यांचें पुनरुज्जीवन करावें म्हणून वर्तमानपत्रांतून त्यांनीं 'राघवानन्द' या नांवानें कांहीं लेख देखील लिहिले. लेखनसृष्टींत अशा रीतीनें 'धनुर्धारी' यांचा 'राघवानंद' हा शेवटचा अवतार झाला !

मुबलक ग्रंथसंभार, मुलेंबाळें, 'कलम-कदमी' नांवाची एक रोजनिशी आणि खंदा लेखक म्हणून कमावलेली कीर्ति एवढी संपत्ति मागें ठेवून पुढें लवकरच 'धनुर्धारी' हे कालवश झाले. आडपडदा न ठेवतां निर्भीडपणें लिहिलेल्या 'धनुर्धारी' यांच्या 'कलम-कदमी' रोजनिशीवरून पुष्कळ गुपित गोष्टी उजेडांत आल्या असत्या आणि 'एव्हेलिन' व विशेषतः 'पेपिस' याच्या डायरींतील मजकुरावरून कांहीं

तत्कालीन कुलंगड्यांचा बोध होतो त्याप्रमाणें ‘ धनुर्धारी ’ यांच्या ‘ कलमकदमी ’-वरूनहि त्या वेळच्या कांहीं मानगर्डीवर पुष्कळसा प्रकाश पडण्याचा संभव होता, पण मराठी वाचकांच्या कमनशिबानें मोकळ्या मनानें लिहिलेली ही ‘ धनुर्धारी ’ यांची रोजनिशी आज अस्तित्वांत नाहीं. त्यांच्या जवळच्या एका नातलगानेंच तिचा जाणूनबुजून सत्यनाश केला आहे. कुऱ्हाडीचा दांडा असा गोतास काळ झालेला बघून गणगोतापासून दोन हात दूरच असलेलें बरें असेंच कोणासहि वाटणार !

पण प्रंपचांतले अपेशी ‘ धनुर्धारी ’ लेखनप्रपंचांत तरी कीर्तीचे व यशाचे वारसदार झालेले पाहिले म्हणजे आज तेवढाच आनंद वाटतो. त्यांतल्या त्यांत त्यांचें ‘ वांईकर भटजी ’ हें पुस्तक मधूनमधून ‘ प्रवेश ’ परीक्षेला लावलेलें दिसलें कीं आपल्या हयातींत नाहीं तर निदान पश्चात् तरी आपल्या लेखनकलेचें सुशिक्षितांत चीज झालेलें पाहून ‘ धनुर्धारी ’ यांच्या मृतात्म्यास तेवढेंच समाधान वाटणार !

**इतिहास आणि ऐतिहासिक चरित्रें:** – युद्धस्य कथा रम्या म्हणतात, पण महाराष्ट्रांत असा एक काळ होता कीं तेव्हां फक्त परकीयांच्या पराक्रमाचे पोवाडे गाण्यांतच आम्हांला मनःस्वी समाधान वाटत असे. शौर्य-बल-तेज पाहावयाचें असेल तर तें सारें आमच्या देशाबाहेर अशी परिस्थिति ! इतकेंच नव्हे तर साऱ्या अवगुणांचे पुतळे म्हणजे स्वकीय अशीच चांगल्या शिकल्या-संवरलेल्यांची तेव्हां भावना ! अशा वेळीं स्वाभिमानाचें वारें पिऊन स्वकीयांचे गुण गाणाऱ्या गवयाची किंमत मोठी असते. पावसाळ्यांत तुडुंब वाहणाऱ्या नदीनाल्यापेक्षां वाळवंटांतील ओहोळाचीच पांथस्थांना अधिक आवश्यकता ! याच दृष्टीनें ‘ धनुर्धारीं ’चें ऐतिहासिक लिखाण महत्त्वाचें आहे. लेकी, पीअरसन् सारख्यांच्या इतिहासाप्रमाणें तात्त्विक कसोटीस ते कदाचित् उतरणार नाहीं; फ्रीमननें केलेल्या टयूटन लोकांच्या पक्षपाताप्रमाणें स्वजनांच्या स्तुतीचा त्याला थोडाफार दर्पहि येईल; फ्रूड, सील यांना चढलेल्या साम्राज्यसत्तेच्या उन्मादाप्रमाणें परकीयांचा बुद्धिपुरस्सर त्यांत एखादे वेळीं पाणउताराहि केलेला आढळेल ! पण तेवढयावरून ‘ धनुर्धारीं ’ ना आपली जबाबदारी माहित नव्हती असें म्हणण्याचें मात्र कोणासहि धाडस करतां येणार नाहीं. “ अगोदर असावी तितकी माहिती व भक्ति आमच्या मंडळींत आणि त्यांतून तरुणांत दिसत नाहीं. यास्तव एकतर्फी व स्तुतिमय असे लेख लिहिण्याचें

मीं पत्करलें आहे. कारण अलिकडे आपल्या इतिहासासंबंधानें पराकाष्ठेचें औदासीन्य दिसतें. आणि अशा स्थितींत तत्त्वज्ञानमय निःपक्षपाती इतिहासलेखकाचें चीज होणें कठिण. ... ... इतिहासाची यथेच्छ गोडी लागण्यास अशासारखे लेख बरेच उपयोगी पडतील अशी आशा आहे.”– हा धनुर्धारींचा खुलासा त्यांच्या इतिहासलेखनाचा हेतु स्पष्टच सांगतो. तरी त्यांचें ऐतिहासिक लिखाण म्हणजे निराधार भाकडकथा होत अशी मात्र कोणीं समजूत करून घेऊं नये. कितीहि लहान असलें तरी त्यांच्या प्रत्येक पुस्तकाचा पाया मोठा भक्कम असतो. ‘ काव्येतिहाससंग्रह ’, गाडगीळकृत ‘ विंचूरकर घराण्याचा इतिहास ’, सहस्रबुद्धेकृत ‘ सरदार पटवर्धन नामक भाऊचें चरित्र ’, तसेंच ‘ धामधुमीचा देखावा ’, ‘ काशीराजाची बखर ’, ‘ ग्रांट डफचा इतिहास ’, शाळिग्रामकृत ‘ बापू गोखल्यांचें चरित्र ’, ‘ पेशवाईची बखर ’, बुईल्कसचा ‘ म्हैसूरचा इतिहास ’, ‘ सरंजामे आणि माल्कम साहेबाचे लेख ’ – इत्यादिकांच्या आधारावर त्यानीं आपली ऐतिहासिक इमारत उभारलेली दिसणार !

उपलब्ध माहितीची संगतवार जुळणी करून ती मनोवेधक रीतीनें पुस्तकांत गोंवण्याचें ‘धनुर्धारीं’ना चांगलें कसब साधलें आहे.‘ आधुनिक शिक्षणाचे दुष्परिणाम ’ ‘ रखमाबाई-दादाजी प्रकरण ’ ‘ लष्करी शिक्षणाकडील आमचें दुर्लक्ष ’ ‘ क्रमिक पुस्तकांतील दळूबाई वेदान्तावरील टीका ’ या साऱ्या भानगडी त्यांच्या ऐतिहासिक पुस्तकांत पाहिल्या म्हणजे एका दृष्टीनें तें अठरा धान्यांचें एक कडबोळेंच दिसतें. निर्भेळ इतिहासाचें त्याला वावडें असावेंसें वाटतें. त्यांत भूगोल आहे, स्वामिनिष्ठा आहे, स्वदेशप्रीति आहे, आख्यायिका आहेत आणि तत्कालीन घडामोडीहि आहेत. पण शुद्ध गाळीव पाण्यापेक्षां भेसळ पाणी जसें गोड आणि चवदार लागतें तसें ‘ धनुर्धारी ’चें हें लिखाण मनोरंजक आणि वाचनीय वाटतें.

त्यांच्या इतिहासवाङ्मयाचें – किंबहुना सगळ्याच वाङ्मयाचें – वैशिष्ट्य म्हणजे त्यांची अमर्याद स्वदेशप्रीति होय ! ती अमर्याद होती म्हणूनच पुष्कळ वेळां डब्ल्यु. ई. हेन्ले आणि रुडिअर्ड किप्लिंग यांच्या साम्राज्यवैभवाच्या गोडव्याप्रमाणें तिचाहि वीट येतोच. आणि क्रियेइतकीच प्रतिक्रिया व प्रबल दीर्घ असूं शकते या सिद्धांन्ताचा प्रत्यय येतो. पण त्यांच्या वेळीं माजलेली स्वकीयांबद्दलची अनास्था व अनादर हीं पाहिलीं कीं त्यांच्या त्या प्रतिक्रियेचा आजच्या

काळीं तेवढासा विषाद मानण्याचें कारणहि उरत नाहीं! आणि त्यांच्या राष्ट्रीय दृष्टीची आठवण झाली कीं उलट तिच्याबद्दल मनापासून आनंदहि होतो.

'धनुर्धारी'चें असें एकहि पुस्तक आढळणें कठिण कीं ज्यांत प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीतीनें स्वजनोद्धाराची तळमळ त्यांना लागलेली दिसत नाहीं. विशेषतः या बाबतींतली त्यांची व्यापक आणि तीव्र राष्ट्रीय दृष्टि वाखाणण्यालायक आहे. प्रसंगोपात्त पेशवे अगर त्यांचे पक्षपाती यांच्यावर कोरडे ओढण्यास, खऱ्या मुत्सद्याची दूरदृष्टि नसल्यामुळें नाना फडणविसानें इंग्रजांस जवळ केल्याबद्दल योग्य शब्दांत त्याची हजेरी घेण्यास, आणि भाऊबंदकीला बळी पडून गृहकलहाग्नीनें स्वदेश-हिताचा होम करणाऱ्या बाईलबुद्धया नादानांचा खरपूस समाचार घेण्यास ते कमी करीत नाहींत. त्यांच्या राष्ट्रीय दृष्टींत स्वामिद्रोह आणि स्वार्थ यांचें कुसळ इतकें खुपतें कीं त्यासंबंधीं लिहितांना त्यांची लेखणी नुसती नागिणीसारखी फुसफुसत असते!

निर्भीडपणें लिहिण्याचें 'धनुर्धारी' यांना बाळकडूच मिळालें होतें. तथापि त्यांची तारतम्य बुद्धि जेथें तेथें जागृत आहे. परक्यांच्या पराक्रमानें दिपून गेलेल्या तेव्हांच्या सुशिक्षितांच्या डोळयांत अंजन घालण्याकरितां पाश्चात्य इतिहासांतील तुलनात्मक स्थळांची त्यांनीं केलेली निवड मोठी मार्मिक आहे. रामशास्त्री प्रभुणे आणि मॅथ्यू हेल्, आनंदीबाईनें केलेले त्रिंबकराव मामाचे हाल आणि पहिल्या चार्ल्सनें केलेला तिथल्या मुत्सद्यांचा छळ, फ्रेंचांकडून तिरुपतीचें (श्रीपतीचें) देवालय सर करून घेण्यांत मराठ्यांनीं दाखविलेली चतुराई, आणि क्लाइव्हनें अर्काटच्या वेढयांत उपयोगांत आणलेली युक्ति यांची समर्पक तुलना पाहिली कीं तेव्हांच्या परकीयलुब्ध सुशिक्षितांनींहि 'धनुर्धारीं'ना धन्यवाद दिले असणार! पण तेवढयावरून गार्डिनरसारखे 'धनुर्धारी' हे निःपक्षपाती आणि सत्पक्षी इतिहास-लेखक होते किंवा ग्रीनसारखे गतकालाचें हुबेहूब चित्र उभें करणारे कल्पक चितारी ते होते असें मात्र म्हणतां येणार नाहीं. त्यांच्या स्वभाववर्णनशैलीची तुलना करावयाची झाल्यास फ्रूडच्या तसल्या शैलीशीं तुलना करावयास हरकत नाहीं. बाकी सुंदर कल्पना, उपमा, उत्प्रेक्षा आणि विशेषतः अतिशयोक्ति इत्यादि शब्दालंकारांची रेलचेल करतांना त्यांना पाहिलें म्हणजे मेकॉलेची आठवण होते. फ्रीमनच्या बोजड, बेडौल भाषापद्धतीपेक्षां मेकॉलेच्या भारदस्त, डौलदार आणि हुकमी भाषापद्धतीशींच 'धनुर्धारीं'च्या भाषेची कोणीहि तुलना करणार! लॉर्ड ॲक्टन यानें मेकॉलेबद्दल काढलेले – "A master in the art of writing

pure, vigorous English. Macaulay has never been found wanting in Interest."– हे उद्गार 'धनुर्धारी' आणि त्यांच्या मराठी भाषेला सार्थपणें लागतात.

ओघाओघानें आलेलीं तात्त्विक वचनें त्यांच्या लिखाणाला फारच शोभा देतात. वीरस्नुषा राधाबाईबद्दल लिहितांना मृत्यूबद्दल त्यांनीं काढलेले उद्गार येथें उद्धृत करण्याचा मोह आवरत नाहीं. " दुःखाची परमावधि खरी काय ती या मरणामध्यें, जगांतील एकंदर हानीची कडेलोट म्हणजे मरण, – आणि तेंच मरण मनुष्यमात्राच्या गुणावगुणांची चाळण असें म्हणावें लागतें; शिवाय या दुनियेंत प्राणिमात्रांत आढळून येणारी पापबुद्धि किंवा दुर्गुणांकुर सफेजंग जळून जाणें शक्य असेल तर तें काम करणारा एकटा मृत्यु. " तसेंच, वैधव्य हें पुष्कळ वेळां इष्टापत्ति होऊन कर्तव्याचें तेज चहूंकडे फांकूं शकतें हें दाखविण्यासाठीं ' फूल चुरगळलें तरी तें बहारदार वास देतें ' या सुंदर कल्पनेनें अहिल्याबाईच्या कर्तृत्वाचा सारांश काढतांना त्यांना पाहिलें म्हणजे त्यांच्या सुप्त कवित्वाचीहि वाचकांना ओळख पटतेच. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ह्यू वॉकर यानें मेकॉलेबद्दल जें लिहिलें तेंच ' धनुर्धारी 'विषयीं बोलावयास हरकत नाहीं. " He was a master of narrative and of the short crisp sentence so easily understood. He had at his command an enormous mass of details and nothing was too trivial for him to use in order to make his picture more vivid. It is this that has made his history as interesting as a novel."

**व्यापार, उदीम, अर्थशास्त्र इत्यादिः**– या विभागांत येणारीं 'धनुर्धारी' यांचीं पुस्तकें आजच्या घडीलाहि उपयुक्त आणि वाचनीय ठरतील. आकडे, शास्त्राभ्यास, स्वानुभव आणि आजूबाजूच्या परिस्थितीकडे पाहण्याची सूक्ष्म दृष्टि यामुळें त्यांचें लिखाण स्वयंप्रत्ययी आणि विश्वसनीय झालें आहे. डॉक्टर वॅट याचा कोश, स्टेटस्मन्स् इयर बुक, 'सार्वजनिक सभे'चें त्रैमासिक आणि डिग्वी साहेबांचे लेख वगैरेंचा उपयोग आणि आधार त्यांच्या या शाखेंतल्या लेखांना पाहिला म्हणजे प्रत्येक बाबतींत माहिती परिपूर्ण मिळवून अधिकारी रीतीनें त्यावर लिहिण्याच्या 'धनुर्धारीं'च्या लेखनपद्धतीचें कोणासहि कौतुक करावेंसें वाटणार. पण विशेष डोळ्यांत भरण्याजोगी गोष्ट म्हणजे अर्थशास्त्रासारख्या रूक्ष विषयावरहि मनोवेधक आणि सुलभ तऱ्हेनें लिहिण्याची त्यांची खुबी ! त्यांच्या उत्कृष्ट भाषाशैलीचे मुबलक मासले त्यांच्या ' व्यापारी वाचनपाठां 'त सांपडावेत ही कांहीं लहानसहान गोष्ट नव्हे. ज्या खादीचा

आणि कापसाच्या व्यापाराचा आज चहूंकडे बोलबाला झाला आहे तो महाराष्ट्रीयांनीं आपल्या ताब्यांत घेण्याबद्दल पंचवीस-तीस वर्षांपूर्वीच 'धनुर्धारीं'नीं उरस्फोट करावा हें त्यांच्या दूरदृष्टीचें उत्तम गमक आहे. " शेतांतील राब, गिरण्यांतील मजुरी, बाजारांतील हमाली, आणि मग कापडाच्या खपाची गिऱ्हाइकी एवढींच कामें महाराष्ट्र या कापसाच्या व्यापारांत करीत आहे. "—हें त्यांचें विधान आजच्या घडीलाहि लागू होण्यासारखें नाहीं काय ? ' उपाशी महाराष्ट्राला उद्योग ' लावण्याकरितां त्यांनीं लिहिलेले ' व्यापारी वाचनपाठ ' जर महाराष्ट्रीयांनीं मनःपूर्वक अभ्यासिले तर ' पैसा कसा मिळेल ' ही भ्रांत खरोखरीच त्यांना राहूं नये इतके ते अधिकारी आणि अनुभवी वाणीनें भरले आहेत ! पण एवढें स्वयंप्रत्ययी लेख लिहून आणि स्वतः व्यापार करून ' धनुर्धारी ' दरिद्रीच राहिले असा आक्षेप त्यांच्यावर येणें साहजिकच आहे; पण दिव्याखालीं अंधार असला तरी त्याच्या उजेडाचा दुसऱ्यांना उपयोग होतोच कीं नाहीं ? बिनचूक माहितीनें त्यांच्या लेखनांत जेवढें महत्त्व आलें आहे तेवढेंच किंबहुना त्याहून अधिक महत्त्व व्यापारी उन्नतीच्या आड येणाऱ्या कारणाची त्यांनीं निर्भीड आणि स्पष्ट नामनिर्देश केल्यामुळें राहिलें आहे. " वास्तविक पाहतां या आमच्या नीचतर दैन्येचें मुख्य कारण अपरिहार्य अशी परदेशच्या व्यापारउदम्यांची आम्हांबरोबर लागलेली झटापट, आणि त्यांच्याशीं सामना देण्याला अवश्य असणाऱ्या साधनांची अननुकूलता हेंच होय. " " आमचे राज्यकर्ते आमच्या देशाच्या नैतिक उन्नतीविषयीं जितकी कळकळ दाखवितात तितकीच किंवा त्याच्या दशांश कळकळ ते आमच्या आधिभौतिक सुस्थितीविषयीं दाखवीत नाहींत यांतच आमच्या नष्टचर्येचें सारें बीज आहे. " आजदेखील देशभर हीच ओरड ऐकूं येत नाहीं का ? आणि वायफळ सुधारणेच्या गप्पा झोंकणाऱ्या बोलघेवड्या समाजसुधारकांना देशाची आर्थिक स्थिति सुधारण्याचे उपाय सुचविण्याकरितां आणि योजण्याकरितां 'धनुर्धारी' यांनीं घेतलेला चिमटा देखील याच हेतूनें घेतलेला नाहीं कां ?

ईश्वरावरील निष्ठा आणि प्रामाणिकपणा यांतच महात्मा गांधींच्या यशासारखें व्यापारनीतीचेंहि 'धनुर्धारीं'सारख्या सत्प्रवृत्त आणि धर्मशील माणसास सगळें सार सांपडावें हें आमच्या संस्कृतीच्या पगड्याचें एक द्योतक आहे. पण नुसत्या दैवाच्या नादीं न लागतां कर्मावरहि त्यांचा भर होता हें विसरून चालणार नाहीं. " ज्ञान आणि उद्योग हे सध्यांच्या काळीं असेंच नव्हे तर सर्वदा कल्पवृक्ष होत.

परवशतेला ज्ञान आणि दारिद्र्याला उद्योग अमृतसंजीवनी होय."–हे 'धनुर्धारीं'चे उद्गार निराश तरुणांना आणि बेकार सुशिक्षितांना कार्यरत करूं शकले तरी त्यांच्या लिहिण्याचा बराचसा फायदा झाला असें म्हणतां येईल !

**स्त्रिया व लहान मुलांकरितां लिहिलेलीं आणि धर्मनीतिपर पुस्तकें:**– या सदरांत मोडणारीं 'धनुर्धारी' यांचीं पुस्तकें चौकस मुलांची जिज्ञासा तृप्त करण्याच्या आणि कुलवधूंना घरच्या घरीं बहुश्रुत आणि सज्ञान करण्याच्या हेतूनें लिहिलीं आहेत. मिशनरी धर्तीवर पैसा दोन पैसे किंमतींत धर्मासारख्या गहन विषयावरहि सोप्या आणि साध्या भाषेंत लिहिलेलीं हीं चटकदार छोटीं पुस्तकें त्यांच्या धर्मज्ञानप्रसाराची तळमळ स्पष्ट करतात. लोकांनीं बरें-वाईट स्वतः-साठीं समजण्यास पात्र व्हावें आणि ज्ञानसाधनें तेवढयाकरितां सुलभ व स्वस्त व्हावीं म्हणून सुरू केलेला हा 'धनुर्धारीं'चा उपक्रम आजच्या काळांतहि अनु-करणीय आहे !

**कादंबऱ्या:**– व्यक्तित्वाची प्रचीति हें जर उत्तम वाङ्मयाचें एक प्रमुख अंग समजलें तर 'धनुर्धारीं'च्या कादंबऱ्या उत्तम वाङ्मयांत जमा व्हावयास हरकत नाहीं. अगोदर सांगण्यासारखें कांहीं तरी मनांत असावें लागतें आणि तें समर्पक व खात्री पटविणाऱ्या शब्दांत सांगण्याची देणगी असली कीं उत्कृष्ट वाङ्मय निर्माण होतें. या डब्ल्यु. एच्. हडसन् यांच्या सिद्धान्ताची कसोटी 'धनुर्धारीं'च्या कादंबऱ्यांस लावली कीं त्या चांगल्या कादंबऱ्यांत सहज मोडतील. कारण दीन रयतेवर चहूंकडून होत असलेला अन्याय, विशिष्ट समाजरचनेमुळें परकीय संस्कृतीला तोंड देतांना उडत असणारी आमची तारांबळ, साक्षर पुढारलेल्या वर्गाची शेतकऱ्यांविषयींची अज्ञानी बेपर्वाई,–हीं पाहून 'धनुर्धारीं'च्या जीवाची जी कालवाकालव झालीं तिचेंच शब्दस्वरूप या कादंबऱ्या होत. पोलिसांच्या भल्याबुऱ्या लांड्या-लबाड्या, सरकारी नोकरांच्या पैसे उकळण्याच्या तेव्हांच्या युक्त्या-प्रयुक्त्या, शहरांतून आढळणारी उठल्या बसल्या पैशाशीं गांठ, जुन्या बालबोध घराण्यांत नवीन इंग्रजी शिक्षणानें उडवलेला गोंधळ, दुष्काळ-सावकार-सरकार यांचा कळत-नकळत होणारा शेतकऱ्यावरील जुलूम – या सगळ्या गोष्टी त्यांच्या कादंबऱ्यांत मोठया खुबीनें दाखविल्या आहेत.

निव्वळ कलेच्या दृष्टीनें त्यांच्या कादंबऱ्यांची किंमत मात्र बरीच कमी ठरेल. तरी कादंबरीकाराला अवश्य असणारे बरेच गुण त्यांच्यांत आहेत हें कांहीं खोटें

नाहीं. त्यांचें निरीक्षण सूक्ष्म आहे; भाषा घरगुती आहे. मनुष्यस्वभावाच्या खांचाखोंचा ओळखण्याचें व त्या योग्य शब्दांत दाखविण्याचें त्यांचें कौशल्य अजब आहे. स्त्रियांच्या सांसारिक काळज्या, बाळकांची बेफिकीर उल्हासवृत्ति, प्रापंचिकांचा जिकिरीस आलेला पण लोभ न सुटलेला संसार हीं रंगविण्यांत त्यांनीं पट्टीचें कसब दाखविलें आहे.

'धनुर्धारीं'ची विशेष नांवाजलेली कादंबरी म्हणजे ' वांईकर भटजी ' ही होय. वास्तविक ' वांईकर भटजी ' हें ऑलिव्हर गोल्डस्मिथ याच्या ' धि व्हिकार ऑफ वेकफील्ड ' या कादंबरीचें रूपांतर असलें तरी त्याचें जॉर्ज इलियटच्या ' सीन्स फ्रॉम क्लेरिकल लाइफ 'शीं बऱ्याच बाबतींत साम्य आहे. मात्र 'धनुर्धारीं'ची भाषा सुबोध, सुटसुटीत आणि घरगुती आहे, तर इलियटची भाषा सुश्लिष्ट, कमावलेली आणि ठिकठिकाणीं सर्वसाधारण वाचकास समजण्यास दुर्घट अशीच आहे.

'वांईकर भटजी' म्हणजे पूर्वीच्या आमच्या भिक्षुकी गृहस्थितीचें सुंदर शब्दचित्र आहे. पण त्यांत भिक्षुकी आयुःक्रमाव्यतिरिक्त खेड्यांतील साधी राहणी आणि शहरांतील उधळी राहणी यांतील अंतरहि मोठ्या मार्मिक शब्दांत रेखाटलेलें आहे. 'धनुर्धारीं'चें सूक्ष्म अवलोकन जागोजाग या कादंबरींतून दृष्टीस पडतें. प्रवासास निघतेवेळची आपल्या मंडळीची गडबड, विशेषतः गाडग्या-मडक्यापासून फुंकणी-केरसुणीपर्यंत सर्व सामानाची राहून-राहून मोजदाद घ्यावयाची बायकांची खोड, शकुनापशकुन आणि मुहूर्ततिथींवरचा सर्वसाधारण माणसांचा विश्वास, आमची वेदान्ती मनोवृत्ति, दुःखाच्या वेळींच कळकळीनें होणारी ईश्वराची आठवण, आणि मग अनन्यभावानें त्याला सर्व तऱ्हांनीं शरण जाण्याची आमची धडपड, रिकामपणीं आल्यागेल्याची अगर शेजाऱ्यापाजाऱ्यांची गांवांतून चाललेली टवाळी आणि कुटाळकी, गृहस्थाश्रमी माणसांना पाहुण्यांचा होणारा त्रास, मोटारी आगगाड्या नव्हत्या तेव्हांचा बैलगाडीचा प्रवास, त्यांतील मौजा आणि धोका, इंग्रजी शिक्षणाच्या प्रादुर्भावानें स्नानसंध्येकडे होत असलेलें दुर्लक्ष, आर्थिक मिळकतीच्या जोरावर कर्त्या मुलाच्या आणि सुनेच्या हातांत संसारसूत्रें जाऊं लागल्यामुळें केल्यासवरल्या सासूसासऱ्यांस वाटणारा विषाद, हरघटकेला लहान मुलांचें कुतूहल आणि जिज्ञासाबुद्धि यांची खच्ची करणारी आमची नियंत्रण-कल्पना, पहिल्या बाळंतपणांत वडीलधाऱ्या माणसांना ठेवावी लागणारी दक्षता,

मुलीच्या बापाची परवशता आणि काळजी – वगैरे वगैरे बाबतींतली 'धनुर्धारीं'चीं वर्णनें अगदीं यथार्थ आणि चटकदार आहेत. प्रत्येक प्रश्नाकडे निरनिराळ्या बाजूनें पाहण्याची त्यांची दृष्टि इतर थोड्याच लेखकांच्या वांट्याला आलेली दिसून येते.

'धनुर्धारीं'च्या या कादंबरींत आजच्या पिढीला विशेष आकर्षून घेणारें जर कांहीं असेल तर तें धनुर्धारींचे निरनिराळ्या विषयांवरील प्रगल्भ आणि उदात्त विचार होत. पंचवीस-तीस वर्षांपूर्वी विवाहासारख्या विषयावर लिहितांना निवळ जुन्याच पद्धतीचे अकारण गोडवे गाणाऱ्यांवर निर्भीड आणि छातीठोकपणें त्यांनीं ओढलेले कोरडे पाहिले म्हणजे 'धनुर्धारीं'चें कौतुकच करावेंसें वाटणार. विवाहाप्रमाणें धर्मान्तर आणि धर्मश्रद्धा या विषयांवरील त्यांचे विचारहि उद्बोधक आहेत. शिवाय मैत्री, सुख, सौंदर्य, लक्ष्मी, आत्महत्या, झोंप, सत्ता, कर्ज इत्यादि विषयांवर प्रसंगोपात केलेल्या विवेचनावरून बहुविध विषयांवर खोल विचार करण्याची 'धनुर्धारीं'ची पद्धत स्पष्ट होते.

लहान मुलांबद्दल लिहितांना 'धनुर्धारीं'च्या लेखणींतून वात्सल्यरसच जणूं वाहत असल्यासारखा वाटतो. संतापाच्या भरांत पोरीला चापटी मारून थोड्या वेळानें शुद्धीवर आल्यानंतर वांईकर भटजीला झालेला पश्चात्ताप वाचतांना कोणाहि सहृदय वाचकाचें अंतःकरण सद्गदितच होईल! प्रवासास निघतांना मुलांना होणारा आनंद आणि आपपरभावाचा त्यांच्या ठिकाणीं असणारा अभाव या पुस्तकांतून 'धनुर्धारीं'नीं फार सुंदर तऱ्हेनें दाखविला आहे.

'वांईकर भटजी'चा विशेष म्हणजे त्यांत दिसून येणारी 'धनुर्धारींची' स्वभाव-वर्णनाची विलक्षण हातोटी. स्वतः वांईकर भटजी, त्यांचें कुटुंब अगर स्नेही मोरोबा यांपैकीं प्रत्येकाचा स्वभाव अगदीं साहजिक, भिन्न आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. विशेषतः स्त्रीस्वभावांतील खाचाखोंचांचें 'धर्नुधारीं'नीं केलेलें मार्मिक निरीक्षण पाहावयाचें असल्यास भटजींच्या कुटुंबाकडे नजर वळविण्यास हरकत नाहीं. भटजी देखील आपल्या असल्या कृत्याकडे काणाडोळा करण्याइतके पक्के आहेत. भटजींचे मुलगे बाळू व विशेषतः गोपाळा याचे स्वभाव आणि शहरवास व आधुनिक शिक्षण यांचा त्यांच्यावर झालेला परिणाम अगदीं स्वाभाविक आणि सहज असे भासतात. अर्ध्या हळकुंडानें पिंवळी झालेली गोपाळासारखी साक्षर मंडळी आजहि थोडीथोडकी सांपडणार नाहीं.

भिक्षुकी आयुष्यक्रम दाखविण्यासाठीं ' वांईकर भटजी ' ही 'धनुर्धारी' यांनीं कादंबरी लिहिली आहे, तर शेतकऱ्यांचीं गाऱ्हाणीं आणि त्यांच्या अनुकंपनीय हाल-अपेष्टा हीं वेशीवर टांगण्यासाठीं त्यांनीं ' पिराजी पाटला 'स जन्म दिला. आणि अधिकाराच्या मदानें धुंद होऊन निरपराध्यांना नाडल्यानंतर याच जन्मीं पोलिसांना आपल्या कृतकर्माची फेड झालेली दाखविण्यासाठीं ' पश्चात्ताप्यांचा पांजरपोळ ' त्यांनीं तयार केला आहे. ही शेवटची कादंबरी वास्तविक एक कथा नसून निरनिराळ्या कथांचें तें एकीकरण आहे; आणि कलेच्या दृष्टीनें इतर कादंबऱ्याहून, त्यांतल्या त्यांत ' वांईकर भटजी'हून फारच हीन आहे !

आपल्या कादंबऱ्यांतून ' धनुर्धारी ' हे फ्लॉबर्तसारखें दूरस्थ निरीक्षकाचें काम करीत नाहींत, तर टॉलस्टॉयसारखे कादंबरींतील पात्रांच्या सुखदुःखांशीं ते समरस झालेले दिसतात. त्यांच्या कादंबऱ्यांचें वैशिष्ट्य म्हणजे कंगाल दुबळ्या बहुजनसमाजाशीं एकजीव होणें हें आहे. तेव्हांच्या इतर मराठी कादंबऱ्याप्रमाणें 'धनुर्धारीं'च्या कादंबऱ्यांत राजेरजवाडे, सरदार-मानकरी, अगर पांढरपेशा सुशिक्षितांचा उदोउदो केलेला किंवा त्यांच्या जीवनक्रमाला आदर्श रूप दिलेलें दिसत नाहीं. जोडा कोठें व कसा लागतो हें त्यांच्या कादंबऱ्यांत स्पष्ट दिसतें आणि म्हणूनच रशियन कादंबरीकारांप्रमाणें ते गरिबाचे खरेखुरे कैवारी दिसतात.

**इतर लिखाणः** — किरकोळ स्वरूपाचीं अगर प्रसंगानुसार लिहिलेलीं 'धनुर्धारीं'चीं इतर लहान-मोठीं पुस्तकें कांहीं थोडीं नाहींत. त्या सर्वांतून त्यांची कळकळ आणि व्यक्तित्व यांची खात्री पटल्यावांचून राहत नाहीं. मग तें ' इंदूर प्रकरणाची दुसरी व खरी बाजू 'सारखें कै. शिवाजीराव महाराजांची बाजू जनतेपुढें धडाक्यानें मांडणारें पुस्तक असो किंवा तंट्या भिल्लासारख्या धाडशी शूर पुरुषाचें काळाच्या बदलत्या चक्रामुळें अमोल गुण मातीमोल झालेले दाखविणारें अल्प चरित्र असो, कोणतेंहि पुस्तक घेतलें तरी त्यांत कांहीं ना कांहीं घेण्यासारखें आज देखील मिळणार. वाचकाचें मन ओढून घेण्याची 'धनुर्धारी'च्या प्रत्येक पुस्तकांत शक्ति आहे. निरर्थक भारूड लिहिण्याचा प्रमाद त्यांच्या हातून विशेषसा झालेला नाहीं. कारण पुस्तक लिहितांना जनतेला आवश्यक किंवा उपयुक्त माहिती देण्याची त्यांची भावना असे. लेखणी हें देखील जनसेवेचें एक साधन आहे ही त्यांची प्रामाणिक समजूत होती. " समशेरीनें लेखणीस साम्राज्य ओपिलें हें मात्र विसरूं नका. आणि त्याप्रमाणें हातून होईल तेवढी धर्मसेवा, देशसेवा

आणि भाषासेवा करा, हें माझें अति विनयपूर्वक मागणें आहे." ह्याच दृष्टीनें त्यांनीं स्वतः भाषासेवा, देशसेवा आणि धर्मसेवा केली. आणि तींत यशहि मिळविलें.

'धनुर्धारीं'ची भाषा अगदीं जोरदार पण सफाईनें लिहिलेली आहे. त्यांची भाषापद्धति तडफदार पण सहजगम्य अशी आहे. त्यांच्या लिखाणाचें वैशिष्ट्य त्यांच्या भाषापद्धतीवरून ठरण्यासारखें आहे. त्यांची भाषा सोपी, घरगुती आणि चटकदार आहे. किंबहुना आपल्या या भाषापद्धतीमुळेंच त्या वेळीं ते वाचकवर्गांत लोकप्रिय झाले म्हणण्यास, हरकत नाहीं. त्यांच्या लिखाणांत अवतरणें, सुभाषितें, म्हणी, उपमा, दृष्टांत अर्थान्तरन्यास इत्यादिकांची रेलचेल असूनहि ओढून चंद्रबळ आणल्याचा कोठेंच भास होत नाहीं. त्यांचे अलंकार अगदीं सहजासहजीं सुचलेले दिसतात. दररोज मणिमंगळसूत्र, गोटपाटल्या, वज्रटीक घालणाऱ्या कुलवधूसारखी 'धनुर्धारीं'ची भाषाशैली साधी पण नीटनेटकी आहे. तिच्यांत नटवेपणा नाहीं किंवा शेजारणीचे दागिने आणून भाडोत्री श्रीमंतीचा दिमाख दाखविण्याची तिला हौसहि नाहीं. कधीं माहेरच्या संस्कृत अवतरणांच्या लेण्यांनीं, तर कधीं इंग्रजी कल्पनांच्या वस्त्रप्रावरणानें आपलें निसर्गप्राप्त सौंदर्य खुलविण्यास तिला कमीपणा वाटत नाहीं, आणि तिच्या अपेक्षेप्रमाणें तसें खुलल्यावाचून राहतहि नाहीं. पण त्या सौंदर्यांत अभिलाषेपेक्षां प्रसन्नता उत्पन्न करण्याचीच विशेष शक्ति आहे. तिचें सौंदर्य आकर्षक आहे पण मादक नाहीं, मोहक आहे पण बाधक नाहीं; आणि म्हणूनच मुलांबाळांपासून म्हाताऱ्याकोताऱ्यांपर्यंत कोणालाहि तिचा लळा लागावा इतकी ती गोड आहे.

खं. सा. दौंडकर

**'धनुर्धारी' यांचें वाङ्मयः—**

( १ ) जवानमर्द ब्राह्मणभाई. भाग १–२, १८९१, १८९२.
( २ ) मराठ्यांच्या मर्दुमकी, भाग १–२, १८९१, १८९२.
( ३ ) वीरस्नुषा राधाबाई, १८९१, १८९४.
( ४ ) तंट्या भिल्ल, १८९१, १९३१.
( ५ ) हरिपंत फडके, १८९२.
( ६ ) शूर अबला, १८९२.
( ७ ) पैसा कसा मिळेल ? १८९२.

( ८ ) आपणांवरील जबाबदारी, १८९२.
( ९ ) आजोबानें नातवास सांगितलेल्या गोष्टी, १८९२.
( १० ) जवानमर्द मराठे गडी, भाग १–२, १८९३.
( ११ ) आपल्या देशाचा लहानसा इतिहास, १८९३.
( १२ ) नाना फडणीस, १८९३.
( १३ ) मराठ्यांचा पत्रबद्ध इतिहास, १८९३.
( १४ ) आतां पुढें काय करावें ? १८९३.
( १५ ) मराठे सरदार, भाग १–२, १८९४, १८९५.
( १६ ) अहिल्याबाई होळकरीण, १८९५.
( १७ ) पानपतचा मोहरा, १८९३, १९०७, १९२५.
( १८ ) इंदूर प्रकरणाची खरी व दुसरी बाजू १८९७.
( १९ ) प्रौढ प्रतापनिधि माधवराव, १८९७.
( २० ) उमाबाई दाभाडे, १८९७.
( २१ ) वांईकर भटजी, १८९८, १९२५.
( २२ ) बाळकृष्ण आत्माराम गुप्ते, १८९८.
( २३ ) पश्चात्ताप्यांचा पांजरपोळ, १९०३.
( २४ ) पिराजी पाटील, १९०३.
( २५ ) उपाशी महाराष्ट्राला उद्योग, १९०३.
( २६ ) व्यापारी वाचनपाठ, भाग १ ला, १९०४.
( २७ ) गुरुभक्ति १९०४. ( २८ ) ब्रह्म १९०४. ( २९ ) भक्ति १९०४.
( ३० ) स्वधर्मांत मरण बरें पण परधर्माचें नांव नको. १९०४.
( ३१ ) अभ्यास.
( ३२ ) आमचीं गळिताचीं धान्यें.
( ३३ ) व्यापारी भूगोल.
( ३४ ) नीतिधर्मपाठ.
( ३५ ) अलिजाबहादुर शिंदे.
( ३६ ) आर्यधर्माचा इतिहास.
( ३७ ) मरेन पण ख्रिस्ती होणार नाहीं.

( ३८ ) हिंदु लोकांचा कैवारी. ( ३९ ) स्वभाव. ( ४० ) अवश्य विचार करण्यासारखी महत्त्वाची गोष्ट.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः—**

( १ ) वांईकर भटजी ( परीक्षण ), नेटिव्ह ओपिनिअन, २ एप्रिल १८९९.

( २ ) वांईकर भटजी (परीक्षण), ना. रा. केळकर, विविधज्ञानविस्तार, एप्रिल १९२६.

**नवलकर गणपत रघुनाथ** (रेव्हरंड) [ १८३७ – १९१२ ] कवि, धर्मोपदेशक व व्याकरणकार. यांचा जन्म मुंबईंत झाला. वयाच्या चौदाव्या वर्षी हिंदुधर्माचा त्याग करून हे 'फ्री चर्च मिशन'मध्यें शिरले व नंतर ख्रिश्चन झाले. यांनीं कांहीं वर्षें शिक्षकाचें व कांहीं वर्षें धर्मोपदेशकाचें काम केलें. यांनीं व्याकरणविषयक व भाषाविषयक पुढीलप्रमाणें तीन पुस्तकें लिहिलीं आहेतः — ( १ ) नवीन मराठी व्याकरण ( १८९६ ); ( २ ) मराठी वाक्यांचें पृथक्करण व संकलन ( १९०२ ); व ( ३ ) बालव्याकरण ( १९०२ ). हे जसे व्याकरणकार तसेच कविहि होते. याची मराठी कविता शुद्ध व सोपी असून भारदस्त आहे. यांनीं '**श्री खृष्टविजय**' या नांवाचें एक मोठें काव्य लिहिलें आहे. एवढें मोठें काव्य मराठी ख्रिस्ती वाङ्मयांत आजवर कोणींहि लिहिलें नाहीं.

**नवलकर ग. र. यांचें वाङ्मयः—**

( १ ) नवीन मराठी व्याकरण, १८९१. ( २ ) मराठी नवीन बालव्याकरण १९०२. ( ३ ) मराठी वाक्यांचें पृथक्करण व संकलन, १९०२. ( ४ ) नवीन गीतसंग्रह, १९०४. ( ५ ) खृष्टविजय, १९०६. ( ६ ) कोमस नाटक, १९०६. ( ७ ) हिंदुस्थानचा संक्षिप्त इतिहास. ( ८ ) ख्रिस्तचरित्र. ( ९ ) रत्नागिरी व तेथील लोक. ( १० ) बालोद्यानगीतें. ( ११ ) जुनी जुनी वार्ता. ( १२ ) शमसोनमल्ल नाटक. ( १३ ) सदुकुळी. ( १४ ) तुकाराम. ( १५ ) पाखंडवाद्यांची सुलभ समजूत.

**नवाथे विष्णु गोपाळ** [ १८६७–१९३१ ] ज्योतिर्विद्. यांचा जन्म कुलाबा जिल्ह्यातील थळ या गांवीं झाला. प्राथमिक शिक्षण आटोपल्यावर त्यांनीं शाळाखात्यांत नोकरी धरिली. नोकरीवर असतांनाच यांनीं 'कुंडलीविज्ञान' हें आपलें ज्योतिषविषयक मासिक महाड येथें सुरू केलें (१९००). पुढें नोकरीचा व्याप संभाळून ज्योतिष विषयाकडे आपल्याला पाहिजे तसें लक्ष द्यावयास मिळत

नाहीं असें पाहतांच त्यांनीं नोकरीचा राजिनामा दिला व आपल्या व्यवसायास आजीव वाहून घेतलें. ' कुंडलीविज्ञान ' व्यवस्थित चालावें म्हणून त्यांनीं स्वतःचा छापखानाहि घातला. हें नियतकालिक कांहीं वर्षें पाक्षिक स्वरूपांत निघून अखेर १९१३ सालीं बंद पडलें. ' कुंडलीविज्ञान ' बंद पडल्यावर त्यांनीं आपल्या बंधूंच्या साहाय्यानें ' योगमाला ' काढिली व ' जातकसंग्रह 'हि सुरू केला ( १९२१ ). लोकाश्रयाच्या अभावीं व इतरहि कांहीं कारणांमुळें हीं नियतकालिकें अल्पजीवी ठरलीं. १९२५ सालीं यांनीं लोणावळें येथें आपल्या कांहीं ज्योतिषप्रिय मित्रांच्या साहाय्यानें ' श्री महालक्ष्मी ज्योतिर्विद्याश्रम ' स्थापन केला व ' कुंडलीविज्ञान ' पुन्हां सुरू केलें, पण त्यांचा हा प्रयत्न फार काळ टिकला नाहीं. पुढें पुणें येथें त्यांचें देहावसान झालें ( १९३१ ). नवाथे हे सायन पक्षाचे एक प्रमुख पुरस्कर्ते होते. पाश्चात्य व पौर्वात्य ज्योतिषाचा तौलनिक अभ्यास करून त्यांनीं ज्योतिषाचा दर्जा वाढविला व ज्योतिषशास्त्रांत आपलें नांव अमर करून ठेविलें. 'जातकशिरोमणि '( १९१६ ) ' सुलभजातक ' वगैरे त्यांचे ज्योतिषविषयक ग्रंथ त्या-त्या विषयांत आधारभूत समजले जातात.

**नवाथे वि. गो. यांचें वाङ्मयः—**

( १ ) नूतन वार्षिक फलादेश, १९०५; ( २ ) साडेसाती, १९०८; ( ३ ) मुद्राज्योतिष, १९१०; (४) मंगळाचें खूळ, १९१३; (५) उडुदायप्रदीप, १९१४; ( ६ ) जातकशिरोमणि – खंड १, १९१६; ( ७ ) ज्योतिर्बोध; ( ८ ) वर्णबोध; ( ९ ) सुलभजातक, भाग १–५; ( १० ) जातकालंकार; ( ११ ) राजकीय वातावरण; ( १२ ) नाक्षत्रफल; ( १३ ) गुप्तज्योतिष – स्वप्नमीमांसा.

**नागपुरकर वैजनाथशास्त्री** [ जन्ममृत्युकाल अनुपलब्ध. ] व्याकरणकार. नागपुरकर भोंसल्यांच्या आश्रितजनांपैकीं हे एक होते. हे मोठे संस्कृतज्ञ असून हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल मार्क्विस ऑफ वेल्स्ली ह्यांनीं ' फोर्ट विल्यम कॉलेज 'मध्यें इ. स. १८०४ चे सुमारास त्यांस मराठी अध्यापकाची जागा दिली होती. या काळांत नागपुरकर भोंसल्यांचें बंगालमध्यें बरेंच प्रस्थ होतें. नागपुरकरांच्या राजकारणाच्या निमित्तानें कांहीं महाराष्ट्रीय ब्राह्मण मंडळी नागपुरकरांचे वकील म्हणून बंगालमध्यें घुसले होते. अशा वकीलांपैकीं वेणीरामपंत यांच्या आश्रयानें वैजनाथशास्त्री बंगालमध्यें गेले व स्थायिक झाले. वैजनाथशास्त्र्यांच्या हाताखालीं पुष्कळ युरोपिअन गृहस्थ मराठी भाषेंत पारंगत

होऊन प्रसिद्धीस आले. वैजनाथशास्त्री हे डॉ. केरी यांचे सहाध्यापक असून त्यांनीं मराठी भाषेचीं देवनागरी अक्षरें तयार करण्याच्या कामीं डॉ. केरी यांस मदत केली; अर्थात् वैजनाथशास्त्री हे मराठी मुद्रणकलेच्या संशोधकांपैकीं एक होत. डॉ. केरी यांचें मराठी भाषेवर विशेष प्रेम असल्यामुळें त्यांनीं वैजनाथ-शास्त्र्यांच्या सहकारितेनें १८०५ मध्यें मराठी भाषेचें व्याकरण व कोश असे दोन ग्रंथ तयार केले. हे दोन्ही ग्रंथ श्रीरामपुर ( बंगाल ) येथील ‘ बॅप्टिस्ट मिशन प्रेस ’मध्ये छापले गेले. वैजनाथशास्त्री यांनीं १८१४ मध्यें स्वतः स्वतंत्रपणें ‘ सिंहासनबत्तिशी ’ हा मराठी ग्रंथ छापून प्रसिद्ध केला. तसेंच १८१६ मध्यें ‘ राजा प्रतापादित्य यांचें चरित्र ’ आणि नागपुरचे ‘ रघूजी भोंसले यांची वंशावळ ’ हे दोन ग्रंथहि प्रसिद्ध केले. ह्याच वर्षी ‘ मराठी भाषेंतील अस्सल पत्रसंग्रह ’ म्हणून एक ग्रंथ वैजनाथशास्त्र्यांच्या मदतीनें डॉ. केरी यांनीं प्रसिद्ध केला. १८०३ मध्यें ‘ न्यू टेस्टामेंट ’ या ग्रंथाचें मराठी भाषांतर डॉ. केरी यांनीं वैजनाथशास्त्र्यांच्याच मदतीनें केल्याचा उल्लेख आढळतो.

( ‘ नवयुगां ’तील रा. ब. पारसनीस यांनीं लिहिलेल्या चरित्रावरून )

**नाडकर्णी पुरुषोत्तम गोविंद** [ १८४४–१९०० ] प्रकाशक. यांचा जन्म सावंतवाडी संस्थानांतील कसाल या गांवीं झाला. मुंबईतील प्रसिद्ध गणपत कृष्णाजीच्या छापखान्याचे हे कांहीं वर्षें व्यवस्थापक होते. १८७० सालीं ‘ विविधज्ञानविस्तारा ’शीं यांचा संबंध आला, व पुढें १८७४ सालीं त्याची मालकी पूर्णपणें त्यांच्याकडे आली. सतत तीस वर्षें अत्यंत प्रतिकूल परिस्थितींतहि त्यांनीं त्यास श्रेष्ठ दर्जाचें वाङ्मयिक स्वरूप आणून दिलें. मुंबईंत ‘ज्ञानसंग्राहक’ व ‘ज्ञान-प्रसारक’ अशीं नियतकालिकें १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत पुष्कळच निघालीं, परंतु तीं चिरजीवी होऊं शकलीं नाहींत. ‘ विविधज्ञानविस्तारा ’नें विद्वानांचा संग्रह करून मोठ्या कौशल्यानें त्यांच्या बुद्धिमत्तेचा व व्यासंगाचा उपयोग करून घेतला व आपलें नांव सार्थ केलें. याचें सर्व श्रेय नाडकर्णी यांजकडेच आहे. नाडकर्णी यांनीं अनेक नामांकित ग्रंथकारांच्या ग्रंथांचीं मराठींत भाषांतरें करून घेऊन मराठी वाङ्मयांत चांगलीच भर घातली आहे.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः—**

( १ ) मृत्युलेख – मनोरंजन पु. ६, अं. ४ –

**नाडकर्णी रामचंद्र वामन** [ १९०१-१९३५ ] व्यासंगी, चिकित्सक व विनोदी लेखक. यांचा जन्म १९०१ च्या सुमारास झाला. उच्च शिक्षण संपादण्याला अनुकूल अशी घरची परिस्थिति नसल्यामुळें मॅट्रिक झाल्यावर यांना नौकरीकडेच धांव घ्यावी लागली. वयाच्या १८ व्या वर्षीच यांनीं सरकारी सेक्रेटरीएटमधील 'पासपोर्ट' खात्यांत नौकरी धरली. वाचनाचा त्यांना मोठा हव्यास. नौकरी करून मिळणारा इतर रिकामा वेळ हे ग्रंथावलोकनांत व इतर वाचनांत घालवीत. गाजावाजा न करतां केलेल्या सुमारें अर्ध्या तपाच्या पक्वप्राय व्यासंगानंतर त्यांनीं प्रत्यक्ष लेखनकार्याला प्रारंभ केला.

नाडकर्णी यांचें सर्व लेखन 'विविधज्ञानविस्तार' 'विविधवृत्त' व 'विहार' या नियतकालिकांतूनच झालें. त्यांच्या लेखनांत परीक्षणें आहेत, संशोधनपर लेख आहेत, लघुनिबंध आहेत, नि लघुकथाहि आहेत. प्रत्येक प्रकारांत त्या-त्या परीचीं वैशिष्ट्यें आहेत, आणि भाषाप्रभुत्व तर सर्वत्रच प्रत्ययास येतें. त्यांच्या लघुकथा बहुतेक रूपांतरित असून त्यांतील कथानकें मोपांसां, चेकॉव्ह, हार्डी यांच्या कथांतून उचललेलीं आहेत. त्यांचें व्यापक निरीक्षण, वैचित्र्याभिरुचि व नर्मप्रियता यांचा मनोहर संगम त्यांच्या लघुनिबंधांत झालेला दिसून येतो. हे निबंध वाचीत असतांना कित्येक प्रसगीं हा चेस्टरटन किंवा गार्डिनरच तर मराठी भाषा आत्मसात् करून घेऊन लिहूं लागलेला नाहीं ना असा भास झाल्यावांचून राहत नाहीं. ते दोघेहि त्यांचे आवडते लेखकच होते. हे लघुनिबंध त्यांनीं सर्व निरनिराळीं टोपण नांवें घेऊन व निरनिराळ्या चालू मथळ्यांखालीं मालारूपानें लिहिलेले आहेत. यांची एकूण संख्या अतिशय मोठी असून ते सर्व 'विविधवृत्तां'तूनच प्रसिद्ध झाले आहेत. त्यांतील कांहीं मुख्य लघुनिबंधावली त्यांच्याच टोपण लेखकनामासह –

| | | | |
|---|---|---|---|
| 'डमरूचे आवाज' | ... | ले. | 'शंभू महादेव' ( १९२५ ) |
| 'दुनियेंतील देखावे' | ... | ,, | 'मुशाफर' ( १९२६ ) |
| 'रिकामटेकडे विचार' | ... | ,, | 'रिकामा' ( १९२६ ते २९ ) |
| 'मूर्ति तितक्या प्रकृति' | ... | ,, | 'गबरबट्टू' ( १९२९ ) |
| 'ताकापुरतें रामायण' | ... | ,, | 'रामशास्त्री' ( १९३३ ) |

– याप्रमाणें होत. 'नर्मदेंतले गोटे' ह्या शीर्षकाचीहि त्यांची एक लघुनिबंधावलि १९२९ ते ३३ यांच्या मधल्या काळांत अशीच टोपण नांवाखालीं येऊन गेली.

या लघुनिबंधांपैकीं कांहीं केवळ तात्कालिक महत्त्वाचे असे असले तरी सार्वकालिक आकर्षणाविषय होऊन राहण्याजोगे असे पुष्कळच आहेत. घेतांना मुख्य एक विषय किंवा एक सूत्र घेऊन त्याच्या अनुषंगा-अनुषंगानें नाना गोष्टी लीलेनें हाताळलेल्या यांत आढळतात आणि विनोद, उपहास, कोटी इत्यादींची त्या-त्या स्थळीं योजना करण्याची लेखकाची हातोटी प्रसंगीं विरोधी भूमिकेंतहि स्वतंत्र रंजन केल्यावाचून राहत नाहीं.

परंतु नाडकर्ण्यांच्या सखोल व मार्मिक अभ्यासाची खरी साक्ष त्यांच्या ग्रंथ-परीक्षणात्मक व इतिहाससंशोधनपर लेखांतून पटते. ‘ सजीव सृष्टीची उत्क्रांति ’ ह्या पुस्तकाचें परीक्षण हा त्यांच्या परीक्षणात्मक व एकूण वाङ्मयसंसारांतीलहि पहिला लेख. त्याच्या मागून आजगांवकरकृत ‘ नामदेव ’, दाजी नागेश आपटेकृत ‘ हिंदी-सुमेरी संस्कृति ’, डॉ. केतकरकृत ‘ ब्राह्मणकन्या ’ ( कादंबरी ), दिघेकृत ‘ मराठ्यांच्या उत्तरेकडील मोहिमा ’ व आळतेकरकृत ‘ समर्थचरित्र ’ या ग्रंथांवर त्यांनीं मुख्यतः समीक्षणलेख लिहिले आहेत. यांपैकीं ‘ नामदेव ’ व ‘ समर्थचरित्र ’ या ग्रंथांवरील लेखांतून त्यांचें बहुवाचन प्रतीत होत असलें तरीसुद्धां ते लिहितांना त्यांची मनोभूमिका असावी तितकी शुद्ध नव्हती असें निरुपायानें म्हणावें लागतें. आजगांवकरांच्या ‘नामदेवा’चें परीक्षण करतांना तर जाणून-बुजून त्यांना डिंवचण्याचाच रोख नाडकर्ण्यांचा स्पष्ट दिसतो. इतर सर्व परीक्षणलेखांवर त्यांनीं आपलें खरें नांव घातलें असतांना त्याच लेखावर तेवढें ‘ नामदेव-शिष्य ’ असें टोपण नांव त्यांनीं द्यावें ही गोष्टहि त्याचा खोडकरपणाचा हेतुच बहुतांशीं दाखविते. ‘विविधवृत्तां’त चार लेखांकांतून त्यांनीं हें परीक्षण केलेलें आहे, व त्यावर मूळ अपेक्षेप्रमाणें वर्तमानपत्री झटापटीहि झाल्यावांचून राहिल्या नाहींत. आळतेकरांच्या ‘समर्थचरित्रा’चें समालोचन त्यांनीं ‘विविध-ज्ञानविस्तारा’च्या दोन अंकांतून केलें आहे. हें समालोचन करतेवेळीं न. र. फाटकांच्या जाणून-बुजून विकृत व अभिनिविष्ट अशा विचारप्रतिपादनाच्या जंजाळांत नाडकर्णी अजाणतांहि असतील कदाचित् पण अतोनात गुरफटून गेलेले दिसतात. आळतेकरांच्या ग्रंथाचें मोल कांहींहि असो, तें ‘धर्माच्या कांट्या ’वर नाडकर्ण्यांनीं ठरवावयास हवें होतें. फाटकांच्या मापानें – आणि तेंहि त्या मापाचा खरे-खोटेपणा स्वतंत्रपणें पारखून घेण्यापूर्वीच – तें तोलूं जाण्यांत नाडकर्ण्यांच्या बुद्धीचें स्वातंत्र्य निःसंशय लांछित झालें आहे. ह्या समालोचनांतील –

" वास्तविक समर्थांच्या ग्रंथांवर रा. फाटकांचा जितका व्यासंग आहे तितका खुद्द आळतेकरांचाहि नसेल. समर्थांच्या ग्रंथावरील अलिकडील वादाला रा. फाटकांनींच सुरवात केली. खुद्द रा. देवहि त्यामुळें टेकीस येऊन फाटकांचा व्यासंग सूक्ष्म आहे अशी कबुली त्यांना द्यावी लागली. " ( वि. ज्ञा. वि. १९३४ फेब्रुवारी-मार्च, पृ. ३६ ) हे नाडकर्ण्यांचे उद्गारच आमच्या येथील म्हणण्याची सत्यता पटविण्यास पुरेसे आहेत. यापुढेंच ह्या लेखांत समर्थांचा राजकारणाशीं म्हणजे राजकीय व्यवहाराशीं कांहींहि संबंध नव्हता हें दाखविण्याकरितां नाडकर्ण्यांनीं 'दासबोधां'तर्गत 'राजकारण' म्हणजे 'व्यवहारचातुर्य' हा फाटकांचा अर्थ सिद्ध करण्याचा खटाटोप केला आहे. समर्थांना 'व्यवहार' नि 'चातुर्य' हे शब्द माहितच नव्हते किंवा ओव्यांमधून प्रास वा यमक जुळण्याकरिताच जसें कांहीं त्यांना अपरिहार्यच झालें होतें म्हणून का समर्थांनीं 'राजकारण' शब्द वापरला आहे हा विचार नाडकर्णी फाटकांच्या आहारीं गेले नसते तर त्यांच्या मनांत निःसंशय आलाच असता. पण आयुष्यांत एक-एक काळ नि एक-एक वय अशीं असतात कीं तेव्हां बुद्धिमतांनाहि भ्रंशाची बाधा होत असते. ह्याच अवस्थेंत नाडकर्णी ह्या प्रकरणीं होते असे खेदानें म्हणावें लागतें. १९२९ मध्यें 'रामदासांचा संप्रदाय' ही लेखमालाहि नाडकर्ण्यांच्या ह्याच अंकित मनोभूमिकेंतून अवतरलेली आहे. पण एवढे हे दोन-तीन अपवाद सोडल्यास इतर सर्व लेखांतून नाडकर्ण्यांच्या सखोल व्यासंगी बुद्धीचा कुशल विहार पाहावयास मिळतो. सरदेसाईसंपादित 'पेशवे दप्तरा'च्या २८्या खंडांत पानिपतविषयक आणि २९व्या खंडांत थोरल्या माधवरावांच्या उत्तरेंतील राजकारणासंबंधीं असे पत्रव्यवहार आलेले आहेत. त्या पत्रव्यवहारांच्या अनुरोधानें तत्कालीन परिस्थितीचें सूक्ष्म परिशीलनपूर्वक विवेचन अनुक्रमें 'पानिपत-पत्रव्यवहार' व 'थोरले माधवराव पेशवे आणि उत्तरेंतील राजकारण' या दोन निबंधांतून जें त्यांनीं केलें आहे तें जाडया इतिहासज्ञांसहि स्तिमित करणारें असेंच आहे. स्वतः सरदेसायांनाहि लेखकाचा परिचय करून घेण्याची इच्छा या लेखांच्या योगें झाली इतके ते परिणामकारक ठरले. या लेखांनीं 'विस्तारा'चीं अनुक्रमें ६५ व ४५ पृष्ठें व्यापिलीं आहेत. 'शाहूची जंजिऱ्यावरील मोहीम' व 'शिवकालीन राज्यघटनेचीं मूलतत्त्वें' हे त्यांचे दुसरे दोन ऐतिहासिक निबंधहि तसेच विस्तृत, विद्वत्तापूर्ण व विचारपरिप्लुत आहेत. 'सगर राजाची कथा' ह्या एका स्वतंत्र निबंधांत त्यांनीं हिंदी व सुमेरी

कथांतील साम्य विशद केलें आहे. नाडकर्ण्यांच्या अत्यंत महत्त्वाच्या अशा या निबंधांचें व टीकालेखांचें टांचण त्यांच्या स्थल-कालांसह पुढीलप्रमाणें आहे:—

१. 'सजीव सृष्टीची उत्क्रांति' (परीक्षण) – वि. ज्ञा. वि. एप्रिल १९२५.

२. रा. आजगावकरांचा 'नामदेव' (परीक्षण – लेखांक १ ते ४) – विविध-वृत्त, जून- जुलै १९२७.

३. 'हिंदी-सुमेरी संस्कृति' (परीक्षण – लेखांक १ ते ४) – वि. वृत्त, जाने-फेब्रुवारी १९२९.

४. 'रामदासांचा संप्रदाय' – वि. वृत्त, डिसेंबर १९२९.

५. 'ब्राह्मणकन्या' (परीक्षण) – वि. वृत्त, ११-१-१९३१.

६. 'सगर राजाची कथा' – वि. ज्ञा. वि., मार्च-एप्रिल-मे १९३१.

७. 'शाहूची जंजिऱ्यावरील मोहीम' – वि. ज्ञा. वि. जुलै १९३१.

८. 'पानिपत-पत्रव्यवहार' (लेखांक १ ते ३) – वि. ज्ञा. वि., ऑक्टोबर व डिसेंबर १९३१ आणि फेब्रुवारी-मार्च १९३२.

९. 'शिवकालीन राज्यघटनेचीं मूलतत्त्वें' – वि. ज्ञा. वि. जून १९३२.

१०. 'मराठ्याच्या उत्तरेकडील मोहिमा' (परीक्षण) – वि. ज्ञा. वि. मे १९३३.

११. 'थोरले माधवराव पेशवे आणि उत्तरेंतील राजकारण' (लेखाक १ ते २) – वि. ज्ञा. वि. डिसेंबर १९३३ व एप्रिल-मे १९३४.

१२. 'समर्थचरित्र' (परीक्षण – लेखांक १ ते २) – वि. ज्ञा. वि., जानेवारी व फेब्रुवारी-मार्च १९३४.

या निबंधांव्यतिरिक्त 'विविधवृत्ता'च्या १९३१ च्या 'विशेष अंकां'त त्यांनीं 'कॉंग्रेसचा इतिहास' हि विस्तारानें निवेदन केला आहे. 'विविधज्ञानविस्तारा'चीं गेलीं ६० वर्षे' ह्या नांवाचें एक अभ्यासार्ह असें पुस्तक लिहिण्याचा त्यांचा विचार होता. त्याकरितां त्यांनीं 'विस्तारा'चीं ६०हि संग्रहपुस्तकें वाचून महत्त्वाचीं टांचणें करून ठेविलीं. पण तें कार्य मूर्त स्वरूपास आलें नाहीं. अवघ्या नऊ-दहा वर्षांत नाडकर्ण्यांनीं वाङ्‌मयक्षेत्रांत जें बहुमोल कार्य करून ठेविलें आहे त्यावरून त्यांच्याविषयीं फार मोठी आकांक्षा उत्पन्न झाली होती. पण त्या आकांक्षेला काळानें मध्येंच चिरडून टाकलें. आठ-दहा दिवसांच्या विषमज्वरानें १९३५ जून ता. १२ ह्या दिवशीं अकालींच म्हणजे वयाच्या अवघ्या ३४ व्या वर्षी काळानें त्यांचा बळी घेतला. नाडकर्ण्यांचे लेख पुस्तकरूपानें महाराष्ट्राच्या हातीं येणें अत्यंत

अवश्य आहे. निदान त्यांचे परीक्षणात्मक व ऐतिहासिक संशोधनात्मक लेख आणि महाराष्ट्राच्या गेल्या साठ-सत्तर वर्षांतील बौद्धिक व वैचारिक हालचालींत महत्त्वाचें स्थान असलेल्या ' विविधज्ञानविस्तारा 'संबंधींचीं त्यांचीं टांचणें एवढीं जरी पुस्तकरूपानें प्रकाशित झालीं तरी तेवढ्यानेंहि अभ्यासकांची तर मोठी सोय होईलच, पण एकूण वाङ्मयांतहि त्यायोगें निःसंशय फार मोलाची भर पडेल.

रा. म. आठवले

**नाडकर्णी विठ्ठल जिवाजी** [१८८१ – १९३६] बहुविध लेखक व कुशल संपादक. यांचा मूळ गांव सावंतवाडी व तेथेंच यांचा जन्म झाला. लहानपणीं मराठी शाळेंत असल्यापासूनच यांच्या कुशाग्र बुद्धीचा व तीव्र स्मरणशक्तीचा प्रत्यय येऊं लागला. यांचे ज्येष्ठ बंधु अनंतराव हे लेखक, कवि व बहुभाषाकोविद असून ते ' सच्चिदानंद ' नांवाचें मासिक चालवीत. त्यामुळें ' विविधज्ञानविस्तार ' ' निबंधमाला ' ' केसरी ' ' सुधारक ' ' पुणेंवैभव ' इत्यादि नामांकित नियतकालिकांचे संच त्यांच्या घरीं असत व इतर पुस्तकांचाहि मोठा संग्रह होता. ह्या आयत्या सोयीचा विठ्ठल जिवाजींना चांगलाच उपयोग झाल्यावांचून राहिला नाहीं. लहानपणींच वाचनाची आवड उत्पन्न होऊन त्यांना जो त्याचा नाद लागला तो अगदीं शेवटपर्यंत अढळ होता. घरची परिस्थिति तितकीशी अनुकूल नसल्यामुळें त्यांना मॅट्रिकच्या पुढें शिक्षण घेतां आलें नाहीं. परंतु मॅट्रिक होण्यापूर्वीच संस्कृतांतील बहुतेक अभिजात वाङ्मय त्यांनीं वाचून काढलें होतें. वाचनाप्रमाणेंच त्यांचें पाठांतरहि दांडगें असे. त्यांची ती विशिष्ट प्रवृत्ति पाहून गोविंदराव डुकले यांनीं त्यांची प्रथमच ' करमणूक 'मध्यें हरिभाऊ आपटे यांच्या हाताखालीं योजना केली. नियतकालिकांच्या क्षेत्रांतील विठ्ठल जिवाजींचा हा प्रवेश त्यांच्या आयुष्याचेंच कार्यक्षेत्र निश्चित करिता झाला.

' करमणुकीं 'त विठ्ठल जिवाजींना लेखनाचा चांगलाच सराव झाला. हरिभाऊ आपटे कित्येकदां ' चालू कादंबरी 'व्यतिरिक्त कांहींहि लिहून पाठवीत नसत, त्यामुळें अंकच्या अंक विठ्ठल जिवाजींनाच भरून काढावा लागे. ' बाळाजी सखाराम आणि मंडळीं 'च्या काळांत त्यांनीं ' करमणुकीं 'त अनेक लेख व गोष्टी लिहिल्या आहेत. पण तें सर्व लेखन निनांवीच असल्यामुळें पुष्कळदां तें हरिभाऊंच्याच नांवावर खपे. पण विठ्ठल जिवाजींनीं त्यासंबंधींची परिस्फुटता कधीं केली

नाहीं. ' करमणुकी 'त कांहीं वर्षे काम केल्यानंतर तेथून ते सुटले व पुढें १९२६ पर्यंत निरनिराळ्या वेळीं ' ज्ञानप्रकाश ' ' मनोरंजन ' ' नवयुग ' ' इंदुप्रकाश ' व ' श्रीशिवाजी ' या नियतकालिकांशीं त्यांचा संपादकीय नात्याचा संबंध जडला. १९२६त ते मोरमकराच्या ' लक्ष्मी-नारायण ' मुद्रणालयांत आले ते मात्र शेवटच्या दुखण्यानें आजारी पडेपर्यंत तेथेंच होते. ' लक्ष्मी-नारायण ' मुद्रणालयाच्या ' विविधज्ञानविस्तार ' ' विविधवृत्त ' व ' विहार ' या तिन्ही नियतकालिकांच्या संपादनांत त्याचें प्रच्छन्नपणेंच, पण महत्त्वाचें अंग असे.

वर्तमानपत्राच्या व्यवसायाला बहुविध व ताज्या वाचनाची अत्यंत आवश्यकता असते आणि विठ्ठल जिवाजींचा तो तर आवडीचाच व्यासंग होता. विलायतचीं अनेक नियतकालिकें आठवड्याच्या आठवड्यास लक्ष्यपूर्वक चाळणें व नव्या इंग्रजी पुस्तकांचा ताजेपणीं परिचय करून घेणें या गोष्टी त्यांनीं कधीं चुकूं दिल्या नाहींत.

तीस-पसतीस वर्षांत विठ्ठल जिवाजींनीं पुष्कळच लेखन केलें. परंतु वैयक्तिक प्रसिद्धीच्या दृष्टीनें त्याचा त्यांना म्हणण्यासारखा मुळींच उपयोग झाला नाहीं म्हटलें तरी चालेल. नियतकालिकी वाळूंतच तें बहुतेक जिरून गेलें. त्यांची भाषा अत्यंत शुद्ध व प्रसन्न असे. ' करमणूक ' ' मनोरंजन ' व ' नवयुग ' यांचें संपादन करीत असतांना रूपांतरित कादंबऱ्या, गोष्टी व ज्ञानवर्धक लेख यांनीं अनेक लिहिले आहेत. पण त्यांतलें त्यांच्या नांवावर प्रसिद्ध झालेलें असें लेखन फारच थोडें आहे. ' श्रीकृष्ण ' ह्या टोपण नांवानें ते केव्हां-केव्हां लिहीत. पण त्यांचें बहुतेक लिखाण निनांवीच आहे. रमेशचंद्र दत्त यांची 'स्लेव्ह गर्ल ऑफ् आग्रा ' ही ऐतिहासिक कादंबरी त्यांनीं ' नरेंद्रनाथ ' ह्या नांवानें ' मनोरंजना 'च्या द्वारें मराठींत आणली आहे. ' पिंजऱ्यांतील पक्षी ' ही ' मनोरंजनां 'त चालू झालेली त्यांची कादंबरी पांच-सात प्रकरणें प्रसिद्ध होऊन अपुरीच राहिली. जगांतील प्रसिद्ध प्रेमकथा निवडून काढून त्या ' प्रेमविजय ' ह्या संग्रहात्मक पुस्तकाच्या द्वारें त्यांनीं मराठींत निवेदिल्या आहेत. तसेंच 'पाश्चात्य संगीत नाटकांचीं संविधानकें 'हि त्यांनीं मराठी वाचकांना परिचित करून दिलीं आहेत. अलिकडे केशव भिकाजी ढवळे यांनीं त्यांच्याकडून बरींच लहान-लहान बोधपर व चरित्रात्मक पुस्तकें लिहवून घेऊन प्रसिद्ध केलीं आहेत. वर्तमानपत्री स्वरूपाचे त्यांचे उल्लेखनीय लेख म्हणजे – ' सुरत येथील राष्ट्रीय सभेचा वृत्तान्त ' ' नाशिक येथील मिलर हिंदूकरणाचा वृत्तान्त ' व ' मुंबईच्या हिंदु-

मुसलमानांच्या दंग्यांचा इतिहास ' हे होत. यांपैकीं पहिला ' ज्ञानप्रकाशां 'त व शेवटचे दोन ' विविध-वृत्तां 'तून अनुक्रमें १९२८ व १९३२ या वर्षी प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांची भाषा अत्यंत शुद्ध व प्रसन्न असे. व्याकरण-शुद्धतेवर त्यांचा अतिशय कटाक्ष असे. त्यांचा स्वभाव धिमा, थंड नि अबोल होता; त्यांचा वेश अगदीं साधा व नित्य एकच प्रकारचा असे. आपलें काम बरें कीं आपण बरे हीच त्यांची सदोदितची वृत्ति. त्यांच्या हातून वाङ्मयांतलें कार्य बहुविध नि विपुल झालेलें असलें तरी तें दृष्टीपुढेंच येणारें नसल्यामुळें ठळकपणें डोळ्यांत भरूं शकत नाहीं यांत नवल काय ? त्यांची सांपत्तिक स्थिति विशेषशी समाधानकारक होती असें नाहीं, तथापि लेखनव्यवसायावर तीस-पसतीस वर्षे ते आपला चरितार्थ चालवूं शकले हीहि गोष्ट कांहीं महाराष्ट्राच्या दृष्टीनें खचित अल्प महत्त्वाची नव्हे. शेवटचे आठ मास ते अंथरूणावरच होते. १९३६ एप्रिल ता.७ ह्या दिवशीं त्यांचा अंत झाला. सकस वाङ्मयनिर्मितीची उत्कृष्ट पात्रता व शक्ति असूनसुद्धां नियकालिकांच्या व्यवसायांत सांपडल्यामुळें ज्यांच्या ग्रांथिक स्वरूपाच्या सेवेच्या लाभाला महाराष्ट्राला मुकावें लागलें अशामध्यें विठ्ठल जिवाजी नाडकर्णी यांचा नामोल्लेख प्रामुख्यानें करावा लागतो.

रा. म. आठवले

**नातू काशीनाथ गोविंद** [ १८४०-१८९७ ] नाटककार. रत्नागिरी जिल्ह्यांतील आचरें हें यांचें मूळ गांव. पुण्यातील ' मिशन स्कुलां 'तून ते इ. स. १८६४ मध्यें मॅट्रिक झाले व त्याच वर्षी त्यांनीं ' नातू स्कूल ' नांवाची एक इंग्रजी शाळा पुण्यास स्थापन केली. ' विजयसिंह ' हें यांचे नाटक याच सुमारास (१८७२) प्रसिद्ध झालें. ' जुलियस सीझर ' या नाटकावरून हें रचिलें असून " भाषांतर या दृष्टीनें तें सुरेख वठलें आहे. "

" सन १८७४ सालीं हे वकिली पास झाले व फौजदारी कोर्टांतील एक उत्तम वकील असल्याचा लौकिक लवकरच झाला. त्यांचें भाषण साधें पण चटकदार असे. पुण्यामध्यें भाषणांचे जे अनेक प्रसंग येत त्या वेळीं नातूंचें भाषण ऐकावयास न मिळालें तर लोकांचा विरसच होई. त्यांचे भाषणांत विनोद ओत-प्रोत भरलेला असे. नाटककार ही पात्रता अंगीं येण्याला प्रत्यक्ष नाटककृति उत्तम पाहिजे किंवा नाटक रचणाराची योग्यता, वजन, रसिकता हीं सामाजिक दृष्ट्या

आदरणीय पाहिजेत. नातू यांनीं फारशीं नाटकें लिहिलीं नाहींत, तरी वरील कारणास्तव त्यांची योग्यता नाटककारांच्या मालिकेंत आम्ही अधिक समजतों. पुण्यामध्यें वजनदारीनें, विद्वत्तेनें किंवा धंद्यानें प्रसिद्ध असलेल्या माणसांचा जेव्हां एक मोसम होता तेव्हांच्या वेळचे नातू हे एक होत. ते प्रसिद्ध वकील होते, तसेंच ते नाटककारहि होते. त्यांनीं एकाच नाटकाचें भाषांतर प्रसिद्ध केलें आहे, तरी त्याच्या योगानें त्यांचें नांव महाराष्ट्र वाङ्मयांत कायम झालें आहे. ”

‘ विजयसिंह ’ या त्यांच्या नाटकाशिवाय बायरनच्या ‘ सार्डिनेपल्स ’ या शोकरसप्रधान नाटकाचें त्यांनीं भाषांतर करून ठेविलें आहे. तसेंच ‘ सिसरोचें वार्धक्य ’ ( Cicero's old Age ) याचेंहि भाषांतर केलें आहे. पण हीं दोनहि लिखितें अप्रसिद्ध आहेत. (आधार – ‘ महाराष्ट्रीय नाटककार ’, शं. बा. मुजुमदार )

**नातू विनायक महादेव** [ हे लेखक सुमारें ऐशीं वर्षांपूर्वी बडोदें येथें होऊन गेले. ] कवि, नाटककार. ब्रह्मानंद ऊर्फ निजानंद हे यांचे गुरु. त्यांच्याच आज्ञेवरून यांनीं आपला ‘ गणेशप्रताप ’ हा ग्रंथ रचिला ( शके १७७० ). या ग्रंथाचीं दोन खंडें व चौपन्न अध्याय असून ओवीसंख्या ५६६५ आहे. हा ग्रंथ छापूनहि प्रसिद्ध झाला आहे. वरील ग्रंथाशिवाय ‘ नल ’ (१८६१) व ‘ मिळिणी ’ (१८६५) हीं दोन नाटकेंहि यांच्या नांवावर आढळतात. हा “ कवि मोठा विद्वान पंडित होता असें त्याच्या कवितेवरून दिसत नाहीं. त्याला संस्कृत व मराठी या दोन भाषा अवगत होत्या, पण या दोनहि भाषांवर त्याचें प्रभुत्व होतें असें म्हणण्यास आधार नाहीं. त्याची कवित्वशक्तिहि सामान्य प्रतीचीच दिसते. ”
( आधार – महाराष्ट्र कविचरित्र, भाग २ रा. आजगांवकर )

**नाथमाधव** [ १८८२–१९२८ ] कादंबरीकार. यांचें संपूर्ण नांव द्वारकानाथ माधवराव पितळे असें असून ‘ नाथमाधव ’ या टोपण नांवानें ते मराठी वाचकांच्या परिचयाचे आहेत. मुंबईच्या प्रसिद्ध पितळे घराण्यांत ता. ३ एप्रिल १८८२ सालीं त्यांचा जन्म झाला. यांचें शिक्षण मुंबईच्या ‘आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या हायस्कूल’मध्यें व ‘ न्यू इंग्लिश स्कूल ’मध्यें मॅट्रिकपर्यंत झालें. १८९९ सालीं परीक्षेंत अपयश आल्यामुळें आणखी एक वर्ष शाळेंत काढून त्यांनीं शाळेला रामराम ठोकला. शाळा सोडल्यानंतर त्यांनीं लष्करी खात्यांत नोकरी धरली. तेथें

वीरवृत्ति दाखविण्यास त्यांनीं कमी केलें नाहीं. अल्पावधींत घोड्यावर बसणें, अचूक नेम मारणें व शिकार करणें वगैरे कामांत आपल्या बरोबरीच्या सोबत्यांना त्यांनीं मागें टाकलें. लष्करी खात्यांतील नोकरीमुळें त्यांना सबंध हिंदुस्थानभर प्रवास करावा लागे. यामुळें हिंदुस्थानांतील प्रमुख शहरें, प्रेक्षणीय स्थळें त्यांना पाहावयाला मिळालीं; रानावनांतून रात्रीं-बेरात्रीं प्रवास करावा लागत असे, त्यामुळें त्यांनीं विविध तऱ्हेचे अनुभव घ्यावयास मिळाले; अर्थात् त्यांच्या धाडशी वृत्तीस उत्तेजन मिळून त्यांची वृत्ति अधिकाधिक निधडी होत गेली. संकटांची भीति त्यांना मुळींच वाटेनाशी झाली. पुढील काळात कादंबऱ्या लिहितांना या वेळीं केलेलें निरीक्षण व अनुभव यांचा त्यांना फार उपयोग झाला. त्यांच्या कादंबऱ्यांतील वैचित्र्याचें कारण शोधावयाला गेलें तर तें या ठिकाणींच सांपडतें. नोकरीवर असतांना नाथमाधवांच्या जिवावरून बरींच संकटें गेलीं.

१९०५ सालच्या मे महिन्यांत खडकीला त्यांचा मुक्काम असतां त्यांच्या बरोबरच्या एका इंग्रज मित्रानें सिंहगडच्या रानांत शिकारीस जाण्याचा बूट काढला व त्याप्रमाणें बरोबर कांहीं वाटाडे घेऊन शिकारी मंडळी सिंहगडावर येऊन दाखल झाली. त्यांचा मुक्काम लो. टिळकांच्या बंगल्यांत होता. १९ मे या दिवशीं सिंहगडालगतच्या रानांत एक वाघ आला आहे अशी बातमी कोणी आणून देतांच शिकारी मंडळीच्या उत्साहांत वाघाच्या आगमनानें भर पडून ताबडतोब सज्ज होऊन ते शिकारीला निघाले. रान काढण्यासाठीं त्यांनीं कांहीं मावळे लोक बरोबर घेतले होते, त्यांस पुढें पाठविण्यांत आलें. ती सायंकाळची वेळ असून सूर्य नुकताच मावळण्याच्या बेतांत होता; आणि रानाच्या आजूबाजूला धुकें पडण्यास आरंभ झाला होता; त्यामुळें झाडींतील पाऊलवाट अस्पष्ट दिसत होती. त्यांचा इंग्रज मित्र रानाच्या दुसऱ्या बाजूस राहून टेहळणी करीत होता आणि मावळे लोक रान काढीत होते. नाथमाधव वाघाची कोठें चाहूल लागते कीं काय हें चौकसपणें न्याहळीत होते. इतक्यांत त्यांची नजर समोरील झाडींत लपून बसलेल्या वाघाच्या हालचालीकडे गेली. लगेच आपली बंदूक सरसावून अगदीं हलक्या पावलांनीं मारा करावयास योग्य अशा ठिकाणीं ते जाऊं लागले. त्याचें सारें लक्ष वाघाकडे होतें. आपली भव्य बंदूक त्यांनीं पाठीमागें डाव्या बाजूला धरून ठेविली होती. आतां वाघ बाहेर पडतांच पहिला नेम आपण मारणार या विचारांत आपण कोठें जात आहों हें त्यांच्या लक्षांत

आलें नाहीं. धुक्यानें दिशा व्यापून गेल्यामुळें (तानाजीच्या समाधीच्या उत्तर बाजूस) पायाखालीं असलेला १०० फुटांचा तुटलेला कडा त्यांना दिसला नाहीं. एक पाऊल पुढें टाकतांच ते घसरले आणि तुटलेल्या कड्याच्या अणकुचीदार दगडाच्या भिंतीला घसरत खालीं एका सपाट खडकावर येऊन ते आदळले. ज्या तानाजीचे पराक्रम नाथमाधवांनीं आपल्या कादंबऱ्यांतून पुढें वर्णिले त्याच्या समाधी-शेजारीं त्यांना अपघात व्हावा हा एक विलक्षण योगायोगच म्हणावयाचा! थोड्या वेळानें सर्व मंडळी तेथें जमा झाली. त्यांच्या दृष्टीला काय पडलें? पाठीचे कपडे फाटून जाऊन पाठीची त्वचा दगडांना घसटून साल काढलेल्या वृक्षाप्रमाणें ती दिसत होती. रक्तानें सर्वांग भिजून जाऊन नाथमाधव जवळजवळ बेशुद्धावस्थेंत पडून होते. थोड्या वेळानें त्यांना शुद्धि आल्यावर हळुहळू दुसऱ्याचा हात धरून ते तो उंच कडा चढून वर बंगल्यांत गेले. पण तेथें त्यांना दुःख सोसवेना. कंबरेला बसलेल्या जबरदस्त हबक्यामुळें खालील भाग अगदीं लुला झाला होता, तेथें कांहीं जुजबी उपचार केल्यावर दुसऱ्या दिवशीं सकाळीं डोलीमधून त्यांना पुण्याच्या 'सासून हॉस्पिटल'मध्यें नेण्यांत आलें. या अनपेक्षित प्रसंगामुळें त्यांनीं उराशीं बाळगलेल्या साऱ्या आशांवर पाणी पडलें. लष्करी पेशांत आपण नांवलौकिकाला जाऊन पोंचावें अशी त्यांची मोठी महत्त्वाकांक्षा होती, पण दैवाच्या इच्छेला मान वांकवावी लागून त्यांना तरवारीऐवजीं लेखणी हातीं घ्यावी लागली. 'सासून हॉस्पिटल'मध्यें ते अकरा महिने होते. ऑपरेशन करूनहि गुण न आल्यामुळें ते घरीं आले व नंतर पनवेलच्या 'धूतपापेश्वर'च्या दवाखान्यांत औषधोपचारासाठीं जाऊन राहिले.

'सासून हॉस्पिटल'मध्यें असतांना त्यांनीं हॉस्पिटलच्या ग्रंथसंग्रहालयांतील सर्व पुस्तकें वाचून काढलीं; व वेळ घालविण्याचें साधन म्हणून वाचनास सुरवात केली खरी, पण पुढें तें व्यसनच जडून, त्यांत ते मग्न होऊन जाऊं लागले. याच ठिकाणीं त्यांनीं हॉस्पिटलच्या उपयुक्ततेबद्दल व आपल्या अनुभवां-संबंधीं सात लेख इंग्रजींत लिहून पुण्याच्या 'डेक्कन हेरल्ड'मधून प्रसिद्ध केले. त्यांनीं आतां वाचनावर भर देऊन इंग्रजी वाङ्मयांतील उत्तमोत्तम लेखकांचीं पुस्तकें वाचून काढण्याचा सपाटा चालविला. या वाचनाचा परिणाम त्यांच्या मनावर होऊन त्यांनीं स्फुट गोष्टी लिहिण्यास सुरवात केली. नाथमाधवांचें आरंभींचें लिखाण 'मनोरंजन' 'वाग्विलास' व 'करमणूक' यांतून प्रसिद्ध

झालें. नवशिक्या लेखकाला प्रसिद्धीच्या बाबतींत जे अनुभव येतात ते त्यांनाहि आले. पुढें पनवेलला गेल्यावर त्या ठिकाणीं महाराष्ट्रभाषाचित्रमयूर 'केरळकोकिळ'-कर्ते आठल्ये यांची गांठ पडली. आठल्ये व पितळे घराणें यांचा पूर्वापार स्नेह असून लेखनाच्या बाबतींत आठल्ये यांनीं नाथमाधवांना उत्तेजन देऊन मार्ग दाखवून दिला. या वेळच्या 'केरळकोकिळां'तील 'विविध' हें सदर नाथमाधव लिहित असत.

अपघातामुळें शरीराला आलेलें पंगुत्व नाहींसें करण्यासाठीं नाथमाधवांना पाण्यासारखा पैसा खर्च करावा लागला. डॉक्टरी, वैद्यकी उपचार, मंत्रतंत्र, अंगारेधुपारे वगैरे नानाप्रकारचे इलाज करून पाहिले; पण कशानेंहि तें नष्ट झालें नाहीं. कंबरेखालचा भाग लुळा होऊन ते कायमचे पंगु झाले. अपघातापासून त्यांची नोकरी सुटलीच होती; त्यामुळें पुढें आपलें कसें होणार या काळजीनें ते ग्रस्त होऊन गेले. त्यांना आपलें जीवित निराशामय वाटूं लागलें. आपल्या हातून आतां कांहीं होणार नाहीं, दुसऱ्यांच्या उपकाराखालीं सारें आयुष्य घालवावें लागणार, असे विचार मनांत येऊन जिवाचें कांहीं तरी बरेंवाईट करून घ्यावें असेंहि त्यांना वाटूं लागलें. त्याचे बंधु रेल्वेमध्यें ४० रुपये पगाराच्या एका लहानशा जागेवर होते; त्यांना मिळत असलेल्या पगारावर कुटुंबांतील आठ-दहा माणसांचा निर्वाह होणें कठिण होतें. तेव्हां वडिलोपार्जित राहतें घर त्यांना विकून टाकावें लागलें. अशा परिस्थितींत त्यांच्या मनांत बरेवाईट विचार मनांत आल्यास नवल नाहीं. पण मराठी भाषेची सेवा त्यांच्या हातून घडावयाची होती. आठल्यांच्या उपदेशावरून त्यांनीं लेखनव्यवसाय करण्याचें ठरविलें. स्वतः आठल्यांनीं त्यांना साहित्यसेवेचे धडे दिले. नाथमाधव आठल्यांना अतिशय मान देत असत. दोघांचाहि स्नेहसंबंध आमरण कायम होता. हळुहळु वाङ्मयसेवा हेंच आपलें ध्येय नाथमाधवांनीं ठरविलें. आद्य नाट्याचार्य अण्णा किर्लोस्कर यांनीं पनवेलीस ज्या जागेंत बसून 'रामराज्यवियोग' नाटक लिहिलें त्याच जागेंत नाथमाधवांनीं आपल्या लेखनास आरंभ केला. नाथमाधवांचें पहिलें पुस्तक 'सायंकाळची करमणूक' १९०५ सालीं प्रसिद्ध झालें. १९११ सालपर्यंत त्यांनीं सात-आठ पुस्तकें लिहून प्रसिद्ध केलीं. त्यांपैकीं 'सांवळ्या तांडेल' (१९०८) ही कादंबरी विशेष नांवाजली गेली.

एक प्रणयकथालेखक म्हणून 'नाथमाधवां'ची या वेळीं प्रसिद्धि होती. त्यांचें इंग्रजी वाचन विस्तृत होतें, पण कोणाहि ग्रंथकाराला आदर्श म्हणून त्यानीं पुढें ठेविलेला दिसत नाहीं. हरिभाऊ आपटे यांचें ताजें उदाहरण त्यांच्या डोळ्यापुढें होतें, पण त्यांचाहि परिणाम त्यांच्या मनावर होऊं शकला नाहीं. पण पुढें मात्र कांहींतरी उच्च ध्येयानें प्रेरित होऊन लिहावयाला त्यांनीं सुरवात केलेली दिसते. हें परिवर्तन कसें झालें याविषयीं स्वतः 'नाथमाधव' म्हणतात – "पहिल्या पांच-सहा कादंबऱ्या लिहीपर्यंत माझी अशी समजूत होती कीं कादंबरी लिहिणें म्हणजे नायकनायिकेचें प्रेममीलन झालेलें दाखवावें, म्हणजे कादंबरी लिहिणें झालें. पण माझा हा भ्रम एका परम पवित्र व पूज्य अशा विभूतिदर्शनानें दूर झाला. गुरुवर्य भांडारकर यांच्याजवळ मी एकदां माझी एक कादंबरी अभिप्रायार्थ घेऊन गेलों. त्या वेळीं त्या वयोवृद्ध व विद्वान् अशा विभूतीनें मला असा प्रश्न केला कीं 'तूं हें पुस्तक कोणतें ध्येय पुढें ठेवून लिहिलें आहेस ?' त्याबरोबर मी निरुत्तर झालों व या वेळेपासून माझ्या लेखनाला नवीन वळण लागलें." या परिवर्तनाचें प्रत्यंतर यानंतर प्रसिद्ध झालेल्या 'विहंगवृंद' या कादंबरींत स्पष्ट दिसून येतें. बसूबिलाच्या चळवळीच्या वेळची ही कादंबरी असून पुनर्विवाह, प्रौढविवाह इत्यादि तत्कालीन सामाजिक विषयांचा ऊहापोह यांत केला आहे.

१९२० पर्यंत त्यांनीं आणखी बरींच पुस्तकें लिहून प्रसिद्ध केलीं. त्यांतील प्रमुख अशा 'विमलेची ग्रहदशा' व 'डॉक्टर' कादंबरी. या कादंबऱ्यांतहि त्यांनीं कित्येक सामाजिक प्रश्न उपस्थित करून त्यांवर चर्चा केली आहे. त्यांच्या बहुतेक कादंबऱ्या 'हिंद एजन्सी'च्या 'एक आणा माले'मधून प्रसिद्ध झाल्या आहेत. 'एक आणा माले'ची मूळ कल्पना नाथमाधवांचीच; ही माला त्यांनीं फार लोकप्रिय करून दाखविली. १९१५ सालीं 'केरळ-कोकिळ' 'हिंद एजन्सी'कडे येऊन 'केरळ-कोकिळ आणि नवें मन्वंतर' या संयुक्त नांवानें कृ. ना. आठल्ये व नाथमाधव यांच्या संपादकत्वाखालीं प्रसिद्ध होऊं लागलें. या मासिकांत 'संत-चरित्रमाला' व 'स्वामिशिष्यसंवाद' हीं प्रकरणें नाथमाधव लिहीत असत. तपस्येशिवाय ईश्वर प्रसन्न होत नाहीं असें आपण म्हणतों. वाङ्मयसेवेचेंहि तसेंच आहे. सरस्वतीची एकनिष्ठ उपासना दीर्घकालपर्यंत केल्याशिवाय कोणालाहि ती वश होत नसते. १९०८ पासून १९२० पर्यंत नाथमाधव ही तपश्चर्या करीत होते. त्यांच्या तपश्चर्येनें संतुष्ट होऊन सरस्वतीनें त्यांच्यावर कृपा करण्यास

सुरवात केली. याच वेळीं स्वराज्यावरील कादंबऱ्यांसारखीं वाङ्मयभूषणें त्यांच्या लेखणींतून बाहेर पडूं लागलीं.

ऐतिहासिक कादंबऱ्या लिहितांना त्यांनीं अतोनात श्रम केले. स्वतः पंगु असूनहि साऱ्या हिंदुस्थानभर त्यांनीं अगदीं अखेरीच्या वर्षापर्यंत प्रवास केला. महाराष्ट्रांतील किल्ले व ऐतिहासिक स्थळें प्रत्यक्ष पाहून ते त्यांसबंधीं टांचणें करून ठेवीत असत; आणि कादंबरी लिहितांना त्या टिपणांचा उपयोग करीत. त्यामुळें त्यांच्या कादंबऱ्यांत वस्तुस्थितीला धरून वर्णनें आलीं आहेत. जें कांहीं लिहावयाचें तें साधार लिहावयाचें असा त्यांचा कटाक्ष असे. इतिहासकार राजवाडे, सरदेसाई यांच्याशीं त्यांचा स्नेह असून वादग्रस्त मुद्यांवर त्यांच्याशीं चर्चा करून मगच ते कादंबरी लिहावयास घेत असत. आजपर्यंत उपलब्ध असलेल्या सर्व ऐतिहासिक साधनांचा त्यांनीं उपयोग केलाच; पण प्रवास करीत असतांना ज्या दंतकथा, लोककथा व पोवाडे त्यांच्या कानावर आले त्यांचाहि त्यानीं उपयोग करून घेतला. ऐतिहासिक कादंबऱ्या लिहितांना त्यांनीं स्कॉटला आपल्यापुढें आदर्श ठेविला होता; तरीहि स्कॉटच्या सर्व गोष्टी त्यांनीं स्वीकारल्या नाहींत. १९२१ सालापासून त्यांनीं आपली ऐतिहासिक कादंबरीमाला लिहावयास घेतली. ‘ स्वराज्याच्या इतिश्री ’ पर्यंत सारा इतिहास छत्तीस कादंबऱ्यांच्या रूपानें लिहावयाचा अशी त्यांची योजना होती. याशिवाय पेशवाईतील स्त्रिया व पुरुष यांवर स्वतंत्र ग्रंथ लिहिण्याचा त्यांचा हेतु होता. अलिकडे कांहीं वर्षांपासून त्यांना आध्यात्मिक नाद लागला होता. पुनर्जन्म, स्वप्नें, योगविद्या इत्यादि प्रश्नांच्या द्वारें या विषयावर कादंबऱ्या लिहावयाचें त्यांनीं ठरविलें होतें. ‘ आत्मशोधन ’ नांवाची या विषयावरील कादंबरी त्यांनीं मृत्यूपूर्वी कांहीं दिवस लिहावयास घेतली होती. ही कादंबरी पुरी झाली असती तर मराठी कादंबरींत एका नव्या प्रकारांची भर पडली असती. मराठ्यांच्या आरमारावर ते आणखीहि बरेंच लिहिणार होते.

नाथमाधवांनीं कादंबरीलेखनाबरोबर कांहीं ऐतिहासिक नाटकेंहि लिहिलीं आहेत. पैसे मिळविण्याच्या दृष्टीनें कादंबरीपेक्षां नाटकच लेखकाला अधिक फलदायी होत असतें. असा अनुभव असल्यानें नाथमाधव तिकडे वळल्यास नवल नाहीं. त्यांचीं कांहीं नाटकें रंगभूमीवर आलीं असून ‘ भेदशासन ’ ‘ कंकणसंदेश ’ ‘ संत-समागम ’ व ‘ कान्होपात्रा ’ हीं नाटकें रंगभूमीवर यावयाचीं होतीं. नाथमाधव शेवटच्या आजारांत असतां नाटकें बसविण्यास निघून येण्याबद्दल नाटकमंडळीची

त्यांना तारहि आली होती. पण त्यांच्या मृत्यूमुळें हीं नाटकें तशींच पडून राहिलीं. उपासनी महाराजांचें एक चरित्र त्यांनीं लिहिलें असून उपासनींच्या भक्तांनीं माहिती पुरवून व चांगला मोबदला देऊन तें मुद्दाम लिहून घेतलें होतें. तें केवळ स्फूर्तीनें प्रेरित होऊन लिहिलेलें नाहीं.

मराठी लेखकांत लेखनसामग्री मिळविण्यासाठीं नाथमाधवांइतका प्रवास दुसऱ्या कोणीं क्वचितच केला असेल. त्यांच्या सामाजिक कादंबऱ्या बहुतेक घडलेल्या गोष्टींवरून थोड्याफार फरकानें लिहिल्या आहेत हें त्यांनीं कादंबऱ्यांच्या प्रस्तावनांत नमूदच केलें आहे. ' रायक्लब 'मधील गोष्टी खऱ्याखुऱ्या प्रसंगांचीं चित्रें आहेत. नाथमाधवांचे एक स्नेही पोलिसांत हुद्यावर होते; त्यांच्याकडून विविध प्रकारच्या गोष्टी नाथमाधवाना ऐकावयास मिळत. त्या गोष्टींत स्वतःच्या पदरच्या गोष्टींची भर घालून वरील 'रायक्लबा'ची त्यांनीं उभारणी केली आहे.

आयुष्याच्या उत्तरार्धांत ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिणें हें आपलें ध्येय त्यांनीं ठरविलें असल्यामुळें त्या एकाच गोष्टीचा ध्यास घेऊन ते आपलें लेखन करीत होते, आणि महाराष्ट्रीय जनतेनें गौरव केल्यामुळें त्यांना मोठा हुरूप येत होता. एका वर्षाच्या अवधींत स्वराज्यावरील कादंबऱ्यांना द्वितीयावृत्तींचा योग येऊन त्यांना ' दक्षिणा प्राइज् कमिटी'कडून बक्षिसेंहि मिळालीं. स्वराज्यावर एकंदर सात कादंबऱ्या त्यांनीं लिहिल्या. मृत्यूपूर्वी या मालेंतील दोन कादंबऱ्या त्यांनीं लिहावयास घेतल्या होत्या, पण मृत्यूमुळें त्या अपुऱ्याच राहिल्या.

१९०५ पासून १९१२ पर्यंत एक, तेथपासून १९२० पर्यंत एक, आणि पुढें १९२८ पर्यंत एक असे नाथमाधवांच्या वाङ्मयसेवेचे तीन भाग ठोकळ मानानें पडतात. या भागांतील पहिल्या विभागांत त्यांनीं सात-आठ पुस्तकें लिहिलीं. त्यांतील बहुतेक सामाजिक असून एक ऐतिहासिक आहे. या कादंबऱ्यांवरून नाथमाधव या काळांत उमेदवारीच करीत होते असें दिसतें. त्यांतील कथानक भाषा व विषय सामान्यच असून त्या लेखकाचा नवशिकेपणा चांगलाच दर्शवितात. ' बंगाल्यांतील पहिलें गुप्तमंडळ ' या कादंबरींत क्रांतिकारकांच्या हालचाली वर्णिल्या असल्यानें ती चटकदार झाली आहे. यानंतर डॉ. भांडारकर यांच्या उपदेशावरून त्यांच्या लेखनांत बरीच सुधारणा झालेली दिसते. यापुढील काळांत ' विहंगवृंद ' ' वीरधवल ' ' डॉक्टर कादंबरी ' ' विमलेची ग्रहदशा ' ' ग्रहदशेचा फेरा '

व 'रायक्लब'सारखीं वाचनीय पुस्तकें त्यांच्या हातून लिहिलीं गेलीं. 'विहंगवृंद' ही कादंबरी बसुबिलाच्या प्रसंगीं लिहिली असून तिच्यांत कादंबरीलेखनाचे बरेच गुण विकास पावलेले दिसतात. 'वीरधवल' ही रेनॉल्डसच्या 'केनेथ' कादंबरीचें सरस रूपांतर आहे. या कादंबरींतील वर्णनें चांगलीं उतरलीं आहेत. 'रायक्लब' मधील गोष्टी चुणचुणीत व रहस्यपूर्ण असून मराठींत अशा प्रकारचीं पुस्तकें फार थोडीं आहेत. जीं आहेत तीं बाबूराव नामक नायकाच्या ठराविक पराक्रमांचीं आलटून-पालटून लिहिलेलीं आहेत. त्यांच्यांत आपल्या इकडील वस्तुस्थिति मुळींच दिसून येत नाहीं. पण 'रायक्लबां'तील गोष्टी अस्सल देशी व वैचित्र्यपूर्ण असल्यामुळें तें इतरांहून फार निराळें दिसतें. हें पुस्तक मराठी वाचकांच्या फार आवडीचें आहे. 'इतकी हृदयंगम कादंबरी अलिकडे फार दिवस आमच्या वाचनांत आली नव्हती' असे उद्गार 'ग्रह-दशेचा फेरा' या कादंबरीविषयीं 'संदेश'कारांनीं काढले होते ( संदेश १-९-१९१५ ). कादंबरी वाचनीय असून तींतील रेखाटलेले प्रसंग वस्तुस्थितिनिदर्शक आहेत. मात्र कथानकाचा शेवट आनंदपर्यवसायी करावयाचा या हट्टामुळें ती वाचतांना शेवटीं विरस होतो. शिवाय वर्णिलेले प्रसंगहि बरेच त्रुटित आहेत. हिला कादंबरी न म्हणतां स्फुट गोष्ट म्हटल्यास योग्य होईल इतकी ती छोटी आहे. 'दोन भावंडें' ही सुद्धां एक स्फुट गोष्ट असून सरळ व भाषेच्या साधेपणामुळें ती चांगली झाली आहे. 'विमलेची ग्रहदशा' या कादंबरींत नामदेव समाजांतील एका सुशील कुमारिकेला आपल्या इच्छेविरुद्ध खिस्ती धर्माचा स्वीकार कसा करावा लागला याचें यथार्थ चित्र रेखाटलें आहे. खिस्ती, कोष्टी व मिशनरी यांचें चित्र यांत काढलें असून वैचित्र्याला भरपूर वाव मिळाला आहे. 'डॉक्टर' कादंबरी नाथमाधवांच्या सामाजिक कादंबऱ्यांत केव्हांहि श्रेष्ठ गणली जाईल. एकंदर मराठी कादंबऱ्यांतहि अशा कादंबऱ्या भोजक्याच सांपडतील. स्त्रीशिक्षणाबरोबर गृहशिक्षणाची किती आवश्यकता आहे हें दाखविण्यासाठीं सदर कादंबरी लिहिली गेली असून या मताला अनुरूप अशी कथानकाची मांडणी करण्यांत आली आहे. लग्नापूर्वी शिक्षण घेऊन त्याचा सासरीं दुरुपयोग झालेल्या दुर्दैवी कमलिनी अजूनहि आपल्या समाजांत आढळतील. तसेंच या कादंबरींतील शांतेसारख्या मुलीहि पुष्कळ आढळून येतील. नाथमाधवांच्या काळांतील मध्यम समाजाचें चित्र या कादंबरींत खुबीदारपणें रंगविलें आहे. कादंबरींतील संवाद अकृत्रिम असून भाषा साधी व स्वाभाविक अशी आहे.

स्वभावपरिपोष चांगला साधला असून प्रत्येक पात्र वैशिष्ट्यपूर्ण आहे. शांतेचें स्वभावरेखन करण्यांत लेखकानें बरीच कुशलता दाखविली आहे. 'सापत्नभाव' व 'स्वयंसेवक' यांतील पहिलीचा प्रतिपाद्य विषय जुनाच असला तरी तो नव्या स्वरूपांत चांगल्या रीतीनें मांडला गेल्यामुळें कादंबरी वाचनीय झाली आहे. 'स्वयंसेवकां'त मद्यपानाचे दुष्परिणाम वर्णिले आहेत. पण कादंबरीनायकानें एकाद्या जादूगाराप्रमाणें सर्व गोष्टी आपल्या मनाप्रमाणें घडवून आणणें, कादंबरीकारानें मधूनमधून नाटकांतील पदांप्रमाणें संस्कृत सुभाषितें ठेवून देणें, इत्यादि गोष्टींमुळें कादंबरी सदोष वाटते.

कादंबरीलेखनांत मनोरंजनाबरोबर उपदेश हेंच नाथमाधवांचें ध्येय होतें. हरिभाऊंप्रमाणें नाथमाधवांचेंहि ध्येय समाजसेवा हेंच असलें तरी दोघांचेहि मार्ग भिन्न आहेत. नाथमाधवाचे सामाजिक कादंबऱ्यांतील नायक समाजसेवेचें कंकण बांधून बाहेर पडत नाहींत – इतकें उदात्त ध्येय नाथमाधवांनीं ठविलेलें नाहीं, पण ज्या संसारांत त्यांना राहावयाचें आहे याबद्दल ते नायक दक्ष असतात. 'डॉक्टर' कादंबरी मधील 'रघू' हा या दृष्टीनें विचार करण्यासारखा रंगविला आहे. 'स्वयंसेवक'मधील नायक मात्र उदात्त ध्येयाचा दाखविला आहे.

वर उल्लेखिलेल्या सामाजिक कादंबऱ्यांत नाथमाधवांनीं मध्यम व खालच्या वर्गांतील समाजाचीं चित्रें रेखाटलीं आहेत. हीं चित्रें वस्तुस्थितीशीं पुष्कळशीं जुळतीं असल्यामुळें त्याच्या कादंबऱ्या लोकप्रिय झाल्या. पण तीं इतकीं अपुरीं आहेत कीं वाचकांची आरंभींची अपेक्षा पुस्तक वाचून झाल्यावर फोल ठरते. नाथमाधव सर्व विषयांचा समाचार घेतात. पण त्या विषयाच्या बुडाशीं ते सहसा जात नाहींत. पाण्याच्या पृष्ठभागावर पोहणाराला नदीची खोली कशी सांगतां येणार ? ती सांगण्यास तळाशींच गेलें पाहिजे. हा दोष त्यांच्या कादंबऱ्यांत प्रामुख्यानें आढळून येतो. मनुष्यस्वभावाचें मार्मिक ज्ञान कादंबरीकाराला अवश्य असावें लागतें. या ज्ञानाच्या बळावर पाहिलेले व ऐकिलेले प्रसंग कौशल्यानें एकत्र गुंफून कादंबरी लिहिण्याचें चातुर्य लेखकाच्या अंगीं असावें लागतें. नाथमाधवाच्या बहुतेक कादंबऱ्या स्वानुभवावर लिहिल्या गेल्या असल्यामुळें वस्तुस्थितिनिदर्शक आहेत. पण कादंबरीचा विशेष जें रहस्य, तें फुलांतील सुवासासारखें आहे. फूल कितीहि सुंदर असलें तरी सुवासाविना त्याचें सौंदर्य जसें फुकट ठरतें तसेंच रहस्याशिवाय लिहिलेली कादंबरी सहसा कोणी औत्सुक्यानें वाचणार नाहीं. या

रहस्यानें वाचक कथानकाकडे खेंचला जाऊन त्याची उत्सुकता वाढत जाते. असें रहस्य आपल्या कादंबरींत साधण्यास लेखकाची कल्पकता प्रखर असावी लागते. नाथमाधवांनीं ' सापत्नभाव ' कादंबरींत असें रहस्य राखण्याचा प्रयत्न केला आहे. पण तें एकाच प्रसंगापुरतें असल्यामुळें मनांत भरण्याजोगें नाहीं. 'वीरधवल'मधील या गुणाचें श्रेय नाथमाधवांपेक्षां रेनॉल्डस्कडेच जातें. नाथमाधवांचीं कथानकें साधीं व सरळ असतात. त्यात फारसे डावपेंच नसतात. मात्र रहस्याशिवाय कादंबरी लोकप्रिय करतां येते हें त्यांनीं दाखवून दिलें आहे. हरिभाऊ आपटे यांच्या सामाजिक व ऐतिहासिक कादंबऱ्यांत हरिभाऊ पात्रांशीं समरस झाल्यासारखे वाटतात. कादंबरीकार आम्हांला ही गोष्ट सांगत आहे असें न वाटतां आपण कांहींतरी प्रत्यक्ष पाहत आहोंत असें वाचकांना वाटून तेहि पात्रांशीं समरस होऊन जातात. हरिभाऊंचें हें कौशल्य नाथमाधवांत आढळत नाहीं. पात्रांच्या भावना नाथमाधव छान रंगवितात; पण स्वतःला विसरून जाण्याइतके ते तद्रूप होत नाहींत. असे कांहीं प्रसंग आहेत कीं त्यांवर लिहितांना हरिभाऊ आपटे लिहिण्याच्या भरांत वाहून जाऊन अतिरेक करितात; याच्या उलट नाथमाधव ऐन रंगांत आलेला प्रसंग तसाच ठेवून देतात. त्यामुळें त्या प्रसंगाशीं समरस झालेला वाचक हिरमुसला होऊन नाथमाधवांनीं हा प्रसग जरा विस्तारानें लिहिला पाहिजे होता असे चडफडीचे उद्गार काढतो. उदाहरणार्थ ' डॉक्टर ' कादंबरींतील 'पहिली रात्र' हें प्रकरण किती तरी सुंदर लिहितां आलें असतें. पात्रांच्या एकसारखेपणाच्या दोषापासून नाथमाधव बरेच अलिप्त आहेत. याचें कारण पात्राची विविधता हेंच असावें. ' डॉक्टर ' कादंबरी व ' सापत्नभाव ' यांतील पात्रांचें स्वभावरेखन चांगलें आहे. सर्वसामान्य माणसांत आढळणाऱ्या सर्व भावना व वासना त्यांच्यात आढळतात. कोठल्याहि एका भावनेचा अतिरेक करून मानवी स्वभावाचीं इतर अंगें जीं प्रत्येक माणसांत सूक्ष्म प्रमाणात वास करितात त्यांकडे दुर्लक्ष केलेलें नाहीं. मराठी कादंबरींत तरी हा गुण बराच दुर्मिळ आहे. याच्या जोडीला पात्रांशीं समरसता हा गुण नाथमाधवांत असता तर त्यांच्या कादंबऱ्यांचा दर्जा अधिक उंचावला असता.

त्यांच्या समकालीन लेखकांत त्यांच्याइतकें वैचित्र्य दुसऱ्या कोणाहि लेखकाच्या कृतींत दिसत नाहीं. पण यांत अपुरेपणाचा दोष आढळतोच. ' स्वयंसेवक ' कादंबरींत मजुरांच्या स्थितीचें चित्र काढण्याचा त्यांनीं प्रयत्न केला आहे. ' विमलेच्या

ग्रहदशें 'त कोष्टी व मिशनरी यांचीं चित्रें रेखाटलीं आहेत; पण तीं चित्रें बरींच अपुरीं आहेत असें म्हणावें लागतें. घाई हा त्यांचा आणखी एक दोष आहे. त्यांना कादंबरीचा आरंभ जितका स्वाभाविक व सुंदर करतां येतो तितका तिचा शेवट करतां येत नाहीं. शेवटीं-शेवटीं ते घाई करितात. पात्रांच्या स्वभाव-परिवर्तनाचें वर्णन अतिशय कुशलतेनें व हलक्या हातानें करावयाचें असतें. लेखकाच्या कलेची कसोटी तेथें लागत असते. अनैसर्गिकतेचा भास कोठेंहि होऊं न देण्याबद्दल फार दक्षता बाळगावी लागते. परिवर्तन होण्यास सबल व बुद्धीला पटण्याजोगें कारण दाखवावें लागतें. हें कसब लेखकाच्या अंगीं नसल्यास वाचकाचा विरस होऊन अस्वाभाविकपणाचा दोष लेखकाच्या पदरांत पडतो. त्यांच्या आरंभींच्या कादंबऱ्यांत यासंबंधीं बरीच ढिलाई दिसते. त्यांच्या अगदीं शेवटच्या ' स्वयंसेवक ' कादंबरींतहि ही ढिलाई आढळते. हा दोष सोडला तर इतर बाबतींत शक्य तितकी ठाकठिकी त्यांनीं ठेविली आहे.

' देशमुखवाडी ' ही नाथमाधवांची भाषांतरवजा कादंबरी आहे. त्यांनीं लिहिलेल्या नाटकांत ' मराठ्यांचा आत्मयज्ञ ' व ' जातिवंत मराठा वीर ' हीं दोन नाटकें चांगलीं आहेत. पैकीं पहिलें नाटक मराठी ऐतिहासिक नाटकांत बरेंच वरचें स्थान पटकावील. अलिकडील ऐतिहासिक नाटकांत इतिहासाचा जो विपर्यास करण्यांत येतो तो यांत बिलकुल आढळणार नाहीं. त्यांच्या स्फुट गोष्टींत 'मास्तराची दिवाळी' व 'संप यशस्वी कोणीं केला ?' या गोष्टी बऱ्यापैकीं आहेत.

कादंबरी कथानकाच्या दृष्टीनें कितीहि चांगली असली तरी तिला जर चांगल्या भाषेची जोड नसेल तर तिला वाङ्मयांत महत्त्व येणार नाहीं. यासाठीं प्रत्येक लेखक आपल्या आवडीप्रमाणें व मगदुराप्रमाणें तिच्यावर भाषेचे विविध अलंकार चढवीत असतो. नाथमाधवांची लेखनशैली साधी व सुटसुटीत आहे. पहिल्या कांहीं कादंबऱ्यांतील भाषेवर मुंबईकर दैवज्ञांच्या भाषेची छाया पडल्याचा क्वचित् भास होतो. पण उत्तरोत्तर ती सुधारत जाऊन अगदीं साध्या मराठीचें स्वरूप तिला प्राप्त झालें. त्यांच्या भाषेंत सहजपणा हा गुण वाखाणण्याजोगा आहे; त्यामुळें त्यांच्या वाचकांत सर्व दर्जाच्या लोकांचा समावेश होतो. अलंकारिक भाषा त्यांना आवडत नसे असें दिसतें. हल्लीं त्यांच्या भाषेंत प्रेमळपणा येत चालला होता, पण हरिभाऊंच्या भाषेंतील माधुर्य त्यांत आढळत नाहीं. करुणरसाला ते

स्पर्श करून जातात, पण त्याचा उत्कर्ष झालेला आढळत नाहीं. इंग्रजी लेखकांपैकीं हेन्री वुडच्या साध्या भाषेचा परिणाम त्यांच्यावर झाला असावा. इंग्रजी लेखकांच्या लेखनपद्धतीचें व ध्येयाचें अनुकरण मात्र त्यांनीं केलेलें दिसत नाहीं.

आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धांत नाथमाधवांनीं मराठेशाहीवर जी ऐतिहासिक कादंबरीमाला लिहिली तिचें महत्त्व बरेंच आहे. इ. स. १९०८ सालीं लिहिलेली 'सांवळ्या तांडेल' ही त्यांची पहिली ऐतिहासिक कादंबरी. ही मराठ्यांच्या आरमारावर लिहिलेली अशी मराठींतील ही पहिलीच कादंबरी होय. या कादंबरीविषयीं कृ. ना. आठल्ये म्हणतात – "आरमारावरील कथा, सफरी, गोष्टी व प्रसंग जसे जलपर्यटणांत आघाडी मारणाऱ्या इंग्लंदासारख्या देशांत आढळतील, तसे आपल्या देशांत मिळणें परम दुर्मिळ आहेत. किंबहुना मुळींच नाहींत म्हटलें तरी चालेल. कारण एक तर इतके मोठमोठाल्या द्वीपांतरांच्या सफरी करणारे खलाशी आणि तांडेल थोडेच, आणि किनाऱ्या-किनाऱ्यानें गलबतें नेणारे आहेत ते बहुधा अक्षरशत्रू. तेव्हां त्यांच्यांत अशा प्रकारच्या दर्यांतील सफरी, त्याच्यावरील गोष्टी, प्रसंग आणि अनुभव लिहिलेले मिळणें हेंहि तितक्यापुरतेंच. युरोपांतलीं आरमारें दांडगीं, आणि त्यांच्यावर वास्को ड गामा, कोलंबस असले विद्वान् नावाडी. तेव्हां त्यांच्याकडे असल्या प्रकारच्या कादंबऱ्या उत्तमोत्तम निपजल्या तर त्यांत मोठेंसें नवल नाहीं. पण आपल्या इकडे त्याबद्दल साराच अभाव. फार काय, पण आरमारासंबंधीं कादंबरी ही पहिलीच होय. रा. पारसनीस यांनीं कांहीं वर्षांपूर्वी एक पुस्तक लिहिलें आहे. पण त्यांत फक्त ऐतिहासिक माहिती असून तीहि त्रोटकच आहे. तेव्हां अशा स्थितींत आरमारासंबंधीं कादंबरी लिहिणाराच्या अंगीं केवढें कौशल्य व कल्पना पाहिजे हें सांगणें नकोच. असें असतांहि श्री. नाथमाधव हे त्यांतून उत्तम रीतीनें पार पडले आहेत; नव्हे चांगले यशस्वी झाले आहेत असें म्हटलें तरी वावगें होणार नाहीं. कारण सर्वांस चटका लावून सोडील असें संविधानक मनांत आणून त्याचा संबंध सारा आरमारावरील प्रसंगांकडे जोडावयाचा ही कल्पना कांहीं सामान्य नव्हे. पण तोहि प्रस्तुत कादंबरीकारांनीं फार उत्तम रीतीनें जुळवून आणला आहे. त्याबद्दल खरोखरच त्यांची तारीफ केली पाहिजे." आपल्या इतर ऐतिहासिक कादंबऱ्यांतहि नाथमाधवांनीं आरमाराचा उल्लेख केला आहे. 'स्वराज्याची स्थापना' हीमधील 'संकटांत

संकटें ' या प्रकरणांत समुद्रावरील वादळाचें चित्र त्यांनीं उत्तम काढलें आहे. नाथमाधवांपूर्वी मराठ्यांच्या इतिहासांतील वेगवेगळे प्रसंग निवडून त्यांवर कथेची उभारणी करण्याचें काम बऱ्याच लेखकांनीं केलें आहे. त्यांपैकीं गुंजीकरांची ' मोचनगड ' व बापटांची ' पानपतची मोहीम ' या कादंबऱ्या विशेष प्रसिद्ध आहेत. याशिवाय ' लालन बैरागीण ' ' ठगाची जबानी ' ' बाजीरावचरित्र ' ' सुशील यमुना ' याहि कादंबऱ्या त्या काळीं लोकप्रिय होत्या. या ऐतिहासिक कादंबऱ्या रूपातरित असून स्कॉट प्रभृति इंग्रजी लेखकांच्या ग्रंथावरून त्या लिहिलेल्या आहेत. त्यांवरून इकडील ऐतिहासिक कालाची यथार्थ कल्पना होत नाहीं. तसेंच या कादंबरीलेखकांच्या वेळीं आजच्या इतकीं ऐतिहासिक साधनें उपलब्ध नव्हतीं. लेखकाला आपली सारी भिस्त कल्पनेवरच अवलंबून ठेवावी लागे. यामुळें या कादंबऱ्यांचें ऐतिहासिक महत्त्व कमी झालें आहे. यानंतर हरिभाऊ आपटे यांनीं कांहीं ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या. हरिभाऊंच्या काळीं पूर्वीहून बरेंच ऐतिहासिक साहित्य उपलब्ध झालें होतें. पण त्याचा उपयोग हरिभाऊंनीं जितका करून घ्यावा तितका घेतलेला दिसत नाहीं. त्यांच्या कादंबरींतील कांहीं प्रसंग स्कॉटच्या कादंबऱ्यांतून उचलल्याचा पुष्कळदां भास होतो. अशीं कांहीं वैगुण्यें असलीं तरी आपल्या प्रतिभेच्या बळावर त्यांनीं कादंबऱ्या चटकदार केल्या आहेत.

सर्व ऐतिहासिक साधनांचा उपयोग करून स्वतंत्रतेनें लिहिलेल्या अशा कादंबऱ्या नाथमाधवांच्याच ठरतात. मराठ्यांच्या इतिहासावर एकंदर सात कादंबऱ्या लिहून शाहूच्या सुटकेपर्यंतचा सर्व वृत्तांत त्यांनीं कथन केला आहे. प्रत्येक कादंबरीचे पूर्वार्ध उत्तरार्ध पाडून, प्रत्येकाचे दोन भाग पाडून त्यांचे पुनः उपोद्घात व उपसंहार असे विभाग पाडले आहेत. या पद्धतीमुळें कादंबरीला आटोपशीरपणा आलेला आहे. या कादंबऱ्यांचा विशेष म्हणजे त्या ठराविक ऐतिहासिक प्रसंगांवर लिहिलेल्या नसून सारा इतिहास कादंबरीच्या रूपानें वर्णिला आहे. अशा पद्धतीमुळें कांहीं सुंदर प्रसंग त्रोटक झाले असून कादंबरीला रंग चढण्यास अडथळा होतो. यांतील कांहीं प्रसंग हरिभाऊंनीं विस्तृत वर्णिल्यामुळें चटकदार झाले आहेत. नाथमाधवांना याची जाणीव होती असें कादंबऱ्यांच्या प्रस्तावनांवरून दिसतें. पण सारा इतिहास कादंबरींत आणावयाचा या हट्टामुळें या दोषाकडे दुर्लक्ष झालें. हरिभाऊंप्रमाणें हे प्रसंग सावकाश रंगवीत बसल्यास मराठेशाहीवर

किती कादंबऱ्या लिहाव्या लागतील याचा सुमारच राहिला नसता. ऐतिहासिक कादंबरीचा मुख्य गुण जो ऐतिहासिक सत्यता तो त्यांच्या कादंबऱ्यांत पूर्णपणें दिसून येतो. स्थळ, काळ व व्यक्ति यांचीं बंधनें त्यांनीं अत्यंत दक्षतेनें पाळलेलीं दिसतात. ज्या प्रसंगावर आपणाला लिहावयाचें ते प्रसंग ज्या ठिकाणीं घडले तीं स्थळें प्रत्यक्ष पाहून त्यांनीं हुबेहूब वर्णिलीं आहेत; त्यामुळें लहानसहान गांवें, नद्या, किल्ले व डोंगर-पर्वत यांच्यांत भौगोलिक चुका झाल्या नाहींत. तसेंच ऐतिहासिक व्यक्तींचे स्वभाव इतिहासाला अनुसरून काढले आहेत. ज्या काल्पनिक व्यक्ती आहेत त्याहि त्या काळांतील आहेत अशाच रंगविल्या आहेत. शिवाजी महाराजांच्या उज्ज्वल चारित्र्याला ते प्रेमसंबंधांत पडलेले दाखवून नाथमाधवांनीं गौणत्व आणिलें आहे असें कांहीं टीकाकार म्हणतात. पण आतां उपलब्ध झालेल्या माहितिवरून शिवाजीला अनेक बायका होत्या असें सिद्ध होतें, अर्थात् नाथमाधव या आरोपापासून मुक्त आहेत. त्यांच्या कादंबऱ्यांतील उपकथा चांगल्या असल्या तरी त्यांत नावीन्य आढळत नाहीं. यांतील कांहींचें स्वभावरेखन घाईनें उरकलें आहे. 'परिवर्तनां'तील भिरेचें चित्र मात्र उत्कृष्ट काढलें आहे. या कादंबऱ्यांत ठिकठिकाणीं जीं स्वगत भाषणें घातलीं आहेत तीं कादंबरींत बरीं दिसत नाहींत, तीं नाटकांत शोभून गेलीं असतीं.

कादंबरी लोकप्रिय होण्यासाठीं या कादंबरीप्रकाराचा जनक जो सर वॉल्टर स्कॉट त्यानें इतिहासाप्रमाणें दंतकथादिकांचा भरपूर उपयोग करून घेतला आहे. ऐतिहासिक कादंबरींत मुख्य ऐतिहासिक गोष्टींना महत्त्वाचें स्थान द्यावें ही गोष्ट निर्विवाद आहे. पण त्यांवरच सर्वस्वीं अवलंबून न राहतां प्रादेशिक लोककथा, दंतकथा, पोवाडे, तत्कालीन चालीरीती, समाजव्यवस्था व समजुती याचा तारतम्य राखून उपयोग केला असतां कादंबरीला रंग चढून ती कादंबरी या नांवाला सार्थ होते. निवळ ऐतिहासिक गोष्टी व लढायांचे वृत्तांत सांगत बसून कादंबरी लोकप्रिय होणार नाहीं. नाथमाधवांनीं वरील सर्व सामुग्रीचा उपयोग केलेला असला तरी तो अत्यंत त्रोटक वाटतो. स्वयंभू बाणाची दंतकथा त्यांनीं आपल्या एका कादंबरींत आरंभापासून अखेरपर्यंत खेळविली आहे. ती ठीक आहे, पण पुनरावृत्तीच्या दोषामुळें शेवटीं कंटाळवाणी वाटते. कोंकणासारख्या प्रदेशांत भूताखेतांच्या, नदीनाल्यांच्या गोष्टी, तसेंच कित्येक अद्भुतरम्य समजुती पुरातनकाळापासून शेकड्यांनीं चालत आलेल्या आहेत. योजकांच्या दुर्लभतेमुळें त्या तशाच उपयोग

केल्याविना पडल्या असून कांहीं स्मृतींतून जात चालल्या आहेत. देशावरहि अशा गोष्टी थोड्याथोडक्या नसतील. आपल्या प्रवासांत नाथमाधवांनीं अशा गोष्टींचा संग्रह केलेला दिसत नाहीं. ज्या ठिकाणीं ते गेले तेथील बारीकसारीक माहिती मिळविण्याचा प्रयत्न न करतां मामुली स्वरूपाच्या माहितीवरच ते संतुष्ट राहिले. जरा जास्त श्रम घेऊन वरील लोककथांचा संग्रह करून त्यांचा उपयोग त्यानीं आपल्या कादंबऱ्यांत केला असता तर त्याच्या कादंबऱ्यांचा दर्जा याहिपेक्षां वाढला असता. जुन्या शब्दांचा त्यांनीं उपयोग करून घेतला तो योग्य आहे. त्यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांची भाषा बरीच ओजस्वी आहे. वीररसाचा उठाव ते चांगल्या रीतीनें करूं शकतात. स्कॉटच्या कादंबऱ्यांप्रमाणें या कादंबऱ्यांत अनेक रम्य स्थळें आहेत. ' स्वराज्याचा कारभार 'मधील धनगराच्या झोंपडींत वेष पालटून शिवाजी महाराज चटणीभाकर खात आहेत तो प्रसंग ज्यानीं वाचला असेल त्याला या म्हणण्याची सत्यता पटेल. अशा प्रकारचे मनोवेधक प्रसंग त्यांच्या सर्वच कादंबऱ्यांत आढळतील.

नाथमाधवांच्या एकंदर वाङ्मयाचा आढावा घेतल्यानंतर त्यांचें मराठी वाङ्मयांत कोणतें स्थान असावें हा प्रश्न सहजच उद्भवतो. ग्रंथसंख्येकडे पाहिलें असतां नाथमाधवानीं मराठी वाङ्मयांत लक्षांत घेण्याजोगी भर घातली यांत शंका नाहीं. पण केवळ ग्रंथसंख्येवरून लेखकाची योग्यता ठरत नाहीं, तर त्या ग्रंथाच्या महत्त्वावर लेखकाचा वाङ्मयांतील दर्जा ठरतो. नाथमाधवांचीं सर्व पुस्तकें चांगलीं आहेत असें कोणीहि म्हणणार नाहीं. दिवसेंदिवस वाङ्मयांत सुधारणा होत असून जुन्याला नवे प्रकार पुष्कळ बाबतींत मागें टाकीत आहेत. या नव्या प्रकाराशीं नाथमाधवांच्या कृतींची तुलना केली तर पुष्कळ सामाजिक कादंबऱ्या कमी प्रतीच्या ठरतील. पुस्तक चागलें ठरण्यास तें पुनःपुनः वाचण्याची इच्छा व्हावी लागते; त्यावर मोहित होऊन परभाषेंतील रसिकांनीं त्याचीं स्वभाषेंत भाषांतरें केलीं पाहिजेत. या दोन्हीं बाबींपैकीं रुचिभिन्नतेला अनुसरून पहिल्यांत नाथमाधवाचीं पुष्कळ पुस्तकें मोडतील. त्यांच्या कादंबऱ्यांचीं भाषांतरें झालेलीं नसल्यामुळें त्याविषयीं लिहावयाला नकोच. या परीक्षांतून पुस्तक बाहेर पडलें तरी त्यांचें वाङ्मयांतील स्थान कायम टिकून राहील असेंच केवळ म्हणतां येणार नाहीं. कारण आज लोकप्रिय असलेलें पुस्तक कालांतरानें नामशेष होऊन जातें असा अनुभव असल्यानें दीर्घ कालोदरांत जी कृति टिकून राहते तीच लेखकाला पहिला दर्जा प्राप्त करून देते. या कसोटीनुसार नाथमाधवांना पहिला दर्जा मिळेल असें वाटत नाहीं. त्यांच्या

'डॉक्टर' कादंबरींत अशा कादंबरीचे पुष्कळ गुण आहेत हें खरें व अजूनहि तिला मागें टाकणाऱ्या कादंबऱ्या मराठींत फारशा निघाल्या नाहींत, तरी कांहीं काळानें ती कादंबरीहि मागें पडेल यांत शंका नाहीं. तरीहि एका काळाचें चित्र तींत चांगल्या प्रकारें काढलें असल्यामुळें त्या दृष्टीनें ती कादंबरी पुष्कळ काळ टिकून राहील. त्यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांत ऐतिहासिक कादंबरीला अवश्य असणारे सर्व गुण सांपडतात. आणि त्याच कादंबऱ्या मराठी वाङ्मयांत त्यांना चिरंजीव करतील. 'सांवळ्या तांडेल' सारख्या कथा जोंपर्यंत निघत नाहींत तोंपर्यंत तिचें महत्त्व टिकून राहील. आरमारावरील कादंबरीचा प्रकार पहिल्यानें मराठींत आणल्याबद्दलचा प्रवर्तकाचा मान केव्हांहि त्यांनाच दिला जाईल. वाङ्मय हा नाथमाधवांचा प्रांत नव्हता असें असूनहि त्यांत यशस्वी कादंबरीकार म्हणून नांव मिळविणें ही कांहीं सामान्य गोष्ट नाहीं. मराठी भाषेस ऊर्जितावस्थेचे दिवस आणण्यास ज्यांचे श्रम प्रामुख्यानें कारणीभूत झाले त्यांत नाथमाधवांना केव्हांहि उच्च स्थान मिळेल. आणि दुय्यम प्रतीचा कां होईना पण एक चांगला कादंबरीकार म्हणून मराठी वाङ्मयांत त्यांचें नांव कायम राहील यांत मुळींच संशय नाहीं.

वि. द. चिंदरकर

**नाथमाधवांचें वाङ्मयः—**

कादंबऱ्या – सामाजिकः – ( १ ) सायंकाळची करमणूक, १९०५. ( २ ) प्रेमवेडा, १९०५. ( ३ ) परवांची गोष्ट अथवा जग हें असेंच, १९०८. ( ४ ) बंगाल्यांतील पहिलें गुप्त मंडळ, १९०९. ( ५ ) विहंगवृंद, १९१३. ( ६ ) सुहासिनी, १९१४. ( ७ ) रायक्लब भाग १–२, १९१४. ( ८ ) ग्रहदशेचा फेरा, १९१५. ( ९ ) प्रेम आणि सूड १९१५. ( १० ) दोन भावंडें, १९१५. ( ११ ) दैवाचे खेळ, १९१६. ( १२ ) देशमुखवाडी, १९१६. ( १३ ) विमलेची ग्रहदशा, १९१७. ( १४ ) डॉक्टर कादंबरी भाग १–३, १९१८-१९. ( १५ ) सापत्नभाव, १९२२. ( १६ ) श्रीनिवासराव, १९२२. ( १७ ) स्वयंसेवक, १९२५. ( १८ ) नटसम्राट्, १९२५. ( १९ ) हृदयविकार – 'रणगर्जना' साप्ताहिक, १९२८. ( २० ) शरयू, १९२८. ( २१ ) वधूपरीक्षेचा घोंटाळा – 'कथापंचक'मधून, १९२५. ( २२ ) भविष्यप्रचीति, १९३२. ( २३ ) आत्मशोधन ( अपूर्ण ). ( २४ ) विसाव्या शतकाचा आरंभ ( अपूर्ण ). ( २५ ) बुद्धिभ्रम ( अपूर्ण ). ऐतिहासिकः –( २६ ) सांवळ्या तांडेल, १९०८,

१९२४. ( २७ ) तरुण रजपूत सरदार, १९०९. ( २८ ) वीरधवल, १९१३, १९२३. ( २९ ) नूरनिहार. ( ३० ) स्वराज्याचा श्रीगणेशा, १९२१. ( ३१ ) स्वराज्याची घटना, १९२१. ( ३२ ) स्वराज्याची स्थापना, १९२२. ( ३३ ) स्वराज्याचा कारभार, १९२३. ( ३४ ) स्वराज्यावरील संकट, १९२३. ( ३५ ) स्वराज्याचें परिवर्तन, १९२५. ( ३६ ) स्वराज्यांतील दुफळी, १९२७. ( ३७ ) मराठ्यांच्या इतिहासांतील स्त्रियांच्या गोष्टी ( अप्रसिद्ध ).

नाटकें व प्रहसनें:- ( १ ) शिक्षण-प्रहसन, १९०८. ( २ ) गजेंद्रसिंग, १९११. ( ३ ) एका रात्रीची मौज-प्रहसन, १९१५. ( ४ ) जातिवंत मराठा वीर, १९१७. ( ५ ) मराठ्यांचा आत्मयज्ञ, १९१७. ( ६ ) लोकसंग्रह, १९२१. ( ७ ) मोहन-तारा-प्रहसन, १९२७. ( ८ ) मनोहर कांता ( अप्रसिद्ध ), ( ९ ) भेदशासन ( अप्रसिद्ध ). ( १० ) कान्होपात्रा ( अप्रसिद्ध ).

इतर पुस्तकें:- ( १ ) बोधशतक रत्नाकर-कविता, १९२०. ( २ ) 'रंगभूमि' नाटकावरील टीका, १९२२. ( ३ ) उपासनी महाराज यांचें चरित्र, १९२३. ( ४ ) धर्मोपदेश, १९२४.

**चरित्र, चर्चा, अभ्यास:—**

( १ ) मृत्युलेख, रत्नाकर, ऑगस्ट १९२८.

( २ ) कै. नाथमाधव याच्या आठवणी; संग्राहक पु. बा. कुळकर्णी, १९३६.

( ३ ) नाथमाधवाची कुंडली, कुंडलीविज्ञान अंक ४ था.

( ४ ) जग हें असेंच व प्रेमवेडा, परीक्षण, केरळ-कोकिळ, डिसेंबर १९०८.

( ५ ) स्वराज्याचें परिवर्तन, गो. स. सरदेसाई, रत्नाकर, फेब्रुवारी १९२६.

**नेने विष्णु गणेश** [ १८६२-१९२४ ] कवि. यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यांतील वांडेपडेल या गांवीं झाला. विश्वविद्यालयाच्या प्रवेशपरीक्षेपर्यंत शिक्षण झाल्यावर यांनीं बी. बी. सी. आय्. रेल्वेंत नोकरी धरली. अध्यात्मविद्येकडे विशेष ओढा असल्यामुळें तद्विषयक वाङ्मयाचा यांनीं कष्टपूर्वक व्यासंग केला. गुजराथेंत गट्टूलाल नांवाचे एक सुप्रसिद्ध साधु होऊन गेले. त्यांच्या गुजराथी भाषेंतील 'पंचीकरण' नांवाच्या पुस्तकाचें यांनीं मराठींत भाषांतर केलें आहे. या पुस्तकामुळेंच आध्यात्मिक वाङ्मयाच्या भोक्त्यांत त्यांची विशेष प्रसिद्धि झाली. यांनीं-( १ ) प्रियमातृनिधन, ( २ ) पितृनिधन, ( ३ ) 'शोच्य मृत्युलोकवास' अर्थात् कै. डॉक्टर काशीनाथ वामन

काणे यांचें चरित्र, १८९२, ( ४ ) विष्णुस्तुति, ( ५ ) जीवितस्तोत्र, ( ६ ) जगदीशस्तोत्र, १८९३, ( ७ ) ईशदर्शन – इत्यादि काव्यें लिहिलीं आहेत. यांची बरीचशी कविता 'काव्यरत्नावलीं'तून प्रसिद्ध झालेली आहे. जुन्या कवींच्या वळणावरच यांची सर्व कविता असून तींतील भाषा अत्यंत सुगम व ओघवती आहे. वरीलपैकीं 'जीवितस्तोत्र' हें सुप्रसिद्ध कवि लॉंगफेलो ह्याच्या 'साम ऑफ् लाइफ'चें सुबोध आर्याबद्ध भाषांतर आहे. नौकरीव्यतिरिक्त यांचा बराचसा वेळ संध्या, देवपूजा, जपजाप्य, इत्यादि नैष्ठिक आचारांत जात असे व त्यांतून उरलेल्या वेळांत त्यांनीं ही काव्यरचना केलेली आहे. नैष्ठिक आचार व काव्यरचना यांच्यासंबंधींचा विरंगुळा वर्ज्य केल्यास यांना प्रपंचांत सुख असें मुळींच लाभलें नाहीं असें म्हटलें तरी चालेल. यांना झालेला एक मुलगा पांच वर्षांचा होऊन वारला. तीन मुली मोठ्या होऊन संसारकर्त्या झाल्या होत्या, पण त्या तिघीहि व एक जांवई त्यांच्या देखतच कालवश झालीं. यामुळें त्यांचें उत्तर आयुष्य विरक्तावस्थेंतच गेलें. संसारांतील अशा उद्वेगकारक स्थितीमुळें त्यांच्या कवितेवरहि बहुतेक शोकाचीच छाया पसरलेली आहे. सेवानिवृत्त झाल्यावर त्यांनीं आपला बहुतेक काळ महाराष्ट्रांतील अनेक तीर्थक्षेत्रींच घालविला. मधून-मधून बरेच वेळां ते आपले जामात रा. नरहर अनंत जोशी याचेकडे जाऊन-येऊन असत. शेवटचीं तीन-चार वर्षें मात्र त्यांचें वास्तव्य त्याच्याकडेच होतें. त्यांची प्रवृत्ति पहिल्यापासूनच परमार्थाकडे होती व तीस अनुसरून तरूणपणींच धोपेश्वर येथील प्रसिद्ध सत्पुरुष काका पुराणिक यांचा त्यांनीं अनुग्रह घेतला होता. पुराणिकांच्या निधनानंतर त्यांचें चरित्र त्यांनीं पद्यामध्यें लिहून ठेविलें. हें पद्यात्मक चरित्र अकरा हजार आर्यांचें आहे. ह्या प्रचंड काव्यग्रंथाच्या प्रकाशनार्थ नेने यांनीं आपल्या मृत्युपत्रांत स्वतंत्र रु. १००० (एक सहस्र रुपये) राखून ठेविले होते व तत्संबंधक व्यवस्थाधिकार आपले जामात उपर्युक्त रा. जोशी यांजकडे देऊन टेविला होता. त्यास अनुसरून रा. जोशी यांनीं नुकताच १९३२ मध्यें तो चरित्रग्रंथ उत्तम स्वरूपांत प्रसिद्धहि केला आहे. अलिकडील कवींत एवढी प्रदीर्घ काव्यरचना करणारा क्वचित्च एखादा आढळतो व त्या दृष्टीनें ह्या कवींचें वैशिष्ट्य ठळकपणें डोळ्यांत भरतें.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः—**

( १ ) चरित्र – काव्यरत्नावली, जानेवारी १९२७.

( २ ) 'काका पुराणिक चरित्र' – प्रस्तावना, प्रकाशक न. अ. जोशी, १९३२.

**नित्सुरे शिवराम रामकृष्ण** [ १८५०–१८७८ ] कवि. यांचा जन्म अहमदनगर जिल्ह्यांत झाला. मुंबईत कामाठीपुऱ्यांतील शाळेंत हे शिक्षक होते. यांची बरीच कविता ' विविधज्ञानविस्तार ' मधून प्रसिद्ध झाली आहे. ' विद्याधनप्रशंसा ' ( १८७२ ) या यांच्या काव्याशिवाय ' चातुर्यसंग्रह ' व ' परिमाणमाला ' हीं पुस्तकेंहि यांनीं लिहिलीं आहेत. ' इंग्रजी कलाकौशल्यें ' ही यांची चटकदार लावणी 'विविधज्ञानविस्तार'मध्येंच प्रसिद्ध झाली ( १८७६ ).

**पटवर्धन काशीनाथ नारायण** [मृत्यु १९०८] नाट्यटीकाकार. हे वऱ्हाड शाळाखात्यांत पहिल्यानें नोकर होते. नंतर त्यांची कुशाग्रबुद्धि, तरतरी व कर्तव्यनिष्ठा वऱ्हाडातील एका अत्यंत श्रेष्ठ अधिकाऱ्याच्या दृष्टोत्पत्तीला येऊन त्याच्या शिफारशीनें त्यांची बदली नागपुरला चीफ कमिशनर साहेबाच्या ऑफिसांत झाली. तेथें त्यांनीं आपलें काम फार समाधानकारक रीतीनें केल्यामुळें त्यांची नेमणूक खामगांव येथें नायब तहशीलदाराच्या हुद्यावर झाली. हे चांगले चित्रकार होते. यांनीं स्कॉटच्या ' टॅलिसमन ' या कादंबरीच्या आधारें 'संग्रामसिंह' नांवाचें नाटक लिहिलें आहे. परंतु यांचा विशेष लौकिक ' नाटक्याचे तारे ' या पुस्तकामुळें झाला. या पुस्तकाला श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनीं प्रस्तावना लिहिली आहे. त्यांत या पुस्तकासंबंधीं लिहितांना ते म्हणतात – "ललितकलांतील कृतींच्या मर्मज्ञ टीकाकारांना त्या कृतींतील गुणावगुण अचूक रीतीनें शोधून काढणें दुर्घट नसतें; परंतु ते हृदयंगम रीतीनें रसिकांपुढें मांडणें बरेंच कठिण असतें. कारण त्या कार्याला मर्मज्ञतेबरोबरच चांगल्या प्रतीच्या कल्पकतेची जोड असावी लागते. ही कल्पकताहि श्रीयुत पटवर्धन यांच्या अंगीं वसत होती याची साक्ष या पुस्तकाचें प्रत्येक पृष्ठ किंबहुना प्रत्येक वाक्य देईल. या पुस्तकांत पर्यायोक्ति, व्याजोक्ति, वक्रोक्ति इत्यादि भिन्नभिन्न प्रकारच्या लेखनपद्धती आढळून येतील. पुष्कळदां उपहासविषयीभूत ग्राम्य, बालिश, अज्ञानी किंवा मूर्ख व्यक्तींशीं लेखकाचें तात्पुरतेंहि तादात्म्य न झाल्यामुळें हास्यरसाचा बिघाड होतो; परंतु हास्यरसांतील विषय व विषयी यांसारखीं दोन अगदीं विसंगत नातीं स्वतःमध्यें कल्पिण्याची दुर्घट कलाहि पटवर्धन यांना उत्तम रीतीनें अवगत होती अशी या पुस्तकाच्या वाचनानें रसिकांची खात्री होईल. मासल्याकरितां या पुस्तकांतील – बाळंतपणांतील नाटकांचा अनुभव, नाट्यपीनलकोडाची चर्चा, नाटकगृहांतील गैरसोईवर ओढलेले

कोरडे, रस्त्याच्या व महालाच्या देखाव्यांतील व्यंगांवरील टीका, देखावे जसेच्या तसे चोरून घेण्यापासून घडणाऱ्या विसंगत प्रकारांचें आविष्करण, नाटक्याच्या नेहमींच्या पोशाखाच्या भपक्याचें व त्याच्या रंगभूमीवरील पोशाखांतील विसंगतपणाचें वर्णन, साधुसंतांच्या नाटकांसंबंधींची परिहासोक्ति, सूत्रधार-नटीवर्णन, ‘ दरोडेखोर मावळया ’ या नाटकाचें संविधानक, गणोबा मास्तरांची जहागीरदारांकडून व त्यांच्या कुटुंबीय व आश्रित मंडळीकडून झालेली संभावना — हे भाग वाचावे. त्यांवरून लेखकाच्या उज्ज्वल कल्पनेची वाचकाना साक्ष पटेल. ... ... कल्पनेच्या जोडीला लेखकाच्या अंगीं ती कल्पना भाषेंत वठविण्याची कला नसती तर तिचा उपयोग झाला नसता. परंतु पटवर्धन याचें मराठी भाषेवर चांगलें प्रभुत्व असून व्यंजनेच्या जोरावर मोजक्या शब्दांनीं विपुल अर्थ व्यक्त करण्यांत तर त्यांचा हातखंडा होता. त्याची भाषा व्याकरणशुद्ध व संप्रदायशुद्ध असून तींत प्रमाणबद्धताहि आहे. ... ... थोड्या शब्दांनीं विपुल अर्थ व्यक्त करणें हाहि वाङ्मयांतील एक गुण समजण्यांत येतो, व विनोदात्मक वाङ्मयांत तर तो अत्यंत परिणामकारक असतो. परंतु जेथें शब्दसंख्या व अर्थव्याप्ति यांमधील प्रमाण मर्यादेबाहेर जातें तेथें त्यापासून दुर्बोधता उत्पन्न होते, व दुर्बोधता रसविघातक असल्यामुळें शक्य तितकी टाळली पाहिजे. प्रस्तुत पुस्तकांत फारशी दुर्बोधता आढळणार नाहीं; मात्र ती मुळींच नाहीं असेंहि नाहीं. उदाहरणार्थ, २४ व्या पृष्ठावरील चाकू, कात्री व बोरूबहाद्दरांच्या एकवाक्यतेविषयींचा, व १३१ व्या पृष्ठावरील राष्ट्राची सुसंपन्नता ठरविण्याच्या कसोटीबद्दलचा मजकूर व्हावा तितका स्पष्ट झाला नाहीं. कधींकधीं अप्रसिद्ध स्थळाचा किंवा प्रसंगाचा संबंध आल्यामुळें भाषेला दुर्बोधता येते. ३० व्या व ३१ व्या पृष्ठांवर पुण्यांतील जाहिराती चिकटविण्याच्या ठिकाणासंबंधानें जो खुबीदार भाग आला आहे, त्यांतील स्वारस्य पुणें शहराचें मार्मिक ज्ञान असल्याशिवाय कळावयाचें नाहीं. ६१व्या पृष्ठावरील ‘ नरसू ’ शब्दाचा प्रयोग एके काळीं सुबोध असेल; पण तो दिवसेंदिवस दुर्बोधच होत जाणार. अशा प्रयोगाचें तात्पुरतेंच महत्त्व असतें, व चिरकालीन महत्त्वाच्या कोणत्याहि वाङ्मयांत त्यांचा प्रवेश होणें इष्ट नसतें. ”

प्रो. चिंतामण विनायक जोशी यांनीं या पुस्तकासंबंधीं पुढीलप्रमाणें लिहिलें आहे— “ मराठी रंगभूमीवर पटवर्धन यांची ‘ नाटक्याचे तारे ’ ही लेखमाला बहुमोल आहे. नाटकगृहाची रचना, कथानकाच्या कालाचा विचार न करितां

मनास येईल तसे वेष धारण करण्याची पद्धत, पात्रांचीं हिडीस रूपें व वेडाविद्रा अभिनय, नाटकांतील संगीत, प्रेक्षकांना शीण आणणारी सीनसिनरी, सूत्रधार-नटींचा निरर्थक प्रवेश इत्यादि नाट्यांगांवर फारच विनोदी व मार्मिक टीका नाटक्यानें या 'तार्‍यां'त केली आहे. उपहासात्मक टीकेचा हा चांगला मासला आहे. " ( विनोदी वाङ्मय, यशवंत, एप्रिल–मे १९३०. )

**पटवर्धन का. ना. यांचें वाङ्मयः** – ( १ ) महाराणा संग्रामसिंह नाटक, १९०९; ( २ ) नाटक्याचे तारे, १९१४.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः—**

( १ ) मृत्युलेख – मनोरंजन पु. १४ पूर्वार्ध अं. ५ स. १९०८.

**पटवर्धन पांडुरंग नरसिंह** [ १८८६ – १९२१ ] इतिहास-संशोधक. जानशीकर पटवर्धन घराण्यांत यांचा जन्म झाला. यांचे वडील नरसोपंत विंचूर, कळवण इत्यादि ठिकाणीं शाळामास्तर होते. नरसोपंताचे बंधु पुण्याचे सुप्रसिद्ध कै. रा. ब. सीतारामपंत पटवर्धन. पांडोबांची घरची गरिबी; तेव्हां विद्याभ्यासासाठीं पांडोबा नगरास आपले चुलते केशवराव पटवर्धन यांच्या घरीं राहिले. त्यांचा विद्याभ्यास ' अहमदनगर ए. सो. 'चे स्कुलांत व हायस्कुलांत झाला. इंग्रजी भाषा व इतिहास या विषयांकडे त्यांचा प्रथमपासूनच विशेष ओढा असे. सन १९०५ त ते मॅट्रिक व स्कूलफायनल झाले. नंतर कांहीं दिवस त्यांनीं सरकारी नोकरी केली. परंतु त्यांच्या तल्लख स्वभावाला ती मानवली नाहीं. एकदां कांहीं खटका उडून यांनीं भर कचेरींत वरिष्ठाच्या श्रीमुखांत भडकाविली व नोकरीचा खाडकन् राजिनामा दिला ! तेव्हांपासून ते रा. ब. सीतारामपंत यांचे मुखत्यार म्हणून पुण्यास त्यांचें कामकाज पाहत असत. रावबहादुराचे पश्चात् ते घरींच असत. त्यांस सार्वजनिक कामाची फार हौस व कळकळ होती. वर्तमान-पत्रास बातमीपत्रें – इंग्रजी व मराठी – वगैरे ते पुष्कळ पाठवीत. खेडोपाडीं हिंडून ते अनेक चळवळी चालवीत. ' राष्ट्रहितैषी ' नांवाचें भारदस्त साप्ताहिक त्यांनीं कांहीं महिने चालविलें होतें. त्यांचा उद्योग दांडगा, वाणी मधुर, राहणी साधी व बुद्धि कुशाग्र होती. इतिहाससंशोधनाची आवड त्यांस अपरंपार होती. ते शेंकडों गावीं हिंडून चिकाटीनें माहिती जमवीत. ' भारत इतिहास संशोधक मंडळा 'चे ते एक एकनिष्ठ, होतकरू, तरतरीत व अभिमानी सभासद होते. मंडळानें त्यांस

तहाह्यात सभासद करून कारभारी मंडळांतहि त्यांची निवड केली होती. राष्ट्रकूटांचा पुण्याचा ताम्रपट, चिंचवडकर देव, चांबळीकर सरनाईक, वाघोलीचे रामेश्वरभट वगैरे शेंकडों घराण्यांत त्यांनीं कागदपत्र शोधले, व पुष्कळ नवीन माहिती प्रसिद्ध केली. पटवर्धन ब्रह्मचारी होते. ( प्रो. द. वा. पोतदार, भा. इ. सं. मं. त्रैमासिक, वर्ष ३ अं. १. )

**पटवर्धन यांचे संशोधनात्मक लेख व ग्रंथः**–( १ ). रणदुल्लाखानाचा घुमट ( भा. इ. सं. मं. द्वितीय संमेलन वृत्त, पृष्ठ २६५-२६९, १९१४ ). ( २ ) पिरंगुट येथील कुळकर्ण्यांचा हकलाजिभा ( भा. इ. सं. मं. तृतीय संमेलनवृत्त. १९१५. पृष्ठ १३१–१४१. ). ( ३ ) औरंगजेबाचें शिवाजीस पत्र, ( भा. इ. सं. सं. चतुर्थ संमेलनवृत्त, १९१६, पृष्ठ ७३–७८ ). ( ४ ) जिऊ महाला, ( भा. इ. सं. मं. पंचम संमेलनवृत्त, १९१७, पृ. १६–१८ ); ( ५ ) पंताजी गोपीनाथ बोकील, (भा. इ. सं. मं. सप्तम संमेलनवृत्त, १९१९, पृ. ५३-६५); ( ६ ) ज्योतिपंतदादा महाभागवत, ( भा. इ. सं. मं. अहवाल शके १८३४, पृ. ७४–७९ ); ( ७ ) तुकाविप्राचा प्रयाणकाळ कोणता? (सदर पृ. ७९); ( ८ ) आंगरे यांचे महजर व इतर कागदपत्र; ( भा. इ. सं. मं. अहवाल शके १८३५, पृ. ३४२–३९९ ); ( ९ ) संभाजीचा वध ( अहवाल शके १८३६, पृ. १८९–१९५ ); ( १० ) गंगाधरशास्त्री पटवर्धन यांचें आत्मचरित्र ( भा. इ. सं. मं. त्रै. वर्ष ३, पृ. १७–४१ ). याखेरीज पटवर्धनांचीं बरींच संशोधनात्मक टिपणें भा. इ. सं. सं. च्या अहवालांतून व त्रैमासिकांतून प्रसिद्ध झालीं आहेत. ( ११) बुंदेल्याची बखर, १९२०.


**पटवर्धन वासुदेव बळवंत** [ मृत्यु १९२१ ] कवि, काव्यचर्चापटु व अध्यापक. यांचा जन्म सातारा जिल्ह्यांत झाला. उच्च शिक्षण नागपुरास होऊन ‘कलकत्ता विश्वविद्यालया’ची बी. ए. ची त्यानी पदवी घेतली. पदवी घेतल्यावर १८९३ सालीं त्यांनीं पुणें येथील ‘न्यू इंग्लिश स्कुलां’त नोकरी धरली व १८९५ सालीं ते ‘डेक्कन एज्युकेशन सोसायटी’चे आजीव सेवक झाले. पुढें यांस ‘फर्ग्युसन कॉलेजां’त इंग्लिश भाषेचे अध्यापक नेमण्यांत आलें. शेक्स्पीअरचीं नाटकें व वर्डस्वर्थ, ब्राउनिंग वगैरे कवींचीं काव्यें शिकविण्यांत त्यांचा हातखंडा असे. जुन्या मराठी कवितेचाहि यांचा व्यासंग दांडगा होता. या व्यासंगाचें निदर्शक




धनुर्धारी



बालकवि ठोमरे



बाबा पद्मजी



शं. बा. दिक्षित



नाथमाधव



दत्तात्रय बळवंत पारसनीस

म्हणजे त्यांनीं 'मुंबई विश्वविद्यालया'च्या भाषाशास्त्रविषयक व्याख्यानमालेंत दिलेलीं व्याख्यानें व तुकारामाचे अभंगांवर केलेली चर्चा होय. पटवर्धन बुद्धिवादाचे कट्टे पुरस्कर्ते असून आगरकरांचे अनुयायी होते. आगरकरांच्या मृत्यूनंतर कांहीं वर्षे 'सुधारक' पत्र त्यांनीं चालविलें होतें.

पटवर्धन हे स्वतः उत्तम कवि होते. कवि 'केशवसुत' यांच्याशीं त्यांचा जिव्हाळ्याचा स्नेह होता. 'वसंत' या टोपण नांवानें त्यांची कांहीं कविता प्रसिद्ध झालेली असून, बरीच अप्रसिद्ध आहे. 'काव्य व काव्योदय' हें त्यांचें काव्यचर्चात्मक पुस्तक बरेंच प्रसिद्ध आहे.

"त्यांची योग्यता 'खरे रसिक व मार्मिक टीकाकार' म्हणून फार होती. त्यांना गद्यापेक्षां पद्य, देहापेक्षां आत्मा, कुडीपेक्षां प्राण आवडे. स्वतः ते कवि असून इंग्रजी वाङ्मयाचें त्यांचें अध्ययन जवळ जवळ तीस-पस्तीस वर्षे झालेलें; त्यामुळें त्यांना 'रसिक' ही पदवी प्राप्त होऊन त्यांचे विचार, उच्चार व आचार काव्यमय होऊन गेले होते. मराठी वाङ्मयावरीलसुद्धां त्यांचा व्यासंग वाखणण्याजोगा झालेला होता. मराठी संतकवींत, विशेषतः तुकाराम व नामदेव यांवर त्यांचा भर विशेषच होता. डॉ. भांडारकर यांच्या अध्यक्षतेखालीं 'तुकाराम मंडळ' स्थापन झालें होतें. मंडळाची बैठक पुण्यास 'प्रार्थनासमाजां'त दर शुक्रवारीं संध्याकाळीं ६ ते ७ भरे. सभासद दहा-बारा असत, व या सर्वांनीं मिळून तुकोबाचा प्रत्येक अभंग घेऊन त्या अभंगाची छाननी व्याकरणदृष्ट्या, भाषाशास्त्रदृष्ट्या, अर्थदृष्ट्या व तत्त्वदृष्ट्या करावी व अशा रीतीनें अभंगांची चांगली चर्चा होऊन डॉ. भांडारकरांच्या संमतीनें अवघड मुद्यांचा निकाल होत. असे. अभंगासंबंधीं सर्व टिपणें करून घेण्याचें काम पटवर्धन करीत असत......पटवर्धनांच्या भाषेसंबंधीं सांगावयाचें झाल्यास त्यांची भाषा जिव्हाळ्याची असे असें म्हणतां येईल. मनास वाटेल, पटेल, तेंच शब्दचित्रानें तंतोतंत ओजस्वी भाषेंत सादर करावयाचें हा त्यांच्या भाषेचा विशेष गुण होता. हृदयांतून उगम पावणारी व वाचकाच्या हृदयांत जोरानें घुसून तेथेंच विलीन होणारी अशी हृदयस्पर्शी त्यांची भाषा होती." (द. वि. पारखे)

आयुष्याच्या अखेरी-अखेरीस त्यांजकडे 'फर्ग्युसन कॉलेज'चें प्रमुखपण आलें होतें. अत्यंत एकांतप्रिय असल्यानें सार्वजनिक चळवळींत ते फारसे कधीं पडले

नाहींत. सारें आयुष्य त्यांनीं वाङ्मयाभ्यासांत व तत्त्वचिंतनांत घालविलें. त्यांची वाङ्मयविषयक विशिष्ट कामगिरी म्हणजे त्यांनीं वाङ्मयचर्चेची दाखवून दिलेली नवी दिशा होय.

**पटवर्धन वासुदेव बळवंत यांचें वाङ्मयः**—( १ ) राजनीतीचीं मूलतत्त्वें; ( २ ) शिक्षण, शिक्षक व अभ्यासक्रम, १९०६; ( ३ ) काव्य आणि काव्योदय; ( ४ ) वाग्विहार भा. १; ( ५ ) तुकाराम महाराजांच्या अभंगांची चर्चा, १९२७.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः**—

( १ ) वासुदेव बळवंत पटवर्धन — प्रो. रा. कृ. लागू व प्रो. वि. के. जोग, नवयुग, ऑगस्ट — सप्टेंबर ११२१.

( २ ) मृत्युलेख — बा. वा. देवधर व द. वि. पारखे, मनोरंजन पुस्तक २७, पूर्वार्ध, अंक ५, १९२१.

( ३ ) काव्य आणि काव्योदय ( परीक्षण ) — बा. अ. भिडे, विविधज्ञानविस्तार नोव्हेंबर — डिसेंबर, १९२२.

**पदमनजी बाबा** [ १८३१—१९०६ ] कोशकार व मराठी खिस्ती सारस्वताचे जनक. यांचा जन्म बेळगांव येथें मारुतीआळींत झाला. 'अरुणोदय'* या आपल्या आत्मवृत्तपर ग्रंथांत त्यांनीं स्वतःसंबंधीं जी माहिती दिली आहे ती येथें संक्षेपानें देत आहोंः—"माझीं मातापितरें मुंबईच्या कांसार ज्ञातीचीं असून सुरतकरांच्या घराण्यांतील होतीं. आमचें कुल सधन व प्रतिष्ठित होतें. माझ्या वडिलांच्या मायआजीच्या कुटुंबांतील पुरुषांकडे शेटयेपणाचा अधिकार होता ( कांसार जातीच्या मुख्यास शेटे म्हणतात ), आणि त्यांच्या बापआजाच्या घराण्यांतील

---

* या पुस्तकांत बाबा पदमनजींनीं आपण खिस्ती धर्माचा स्वीकार करीपर्यंतचा स्वतःचा इतिहास दिला आहे. हें पुस्तक क्राउन षोडशपत्री आकाराचें ४११ पृष्ठांचें आहे. हें आत्मचरित्र अनेक दृष्टींनीं महत्त्वाचें आहे. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत हिंदु तरुणांत धर्मांतर करण्याची जी भयंकर लाट उसळली होती तिच्या कारणांवर या पुस्तकामुळें चांगलाच प्रकाश पडतो. हें पुस्तक हल्लीं दुर्मिळ आहे. त्यामुळें येथें त्यांतील बरेच उतारे येथें बुध्द्याच दिले आहेत.

—संपादक.

पुरुष मोतीं व जवाहिराचा व्यापार करणारे होते. त्यांची मुंबईत मोठी पेढी असून ते सुरतेच्या व्यापाऱ्यांशीं व्यवहार ठेवीत. ते बहुत वर्षे सुरतेस जाऊन राहिले होते म्हणून त्यांस सुरतकर असें नांव पडलें, परंतु आमचें उपनांव मुळे आहे. माझे चुलतचुलत आजे बापुशेट सुरतकर हे कांसार ज्ञातींत मोठे वजनदार व धनवान पुरुष होते. जसे मुंबईच्या सोनार ज्ञातींत श्रीमंत आनरेबल जगन्नाथ शंकरशेट होते तसेच ते कांसार लोकांत श्रेष्ठ मानिले असत. मुंबई सरकारांतहि त्यांस बहुमान होता, कारण ते त्या वेळच्या टांकसाळींत रूपें, तांबें वगैरे धातू पुरविण्याचें कंत्राट घेत असत.

"हे आमचे पूर्वज व्यापारासंबंधानें बरेच दिवस सुरतेस जाऊन राहिल्यामुळें त्यांच्या मराठी भाषेंत गुजराथी भाषा मिसळून पुष्कळ पालट झाला, इतकेंच नव्हे तर त्यांच्या पोषाकांतहि फरक पडला. ते पारशी किंवा गुजराथी लोकांप्रमाणें जामे घालीत, व जुन्या परभू लोकांप्रमाणें बंदरी पगड्या वापरीत. माझ्या तीर्थरूपांचें नांव पदमनजी माणिकजी. त्यांचा अभ्यास प्रसिद्ध व विद्वान कर्नल जर्विस साहेब याच्या इंजिनियरींग स्कुलांत झाला आणि त्यांस प्रथम दक्षिण कोंकणांत सब्-असिस्टंट सर्वेयर व बिल्डरची जागा मिळाली. नंतर तेथून लवकरच त्यांची बदली बेळगांवास झाली.

"माझा मराठी भाषेचा अभ्यास बेळगावांतील सरकारी मराठी शाळेंत झाला. ही शाळा १८३० त स्थापली होती. शाळेची जागा गावांतील आदितवारपेठेंत होती; तींत खोल्या नव्हत्या; केवळ लांबच लांब घोडसाळ किंवा उतारशाळेप्रमाणें ती होती. शाळेंत घड्याळ नव्हतें, सावलीच्या खुणांवरून सुटी देत असत. मुलां-करिता सरकारी पाट्या होत्या, कोणी मुलें आपल्या घरच्या पाट्या आणून तेथेंच ठेवीत. स्लेटींच्या ऐवजीं बहुतेक मुलें टिनाचें तगट वापरीत. त्यावर शाईनें हिशेब मांडीत, व ते ओल्या फडक्याच्या बोळ्यानें पुसून टाकीत. स्लेटपेन्सलीच्या ऐवजीं 'बळू' नांवाच्या मातीच्या तुकड्यानें लिहीत. अभ्यास म्हटला तर साधारणच, म्हणजे धूळाक्षर, कित्ते वळविणें, खरडे लिहिणें, मोडी कागद वाचणें असा होता. संध्याकाळीं मुलें परवचा म्हणत. वरच्या वर्गांत कांहीं भूगोल, व्याकरण, गणित शिकवीत. वाचनाकरितां बालगोष्टी, मनोबोधकथा इसापनीति, लघुहितोपदेश, सिंहासनबत्तिशी, वेताळपंचविशी, पंचोपाख्यान, मराठ्यांची बखर, इंग्लंदचा इतिहास, बालमित्र, बैठकचावडी, जागती जोत इत्यादि

पुस्तकें होतीं. व्याकरण शिकविण्यासाठीं 'बाळ व्याकरण' (बाळशास्त्री जांभेकर) यांचें व दादोबांचें व्याकरण ( १ ली आवृत्ति ) हीं होतीं.......मी शाळेंत असतांना एकदां सदाशिव काशीनाथ छत्रे (' बाळमित्रा 'चे भाषांतरकर्ते ) हे मराठी शाळांची देखरेख करावयास मुंबईहून आल्याचें मला आठवतें. परंतु त्या वेळीं मी फार लहान होतों. त्यांच्या मागून बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर हे मी शाळेंत असतांना दोनदां देखरेखीस आले. त्यांचा लोकांनीं बहुमान केला. त्यांच्या सुधारलेल्या मतांवरून त्यांचा कल ख्रिस्ती धर्माकडे आहे, व ते पाव-बिस्कुटें खातात व ग्लासानें पाणी पितात अशी लोकांत कंडी उठली होती; त्यांच्याशीं वाद करावयास कित्येक वैष्णवांच्या आचार्यांनीं कंबरा बांधल्या होत्या, परंतु त्यांनीं तो प्रसंग टाळला. हे शास्त्रीबावा तेथील मिशनरींच्या भेटीस वारंवार जाऊन फार वेळ त्यांच्याशी संभाषण करीत बसत; तसेंच मार्गांतून पालखींत बसून जातांना साहेब लोकांप्रमाणें बुक वाचीत; त्यावरून ते 'बैबल' वाचतात असा लोकांनीं तर्क केला होता."

बाबांचें इंग्रजी शिक्षण बेळगांव येथील 'मिशन स्कुलां'त व मुंबईस कांहीं दिवस सरकारी इंग्रजी शाळेंत व पुढें डॉ. विल्सनच्या 'फ्री चर्च स्कुलां'त झालें. मुंबईतील शाळेंत महादेवशास्त्री कोल्हटकर, गोविंद नारायण माडगावकर, दादाभाई नौरोजी ही मंडळी शिक्षक होती. बाबांनीं आत्मचरित्रांत महादेवशास्त्र्यांच्या सुंदर मराठीची व दादाभाईंच्या इंग्रजीची फार तारीफ केली आहे. बाबा मुंबईत आलेल्या काळांत सर्वत्र सामाजिक अंदाधुंदी होती. हिंदु समाजाचें नियमन करील असा पुरुष त्यावेळीं कोणी नव्हता. इंग्रेजी शिक्षण मिळालेल्यांस अग्रेसरत्व प्राप्त झालें होतें; पण या लोकांच्या मनाची स्थिति अत्यंत अनुकंपनीय होती. जुनें सुटलें होतें व नवें आत्मसात् करण्याची ताकद नव्हती. आपण काय करीत आहों याचा नीट उमज या लोकांस झाला नव्हता. शिक्षणप्रसाराच्या नांवाखालीं इंग्रज मिशनरी स्वसंस्कृति, स्वधर्म व स्वभाषा याचा प्रसार करीत आहेत, नव्हे त्यांचीं पाळेंमुळें घट्ट रुजवून हिंदुसंस्कृतीला हिंदुस्थानातून पाळांमुळांसकट उखडून फेंकून देण्याचा भगीरथ प्रयत्न करीत आहेत याची अंधूक सुद्धां कल्पना या अग्रणींना आली नाहीं. प्रवाहपतितासारखी त्याची स्थिति होती. एवढे दादोबा पांडुरंग, भाऊ महाजन, बाळशास्त्री, पण तेसुद्धां चकले. दादोबांना आपल्या पूर्वजांचा धड इतिहासहि माहीत नव्हता, मग अभिमान तर दूरच! इतिहासाचें संशोधन करावें,

जुन्या-नव्या वाङ्मयाचा तुलनात्मक अभ्यास करावा, हिंदुस्थानांत आज हजारों वर्षें निरनिराळ्या संस्कृतींचे अनेक प्रवाह वाहिले असतांहि त्या सर्वांना पोटांत घालून हिंदुस्थानानें आपलें सांस्कृतिक वैशिष्ट्य गमाविलें नाहीं या गोष्टीवर विचार करावा असें दादोबासारख्यांना कधीं वाटलें नाहीं. शालेय पुस्तकें — आणि तींहि इंग्रजांच्या पुस्तकांच्या आधारें — लिहिण्यांत व मिशनऱ्याचीं स्तुतिस्तोत्रें गाण्यांत यांनीं धन्यता मानिली. शिक्षणप्रसाराचें कार्य स्वतंत्रपणें आपल्या हातीं घेऊन इंग्रजी अमदानींतहि परक्यांचा वरचष्मा होऊं न देतां स्वोन्नति घडवून आणण्याची धमक एकानेंहि बाळगिली नाहीं. राष्ट्राचा इतिहास शाळांत घडत असतो हें सूत्रवाक्य आठवून त्यावर ते विचार करते, तर महाराष्ट्राची जवळजवळ अर्धशतक जी प्रवाहपतितासारखी स्थिति झाली ती झाली नसती. हें सूत्रवाक्य एकाच पुरुषाला आठवलें. हा पुरुष विष्णुशास्त्री चिपळूणकर होय. या पुरुषानें या सूत्रवाक्यावर जोरदार भाष्य करून महाराष्ट्राचे डोळे उघडले. दिशा चुकली आहे याचा बोध याच वेळीं झाला. पण हा बोध कितीतरी उशीरां झाला. त्याआधीं सांस्कृतिक दृष्ट्या महाराष्ट्राचें जें नुकसान झालें आहे त्याची कल्पनाच करवत नाहीं.

बाबा फ्री चर्च 'मिशन'च्या शाळेंत आल्यापासून त्यांची प्रवृत्ति ख्रिस्ती धर्माकडे वळूं लागली. आणि दुर्दैवाची गोष्ट अशी कीं त्या वेळच्या दोन थोर विद्वान लेखकांच्या लिखाणानीं ही प्रवृत्ति अधिक बळावली. हे दोन गृहस्थ म्हणजे 'प्रभाकर'कर्ते भाऊ महाजन व 'लोकहितवादी' हे होत. बाबा म्हणतात—" 'प्रभाकर' पत्र रा. भाऊ महाजन हे काढीत असत. हे गृहस्थ विद्वान् असून पहिल्या प्रतीचे मराठी लिहिणारे होते, त्यांचाहि मजवर फार लोभ होता. ख्रिस्ती धर्माविषयीं त्यांचें असें मत होतें कीं मनुष्याच्या सामाजिक सुखाच्या वृद्धीसाठीं हा धर्म फार चांगला आहे. त्याच्या पत्रांत ' लोकहितवादी ' या सहीची जी दीर्घ निबंधमाला लागली होती तिजपासून मला अत्यंत उपयोग झाला. ब्राह्मणधर्म व ब्राह्मणांचें श्रेष्ठत्व यांजवरील माझा विश्वास व पूज्यबुद्धि हीं उत्तरोत्तर नष्ट होण्यास ही पत्रमालिकाच बहुतेक कारणीभूत झाली." या काळांत थोरल्या चिपळूणकरांनीं ' विचारलहरी ' नांवाचें ख्रिस्तीधर्मविरोधी पत्र काढलें होतें, पण त्याची जरब ख्रिस्तीधर्मप्रसारकांवर व त्यांच्या स्तुतिपाठकांवर बसूं शकली नाहीं. बाबांनीं या पत्रावर— 'त्यांतील विचार फारच हलकट व पोरकट होते' ( 'अरुणोदय' पृष्ठ १६३)

असा अभिप्राय दिला आहे. हें जरब बसविण्याचें काम विष्णुशास्त्र्यांनींच केलें. यांनीं आपल्या 'निबंधमालें'तून खिस्ती धर्मावर व त्याचा प्रसार करणारे व त्याकडे ओढा असणारे अशांवर जे हल्ले चढविले ते या सर्व परिस्थितीचा विचार केला असतां योग्यच होते असें वाटूं लागतें. स्वजनांच्या निर्भत्सनेला किंवा तेजोभंगाला कांहीं तरी मर्यादा आहे. मर्यादेपलीकडे गोष्टी गेल्या म्हणजे हित न होतां अन-हितच फार होतें. 'लोकहितवादी' लोकाचें चांगलें व्हावें, ते सुधारावे म्हणून निर्भत्सना करीत हें खरें, पण त्यांनीं त्याला मर्यादा ठेविली नाहीं. ह्याचा परिणाम तरुण पिढीवर किती प्रतिकूल होत होता हें बाबा पदमनजींच्या उदाहरणावरून सिद्ध होतें. जे टीकाकार स्वगृह, स्वसमाज, स्वदेश सुधारण्याकडे तरुणांना प्रवृत्त न करतां त्यांशीं फटकून वागून त्यांची निंदा करून परक्यांची धन करावयाला त्यांना प्रवृत्त करतात, त्यांस एखाद्या स्वदेशाचा, स्वधर्माचा व स्वभाषेचा जाज्वल्य अभिमान बाळगणाऱ्यानें स्वजनद्रोही म्हटलें तर तो त्यानें मोठा गुन्हा केला असें आम्हांस वाटत नाहीं. 'लोकहितवादीं'वर विष्णुशास्त्र्यांनीं केलेल्या आग्निवर्षावाबद्दल जे लोक त्यांस दोष देतात, ते लोक ज्या परिस्थितींत त्यांना असें करावें लागलें त्या परिस्थितीचा विचार करीत नाहींत. याला दुसरेंहि एक कारण आहे. हें कारण म्हणजे त्या काळच्या सामाजिक इतिहासाचें अज्ञान होय. हे लोक आजच्या काळाच्या चष्म्यांतून या टीकेकडे पाहत असतात.

बाबा काहीं दिवस 'परमहंस मंडळीं'त शिरले होते. पण बाह्यांशीं चोवीस तास संबंध येत गेल्यामुळें तेथेंहि त्यांचें मन स्थिरावलें नाहीं; व अखेरीस १८५४ त ते खिस्ती बनले.

"खिस्ती झाल्यावर सुमारें सोळा वर्षें बाबा पुण्यास होते. तेथें बराच काळ पर्यंत 'फ्री चर्च मिशन शाळें'त त्यांनीं शिक्षकाचें काम केलें. या कामावर असतांच १८६० मध्यें बाबांनीं कँडीच्या 'इंग्रजी-मराठी कोशा'चा संक्षेप 'शब्दरत्नावली' नांवाचा केला. १८७० त त्याची दुसरी आवृत्ति काढली. ...... १८५७ त बाबांस 'फ्री चर्च मिशन पुणें' येथील 'पालक' दीक्षा झाली. त्या कामाचा राजिनामा बाबांनीं १८७३ त दिला. 'ऐक्यवर्धक पत्रिका' 'सत्यदीपिका' ह्या हें काम करीत असतांनाच त्यांनीं काढल्या. १८७३ पासून लेखनव्यवसाय हाच बाबांचा मुख्य आधार झाला. १८७७त त्यांनीं 'बैबल सोसायटी' व 'ट्राक्ट सोसायटी' यांची एडिटरी पत्करली. 'नवा करार' वगैरे पुस्तकें यांच्याच हातून तडीस गेलीं. हें संपादकीय

काम २५ वर्षें केल्यावर १९०२ मध्यें ७१ व्या वर्षी त्यांस पेन्शन मिळालें ! १९०६त ते 'प्रभूंत लीन झाले !' ख्रिस्तवासी रे. टिळक म्हणतात– "रे. बाबा पदमजी म्हणजे मराठी ख्रिस्ती सारस्वताचे जनक होत. त्यांच्या हातून बनलेलीं मराठी पुस्तकें वजा केलीं, तर आज मराठी ख्रिस्ती वाङ्मय असून नसल्या-सारखें होईल. त्यांनीं एकट्यांनीं लिहिलेलीं लहान-मोठीं पुस्तकें शंभरांवर आहेत ! ह्यांत त्यांच्या वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या लेखांचा समावेश केला तर हें वाङ्मय कसें एखाद्या डोंगरासारखें दिसूं लागतें ! ह्या वाङ्मयाच्या ठायीं प्रतिभाहि तशीच विलक्षण आहे.' बाबाची भाषापद्धति खरोखरच फार गोड आहे. त्यात भक्तीचा जिव्हाळा आहे. समाजसुधारणेची तळमळ आहे. वाक्यें शुद्ध, साधीं, सरस व चटकदार आहेत. लिहिणें गंभीर व प्रौढ आहे. शब्द वेंचक आहेत. वळण जरा कोंकणी आहे. त्याची गोड भाषा व सुंदर टापटिपीची मांडणी पाहतां बाबाची गणना उत्तम मराठी लेखकांत केली पाहिजे. त्यांचीं मतें कांहींहि असलीं तरी त्यांची वाङ्मयसेवा कौतुकार्हच आहे !" (पोतदार, 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार' पृ. ९५–९६.)

बाबा पदमनजींचीं कांहीं पुस्तकें:—

(१) यमुनापर्यटण, १८५७, १८८२, १८९०; (२) शब्दरत्नावली, १८६०; (३) इंग्रजी-मराठी कोश, १८६३; (४) मराठी-इंग्रजी कोश १८६३, १८७०; (५) सटीक मराठी नवा करार, १८७४, १८७७; (६) साहित्य-शतक, १८७६; (७) नूतन जन्म, १८७९; (८) जगत्‌शेटाचा पुत्र नरनायक, १९७९; (९) मुक्तिमार्गमीमांसा १८७८ (१०) मूर्तिपूजेवरील संवाद १८८१ (११) ख्रिस्ती व हिंदु जीवित यांची तुलना, १८८१; (१२) हिंदु धर्माचें स्वरूप-भाग १–२, १८८३,१८८४; (१३) हिंदु लोकांच्या सणां-विषयीं निबंध, १८८१; (१४) स्त्रीविद्याभ्यास निबंध; (१५) व्यभिचार-निषेधक बोध; (१६) कुटुंब सुधारणा; (१७) निबंधमाला; (१८) अरुणो-दय; (१९) अनुभवसंग्रह भाग १–२, १८९४,१९०४; (२०) सहभोज-नाचा (ख्रिस्त्याचा) सहचर, १८८९; (२१) वैदिक हिंदु धर्म, १८९२; (२२) संस्कृत-मराठी कोश, १८९१; (२३) हिंदु आणि ख्रिश्चन यांच्या धर्म पुस्तकांत वर्णिलेला स्वर्ग, १८८४; (२४) पवित्रशास्त्र विरुद्ध कांहीं

ब्राह्मणीय भूगर्भशास्त्रविषयक व देवताविषयक आक्षेपांचा विचार, १८९२; ( २५ ) निसीमा, १८९३; ( २६ ) लाभालाभ, १८९५; ( २७ ) हिंदु धर्म व ख्रिस्तीधर्म याची तुलना, १९०३; ( २८ ) बापाकडे जाणें, १९०४; ( २९ ) जातिभेदाविवेचन.

**पदे शंकर दाजीशास्त्री** [ मृत्यु १९०९ ] कादंबरीकार व आयुर्वेद ग्रंथप्रकाशक. यांनीं 'सुंदराबाई' नांवाची एक कादंबरी व 'प्रेमपरीक्षण' ( १८९३ ) ही नाटिका लिहिली असून आपल्या वैद्यकीय व तत्सम पुस्तकांच्या द्वारां आयुर्वेदशास्त्रांत महत्त्वाची भर घातली आहे. यांचीं हीं पुस्तकें येणेंप्रमाणेः– ( १ ) अश्वरोगपरिज्ञान, १८९१; (२) रसवैद्य, १८९१, १८९८; (३) वैद्यविजय अर्थात ज्वरपराजय, १८९३; (४) हारीतसंहिता सार्थ-भाग १ ला, १८९५; ( ५ ) बृहन्निघंटु, १८९७; ( ६ ) योगशतक सार्थ, १८९६; (७) निघंट शिरोमणि, १८९८; (८) ग्रंथिक सन्निपात, १८९९; (९) औषधी गुणदोष, १८९९; (१०) चरकसंहिता सार्थ-भाग १–१४; (११) औषधी क्रिया, १९००,१९१४; ( १२ ) त्रिदोषविचार-भाग १–२, १९०२, १९०३; ( १३ ) त्रिदोषपद्धति, १९०८; ( १४ ) औषधी बाड, १९१३; (१५) नपुंसकमीमांसा आणि कामसंजीवन; ( १६ ) बृहत्पाकसंग्रह; ( १७ ) वनौषधिगुणादर्श-भाग १–७; (१८) वाग्भट ( मराठी ) – भाग १–२; (१९) वैदिक दिनचर्या; (२०) हल्लींचा वीर्यनाश व त्यावर उपाय; ( २१ ) सुबोध वैद्यक; ( २२ ) गोवैद्यक.

**परचुरे हरि बल्लाळ** [ मृत्यु १९२३ ] चरित्रकार. यांचें प्रवेश परीक्षेपर्यंतचें शिक्षण पुण्यास व पुढें बी. ए. पर्यंतचें शिक्षण नागपुरास झालें. प्रि. वासुदेवराव पटवर्धन व मोतीबुलासा ह्यांचे हे सहाध्यायी असून तरुणपणीं आगरकरांचे एकांतिक भक्त होते. पुढें-पुढें निरीश्वरवाद न पटून ते 'प्रार्थनासमाजी' बनले. हे कर्ते सुधारक होते. त्यांनीं पुनर्विवाह केला होता. कांहीं महिने अमेरिकेंत त्यांनीं प्रवास केला होता. वऱ्हाड शाळा खात्यांत हे नोकरीला होते. यांनीं गोपाळराव आगरकरांचें चरित्र ( १८९६ ) लिहिलें आहे. यांना अकोला येथें देवाज्ञा झाली.

**परांजपे कृ. शि.** [ मृत्यु १९३० ] सुप्रसिद्ध साहित्यसेवक शिवरामपंत परांजपे यांचे हे ज्येष्ठ चिरंजीव. 'डेक्कन कॉलेजां'तून हे बी. ए. झाले व पुढें

एल्एल्. बी. झाल्यावर पुणें येथेंच वकिली करण्यास त्यांनीं सुरवात केली. शिवरामपंत १९०८ सालीं तुरुंगांत गेले तेव्हां हे 'काळ' पत्रांत लिहूं लागले. पुढें मुळशी सत्याग्रहाचे वेळींहि वडिलांच्या गैरहजेरींत यांनीं 'स्वराज्य' हें साप्ताहिक आपल्या जबाबदारीवर चालू ठेविलें होतें. याची भाषा शिवरामपंतां-प्रमाणेंच ओजस्वी असे. यांची (१) 'शांतादेवी' ही कादंबरी 'सरस वाङ्मय रत्नमालें'तून प्रसिद्ध झाली आहे ( १९२६ ). यांचें ( २ ) 'पाणिग्रहण' हें नाटक पौराणिक कथानकावर रचलेलें आहे ( १९२१ ). हे चांगल्यापैकीं वक्तेहि होते.

**परांजपे नारायण माधव** [ १८३५-१८८० ] वृत्तपत्रकार. यांचें इंग्रजी शिक्षण धुळें येथें झालें. प्रिव्हियसपर्यंत मजल मारल्यावर अनुकूल परि-स्थितीच्या अभावीं यानीं 'नेटिव ओपिनिअन' मध्यें मराठी विभागाचा संपादक म्हणून नोकरी धरिली. पुढें-पुढें या पत्रांत ते इंग्रजी मजकूरहि लिहूं लागले. कांहीं दिवसांनीं 'नेटिव ओपिनिअन'ची त्यांजकडे पूर्ण मालकी आली. सतत १५ वर्षें त्यांनीं हें पत्र धडाडीनें चालविलें. त्यांचें लिहिणें मार्मिक व परिणाम-कारक असे. यांच्या कारकीर्दीत 'नेटिव ओपिनिअन'मध्यें उच्च दर्जाचें ग्रंथ-परीक्षण झालें आहे.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः—**

( १ ) चरित्र – नेटिव्ह ओपिनियन वर्ष १७ अं. ४८ स. १८८०.

**परांजपे शिवराम महादेव** [ १८६४ – १९२९ ] वृत्तपत्रकार, व्याजोक्तिकुशल लेखक व वक्ता. जन्म महाड येथें झाला. शिक्षण महाड, रत्नागिरी व पुणें येथें झालें. १८८४ सालीं मॅट्रिक झाले. या परीक्षेंत त्यानीं जगन्नाथ शंकर शेटची संस्कृत विषयासंबंधीं पहिली शिष्यवृत्ति मिळविली. पुढें १८९० त बी. ए. व १८९२ त ते 'डेक्कन कॉलेजां'तून एम्. ए. झाले. या परीक्षेंत त्यांनीं 'भगवानदास पारितोषिक' व 'झाला वेदान्त पारितोषिक' हीं दोन्हीं पारितोषिकें पटकाविलीं.

विद्यालयीन शिक्षणक्रम समाप्त झाल्यावर त्यानीं कांहीं दिवस शिक्षकाचा पेशा स्वीकारला. पुण्यांतील 'भावे स्कूल'चे प्रमुख प्रो. विष्णुपंत गोखले यांनीं नुकतेंच 'महाराष्ट्र कॉलेज' स्थापन केलें होतें, त्यांत ते संस्कृत भाषेचे अध्यापक म्हणून

काम करूं लागले. या कॉलेजांत शिवरामपंतांबरोबरच नटेश आप्पाजी द्रविड, अच्युतराव साठे, वगैरे विद्वान मंडळी शिकवीत असे. त्यामुळें हें कॉलेज अल्पावधींतच लोकप्रिय झालें. परंतु १८९७ च्या प्रक्षुब्ध वातावरणांत त्यावर सरकारची अवकृपा होऊन तें बंद पडलें. विद्यालयांत अध्यापकाचें काम करीत असल्यावेळेपासूनच व्याख्यान, पुराण, कीर्तन यांद्वारां ते लोकजागृतीचें कार्य करूं लागले होते. त्यांची वाणी ओघवती व ओजस्वी असल्यामुळें श्रोत्यांची अंतःकरणें ते हा हा म्हणतां काबीज करूं शकत. ' असंतोषः श्रियो मूलं । संतोषो हरति श्रियम् ' एवढया लहानशा वचनावर त्यांचें घटकान् घटका अस्खलित प्रवचन चाले. गारुड्याच्या पुंगीनें नाग जसा डोलूं लागावा तसा सारा श्रोतृसमाज त्यांच्या वक्तृत्वानें डोलूं लागे. त्या वेळेस ' वक्ता दशसहस्रेषु ' हें म्हणणें पटे. अध्यापकाची जागा सुटतांच शिवरामपंतांनीं आपल्या वाणीचा व लेखणीचा उपयोग स्वदेशकार्यार्थ करण्याचें ठरविलें. मराठी वाङ्मयक्षेत्रांत त्यांचें नांव अजरामर करणाऱ्या ' काळ ' पत्राला त्यांनीं १८९८ सालीं जन्म दिला. ' केसरी 'च्या बरोबरीनें महाराष्ट्रांत घरोघरीं वाचलें जाणारें ह्या पत्रासारखें त्या काळीं दुसरें एकहि पत्र नव्हतें. तरुण लोक प्रत्येक शुक्रवारीं सकाळीं त्याची अत्यंत उत्सुकतेनें वाट पाहत. ' केसरी 'पेक्षां त्यांना ' काळा 'बद्दल अधिक आत्मीयता वाटे. शिवरामपंतांचें ' काळां 'तलें लिहिणेंच तसें होतें. जणूं मूर्तिमंत स्फूर्तिच ! ती व्याजोक्ति, ती वक्रोक्ति, तीं रूपकें, तीं कल्पित पात्रांचीं स्वगत भाषणें; साराच थाट कांहीं न्यारा ! कॉलेजात असतांना रूसो, व्हॉल्टेअर, स्विफ्ट, या ग्रंथकारांचें वाङ्मय त्यांनीं आत्मसात् केलें होतें. त्यांतल्या त्यांत स्विफ्टच्या उपरोधपूर्ण लेखनशैलीचा त्यांनीं विशेष अभ्यास केला होता. ' काळां 'तील लेख लिहितांना त्यांनीं या लेखनशैलीचाच बहुतक ठिकाणीं अंगीकार केला.'

१९०८ सालच्या दडपशाहींत शिवरामपंतांवर राजद्रोहाचा खटला भरण्यात आला. या खटल्यांत शिवरामपंतांनीं वकील न देतां स्वतःच काम चालविलें. हें काम त्यांनीं इतकें उत्कृष्टपणें चालविलें कीं खुद्द न्यायाधीशानें – ' वकीलाच्या कामाची माहिती नसतां आपण आपला डिफेन्स इतक्या उत्कृष्टपणें देऊं शकलां हें पाहून खरोखरच तुमच्या बुद्धिमत्तेचें कौतुक वाटतें.' – असे उद्गार काढले. या खटल्यांत त्यांना १९ महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा झाली.

शिवरामपंत तुरुंगांतून सुटून येईपर्यंत ( १९१० ) ' काळ ' पत्र चालू होतें.

परंतु पुढें तें प्रेस ॲक्टला बळी पडलें. त्याचप्रमाणें दहा विभागांत प्रसिद्ध झालेले ' काळांतील निवडक निबंध ' हि जप्त करण्यात आले.

शिवरामपंताच्या हातून १९१०–१९२० पर्यंत विशेष अशी कांहीं राजकीय हालचाल झाली नाहीं. मात्र वाङ्मयविषयक लिखाण बरेंच झालें. १९२० सालापासून असहकारितायुग सुरू होतांच ते चळवळींत भाग घेऊं लागले. पण पूर्वीची धडाडी त्यांत नव्हती. त्यांनीं ' काळ ' पत्राप्रमाणेच ' स्वराज्य ' नावाचें पत्र काढलें, पण त्याचें तेज पडेना. अखेरी-अखेरीस शिवरामपंतांनीं राजकारणातून अंग काढून घेऊन ग्रंथरचनेकडेच अधिक लक्ष पुरविलें होतें. त्याची वाङ्मय-सेवा लक्षात घेऊन १९२८ सालीं बेळगांव येथें भरलेल्या ' महाराष्ट्र साहित्य संमेलना'च्या अध्यक्षपदाचा मान त्याना देण्यात आला. या संमेलनांत झालेलें त्याचें भाषण हेंच त्यांचें अखेरचें जाहीर भाषण होय. तदनंतर मधुमेहाचा विकार बळावल्यामुळें ते आजारी पडले व त्यातच त्याचा अंत झाला.

**' काळां'तील लेखनः–** शिवरामपंतांचें अत्यंत महत्त्वाचें लेखन म्हणजे आयुष्याच्या पूर्वार्धांत ' काळ ' पत्रांत केलेले लेखन होय. दुर्दैवानें ह्यातील कांहीं निवडक भाग ग्रंथनिविष्ट असूनहि सरकारच्या अवकृपेमुळें आजच्या पिढीस तो अनुपलब्ध होऊन बसला आहे. आणि त्यामुळें ज्यांना तो वाचावयास मिळाला त्यांनीं त्याच्या केलेल्या स्वरूपाच्या दिग्दर्शनावरच अवलंबून राहणें भाग आहे. शिवरामपंतांच्या मृत्यूनंतर प्रो. श्रीपाद महादेव माटे व श्री. नरहर रघुनाथ फाटक यांनीं अनुक्रमें ' रत्नाकर ' व ' यशवंत ' या मासिकांत जे विस्तृत लेख लिहिले त्यांत त्यानीं शिवरामपंताच्या ' काळा 'तील कामगिरी संबंधीं बरेंच विवेचन केलें आहे. त्यांतील प्रो. माटे यांच्या लेखांतून कांहीं निवडक भाग येथें उद्धृत करतों.

" त्यांच्या लिहिण्यांत स्वातंत्र्याचा ध्येयवाद दृग्गोचर होऊं लागला. चालू राजकीय चळवळी, विशेषतः कॉंग्रेसच्या बैठकी वगैरे संबंधानें तर त्यांस केवळ उपहासबुद्धि होती. असल्या चळवळींनीं कांहीं एक व्हावयाचें नाहीं असा त्यांचा विश्वास होता. समाजकारणासंबंधानें तर त्यांचीं मतें अगदीं जुन्या चालीचीं असत. समाजसुधारणेच्या कामाकडे आपण मुळींच वळूं नये असें त्यांचें स्पष्ट मत असे. त्यास अनुसरून समाजसुधारकांची व त्यांच्या प्रयत्नाची ते मधून-मधून टर उडवीत व त्यांवरून राजकीय प्रयत्नांकडे वाचकांचें मन ओढून घेण्याची शिकस्त करीत. एकदां लहानसान गोष्टींत व चालू चळवळींत

विशेष कांहीं नाहीं असें ठरविल्यानंतर राष्ट्रीय सभेपासून तों गांवच्या म्युनिसिपालिटीपर्यंत सर्व कारभारावर ते व्याजोक्तीनें, उपहासानें, अर्धवट विनोदानें मनमुराद लिहीत. इंग्रजी वाङ्मयांतील ‘ उपहासविजल्पितां ’चे सर्व नमुने दृष्टि-पथांतून गेलेले असल्यामुळें, पण त्याहिपेक्षां स्वभावाची घडण या रसाला अनुकूल बनलेली असल्यामुळें या त्यांच्या उपहासाला काहीं विलक्षण खुमारी येत असे. लहान मुलांनासुद्धां त्यांतील लेखांचा चटका लागे. पण मधून-मधून वाङ्मयादि विषयांवरहि स्वतंत्र विचाराचें व सोपपत्तिक असें लिहिणें ते लिहीत, त्यामुळें त्यांच्या प्रतिभेची व विद्वत्तेची साक्ष सर्वांस एकदम पटे व ‘काळ’ पत्र म्हणजे उगाच फिदीफिदी हंसावयास लावणारें व वाचकांची खुषमस्करी करणारें असे शेरे जे आडून-आडून मारीत त्यांनासुद्धां त्यांच्या लिहिण्याचें कौतुक वाटे व बाहेरून ‘ काळ ’ पत्राविषयीं कितीहि तिटकारा दाखविला, तरी परांजप्यांचें लिहिणें वाचल्याशिवाय त्यास चैन पडत नसे. इंग्रजी वाङ्मयांत साध्या विषयावरहि सुंदर निबंधरचना करणारे कित्येक लेखक झालेले आहेत. आपल्याइकडेहि कै. आगर-करांनीं अशा प्रकारचे निबंध लिहिलेले आहेत. तीच तऱ्हा शिवरामपंतांनीं उचलली होती. पण त्या तऱ्हेंतसुद्धां स्वदेशी बाणा होता ! कोठल्यातरी दोन कल्पित व्यक्तींचें भाषण, कोणा एखाद्यास पडलेलें स्वप्न, कोणा ऐतिहासिक माणसाचें आत्मगत भाषण, असले प्रसंग कल्पून त्यांच्या द्वारां आपली देशाभिमानाची शिकवण ते वाचकास देत असत. ही नाट्यपद्धति, हा देशी बाणा व हा उपहास हीं कोरडींच असतीं तर वाचक इतके वेडावले नसते. पण हीं सर्व काव्यकल्पनांत चिंब भिजलेलीं असत, यामुळें नाट्यपद्धति, विनोद, काव्य व निखालस देशाभिमान यांच्या मिश्रणानें वाचकाला नुसता मोह पडे इतकेंच नव्हे तर त्याला निशाच चढे ! या लिहिण्यांत ‘ कल्पना असे ’ असें म्हटलें म्हणजे माणसांना वाटतें कीं उगाच कांहीं तरी मनचें कल्पून लेखक भरारत असे. तसें नाहीं. इंग्रजींत ज्याला आपण Sympathy म्हणजे समभावना म्हणतों तिचा प्रकर्ष या लिहिण्यांत दिसून येई. सुखांत डुंबणाराचे, आपत्तींत तळमळणाराचे, मत्सरानें विचारभ्रष्ट झालेल्याचे, देशद्रोह्याचे, सतीचे, स्वराज्य गमावलेल्याचे मनोव्यापार काय असतील हें ओळ-खण्यासाठीं त्या-त्या स्थितींत स्वतःला कल्पून त्याच्यासारखे विचार व विकार आपल्या मनांत आणणें याला जी शक्ति लागते तिचेंच नांव Sympathy.. ही त्यांची समभावनाशक्ति कित्येक प्रसंगीं केवळ अव्वल दर्जाची अशी दिसत असे.

यामुळें ' काळ ' पत्राचें वाचन हें लहानापासून थोरापर्यंत सर्वांना आवडीचें वाटूं लागलें. भावनाप्रधान तरुणांची तर या लिहिण्यावर उडी पडत असे. त्यांच्या मनांतील स्वदेशाभिमान प्रफुल्लित करण्यासाठीं त्यांचे रागलोभ खिजविण्याची शिवरामपंत पराकाष्ठा करीत. हें साधण्यासाठीं इतिहासांतील, पुराणांतील किंबहुना जेथें-जेथें सांपडतील तेथील विविध प्रसंग उचलून घेऊन, त्यांत जरूर तेथें व इष्ट ते फेरफार करून, उपमालंकारांची वेलबुट्टी काढून, मूळ प्रसंग खूप उठावानें दिसेल अशी विरोधी पार्श्वभूमि निर्माण करून त्याची देशाभिमानाच्या कमजास्त उजेडांत ते अशी खुबीदार मांडणी करीत कीं त्या-त्या प्रसंगाचे निराळे व खरे अर्थ आपल्याला आतां प्रतीत झाले असें वाचकास वाटे व त्यांचे रागलोभ पराकाष्ठेचे भडकत असत. देशाभिमान ही केव्हा तरी मनांतून येऊन जाणारी लकेर नव्हे, तर सदा सर्वकाळ मनावर आपली गच्च पकड बसविणारी शक्ति आहे, याचा अनुभव प्रत्येक वाचकाला दिवसभर येत असे. हें लिखाण नुसत्या देशाभिमान्याचें होतें असें नाहीं. तें एका जाड्या पंडिताचें आणि रसिकशिरोमणीचें होतें. यामुळें त्यात देशाभिमान, पांडित्य, रसिकता इत्यादींचें मनोज्ञ मिश्रण होऊन वाचकाच्या हृदयाला आणि मेंदूला सारखेंच आवाहन पोंचत असे.

कायद्याची कैची टिळकांच्या खटल्यानंतर सरकारनें आणखी आंवळून घेतल्यामुळें सडेतोड लिहिणें अधिकच धोक्याचें झालें होतें. पण आपलें मनोगत सांगण्याची सडेतोड बोलणें ही एकच पद्धति नाहीं हें सरकारच्या ध्यानात आलें नाहीं! समोरून हल्ला करतां येईना, तर ज्याला करावयाचाच आहे तो बगलेकडून हल्ला चढवितो. शिवरामपंतांनीं हेंच केलें. भर तोंडावर जाऊन पडण्याच्या कामीं त्यांनीं कित्येकदां साहस केलेंच होतें व तें पाहून वाचकांनासुद्धां दहशत बसावी असें होई; पण त्यांनीं जेव्हां बगलेकडून मारा सुरू केला तेव्हां मात्र सरकारची पुरी फजिती त्यांनीं उडविली. तोंडावर ' तुम्ही गाढव आहांत ' असें म्हणणाराला शिक्षा करतां येते. पण जो ' आपण खरोखरच फार शहाणे आहांत ' असें तोंडानें म्हणतो पण पोकळ आवाजानें व डोळा मिचकावून 'गाढव आहांत' असें सुचवितो त्याचें कोण काय करणार ? या उपरोधपद्धतीचा अवलंब शिवरामपंतांना उत्तम मानवला. ही कला त्यानीं इतकी वाढविली व खुबीनें वापरली कीं सबंध अंकभर या टोंकापासून त्या टोंकापर्यंत उपरोधाची सारखी उतरणूक ते करीत. कधीं एखादें रूपकच घेत आणि मग ज्या विषयाला उद्देशून तें घेतलेलें असेल

त्याला बालाग्रहि स्पर्श न करतां रूपकाचा बारीकसारीक तपशीलसुद्धां मूळ तपशीलाला इतका अचूक लावून दाखवीत कीं लेखकाच्या कौशल्याचें वाचकाला आश्चर्य वाटे व अशा रीतीनें परोक्षपणें सरकारला चपेटे बसल्याचें सुखहि त्याला चाखावयास सांपडे. ही त्यांची शक्ति विलक्षण पोसली होती. आरंभापासून शेवटपर्यंत तंतु आणि तंतु मूळ वस्तूच्या तंतूला आणि तंतूला लावून दाखविणें फार थोड्यांना साधेत. असो. रूपकाच्या आड राहून त्यांना वाटेल त्याच्यावर शस्त्र चालवितां येई. पण या शस्त्रानें ज्याचें अंग रक्तबंबाळ होई तो जर रसिक असला तर वेदना होत असतांसुद्धां तें चालविणाऱ्याच्या कसबाचें आश्चर्य वाटावें अशी स्थिति असे. हा रूपकाचा अवलंब आपलें काव्यचातुर्य दाखविण्यासाठीं ते करीत होते असे नव्हे, तर उपरोध साधावा म्हणून एखादे वेळीं कांहीं भलताच समज आरंभाला व्हावा असा मथळा ते अग्रलेखाला देत. पण वाचक वाचूं लागला म्हणजे हें काय प्रकरण आहे हें त्याला उपरोधाच्या तपशीलानें दिसूं लागे. त्यांची लकब कळल्यामुळें वाचकवर्गहि मोठा तल्लख बनला होता. परांजप्यांचें धोरण आणि सुकाणूं कोणीकडे वळत आहे हें वाचक तडातड ओळखीत. हा गनिमी कावा इतक्या काविबाजपणानें आजवर कोणींहि चालविला नव्हता. मराठी वाङ्मयांत हा रस अगदीं नवा होता. पण नवा म्हणून अल्प दिसणारा होता असें मात्र नव्हे. वाचकाला त्यांत मनसोक्त डुंबतां येत असे. उपरोधाचें खमंग लिहिणें हा कांहीं शिवरामपंताच्या लिहिण्याचा केवळ विशेष नसला तरी कायद्याच्या त्या मगरमिठीच्या काळांत या वक्रोक्तीवरच त्यांना मुख्य भिस्त ठेवावी लागे. प्रत्यक्ष चालू असलेल्या कोणत्याहि चळवळींत ते महत्त्वानें पडले नसल्यामुळें त्या चळवळींतील बारीकसारीक व्यंगें — कीं जीं देशाभिमानीच पण कष्टाळू माणसानें वजा घातलीं असतीं तीं सुद्धां त्यांच्या वक्रोक्तीच्या झपाट्यांत सांपडूं लागलीं. सरकारवर योजावयाचें जें उपहासाचें शस्त्र त्याचा उपयोग शिवरामपंत हौसेखातर स्वकीयांवरसुद्धां करूं लागले. प्रतिपक्षास वाटे कीं यांनीं वाटल्यास चार सडेतोड शब्द लिहावे पण असें खोंचून आणि लावून लिहूं नये. पण एकेकाचें एकेक वैशिष्ट्य असतें."

"ही वक्रोक्ति 'काळ' पत्राचें सौंदर्यसर्वस्व आणि शिवरामपंतांची मुख्य कामगिरी असें जर कोणी समजेल तर तें मात्र चूक आहे. वक्रोक्ति हा एक पद्धतिविशेष होता इतकाच त्याचा अर्थ आहे. त्यांचें खरें काम वाचकाला देशाभिमानी बनविणें अथवा त्यांच्या गूढस्थ देशाभिमानाला फुंकर घालणें आणि

त्यांच्यापुढें शुद्ध स्वातंत्र्यकल्पना मांडणें हें होय. हें त्यानीं १८९८ पासून तों १९०८ पर्यंतच्या दहा वर्षांत इतक्या उत्कटतेनें केलें कीं इकडील वर्तमानपत्राच्या इतिहासांत त्याला तुलना सांपडणें कठिण आहे. . . .त्यांनीं आपलें काम विलक्षण तडफेनें केलें. रोम, ग्रीस, स्वित्सरलंड, रशिया, अमेरिका इत्यादि देशांचे इतिहास त्यांनीं या एकाच विचारानें धुंडाळिले कीं देशभक्तीचीं उदाहरणें त्यांत कोठें गवसत आहेत. आपल्या इतिहासाचें परिशीलन त्यानीं याच विचारानें केलें. पुराणांतील कथा थापटून-थोपटून त्यांनीं इकडे वळवून घेतल्या. फ्रान्सच्या राज्यक्रान्तीचा इतिहास, रूसो-व्हॉल्टेअर यांचीं तत्त्वज्ञानें यातून स्वातंत्र्यविचारांस लागू असलेले भाग इकडल्या परिस्थितीस जमवून घेतले. प्रथम-प्रथम ही शिकवण त्यांनीं गोष्टींच्या रूपानें चालू केली. गोष्ट हेंच तेव्हाचें 'काळ' पत्राचें वैशिष्ट्य होतें. ...... 'तरवारीचा हक्क' आणि 'राज्यापहार आणि न्याय' अशांसारख्या लेखांत त्यांनीं दाखविलेली प्रतिपादनाची नवी तऱ्हा वाचकांना उल्हसित करी. 'दिल्लीचें तख्त व भाऊसाहेबाचा वण' 'कानपुरची विहीर' 'ब्लॅक होल' अशांसारख्या लेखांनीं मेलेल्या लोकांचा इतिहास किती जिवंत आहे, याची खात्री नसानसांतून अंगात भिने. 'पिकाच्या पाहाणी'नें स्वातंत्र्याचा अपहार आणि स्वातंत्र्यासाठीं कष्ट कसे होत असतात याची जाणीव तलवारीच्या धारेप्रमाणें वाचकाच्या मनात शिरत असे. ते-ते लेख आतां विसरून गेले. त्यांचीं नांवें मात्र आठवतात आणि तेव्हां त्यांच्या वाचनानें मनावर झालेले संस्कार हेच मात्र शिल्लक आहेत. बाकी तें सर्व धीरोदात्त, प्रगल्भ आणि चैतन्यकारी वाङ्मय 'अगात् स्मृतिपथम्' ( रत्नाकर, सप्टेंबर १९२९ ).

शिवरामपंताचें 'काळां'तील लेखन ज्यांनीं वाचलें त्यांना पूर्वस्मृतींनीं जर एवढी हळहळ वाटते, तर प्रत्यक्ष लेखकाला काय वाटत असलें पाहिजे? कित्येकदा तर असेंहि वाटतें कीं 'साहित्य-संग्रहां'तील त्यांचा 'भासाची भवितव्यता' हा लेख त्यांच्या अंतःकरणांत पूर्वस्मृतींनीं उफाळणाऱ्या भावनांचा तर निदर्शक नसावा ना! भासाला उद्देशून ते त्यात एके ठिकाणीं म्हणतात– "भासा, तुझीं नाटकें जाळलीं तेव्हां तूं जिवंत होतास? तुझ्या डोळ्यांदेखत ही गोष्ट झालेली असेल, तर ती पाहून तुझ्या मनाला काय वाटलें असेल? तुझीं पुस्तकें होरपळलेलीं पाहत असतां तुझें अंतःकरण होरपळून गेलें असेल! तुझ्या पुस्तकांतून अग्नीच्या ज्वाळा निघत असतांना तुझ्या हृदयांतूनहि तितक्याच लाल क्रोधाच्या ज्वाळा निघत

असतील! तुझ्या जळणाऱ्या ग्रंथांतील आणि डोळ्यांतील ठिणग्या एकदमच बाहेर पडल्या असतील. भासा, कांहीं वेळानें तुझ्या पुस्तकांची आग विझली असेल; पण तुझ्या मनाची आग कधींतरी विझली असेल काय रे ? बहुधा ते बाहेरचे अंगार धुमसण्याचे थांबल्यानंतरहि अनेक वर्षेपर्यंत तुझ्या अंतर्यामांतील क्रोधांगार तसेच धुमसत राहिले असतील! तुझीं नाटकें जळलेलीं पाहून तूं रडला असशील, ओरडला असशील, हळहळला असशील, तळमळला असशील! त्या आगीच्या उष्णतेनें तुझे हातपाय गार पडले असतील! आणि त्यांची प्रसवित्री ती तुझी जीभ दुःखातिरेकानें वांकडी पडल्यानंतर कंठाच्या अग्रभागीं आलेले तुझे पंचप्राण त्या पेटलेल्या अर्चीवर आरूढ होऊन त्या सुप्रसिद्ध अर्चिरादि मार्गानें ब्रह्मलोकाला जाण्याला खरोखर उत्कंठित झाले असतील."

आपल्या ऐन कर्तबगारीच्या काळांतील, ज्यांत त्यांनीं आपलें अंतःकरणसर्वस्व ओतलें होतें, तें वाङ्मय डोळ्यांदेखत अंधारकोठडींत पडलेलें किंवा राजभयानें अग्निसात् झालेलें पाहून त्यांना भासाप्रमाणेंच वाटलें असेल यांत मुळींच आश्चर्य नाहीं.

सरकारजमा झालेल्या 'काळांतील निवडक निबंधां'चे खण्डांपैकीं एक खण्ड — दहावा — १९३७ सालीं नवीन राजकीय सुधारणांनुसार मुंबई प्रांतांत 'हिंदी राष्ट्रीयसभा'पक्षाचें सरकार अधिकारावर आल्यामुळें बंधमुक्त झाला. बाकीच्यांना प्रकाश केव्हां दिसणार तें एक भविष्यकाळच जाणे!

'काळां'तील लेखनाखेरीज त्यांचें विशेष उल्लेखनीय वाङ्मय म्हणजे त्यांचा 'साहित्यसंग्रह' हा निवडक लेखांचा संग्रह, 'गोविंदाची गोष्ट' व 'विंध्याचल' या दोन कादंबऱ्या आणि 'मराठ्यांच्या लढायांचा इतिहास' हें होय. शिवरामपंतांच्या लेखनांतील वैशिष्ट्यें 'काळां'तील लेखांतल्याइतकीं जरी नाहीं तरी बऱ्याच उत्कटत्वानें यांत प्रगट झालेलीं आढळतात.

'साहित्यसंग्रहां'त संकीर्ण स्वरूपाचे २० लेख संग्रहित केले आहेत. त्यांतील कांहीं संस्कृतवाङ्मयावरील तर कांहीं वेदान्तपर, कांहीं ऐतिहासिक तर कांहीं रूपकात्मक असे आहेत. यांतील 'भासाची भवितव्यता' हा लेख शिवरामपंतांच्या 'काळां'तील लेखनाची आठवण करून देतो. त्याचप्रमाणें 'मेघदूतावरून कालिदासाविषयीं' 'चारुदत्त आणि मृच्छकटिक' 'प्रियदर्शिका व नागानंद हीं नाटकें कोणाचीं?' 'शाकुन्तल नाटकाचा चौथा अंक' हे लेख त्यांच्या जुन्या संस्कृत वाङ्मयावरील भक्तीचे व त्यावरील त्यांच्या व्यासंगाचे निदर्शक आहेत.



गोविंद बल्लाळ देवल



दिवाकर



शिवराम महादेव परांजपे



गोपाळराव हरि देशमुख

' गोविंदाची गोष्ट ' व ' विंध्याचल ' या धड सामाजिक नाहींत धड ऐतिहासिकहि नाहींत अशा रम्याद्भुत कथांत मोडण्यापैकीं कादंबऱ्या आहेत. यांत जागोजाग शिवरामपंती पद्धतीप्रमाणें लांबलांब काव्यमय वर्णनें, स्वगत भाषणें आणि गुलामगिरी, परवशता, मातृभूमीचे दैवदुर्विलास यांसंबंधींचे हृदय हलवून सोडणारे उद्गार वाचावयास सांपडतात. या कादंबऱ्या कादंबरीच्या आधुनिक तंत्राच्या कसोटीला उतरण्यासारख्या नसल्या तरी चटकदार वठल्या आहेत. मनाला कांहीं काळ थक्क करून सोडणारी त्यांची कल्पना आपला बहुरंगी पिसारा फुलवून त्यांत जागोजाग नृत्य करतांना आढळते, आणि तिच्या नूपुरध्वनींत वाचकाच्या मनाचा लय कांहीं काळ तरी लागल्याशिवाय राहत नाहीं.

' मराठ्यांच्या लढायांचा इतिहास ' या पुस्तकांत १८०२ ते १८१८ या कालांत झालेल्या महत्त्वाच्या चौदा लढायांचा इतिहास विवेचिलेला आहे. या साऱ्या लढाया अपेशी ठरल्या; त्यांचा शेवट स्वातंत्र्यनाशांत झाला. मराठ्यांना असें हें अपेश कां आलें, पाहतां-पाहतां परक्यांचें राज्य कसें सुरू झालें याची कारणमीमांसा अगदीं स्पष्ट शब्दांत त्यांनीं यांत पुराव्यानिशीं केली आहे. यांत ज्या-ज्या वेळीं इंग्रजांच्या कारस्थानांचें, त्यांनीं मराठे सरदारांत फुट पाडण्याकरितां चालविलेल्या प्रयत्नांचें व त्याला बळी पडलेल्या लोकांचें वर्णन करण्याचा प्रसंग येतो, त्या-त्या वेळीं त्यांच्या मनाचा तोल स्थिर राहूं शकत नाहीं. ते क्रोधाविष्ट होतात, त्वेषाचे-तिरस्काराचे लोळचे लोळ त्यांच्या लेखणींतून बाहेर पडूं लागतात.

इतिहाससंशोधक म्हणून शिवरामपंतांची विशेषशी प्रसिद्धि नसली तरी इतिहास हा त्यांचा बराच आवडीचा विषय होता असें म्हणतां येईल. वरील वाङ्मयाच्या द्वारां त्यांनीं निरनिराळ्या प्रकारांनीं इतिहासांत विहार केलेला आहे. ' काळां'तील निबंधांतून पार्श्वभूमीकरितां व स्फूर्तीचें लेणं घेण्याकरितां त्यांनीं इतिहासाचा अनेक वेळां व भरपूर उपयोग केला आहे. संस्कृत वाङ्मयासंबंधींच्या निबंधांतून तत्कालीन परिस्थिति विशद करतांना त्यांना प्रामुख्यानें इतिहाससंशोधनाचाच अवलंब करावा लागलेला आहे. 'मराठ्यांच्या लढाया' म्हणजे तर बोलून-चालूनच ऐतिहासिक उलाढालींचा विषय. पण याव्यतिरिक्त मराठी भाषा व मराठी वाङ्मय यांचेंहि त्यांनीं सूक्ष्म ऐतिहासिक दृष्टीनें बरेंच निरीक्षण केलें होतें. ह्या निरीक्षणाचें फळ ' भारत-इतिहास-संशोधक मंडळां'त त्यांनीं वाचिलेल्या अनेक शब्दांच्या

व्युत्पत्तिविषयक व वाङ्मयसंशोधनपर अशा निबंधांच्या रूपानें आपल्याला मिळालें आहे. त्या मंडळाच्या निरनिराळ्या वार्षिक इतिवृत्तांतून व संमेलनवृत्तांतून ते निबंध समाविष्ट आहेत. ' मत्स्येंद्र व गोरक्ष यांचा एक उल्लेख ' ' मोरोपंतांची भगवद्गीता ' ' जनाबाईचा थालीपाक ' ' मिराबाईचें आख्यान ' ' श्री नामदेवकृत ज्ञानेश्वरांची समाधि, सोपानदेवाची समाधि, व नामदेवाची आळ' इत्यादि त्यांतील कांहीं मुख्य निबंधांच्या नांवांवरून त्यांच्या विषयव्यापाची कल्पना येईल. पण या त्यांच्या शुद्ध ऐतिहासिक संशोधनपर अशा निबंधांतूनहि त्यांच्या इतरत्र आढळणाऱ्या लेखन-पद्धतीप्रमाणें तत्त्व थोडेंच पण विवेचनाचा फुगारा मात्र कापूस पिंजारून ठेवावा तसा फार मोठा असाच प्रकार पुष्कळ अनुभवास येतो, आणि व्युत्पत्तींच्या संबंधांत तर अनेक वेळां कल्पनांच्या भराऱ्या व ओढाताण यांचाच खेळ पाहावयास मिळतो. तथापि अभ्यासकानें त्यांचा हा लेखनविभाग उपेक्षून मात्र चालावयाचें नाहीं इतकें महत्त्व ग्राह्यांशाच्या दृष्टीनें त्याला आहेच हें निर्विवाद.

येथवर विवेचिल्याप्रमाणें शिवरामपतांनीं आपली लेखणी काव्य, नाटक, कथा, कादंबरी, इतिहाससंशोधन या सर्व क्षेत्रांत चालविली हें तर खरेंच. परंतु त्यापेक्षांहि खरें सांगावयाचें म्हणजे निबंधलेखनांतील तिचे आकर्षक विलास यांपैकीं कोणत्याहि एका क्षेत्रांत तितक्या उत्कटतेनें घडलेले आढळत नाहींत. आणि त्यामुळेंच शिवरामपंत हा शब्द उच्चारतांना ' काळांतील निवडक निबंध 'च ठसठशीतपणें डोळ्यांसमोर येतात.

**परांजपे शिवराम महादेव यांचें वाङ्मयः—**

**निबंधः**—( १ ) काळांतील निवडक निबंध—भाग १–१०; ( २ ) साहित्य संग्रह—भाग १–२, १९२२, १९२५; ( ३ ) स्वराज्यांतील निवडक निबंध.

**नाटकें**:—( ४ ) सं. कादंबरी, १८९७; ( ५ ) मानाजीराव, १८९८, १९२८; ( ६ ) रामदेवराव, १९०६; ( ७ ) भीमराव, १९०७; ( ८ ) पहिला पांडव, १९३१; ( ९ ) मीराबाई ( अपूर्ण ).

**कादंबऱ्याः**—( १० ) गोविंदाची गोष्ट, १९१८, १९२५; ( ११ ) विंध्याचल, १९२४.

**संकीर्णः**—( १२ ) तर्कसंग्रह-दीपिका, १८९९, १९१०; ( १३ ) तर्कभाषा, १९०४; ( १४ ) तर्कसंग्रह, १९२२; ( १५ ) रामायणाविषयीं कांहीं विचार; ( १६ ) अर्थशास्त्र; ( १७ ) सूर्याच्या गैरसोई, १९२०;

(१८) अहल्याजारकाव्य, १९२४; (१९) कालिदासानें न लिहिलेलें नाटक, १९२५; (२०) अर्थसंग्रह, १९२७; (२१) मराठ्यांच्या लढायांचा इतिहास, १९२८; (२२) शाकुंतल नाटकांतील चौथा अंक, लोकशिक्षण (नवें) वर्ष २ अंक ३-४ स. १९२९.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः—**

(१) मराठी साधुकवि विरुद्ध प्रो. शि. म. पराजपे – गोविंदसुत, १९३६.
(२) मानाजीराव – परीक्षण, श्री. कृ. कोल्हटकर, विविधज्ञानविस्तार, नोव्हेंबर १९०१.
(३) भासावरील आक्षेपाचें खंडण – नवयुग, मार्च, मे १९१७ एप्रिल १९१८.
(४) अर्थसंग्रहाचें मराठी विवरण – चि. वि. वैद्य, चित्रमयजगत्, सप्टेंबर १९२७.
(५) पहिला पांडव, परीक्षण – ना. बा. केळकर, चित्रमयजगत्, फेब्रुवारी १९३१.
(६) साहित्यसंग्रह भाग १-२, र. दा. करमरकर, रत्नाकर, जुलै १९२६.
(७) मराठी लघुकथा – परांजपे, ले. दि. वि. आमोणकर, रत्नाकर, ऑक्टोबर १९२९.
(८) पहिला पाडव, परीक्षण – व. शां. देसाई, रत्नाकर, डिसेंबर १९३०.
(९) मृत्युलेख – श्री. म. माटे, रत्नाकर, सप्टेंबर १९२९.
(१०) प्रो. शि. म. परांजपे – शब्दचित्र, दि. वा. दिवेकर, रत्नाकर, ऑक्टोबर, १९२९.
(११) मृत्युलेख – चित्रमयजगत्, ऑक्टोबर १९२९.
(१२) मृत्युलेख – केसरी सारसंग्रह, १९२९ पृष्ठ ३९५.
(१३) कै. शि. म. परांजपे – न. र. फाटक, यशवंत, अंक ११ वा १९२९.
(१४) **प्रो. शिवरामपंत परांजपे – चरित्र व आठवणी,** ओगले व बर्वे, १९३६.

**पाटणकर परशुराम नारायण** [१८६०-१९२९] निबंधकार व कवि. यांचा जन्म पुणें जिल्ह्यांतील चासकमाण गांवीं झाला. वडील लहानपणींच वारल्यामुळें याचें संगोपन व शिक्षण मातुलगृहीं झालें. १८८५ सालीं बी.ए. झाल्यावर यांनीं प्रथम पुणें येथें 'न्यू इंग्लिश स्कूल'मध्यें शिक्षकाची नोकरी धरली व तेथून पुढें इंदूरास येऊन तेथील हायस्कुलांत संस्कृत शिक्षकाचें व मग 'होळकर कॉलेजां'त मुख्य संस्कृत अध्यापकाचें काम केलें; आणि या अवधींत १८९८ सालीं एम्. ए. ची पदवीहि संपादन केली. नंतर उज्जैन येथील 'माधव कॉलेजां'त इंग्लिश व संस्कृत या विषयांच्या अध्यापकाची जागा यांस मिळाली व

१९०५ मध्यें तें कॉलेज बंद पडल्यावर तेथील म्युनिसिपालिटीच्या मुख्याधिकाऱ्याच्या जागीं त्यांची योजना झाली; परंतु हें काम त्यांच्या स्वभावास व अभिरुचीस योग्य नसल्यामुळें तें त्यांनीं लवकरच सोडून दिलें. आणि पंडित मदनमोहन मालवीय यांच्या आग्रहावरून बनारस येथील 'सेंट्रल हिंदु कॉलेजां'त संस्कृत भाषेच्या मुख्याध्यापकाची जागा स्वीकारली. पुढें १९१२ मध्यें कांहीं आगंतुक कारणांमुळें त्यांना ती जागा सोडणें भाग पडलें. नंतर ते देवास येथें येऊन राहिले. तेथें त्यांच्यावर धाकट्या पातीच्या सरकारांची मर्जी बसून त्यांनीं यांस प्रथम आपले खानगी चिटणीस व नंतर विद्याधिकारी नेमिलें. १९१८ त देवास सोडून ते पुनः बनारसला गेले व तेथील 'हिंदु युनिव्हर्सिटीं'त रिलीजस इंस्ट्रक्टरच्या जागीं रुजू झाले. तेथें असतांनाच यांना १९२७ मध्यें पक्षघाताचा विकार जडला म्हणून ते नोकरी सोडून इंदूरास आपल्या चिरंजीवांकडे येऊन राहिले व शेवटीं तेथेंच दोन वर्षांनीं त्यांचें देहावसान झालें. यांना साहित्यसेवेची आवड फार लहानपणापासून होती. संस्कृत भाषेवर असलेलें यांचें प्रेम व प्रभुत्व प्रशंसनीय होतें. श्रीक्षेत्र काशी येथें त्यांनीं 'धर्मसंगति' नांवाचें संस्कृत मासिकहि कांहीं दिवस चालविलें होतें. महाभारतांतील जयद्रथवध प्रसंगावर यांनीं लिहिलेलें 'वीरधर्मदर्पण' नांवाचें संस्कृत नाटक 'अजमीर बोर्डा'नें नुकतेंच १९३४-३५ सालच्या इंटरमीजिएट परीक्षेकरतां संस्कृत विषयांत नेमलें होतें. इंग्रजींतहि यानीं हिंदुधर्मविषयक सात-आठ पुस्तकें लिहिलीं आहेत. शिवाय शिशुपालवध, रघुवंश, शाकुंतल, किरातार्जुनीय, काव्यादर्श वगैरे संस्कृत ग्रंथांवर विद्यार्थ्यांच्या उपयोगासाठीं यांनीं लिहिलेलीं इंग्रजी टिपणी पुस्तकें प्रसिद्धच आहेत. मराठींत यांनीं कांहीं निबंध व लघुकाव्यें लिहिलीं आहेत. 'मराठी भाषेच्या माहेराचें सिंहावलोकन' या त्यांच्या संशोधनात्मक निबंधाची प्रशंसा इतिहासाचार्य राजवाडे यांनीं मुक्तकंठानें केलेली सर्वश्रुतच आहे. 'काव्यरत्नावलि' मासिकाच्या आद्य परीक्षक मंडळांतील हे एक सदस्य होते. यांची अप्रकाशित अशी बरीच कविता आहे ती अलिकडे त्यांच्या चिरंजीवांकडून हळूहळू प्रसिद्ध होऊं लागली आहे ही आनंदाची गोष्ट होय. यांच्या कवितांची रचना प्रौढ असून तींतून एकप्रकारें त्यांच्या उत्कट भाविक बुद्धीचा रम्य विलास दिसून येतो.

कृ. गं. कवचाळे.

**पाटणकर प. ना. यांचें वाङ्मयः—**

( १ ) भारतीय नाट्यशास्त्रासंबंधीं सुचलेले विचार. ( २ ) कांहीं मराठी शब्दांच्या व्युत्पत्तीचे मार्ग अथवा मराठी भाषेच्या माहेराचें सिंहावलोकन. ( १९०७ ). ( ३ ) समवृत्ती गीतगोविंद. ( ४ ) ब्रह्मोद्धार गाथा. ( ५ ) मल्लारिराजप्रशस्ति अथवा भेंडकी मैदानचा सुखवास. ( ६ ) छात्रसंकटमोचनार्थ धांवा व इतर स्फुट कवितासंग्रह. ( ७ ) स्फुट पद्यसंग्रह.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः –**

( १ ) चरित्र – न. शं. रहाळकर ( 'वीरधर्मदर्पण' नाटकाच्या मराठी भाषांतरास जोडलेलें. )

**पाटणकर माधवराव** [ १८६२–१९१६ ] नट व नाटककार. जन्म सातारा जिल्ह्यांतील विटें या गावीं झाला. यांचें मराठी सहा व इंग्रजी चार इयत्तांपर्यंत शिक्षण होऊन थोडेंसें वेदाध्ययनहि झालें होतें. हे वयाच्या १९ व्या वर्षी मुंबईस मामाकडे राहावयास आले असतां त्यांस गाण्याचा व नाटकें पाहण्याचा नाद लागला. पुढें उरणकरांच्या चाळींत त्यांनीं एक क्लबहि काढला. १८८४ सालीं या क्लबाचें त्यांनीं नाटकमंडळींत रूपांतर केलें व ते बाहेरगांवीं खेळ करीत हिंडूं लागले. " कै. अण्णासाहेबांनीं ( किर्लोस्कर ) आपलीं नाटकें वाटेल त्यांनीं करण्यास या वेळीं परवानगी ठेविल्यामुळें कोणत्याहि नवीन नाटकमंडळी काढणाऱ्यावर अनंत उपकार करून ठेविले होते. त्याप्रमाणें माधवराव हे त्यांचींच नाटकें पूर्वी करीत असत. १८९० सालीं बेळगांव मुक्कामीं कंपनी आल्यावर दुसऱ्या नाटककर्त्यांचीं कांहीं नाटकें बसवून प्रयोग चालू झाले; पण त्या नाटककारांस मोबदला देण्याइतके जवळ पैसे नसल्यामुळें एके दिवशीं एका नाटककारांकडून आयत्या वेळीं खेळ बंद करण्याचा सरकारी हुकूम आल्यामुळें खेळ बंद करणें भाग पडलें. यामुळें आपण यापुढें स्वतः नाटकें रचून तीं लोकांपुढें आणावीं असा त्यांनीं निश्चय केला; व सन १८९१ सालीं ' विक्रम-शशिकला ' नांवाचें नाटक रचून त्याचा प्रयोग करून दाखविला. ' विक्रम-शशिकले 'च्या पूर्वींहि त्यांनीं एक-दोन गद्य नाटकें लिहिलीं होतीं. त्यांपैकीं ' अधिकारमदविपाक ' नांवाचें नाटक हे करीतहि असत. ' विक्रम-शशिकला ' नाटकानें लोकांच्या अभिरुचीस नवीन वळण

लागल्यानें या नाटकास पैसा चांगला मिळूं लागला, व तेथूनच माधवरावांच्या मंडळीस उत्कर्षावस्था प्राप्त झाली. 'विक्रम-शशिकला' संगीत असें पहिलेंच असल्यामुळें त्या वेळीं त्यांजवर अनेकांच्या टीकाहि आल्या. माधवरावांनीं त्यांकडे लक्ष न देतां व धीर न सोडतां नाटकें लिहिण्याचा आपला उद्योग अव्याहत चालविला. त्यांनीं एकंदर २४ नाटकें लिहिलीं व तीं सर्व आपल्या मंडळीकडून करविलीं. माधवराव कोणाजवळ अभिनय शिकले नाहींत. त्यांचें कोणतेंहि काम स्वाभाविक अभिनयानें होत असे. विशेषतः त्यांची रागाची भूमिका बहारीची वठत असे. प्रसिद्ध चित्रकार राजा रविवर्मा यांनीं देखील आपलीं चित्रें प्रसिद्ध करतांना यांच्याकडून मुद्दाम पोझिशन्स घेतल्या आहेत. त्यांपैकीं गंगावतरणाच्या चित्रांतील शंकराचें चित्र माधवरावजींचें आहे. ग्वाल्हेराधिपति माधवराव शिंदे यांची यांजवर फार कृपा असे. त्यांनीं यांस बरीच आर्थिक मदत केली."

आधार – 'रंगभूमि' १९१६

**पाटणकरांचीं नाटकें:** – (१) विक्रम-शशिकला; (२) सीमंतिनी, १९०५; (३) सत्यविजय; (४) युवतिविजय, १८९४; (५) कनककांता; (६) वसंतचंद्रिका, १८९४; (७) वत्सला; (८) वीर त्रिविक्रम; (९) प्रेमदर्शन; (१०) सैरंध्री; (११) द्रौपदीवस्त्रहरण, १९०३; (१२) कलिप्रभाव; (१३) सत्यनारायण; (१४) भस्मासुर; (१५) सुदामदेव; (१६) इंदुमती-चंदुलाल; (१७) रणछोडराय, हिंदी व गुजराथी (१८) मानसन्मान (१९) समाजसंजीवनी (२०) श्रीतुकाराम (२१) संत तुलसीदास, हिंदी; (२२) नरकेसरी; (२३) अधिकारमदाविपाक; (२४) मानवी पोपट-मैना.

**चरित्र, चर्चा, अभ्यास:** –

(१) चरित्रात्मक लेख, मुजुमदार, रंगभूमि, १९१६.

(२) विक्रम-शशिकला – टीका, ले. श्री. कृ. कोल्हटकर, वि. ज्ञा. विस्तार, पु. २४ अं. ४, १८९२.

**पाठारे आत्माराम मोरेश्वर** [ १८६८–१९३१ ] नाटककार. यांचा जन्म ता. १० ऑक्टोबर सन १८६८ रोजीं ठाणें येथें झाला. श्रीमंत चिमणाजी आप्पा पेशव्यांनीं इ. स. १७३९ सालीं वसईचा किल्ला फिरंग्यांच्या तावडींतून सर करतेवेळीं ज्या गंगाजी मुरारजी वगैरे वीर पुरुषांनीं लढतां-लढतां

आपले प्राण धारातीर्थीं अर्पण केले त्या अणजूरकर नाईक घराण्यांत यांच्या मातोश्रीचा जन्म. यांचे आजोबा विठोबा हे सन १८२६ सालीं महाडास सब्‌-जज्जाचे हुद्यावर होते. ज्या वेळीं ( ता. २८ एप्रिल १८५३ ) मुंबई ते ठाणें जी. आय्. पी. रेल्वे सुरू झाली त्या वेळीं वडील चुलते जगन्नाथ यांना ठाण्यास पहिलेच स्टेशनमास्तर नेमले. यांचे वडील रेल्वे कंपनीचेच एक साधारण नोकर होते. आजोबानंतरचा कुटुंबाचा बऱ्याच वर्षांचा काळ सुखासमाधानानें गेला; परंतु प्रस्तुत नाटककाराच्या अगदीं अल्पवयांत भवचक्राचे फेऱ्यांत वडील चुलते व तीर्थरूप सांपडून कालवश झाल्यामुळें कुटुंबाचा चोहों बाजूंनीं छळ होण्यास आरंभ झाला. तशाहि परिस्थितींतून आत्मारामजी यांस मातुलपक्षाचा पाठिंबा मिळाला व त्यांना आपलें डोकें वर काढतां आलें. मराठी व इंग्रजीचा अभ्यास साधारणपणें पूर्ण झाल्यानंतर चित्रकलेचा अभ्यास करण्याकरितां ' स्कूल ऑफ आर्ट 'मध्यें ते जाऊं लागले. परंतु कौटुंबिक अडचणीमुळें त्यांना लवकरच तो अभ्यास अर्धवटच सोडून देऊन मुंबईतील ' श्रीशिवाजी हायस्कूल 'मध्यें चित्रकला व मराठी भाषा शिकविण्याचें काम पत्करावें लागलें. यापुढें त्यांनीं नाट्यव्यासंगाला सुरवात केली. प्रथमतः नमुन्यादाखल ' मार्कंडेय ' नावाचें पौराणिक नाटक लिहिलें. सन १८८८ सालीं त्यानीं ' सं. वसंत-इंदिरा ' नाटक लिहिलें. शिवाय 'भिल्लीणी' ' महानंदा ' व ' मद्यपाननिषेध ' (– ' मुंबई मद्यपान निषेधक मंडळा 'नें १९०८ सालीं बक्षिस दिलेलें – ) अशीं तीन काव्येंहि लिहिलीं. त्यानंतर सन १८९० सालीं त्यांनीं प्रसिद्ध ' संगीत संभाजी ' नाटक लिहिलें. या नाटकांतील वीररस, तेजस्वी भाषा, व प्रभावी विचारसरणी हीं श्रोत्यांच्या अंतःकरणांत कालवा-कालव उत्पन्न करीत. महाराष्ट्रीय प्रमुख नाटक मंडळ्यांनीं कांहीं दिवस या नाटकाचेच प्रयोग करण्यास सुरवात केली; महाराष्ट्राबाहेरहि म्हणजे काशी बनारस, गोवें, कारवार अशा ठिकाणींहि या नाटकाचें प्रयोग लोकप्रिय झाले. दुर्दैवानें हें समाजांत चेतना उत्पन्न करणारें व भावनोद्दीपक नाटक सन १९१२ सालीं सरकारच्या अवकृपेस पात्र झालें. सरकारनें जातींजातींत यानें वैमनस्य वाढतें असा आक्षेप घेऊन त्या नाटकाचा बळी घेतला. सदर लेखकाचें सन १८९८ मधील ' रणसिंह बाजी ' हें संगीत नाटकहि उत्तम वठलें होतें. त्यांत

पहिले बाजीराव पेशव्यांचें संविधानक चितारलें होतें. परंतु याहि नाटकाच्या प्रयोगाला सरकारचा तोंडी मनाईहुकूम झाला. सन १९१२ सालीं त्यांनीं सं. 'मृगाभास' हें पौराणिक नाटक लिहिलें. सन १९१९ सालीं दादर मुंबई येथील रा. मा. चोणकर यांनीं दोनशें रुपयांचें बक्षीस जाहीर करून नाटककारांस उत्तेजन देण्याचें ठरविलें. पाठारे यांनीं 'भक्त नरहरी' हें पौराणिक गद्य नाटक लिहून तें बक्षीस मिळविलें. यानंतर १९२५ सालीं 'राधाराधन' (– एका पदवीधर वेश्यागमन्याचें भेसूर चित्र –) नांवाचें गद्य नाटक लिहिलें. याशिवाय 'सं. वत्सराज्यारोहण' व 'भयंकर रक्तपात' वगैरे नाटकें यांनीं लिहिलीं असून तीं अप्रकाशित आहेत. सन १८९४ मध्यें 'किर्लोस्कर नाटक मंडळी'नें जाहिरात देऊन उत्तम नाटकें मागविलीं होतीं, त्या वेळीं यांनीं 'नीतिसंहति' हें नाटक लिहिलें व सबंध महाराष्ट्रांतून आलेल्या नाटकांतून यांच्या नाटकाचा दुसरा क्रम लागला ही गोष्ट लेखकाच्या लेखनपटुत्वाची उत्तम साक्ष देते.

**पाठारे आ. मो. यांचें वाङ्मयः—**

( १ ) मार्कंडेय नाटक; ( २ ) सं. वसंत-इंदिरा नाटक, १८८८; ( ३ ) सं. छत्रपति संभाजी, १८९१, १८९४, १९०३; ( ४ ) नीतिसंहति, १८९४; ( ५ ) सं. रणसिंह बाजी, १८९८; ( ६ ) सं. मृगाभास, १९१२; ( ७ ) भक्त नरहरि, १९१९; ( ८ ) राधाराधन, १९२५; ( ९ ) भिल्लिणी ( काव्य ); ( १० ) महानंदा ( काव्य ); ( ११ ) मद्यपाननिषेध ( काव्य ).

**चरित्र, चर्चा, अभ्यास :—**

( १ ) मृत्युलेख, चित्रमयजगत्, आक्टोबर १९३१.

**पाध्ये पांडुरंग जनार्दन** [ १८४१ – १९१२ ] व्याकरणचर्चिक. हे ठाणें जिल्ह्यांतील वसई तालुक्यांतील आगाशी येथें राहणारे. यांचा 'स्वर-व्यंजन व्यवस्था' ( १९११ ) हा ग्रंथ त्यांनीं वयाच्या सत्तराव्या वर्षी प्रसिद्ध केला. आपल्या भाषेंत उच्चार व लेखन यांत पुष्कळदां भेद आढळतो; तो अशास्त्रीय असल्यामुळें त्यांनीं आपल्या 'स्वर-व्यंजनव्यवस्थे'त तो नाहींसा करण्याचा कौशल्यपूर्वक प्रयत्न केला आहे. यांच्या वरील पुस्तकाच्या सुरुवातीस यांनीं आपलें आत्मचरित्रहि थोडक्यांत दिलें आहे.

**पारख बळवंत खंडूजी** [ १८५१ – १९०४ ] कवि व निबंधकार. यांचा जन्म ओझर ( नाशिक ) गांवीं झाला. याच गांवीं सरकारी मराठी शाळेंत सहा इयत्तांपर्यंत अभ्यास झाल्यावर त्यांनीं सरकारी शिक्षणखात्यांत शिक्षकाची नोकरी धरली. पुढें ही नोकरी सोडून हे पोलिसखात्यात राहिले. पण अधिकाऱ्यांशीं न पटल्यामुळें १८८९ त त्यांनीं राजिनामा दिला.

बळवंतरावांस लहानपणापासून ज्ञानसंपादनाची मोठी आवड होती. कोठें कांहीं सुभाषित कानीं पडलें कीं टिपून ठेवावयाचें असा त्यांचा पाठ होता. अशा सुभाषितांनीं भरलेल्या त्यांच्या कितीएक वह्या आहेत. त्याप्रमाणेंच त्यांस ग्रंथांचा शौक होता. चांगलें पुस्तक पाहिलें कीं तें विकत घ्यावयाचें, मग त्यास कितीहि किंमत पडो, अशी त्यांची रीत असे. त्याची अर्धी प्राप्ती ग्रंथसंग्रहाकडे खरचत असे. शिवाय ही त्यांची ग्रंथभक्ति जाणून त्याचे चाहते गोपाळराव हरि देशमुख, महादेव गोविंद रानडे, गंगाधर नरसिंह केतकर इत्यादि मोठे गृहस्थ त्यांस ग्रंथ बक्षीस देत असत. तसेंच हे आपल्या वक्तृत्वानें, काव्यरचनेनें, समयोचिततेनें आणि रसिकतेनें सगळ्या महाराष्ट्रीयांत प्रसिद्धीस आले होते; त्याच्या योगानें सर्व मराठी ग्रंथकार आणि शेठ तुकाराम जावजीसारखे नामांकित ग्रंथप्रकाशक त्यांस ग्रंथ नजर करीत असत. त्यांत विशेष संतोषाची गोष्ट ही होती कीं ते ग्रंथ घेऊन ते नुसते पुजून ठेवीत नसत, तर ते लक्षपूर्वक वाचीत असत, आणि त्यांतल्या सर्व गोष्टी त्यांस वाटेल तेव्हां आठवत असत. त्यांचे वेगळे-वेगळे रुमाल बांधलेले व्यवस्थित ठेविले आहेत. एवढा मराठी ग्रंथांचा संग्रह सबंध महाराष्ट्रांत दुसऱ्या कोणाहिपाशीं नाहीं. गेल्या पन्नास-साठ वर्षांत म्हणजे इकडे छापखाने चालू झाल्यापासून मराठींत जितकीं पुस्तकें शिळेवर किंवा टंकांनीं छापलीं आहेत त्यांतल्या बहुतेक सर्वांची एक-एक प्रत त्यांच्या संग्रहांत आहे. बळवंतरावांचें पाठांतर जबर होतें. तुकाराम, मोरोपंत व वामन यांचीं प्रकरणेंच्या प्रकरणें हे तोंडपाठ म्हणत. संस्कृत आणि हिंदी सुभाषितांचा त्यांचा भरणा मोठा असे. त्यामुळें त्यांच्या व्याख्यानांस फार रंग चढे. यांनीं गद्यापेक्षां पद्य पुष्कळ लिहिलें आहे. त्यांतलें थोडेंसें छापलें आहे. यांचीं ' ज्ञानेश्वरमहाराजांचें चरित्र ' ' दुर्व्यसन-निषेधाष्टक ' आणि ' विष्णुसहस्रनाममंजरी ' हीं पुस्तकें ' निर्णयसागरा 'च्या मालकांनीं छापलीं आहेत.

बळवंतरावांस इतर वृत्तांपेक्षां कटाव आणि फटके फार चांगले साधत असत; ते त्यांनीं शेंकडों विषयांवर लिहिले आहेत; किंबहुना त्यांच्या वेळच्या महाराष्ट्रांतला एकहि प्रचलित विषय त्यांतून सुटला नाहीं असें म्हटलें तरी चालेल. असे कटाव आणि फटके ते बोलतां-बोलतां रचीत असत. ते त्यांच्या तोंडांतून ऐकावयास फारच गोड लागत असत. ते कांनीं पडले म्हणजे बळवंतराव हे सध्यांच्या काळचे फंदी आहेत असें श्रोत्यांस वाटे. ह्याशिवाय त्यांना श्लोक आर्याहि चांगल्या रचितां येत असत.

'ज्ञानेश्वर महाराजांच्या चरित्रा'बद्दल त्यांस 'दक्षिणा प्राइज् कमिटी'नें बक्षीस दिलें होतें. दंतकथा वगळून केवळ उपलब्ध अशा खऱ्या माहितीनें लिहिलेलें असें हें एकच व चांगलें चरित्र आहे. तुकोजीराव महाराज होळकरांकडून एका कवितेबद्दल शेलापागोटें बक्षीस आलें होतें. श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड, जव्हारचे राजे इत्यादि राजेरजवाड्यांनीं हीं यांचीं काव्यें ऐकून किती एक वेळां यांची चांगली संभावना केली होती. युवराज फत्तेसिंह महाराज गायकवाड ह्यांच्या विवाहोत्सवावर त्यांनीं केलेल्या कविता ऐकून श्रीमंत सयाजीराव महाराजांनीं मोठी देणगी देऊन त्यांचा बहुमान केला. ते बळवंतरावांचीं पद्यें तासांचे तास ऐकत बसत. ( आधार – 'बालबोध', १९०४ )

**पारख ब. खं. यांचें वाङ्मयः**—( १ ) जयवर्णन, काव्य, १८८२; ( २ ) ज्ञानेश्वर महाराजांचें चरित्र, १८८६, १८८९; ( ३ ) दादाभाई नौरोजी, कटाव, १८९४; (४) वेरूळच्या लेण्याचें वर्णन, कटाव, १८९५; ( ५ ) सनातन भारत धर्म महापरिषदेची हकीगत, कटाव १८९६; ( ६ ) दुर्व्यसननिषेधाष्टक, १८९६; ( ७ ) वज्रेश्वरी चरित्र, स्थलवर्णन, १८९८; ( ८ ) विष्णुसहस्रनामार्थमंजिरी ( ओवीबद्ध ) १९००.

**पारखी पांडुरंग गोविंदशास्त्री** [ १८४४–१९११ ] कवि व ग्रंथकार. पुणें जिल्ह्यांतील खेड तालुक्यांतील कडूस या गांवीं यांचा जन्म झाला. लहानपणीं यांनीं संस्कृत व्याकरण, व्युत्पत्ति अलंकार, वगैरेंचें अध्ययन केलें व पुढें मोठ्या वयांत इंग्रजी भाषेचें ज्ञानहि स्वप्रयत्नानें चांगलेंच कमविलें. यांचें बरेंचसें आयुष्य शिक्षकाचे धंद्यांत गेलें. शेवटचीं कांहीं वर्षें पुण्याच्या 'आनंदाश्रमां'त व डॉक्टर भांडारकर यांच्या हाताखालीं शास्त्री म्हणून त्यांनीं काम केलें. यांची स्फुट कविता 'काव्यरत्नावली'त प्रसिद्ध झाली आहे.

**पारखी पां. गो. यांचें वाङ्मयः** – ( १ ) मित्रचंद्र, कादंबरी, १८७९, १८८४, १९०९; ( २ ) बोधामृत, काव्य, १८८४, १८८८; ( ३ ) षड्ऋतु-वर्णन, काव्य, १८८२; ( ४ ) बाणभट्ट, चरित्र, १९०५, १९११; ( ५ ) कादंबरीकथासार; ( ६ ) कादंबरीसार, १९०८; ( ७ ) श्रीहर्षचरित्र, १९११; ( ८ ) हंसिका, नाटक; ( ९ ) कृष्णकुमारी, काव्य.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः**—

( १ ) चरित्र, काव्यरत्नावली, जुलै १९११.

( २ ) षड्ऋतुवर्णन, परीक्षण, विविधज्ञानविस्तार, पुस्तक १५ अंक ११-१२ स. १८८३.

( ३ ) श्रीहर्ष, परीक्षण, विविधज्ञानविस्तार, पुस्तक ४२ अं. ८ स. १९११.

( ४ ) कृष्णाकुमारी, परीक्षण, निबंधचंद्रिका, अंक ३५ स. १८८५.

( ५ ) बाणभट्ट आणि श्रीहर्ष, बा. गं. टिळक, 'लो. टिळकांचे केसरींतील लेख'. भाग ४ था पृष्ठ ४७३–४८०.

**पारसनीस दत्तात्रय बळवंत** [ १८७०–१९२६ ] इतिहास-संशोधक. यांचा जन्म सातारा येथें १८७० च्या नोव्हेंबर ता. २७ ह्या दिवशीं झाला. पारसनीस घराणें सातारला येऊन स्थायिक होण्यापूर्वी सातारा जिल्ह्यांतील माण तालुक्यांत असलेल्या मलवडी नामक खेडेगांवांत राहत असे. मलवडीच्या घाटग्यांच्या आश्रयास पारसनीसांचे पूर्वज होते अशी माहिती मिळते. पारसनीस या कुलनामाचा अर्थ फारशी पत्रव्यवहार करणारा मुन्शी असा आहे. दक्षिणेंत बहामनी राज्याची स्थापना होऊन मुसलमानी राजवट झाल्यानंतर राजकीय व्यवहारांत फारशी भाषेचा प्रवेश होणें अपरिहार्यच होतें. मुसलमानी अमदानींतील मराठे सरदार आणि विजापुर, अहमदनगर, बेदर, इत्यादि ठिकाणीं अस्तित्वांत आलेलीं मुसलमानी राज्यें यांचा परस्पर पत्रव्यवहार फारशी भाषेंतून चालत असला पाहिजे. हा पत्रव्यवहार ज्यांच्यातर्फे चालत असे ते फारशी-नवीस – पारसनवीस – पारसनीस होत. मलवडीच्या घाटग्यांच्याकडे असतांना पारसनीसांच्या पूर्वजांकडे फारशी दप्तर पाहण्याचें काम असावें असा तर्क आहे. तर्क म्हणण्याचें कारण एवढेंच यासंबंधीं ऐतिहासिक पुरावा सांपडत नाहीं.

बापूसाहेब ह्या नांवानेंच पारसनीस हे त्यांच्या घरोब्याच्या परिचित मंडळींत व सार्वजनिकरीत्या इतरत्रहि ओळखले जात. त्यांचें मराठी व इंग्रजी शिक्षण

साताऱ्यालाच झालें. इंग्रजी शाळेंत असतांना वादविवादसभांमध्यें ते प्रामुख्यानें भाग घेत. वर्गामध्यें ते बुद्धिमान विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध असण्याऐवजीं बहुश्रुत विद्यार्थी म्हणूनच त्यांचा लौकिक विशेष होता. हायस्कूलमध्यें असतांनाच त्यांना वाचनाचा आणि लेखनाचा मनस्वी नाद लागला; आणि या नादापायीं त्यांचें अभ्यासाकडे दुर्लक्ष झालें. भराभर परीक्षा पास होऊन कॉलेजांत जाणें व पदवी घेणें इकडे त्यांचें लक्ष वेधण्यापेक्षां जीं कांहीं मासिकें किंवा वर्तमानपत्रें त्यांच्या अवलोकनांत येत त्याप्रमाणें आपणहि प्रयत्न करावेत असेच विचार त्यांच्या मनांत अधिक घोळत. शाळेमध्यें असतांना विद्यार्थिवर्गाची सहानुभूति व शिक्षकांचें प्रोत्साहन नसतांना त्यांनीं हस्तलिखित मासिक चालविलें होतें. इंग्रजी सातवीपर्यंत त्यांचें शिक्षण झाल्यानंतर त्यांनीं १८९० च्या सुमारास शाळा सोडली आणि वाङ्मयकार्यालाच आपल्याला सर्वस्वीं वाहून घेतलें.

त्या वेळचा काळ आणि मराठी वाङ्मयाची स्थिति लक्षांत घेतां बापूसाहेबांचें लक्ष इतक्या अल्पवयांत वाङ्मयाकडे कसें वेधलें यांचें आश्चर्य वाटतें. पुण्यासारख्या ठिकाणीं जागृति अधिक असते. तरुणांच्या मनावर संस्कार उमटतील अशा तऱ्हेचे प्रसंग वारंवार घडतात आणि त्याचा परिणाम तरुण मनांना राष्ट्रसेवेच्या विविध अंगांपैकीं कोणत्यातरी अंगाकडे आकर्षित करून घेण्यांत होतो. साताऱ्याला अशा तऱ्हेची चळवळ नव्हती. स्वयंप्रकाशी असा एखादाहि तारा तेथें तळपत नव्हता. या कालांतसुद्धां बापूसाहेबांचें लक्ष सार्वजनिक कार्याकडे वेधलें यांत त्यांचें वैशिष्ट्य आहे.

शिक्षणक्रम अर्धवट सोडून सार्वजनिक जीवनाला लवकर सुरवात केल्यामुळें बापूसाहेबांचा बोलबाला तेव्हांच झाला. पुढारी लोकांमध्यें त्यांना प्रवेश मिळाला. मोठमोठ्या लोकांशीं परिचय घडला आणि स्वतः त्यांची गणना तत्कालीन विद्वानांमध्यें होऊं लागली. परंतु पूर्ववयांत त्यांना विश्वविद्यालयीन शिक्षण मिळालें असतें तर बरें झालें असतें असें त्यांचें पुढील आयुष्य पाहिल्यानंतर वाटतें. विश्वविद्यालयीन शिक्षणामुळें बुद्धीला व्यवस्थितपणा येतो, व्यासंगाची व्याप्ति वाढते, आत्मप्रत्यय बाणतो आणि पदवीधर विद्वानांपेक्षां आपण कनिष्ठ ही भावना दूर होऊन आत्मविश्वास दुणावतो. ललितवाङ्मयाच्या क्षेत्रांत ज्यांना कार्य करावयाचें असतें त्यांची गोष्ट निराळी. प्रतिभा, लेखनकौशल्य, मानवी मनाचें सूक्ष्म

निरीक्षण, इत्यादि ललितलेखनाला उपकारी असलेल्या गोष्टी विद्वत्तेवर अवलंबून नसतात. गडकरी एम्. ए. पर्यंत शिकले असते तर त्यांच्या हातून अधिक उच्च दर्जाचें लेखन झालें असतें असें हमखास म्हणतां येत नाहीं. परंतु बापूसाहेबांनीं इतिहाससंशोधन हें आपलें जीवितक्षेत्र ठरविलें. त्या दृष्टीनें पाहतां पूर्ववयांत विद्वत्तेचा भक्कम पाया घातला गेला असता तर त्यांची दृष्टि संकुचित राहिली नसती असें वाटतें. संस्कृत किंवा इंग्लिश वाङ्मय यांच्या सखोल अभ्यासाची दिशा पूर्ववयांत न लागल्यामुळें त्यांच्या हातून त्या-त्या वाङ्मयाचें आवश्यक आलोडन पुढेंहि झालें नाहीं. त्यांच्या एकंदर लेखनांत विशालता दिसून येत नाहीं याचें कारण तरी हेंच !

विद्यार्थिदशेला रामराम ठोकल्यानंतर बापूसाहेबांना आपल्या आवडीच्या कार्याकडे लक्ष देण्यास कोणतीच अडचण नव्हती. शिक्षणक्रम संपतो न संपतो तोंच नौकरीची काच जशी कित्येकांना कुटुंबपोषणाकरितां लागते तशी बापूसाहेबांना लागण्याचें बिलकुल कारण नव्हतें. कुटुंबपोषणाचा सर्व भार बापूसाहेबांचे चुलते नाना यांनीं उचलला होता आणि आयुष्यक्रमाच्या सुरवातीस बापूसाहेब त्या काळजींतून मुक्त असल्यामुळें त्यांना आपल्या आवडत्या व्यवसायाला सर्वस्वीं वाहून घेणें जड गेलें नाहीं.

**प्राथमिक प्रयत्नः**– बापूसाहेबांचे वाङ्मयक्षेत्रांतील प्राथमिक प्रयत्न पाहतां इतिहास हा विषय त्यांनीं मुद्दाम निवडून काढला होता असें दिसत नाहीं. प्रथमची कल्पना एवढीच दिसते कीं मराठींत मासिक काढावयाचें आणि तत्कालीन सर्व मासिकांप्रमाणें मनोरंजन करीत-करीत तद्वारां अज्ञ वाचकांना बोधामृत पाजावयाचें. प्रथम त्यांनीं ठरविलेलें ध्येय हें एवढेंच सामान्य स्वरूपाचें होतें. त्यांचें अगदीं पहिलें मासिक म्हणजे ‘सुभाष्य-चंद्रिका.’ याचा पहिला व शेवटला अंक १८८७ सालीं प्रसिद्ध झाला. त्याचीं एकंदर सोळा पानें होतीं. मासिकाच्या नांवावरून या पुस्तकांत केवळ सुभाषितें देण्याचा संपादकाचा विचार आहे असें सकृत्दर्शनीं वाटतें. परंतु तें केवळ त्यातलें एक सदर होतें. या पहिल्या अंकात व्यापारवृद्धीवर एक निबंध, बोधसमक म्हणून एक छोटी कविता आणि लोकवृत्त इत्यादि विविध विषय दिले आहेत. एकंदर लेखांचा दर्जा पाहिला तर सध्यां कित्येक शाळातून निघणाऱ्या हस्तलिखित मासिकांपेक्षां सुद्धां कनिष्ठ होता. त्या काळच्या मानानें एका अल्पवयी

व अल्पशिक्षित विद्यार्थ्यांचा प्रयत्न म्हणून या मासिकाचें कोडकौतुक करावें फार तर !

त्याच वर्षाच्या म्हणजे १८८७ सालच्या ऑक्टोबरपासून 'महाराष्ट्र-कोकिळ' हें प्रसिद्ध मासिक सुरू झालें. ' महाराष्ट्रभाषाचित्रमयूर ' म्हणून प्रसिद्धीस आलेले कृ. ना. आठल्ये हे याच वेळीं ' केरळ-कोकिळ ' नांवाचें मासिक चालवीत असत. त्यावरूनच हें नांव सुचलें आणि त्या मासिकाचाच आदर्श पुढें ठेवण्यांत आला होता हें प्रारंभींच्या कांहीं अंकांवरून स्पष्ट दिसतें. मासिकाचीं प्रथम सोळा पृष्ठें व वार्षिक वर्गणी एक रुपया होती. ' महाराष्ट्र-कोकिळा 'नें तत्कालीन मराठी मासिकांत बराच उच्च दर्जा प्राप्त करून घेतला होता. अल्पावकाशांत मासिकाला २००० वर्गणीदार मिळून तें लोकप्रिय झालें. आंतील मजकुराच्या दृष्टीनेंहि मासिकाची प्रगति झालेली दिसते. प्रसिद्ध पुरुषांचीं चरित्रें, सुंदर काव्यें, शास्त्रीय चमत्कार, लोकोत्तर माहिती, स्थलवर्णनें, नीतिपर निबंध, ऐतिहासिक आख्यायिका इत्यादि विषय चटकदार भाषेंत येत असल्यामुळें मासिकास वाढता लोकाश्रय लाभला. लेखांच्या शेवटीं किंवा प्रारंभीं लेखकाचें नाव प्रसिद्ध करण्याची त्या वेळचीं वहिवाट नसल्यामुळें या सर्व लेखसंभारापैकीं खुद्द बापूसाहेबांचे नक्की लेख कोणते हें सांगतां येण्यास साधन नाहीं. परंतु त्या वेळीं हल्लींइतका लेखकवर्ग तयार झालेला नसल्यामुळें त्यांतील तीनचतुर्थांश भाग बापूसाहेबांच्याच लेखणींतून उतरला असला पाहिजे.

' महाराष्ट्र-कोकिळा 'मध्यें आलेल्या स्थळवर्णनांवरून या वेळीं बापूसाहेबांनीं हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रांतात प्रवास केल्याचें दिसून येतें. स्थळवर्णन देतांना त्या-त्या ठिकाणची ऐतिहासिक माहितीहि शक्य ती ते देत असत. ज्या-ज्या शहरीं ते जात त्या-त्या ठिकाणची ऐतिहासिक माहिती परिश्रमपूर्वक मिळवीत, एवढेंच नव्हे तर ऐतिहासिक कागदपत्र संग्रहित करण्याचाहि ते प्रयत्न करीत. दुर्मिळ कागदपत्रांचें संकलन करण्याचा त्यांनीं जो पुढें अव्याहत उद्योग केला त्याचा हा प्रारंभ होय; आणि या प्रयत्नांना जसजसें अधिकाधिक यश येऊं लागलें तसतसें त्यांचें मन तिकडे विशेष रमूं लागलें असलें पाहिजे.

१८९२ च्या नंतर ' महाराष्ट्र-कोकिळ ' हें मासिक बंद पडलें. या मासिकाला भरपूर लोकाश्रय होता; खुद्द बापूसाहेबांची तें चालविण्याची इच्छा होती. परंतु हें मासिक मुंबई येथें ज्यांच्या मदतीनें मुद्रित होत होतें त्या गृहस्थांनीं एकाएकीं

आपला धंदा आवरला व हिंदुस्थान सोडलें. त्यामुळें मासिकाच्या मुद्रणाची आणि प्रकाशनाची घडी जी विसकटली ती विसकटलीच. 'महाराष्ट्र-कोकिळा'चें पुनरुज्जीवन करण्याचा विचार कांहीं दिवस चालू असावा असें वाटतें. परंतु याच सुमारास झांशीच्या प्रभावशाली लक्ष्मीबाईसाहेब यांचें चरित्र लिहिण्याचें कार्य अंगावर घेतल्यानें पुनरुज्जीवन करण्याचा विचार मागें पडला.

'महाराष्ट्र कोकिळा'चें प्रकाशन चालू असतां बापूसाहेबांनीं 'कीर्तिमंदिर'-सारखीं कांहीं किरकोळ पुस्तकें लिहिलीं. या सुमारास त्यांचें अवांतर वाचन बरेंच झालें होतें असें दिसतें. तुकाराम, रामदास, वामन, मोरोपंत इत्यादि महाराष्ट्र-कवींचीं प्रमुख प्रमुख काव्यें त्यांनीं वाचिलीं असावींत. संस्कृत कवींपैकीं कालिदास, भवभूति, भर्तृहरि आणि जगन्नाथ यांचेहि ग्रंथ त्यांनीं वाचिले होते असें दिसतें.

१८९२ सालापर्यंत बापूसाहेबांचे चाललेले प्राथमिक प्रयत्न लक्षात घेतां त्याची दृष्टि इतिहासविषयावर केंद्रीभूत झालेली दिसत नाहीं. मासिकाच्या संपादकाला सर्व विषयांचें थोडेंबहुत ज्ञान असावें लागतें. त्या दृष्टीनें इतर विषयांप्रमाणें इतिहास हाहि एक विषय. कारणपरत्वें इतर विषयांप्रमाणें याहि विषयावर 'महाराष्ट्र-कोकिळां'त त्यांनीं लेख लिहिले. परंतु इतिहास-लेखन आणि इतिहास-संशोधन या कार्याकडे त्यांची दृष्टि कायमची खिळून बसण्यास 'झांशीच्या लक्ष्मीबाईसाहेब यांचें चरित्र' कारणीभूत झालें. या चरित्रानें त्यांच्या कीर्तिमंदिराचा जसा पाया घातला तशीच त्यांच्या स्वतंत्र ग्रंथकर्तृत्वासहि याच पुस्तकापासून सुरवात झाली. 'महाराष्ट्र-कोकिळ' मासिक चालू असतांना त्यानीं प्रसंगोपात्त प्रमुख व्यक्तींचीं चरित्रें लिहिलीं होतीं. प्रथम 'कोकिळां'त प्रसिद्ध करून नंतर स्वतंत्र पुस्तक-रूपानेंहि तीं प्रसिद्ध केलीं आहेत. अशाच चरित्रांपैकीं विशेष नाव घेण्याजोगीं अशीं न्यायमूर्ति रानडे, प्रिन्सिपॉल वामन शिवराम आपटे, दादाभाई नौरोजी, सर ए. ओ. ह्यूम इत्यादि तत्कालीन प्रसिद्ध असलेल्या व्यक्तींचीं चरित्रें होत. परंतु हीं चरित्रें छोटेखानी आहेत. शिवाय जीवितकार्याची रूपरेषा निश्चित होण्यापूर्वी तीं लिहिलेलीं आहेत. वाङ्मयदृष्टीनें आज त्यांचें कांहींच महत्त्व उरलें नसलें तरी ज्या विषयाच्या अभ्यासामध्यें बापूसाहेबांचें इतउत्तरचें आयुष्य खर्ची पडावयाचें होतें त्यावर निश्चयदृक् होण्यापूर्वीच त्याचे वाङ्मयविषयक प्रयत्न कोणते चालले होते एवढें मात्र त्यांवरून कळतें.

जीवितकार्याचा शोध लागला, बावचळलेली वृत्ति स्थिर झाली आणि अवर्ण-नीय कार्यैकनिष्ठतेनें सतत तीस वर्षे अविरत उद्योग करून ज्या क्षेत्रांत त्यांनीं कार्य केलें त्याचें स्वरूप काय आहे तें आपल्याला पाहिलें पाहिजे. त्यांनीं केलेलें हें कार्य त्रिविध स्वरूपाचें आहे. ऐतिहासिक कागदपत्रें, चित्रें, दुर्मिळ पुस्तकें, जिनसा इत्यादिकांचें संकलन, कागदपत्रांचें प्रकाशन आणि स्वतंत्र ग्रंथरचना किंवा स्फुट लेखन असें त्याचें स्वरूप सांगतां येईल; आणि हा त्यांचा उद्योग एकाच वेळीं जोडीनें चालला होता. विवेचनाच्या सोयीकरितां आपण प्रथम लेखन घेऊं.

[ १ ] **ग्रंथरचना व अवांतर लेखनः**– बापूसाहेबांनीं लिहिलेलीं मराठी पुस्तकें त्यांच्या प्रथमप्रकाशनकालासह खालीं देत आहें.

( १ ) झांशीच्या महाराणी लक्ष्मीबाईसाहेब यांचें चरित्र. ( १८९४ )

( २ ) मराठ्यांचे पराक्रम – बुंदेलखंड प्रकरण. ( १८९५ )

( ३ ) अयोध्येचे नबाब. ( १८९९ )

( ४ ) मुसलमानी अमदानींतील मराठे सरदार. ( १९०० )

( ५ ) महापुरुष ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर यांचें चरित्र व पत्रव्यवहार. ( १९०१ ).

( ६ ) बायजाबाई शिंदे यांचें चरित्र. ( १९०२ )

( ७ ) दिल्ली अथवा इंद्रप्रस्थ. ( १९०३ )

( ८ ) मराठ्यांचें आरमार. ( १९०४ )

( ९ ) स्वल्पमूल्य चरित्रमाला – एकंदर तीन पुष्पें. ( १९०४ )

(१०) सवाई माधवराव पेशवे यांचा दरबार. ( १९०५ )

'**लक्ष्मीबाईचें चरित्र**' लिहिण्याची स्फूर्ति 'केसरी'मध्यें तत्संबंधीं त्या वेळीं जो पत्रव्यवहार झाला त्यावरून झाली. लक्ष्मीबाईचे दत्तक पुत्र श्रीमंत दामोदरपंत यांनीं १० जून १८९० च्या केसरींत एक पत्र प्रसिद्ध करून महाराणीसाहेबांबद्दल 'वसंत व्याख्यानमाले'मध्यें एका व्याख्यात्यानें केलेल्या भरमसाट विधानांचा त्यांनीं समाचार घेतला. यानंतर श्रीमंत दामोदरपंत आणि बापूसाहेब यांचा परिचय घडून आला आणि श्रीमंतांनीं आपल्याजवळील सर्व चरित्रोपयोगी सामुग्री बापूसाहेबांच्या हवालीं केली. परंतु बापूसाहेब एवढयाच माहितीवरून संतुष्ट राहिले नाहींत. हिंदुस्थानांत मिळणारीं इंग्रजी पुस्तकें आणि सरकारी रिपोर्ट यांचा त्यांनीं आधार घेतलाच;

परंतु इंग्लंडमध्यें त्या वेळीं १८५७ सालच्या राजकीय घडामोडीसंबंधींचें वाङ्मय पुष्कळच प्रसिद्ध झालें होतें तेंहि आणविण्याची त्यांनीं खटपट केली. तसेंच बंडाची आंच ज्या-ज्या शहराना लागली तेथील लोकांकडूनहि मिळवितां आली तेवढी माहिती गोळा केली.

हिंदुस्तानच्या प्राचीन व अर्वाचीन इतिहासांत पुरुषांप्रमाणें अनेक कर्तबगार स्त्रियाहि निर्माण झाल्या आहेत. त्यांचीं चरित्रें कोणत्याहि राष्ट्रास आत्मप्रत्ययोत्पादक वाटतील. परंतु आमच्या राष्ट्रांतील स्त्रीजातीच्या अशा अत्यंत तेजस्वी रत्नावली चरित्रलेखनयोग्य असताहि विस्मृतीच्या काळांत गडप होऊन राहिल्या आहेत. त्यामुळें स्त्रियांमधील अन्तर्हित तेजाची आम्हास ओळख पटेनाशी झाली आहे. अशा इतिहासप्रसिद्ध व कर्तृत्वशाली स्त्रियांचीं विस्तृत चरित्रें प्रसिद्ध झाल्याशिवाय आमच्या भगिनीवर्गांत आत्मविश्वास निर्माण होणें दुर्घट आहे. झांशीच्या लक्ष्मीबाईसाहेबांसारख्या तरवारबहाद्दर शूर अबलेचें चरित्र लिहून महाराष्ट्रइतिहासाप्रमाणेंच महाराष्ट्रमहिलावर्गावरहि बापूसाहेबांनीं उपकार केले आहेत.

महाराष्ट्रभाषेमध्यें या चरित्राचा दर्जा विशेष प्रकारचा आहे. हें चरित्र प्रसिद्ध होण्यापूर्वी लक्ष्मीबाईसंबंधीं विश्वसनीय माहिती फारच थोड्यांना होती. सामान्य जनतेंत प्रसृत झालेल्या माहितींत अतिशयोक्तीचा भाग थोडाथोडका नव्हता. विपर्यस्त माहितीचें जाळें भोंवतीं पसरल्यामुळें लक्ष्मीबाईचें दर्शन विकृत स्वरूपांत होत होतें. ऐतिहासिक पद्धतीनें त्या सत्य स्वरूपाचा ठाव घेण्याचा महाराष्ट्रांत झालेला पहिला असा प्रयत्न म्हणजे बापूसाहेबांचाच. या चरित्राचा बोलबाला महाराष्ट्रांत हां हां म्हणतां झाला; आणि बापूसाहेबांची गणना प्रसिद्ध लेखकांत होऊं लागली. हे चरित्र प्रसिद्ध होण्यापूर्वी मराठीमध्यें ऐतिहासिक चरित्रें अशीं फारच थोडीं प्रसिद्ध झालेलीं होतीं. शिवाय चरित्राची सामुग्री जितक्या कसोशीनें जमविणें आवश्यक आहे, जितकें संशोधन होणें जरूर आहे तितकें बापूसाहेबांच्या पूर्वीच्या एकाहि चारित्रलेखकाकडून झाल्याचें दिसत नाहीं. डौलदार, आकर्षक व ओजस्वी भाषाशैलीचें चरित्रग्रंथास वावडें नसलें तरी ऐतिहासिक सत्याचा सूर्य चरित्रभर तळपत राहिलाच पाहिजे. ऐतिहासिक संशोधनाची रूक्षता जशी या चरित्रांत टाळली आहे तसेंच चरित्रग्रंथास मनोरंजकता आणण्याकरितां अवास्तव

कल्पनेचा लेखकानें कोठेंहि आश्रय केला नसल्यामुळें सामान्य वाचक आणि इतिहासतज्ज्ञ या दोन्ही वर्गांना हें चरित्र सारखेंच प्रिय झालें आहे. आणि हें चरित्र प्रसिद्ध झाल्याला आज चाळीसच्यावर वर्षें होऊन गेलीं असलीं, आणि या अवधींत संशोधनाचा प्रांत बराच विस्तृत झालेला असला, तरी या चरित्राची जागा भरून निघेल असा चरित्रग्रंथ अद्याप तरी मराठींत लिहिला गेला नाहीं. गुजराथी, हिंदी व कानडी या भाषांतून याचीं भाषांतरें झालीं आहेत हाहि या चरित्रग्रंथाच्या लोकप्रियतेचा पुरावा म्हणून देण्यास हरकत नाहीं.

प्रस्तुत चरित्रग्रंथासंबंधीं ' केसरी 'मध्यें विस्तृत अभिप्राय आला होता. ( ७-५-१८९५). त्यांतील कांहीं भाग पुढें देत आहें. " सदहू पुस्तकांत बंडाच्या एका अंगाचीच हकीकत दिली आहे; तथापि ती विस्तृत, साधार व मोठ्या मार्मिक रीतीनें वाचकापुढें माडली असल्यामुळें तीवरून एकंदर धामधुमी-विषयीं सहज अनुमान करितां येतें. महाराणी लक्ष्मीबाईवर आणलेल्या अनेक आरोपांचें चरित्रकारांनीं ठिकठिकाणीं टीपा देऊन मुद्देसूद खंडण केलें आहे. भाषा तर इतकी चटकदार साधली आहे की तें एकदा हातीं घेतल्यावर संपविल्या-शिवाय खालीं ठेववत नाहीं. मधूनमधून कादंबरीच्या धर्तीवर रसभरित वर्णनें घालण्याचा ग्रंथकारानें प्रयत्न केलेला दिसतो, व तीं कितपत साधार आहेत हें कळत नसल्यामुळें केवळ ऐतिहासिक चरित्र या न्यायानें पुस्तकाची किंमत कमी वाटण्याचा संभव आहे. पण एक तर अशीं स्थळें थोडीं असून सहज उमगण्या-सारखीं आहेत व दुसरें त्यांच्या योगानें पुस्तकास निःसंशय मनोवेधकता आली आहे. "

चरित्रामध्यें जें विवेचन आलें आहे त्यासंबंधानें मतभेद होण्याजोगीं कांहीं स्थळें निःसंशय आहेत. ब्रिटिश सरकारसंबंधीं फाजील आदरबुद्धि व्यक्त झालेली दृष्टोत्पत्तीस येते. लक्ष्मीबाईचें चरित्र म्हणजे पर्यायानें इंग्रजांच्या तत्कालीन अनन्वित कृत्यांचें वर्णनच म्हणावयाला हरकत नाहीं. तेव्हां ते करीत असता त्यांत फाजील कठोरपणा व तीव्रता वाटूं नये म्हणून इंग्लिश ऑफिसर आणि ब्रिटिश सरकार यांच्याबद्दल मजकूर लिहितांना विशेषणाची खैरात जरा सढळ हातानें झाली असावी असा संशय येतो. राणी बंडवाल्यांस सामील कशी झाली हा जो मुख्य मुद्दा आहे त्याचें चरित्रकारानें केलेलें वर्णन आणि समर्थन लंगडें पडतें. राणी प्रथम बंडाला अनुकूल नव्हती, तिनें लिहिलेलीं पत्रें इंग्रजांना पोहोंचलीं नाहींत

यामुळें सर्व घोटाळा झाला वगैरे दर्शविलेली कारणपरंपरा खात्री पटविण्यास असमर्थ आहे. तसेंच राणी व नानासाहेब पेशवे, तात्या टोपे इत्यादि पुढारी यांच्यामध्यें पुढें एकदिल का राहिला नाहीं याचें वर्णन विस्तृत यावयास पाहिजे होतें असें वाटतें.

'**मराठ्यांचे पराक्रम – बुंदेलखंड प्रकरण**' हें पुस्तक लक्ष्मीबाईच्या चरित्रानंतर एकच वर्षानें प्रसिद्ध झालें. हें पुस्तक लिहिण्याची स्फूर्ति व कल्पकता न्यायमूर्ति रानडे यांजकडून त्यांना मिळाली. 'भारतवर्षा'च्या एका अंकांत ते लिहितात ( वर्ष १ लें अंक ७ ) – "महादेव गोविंद रानडे यांनीं 'मराठ्यांच्या इतिहासातील अप्रसिद्ध भाग' म्हणून जे कांहीं भाग लिहिण्याचें योजिलें आहे. त्यांत तंजावर, बुंदेलखंड, नागपुर वगैरे कित्येक प्रांतांतील मराठयांच्या राज्य-सत्तेचा अंतर्भाव होतो. त्यापैकीं ज्यांची-ज्याची माहिती कागदपत्रांच्या द्वारें मिळेल ती मिळवावी असा उद्देश मनांत आल्यावरून आम्हीं बुंदेलखंडांतील कित्येक मित्रांस पत्रें लिहिलीं व तिकडे प्रयत्नहि केला. त्यांमध्यें गोविंदपंत बुंदेले यांचे वंशज, गुलसराईच्या राजघराण्यांतील पुरुष व सागरचे सुभेदार यांच्या भेटीचा लाभ झाला. त्यांस बुंदेलखंडांतील मराठी राजसत्तेचा इतिहास प्रसिद्ध करण्याची इच्छा दर्शविल्यावरून त्यांनीं मोठ्या आनंदानें आपल्याजवळचे जुने कागदपत्र आमच्याजवळ पाठवून दिले. त्यांच्या आधारें 'मराठयांचे पराक्रम – बुंदेलखंड प्रकरण' नामक पुस्तक लिहिलें आहे." असा या पुस्तकाच्या जन्माचा इतिहास आहे.

लक्ष्मीबाईच्या चरित्राची सामुग्री जमा करण्याच्या हेतूनें मध्यहिंदुस्तानांत प्रयत्न करीत असतांना त्यांना राजा छत्रसाल व बुंदेलखंड यासंबंधीं बरीच नवीन माहिती उपलब्ध झाली. त्याच सुमारास मद्रास येथील राष्ट्रीय सभेच्या अधिवेशना-करितां गेले असतांना तंजावर प्रांतांत प्रवास करण्याचा त्यांना योग आला. "सूक्ष्म दृष्टीनें पाहूं गेलें तर मराठी राज्यसत्तेचा उगम कर्नाटकांत तंजावर प्रांतीं झाला व तिची एक शाखा महाराष्ट्रांत येऊन ती तेथील देशस्थिति व नैसर्गीक गोष्टी यांच्या योगानें बळावत जाऊन इतकी विस्तृत झाली कीं तिच्या योगानें सर्व भरतखंड व्याप्त होऊन तिचा एक अत्युच्च झेंडा बुंदेलखंड आक्रमण करून हिमालयापर्यंत जाऊन पोहोंचला." परंतु मराठ्यांच्या इतिहासांत या दोन्ही प्रांतांतील मराठी राज्यसत्तेच्या उत्कर्षापकर्षाचा इतिहास अनुपलब्ध होता. या

प्रांतांप्रमाणेंच मराठे नागपुर, बंगाल, गुजराथ, माळवा इत्यादि महाराष्ट्राबाहेरील प्रांतांमध्यें गेले होते व तेथेंहि त्यांनीं आपली मर्दुमकी गाजविली होती. 'मराठ्यांचे पराक्रम' या नामाभिधानावरून या सदराखालीं हिंदुस्तानच्या निरनिराळ्या प्रांतांमध्यें मराठ्यांनीं वेळोवेळीं जे पराक्रम केले आणि इतिहास निर्माण केला तो सर्व स्फूर्तिदायक वृत्तांत जसजशी माहिती मिळेल त्याप्रमाणें पृथक्-पृथक् खंडांमध्यें द्यावयाचा असा संकल्प असावा असें दिसतें. परंतु या सदराखालीं हें एकच पुस्तक प्रसिद्ध झालें आहे. 'इतिहाससंग्रहां'त 'तंजावरचें राजघराणें' म्हणून कांहीं कागदपत्र त्यानीं पुढें प्रसिद्ध केले आहेत. तथापि या त्यांच्या संकल्पाप्रमाणें मराठ्यांच्या विविध प्रांतातील पराक्रमांचा इतिहास पृथक् भागांमधून त्यानीं प्रसिद्ध केला असता तर ऐतिहासिक वाङ्मयांत उत्कृष्ट भर पडली असती.

बुंदेलखंडांतील मराठी राज्यसत्तेचा इतिहास प्रस्तुत पुस्तकांत दिला आहे. हा इतिहास स्फूर्तिदायक असून साधार माहिती व ओघवती भाषा यांमुळें तो अधिक मनोवेधक झालें आहे. परंतु 'लक्ष्मीबाईच्या चरित्रा'इतकी लोकप्रियता या पुस्तकाला लाभली नाहीं हें खरें ! पुस्तकाच्या पहिल्या कांहीं भागांत राजा छत्रसाल आणि गोविंदपंत बुंदेले या दोन व्यक्तींचीं चरित्रें प्रामुख्यानें आलीं आहेत. गोविंदपंतांनीं पानिपत प्रकरणीं कशा प्रकारें वर्तन केलें याची हकिकत संक्षिप्त रीतीनें या पुस्तकांत आली असली तरी सध्यां उपलब्ध झालेल्या ऐतिहासिक कागदपत्रांमुळें तिचें प्रामाण्य पुष्कळच कमी मानावें लागणार हें उघड आहे. गोविंदपंतांचें पुत्रद्वय बाळाजी गोविंद व गंगाधर गोविंद यांनीं बुंदेलखंडांत मराठी राज्य कायम टिकविण्याचा आटोकाट प्रयत्न केला तो इतिहास मात्र दुसरीकडे फारसा उपलब्ध नाहीं.

'**अयोध्येचे नबाव**' या पुस्तकाला आधार सर्वस्वी इंग्रजी ग्रंथांचा आहे. वरील दोन्ही पुस्तकांचे मानानें हें पुस्तक चांगलें उतरलें नाहीं हें कबूल करणें भाग आहे. महाराष्ट्राचा संपूर्ण इतिहास तयार व्हावयाचा म्हणजे मराठयांचा ज्या-ज्या राज्यसत्तांबरोबर संबंध आला त्यांचा-त्यांचाहि इतिहास अवगत असला पाहिजे. दिल्लीचे मोंगल बादशाहा, हैदराबाद, बंगाल व अयोध्या व लखनौ येथील मुसलमान सुभेदार, राजस्थानांतील रजपूत राजे, पंजाबांतील शिख, कर्नाटकांतील पाळेगार, आणि कोंकणांतील आंग्रे व हबशी संस्थानिक इत्यादि अनेक

सत्तांचा आणि मराठयांचा कसकसा संबंध आला याचा इतिहास उपलब्ध होणें अवश्य आहे. तशा तऱ्हेचा प्रयत्न प्रस्तुत पुस्तकांत केला आहे. हिंदुस्थानचा इतिहास म्हणजे विभिन्न राष्ट्रसमुच्चयाचा इतिहास आहे. त्याचें प्रकाशन करावयाचें म्हणजे प्रथम त्यांतील निरनिराळ्या भागांची सामुग्री सिद्ध करून ते प्रकाशित केले पाहिजेत. नंतर त्यांची संगति जुळवून सर्व राष्ट्रांचे परस्पर संबंध लक्षांत घेतले पाहिजेत. ही कल्पना मनांत बाळगून प्रस्तुत पुस्तक रचिलें आहे; परंतु त्यामध्यें उच्च विवेचन दृष्टि प्रतीत होत नाहीं. इंग्रजी ग्रंथाच्या आधारें सरळ कथन केलेलें आहे. संशोधनाचा कांहींच भाग नसल्यामुळें इतिहासाच्या अभ्यासकाचें समाधान होत नाहीं; आणि एखादी प्रसिद्ध व्यक्ति किंवा रोमांचित करणारा ऐतिहासिक प्रसंग पुस्तकाचा विषय नसल्यामुळें सामान्य वाचकालाहि प्रस्तुत पुस्तक नीरस वाटतें. पुस्तकाच्या शेवटीं अयोध्या आणि लखनौ या स्थळाचें वर्णन दिलें आहे. त्यापैकीं कांहीं भाग ‘ केसरी ’मध्यें ‘ उत्तर हिंदुस्थानांतील प्रवास ’ या शीर्षकाखालीं प्रसिद्ध झालेलाच होता.

‘ **मुसलमानी अमदानींतील मराठे सरदार** ’ आणि ‘ **मराठ्यांचें आरमार** ’ हीं दोन निबंधवजा छोटीं पुस्तकें सरस आणि त्या-त्या विषयावरील उपयुक्त माहिती देणारीं आहेत. हे दोन्ही निबंध अनुक्रमें १९०० व १९०४ सालीं मुंबईच्या ‘ हेमंतव्याख्यानमालें ’त वाचून दाखविण्यांत आले होते. पहिल्या पुस्तकाची कल्पना न्यायमूर्ति रानडे यांच्या ‘मराठ्याच्या सत्तेचा उत्कर्ष’ या पुस्तकांतील ‘How the ground was prepared’ या प्रकरणावरून सुचली आहे. या निबंधाचे – ( १ ) विषयप्रवेश – मराठ्याचा इतिहास, ( २ ) महाराष्ट्र व मराठे, ( ३ ) मुसलमानी अमदानी, ( ४ ) मराठे सरदार, आणि ( ५ ) उपसंहार – असे पांच भाग असून चौथ्या सदराखालीं निंबाळकर, घाटगे, शिर्के, मोहिते आणि माने या पांच घराण्यांचीच अल्पशी माहिती दिली आहे. महाराष्ट्रांत स्वराज्याची मुहूर्तमेढ रोंविली जाण्यापूर्वी जो मुसलमानी अंमल होता त्याचें यथातथ्य स्वरूप काय होतें हा एक वादग्रस्त मुद्दा आहे. मुसलमानी राजवटींत ब्राह्मण्य बुडालें, हिंदुधर्म नाममात्र राहिला, स्त्रियाचें पातिव्रत्य केव्हां भ्रष्ट होईल याचा नेम नसे आणि मालमत्ताहि सुरक्षित नव्हती असें महाराष्ट्राचें चित्र कित्येकदां रंगविलें जातें; तर दुसऱ्या एका पक्षाचें मत असें आहे कीं मुसलमानी अंमलामध्यें लक्षावधि हिंदूंवर जुलूम झाले असले तरी त्यांनीं सर्वांची उन्नतीची आशा कायम ठेविली होती.

त्यांनीं आपल्या सर्व हिंदुप्रजेस योग्य महत्त्वाकांक्षेचीं फळें उपभोगण्याचा मार्ग खुला ठेविला होता; आणि अधिक बुद्धिमान्, कर्तृत्ववान् आणि साहसी लोकांस मान-मरातब, राजकीय सत्ता, मोठमोठे लष्करी अधिकार आणि त्याबरोबर जहागिरी आणि इनामें मिळण्याचीहि लालसा बाळगण्यास प्रोत्साहन दिलें होतें. वरील निबंधांतील विवेचन या दुसऱ्या पक्षाकडे झुकत आहे. आणि जे मुसलमान राज्य-कर्ते आपल्या प्रजेस प्रेमभावानें वागवीत होते त्यांच्याशीं महाराष्ट्रीय प्रजाजनहि अत्यंत राजनिष्ठेनें वागत होते असा निष्कर्ष लेखकानें काढिला आहे.

मराठ्यांच्या राष्ट्रीय संस्कृतीच्या इतिहासांत त्यांचा राज्यकारभार, कायदेकानू, वसुलीची रीत, सैन्य व आरमार यांची रचना, युद्धपद्धति इत्यादि अनेक बाबींचा समावेश होतो; आणि या निरनिराळ्या अंगोपांगांवर विस्तृत ग्रंथ झाले पाहिजेत; त्याखेरीज महाराष्ट्राच्या संस्कृतीची यथार्थ कल्पना यावयाची नाहीं. यांपैकीं मराठ्यांच्या आरमाराबद्दलची कांहीं माहिती 'मराठ्यांचें आरमार' या निबंधांत दिली आहे. मराठ्यांच्या समरभूवरील लोकोत्तर शौर्याचे पवाडे बऱ्याच इतिहासकारांनीं गायिले आहेत; परंतु मराठ्यांच्या समुद्रावरील युद्धनैपुण्याची ख्याति आमची आम्हांस सुद्धां नाहीं. एके काळीं सर्व पश्चिम किनारा आपल्या ताब्यांत ठेवण्याकरितां मराठ्यांनीं पराक्रमाची पराकाष्ठा केली, आणि दर्यावर्दी-पणांत ज्यांचा जन्म केला अशा यूरोपीय राष्ट्रांना धाकांत ठेविलें ही कामगिरी लहानसहान नव्हे. प्रस्तुतच्या छोट्या पुस्तकांत या महत्त्वाच्या विषयाकडे इतिहासज्ञांचें त्यांनीं लक्ष वेधिलें आहे. ( १ ) शिवाजीमहाराजांच्या कारकीर्दीतील आरमार, ( २ ) इ. स. १६८० ते इ.स. १७५६ पर्यंतचें मराठ्यांचें आरमार, आणि ( ३ ) पेशव्यांचे वेळचें आरमार-असे या विषयाचे तीन भाग करून त्यांचें क्रमशः विवेचन केलें आहे. हें विवेचन जसें अभिनव तसेंच मनोरंजक झालें आहे आणि यांत दिलेल्या संक्षिप्त माहितीवरून मराठी राज्यामध्यें आरमारासारख्या महत्त्वाच्या विषयाकडे दुर्लक्ष होत नसून राज्यरक्षणाच्या कामीं सैन्याप्रमाणें आरमारहि ते आधारस्तंभ मानीत व त्यामध्यें त्यांनीं वेळोवेळां सुधारणा केल्या होत्या असें स्पष्ट निदर्शनास येतें.

अवशिष्ट राहिलेल्या चार पुस्तकांपैकीं '**बायजाबाईसाहेब शिंदे यांचें चरित्र**' '**दिल्ली आणि इंद्रप्रस्थ**' आणि '**सवाई माधवराव पेशव्यांचा दरबार**' हीं तीन पुस्तकें सामान्य दर्जाचीं आहेत. लेखनशैली मोहक

आहे आणि सर्वसाधारण वाचकांस तीं मनोरंजक वाटल्यावांचून राहणार नाहींत; परंतु ऐतिहासिक संशोधनाच्या दृष्टीनें यापैकीं एकहि पुस्तक उच्च दर्जाचें नाहीं असें म्हणावें लागतें. बायजाबाई शिंदे या दुसऱ्या बाजीरावाचा हस्तक जो सर्जेराव घाटगे यांच्या कन्या आणि दौलतराव शिंदे यांच्या धर्मपत्नी. ही 'दक्षिणची सौंदर्यलतिका' प्राप्त व्हावी म्हणून दौलतरावाला आपल्या दिवाणगिरीचीं वस्त्रें सर्जेराव घाटगे याला द्यावीं लागलीं. बाजीरावाला पेशवेपद मिळवून देण्याकरितां दौलतरावानें मदत करावी व या मदतीकरिता बाजीरावानें त्याला दोन कोट रुपये द्यावे असा करारमदार ठरला. हे दोन कोट रुपये वसूल करण्याकरितां सर्जेरावानें पुणें शहर लुटलें व अनन्वित प्रकार केले. खुद्द बाजीरावाच्या तोंडून 'सर्जेरावाचा छळ आतां माझ्याच्यानें पाहवत नाहीं' असे उद्गार त्यानें काढले इतका त्यानें हलकल्लोळ मांडला. असो. दौलतराव शिंद्याच्या मागून ग्वालेरच्या जहागिरीची सर्व व्यवस्था बायजाबाईकडे आली आणि अनेक गंडांतरें आलीं असताना तिनें खूप शर्थीनें आपली जहागिर कायम राखिली इत्यादि हकीकत रसाळ वाणीनें सांगितली आहे. परंतु असा एक विचार येतो कीं बापूसाहेबांनीं आपला काळ व शक्ति बायजाबाई शिंद्यासारख्या दुय्यम दर्जाच्या स्त्रीचें चरित्र लिहिण्यांत खर्च न करतां त्यांच्या पूर्वमनोदयाप्रमाणें अहल्याबाई होळकर यांचे चरित्र किंवा 'मराठ्यांचे पराक्रम' यातील इतर भाग लिहिण्याच्या कारणी लावली असती तर भरीव कामगिरी केल्याचें त्यांना श्रेय मिळालें असतें.

१९०३ सालीं सातवे एडवर्ड बादशाहा याच्या राज्याभिषेकानिमित्त दिल्ली येथें मोठा समारंभ झाला. या समारंभाचा फायदा घेऊन '**दिल्ली अथवा इंद्रप्रस्थ**' हें पुस्तक लिहिलें आहे. सन १८९३ सालीं स्वतः दिल्ली पाहून मिळविलेली माहिती आणि हंटर, कीन वगैरे ग्रंथकारानीं करून ठेविलेलीं टांचणें यांच्या योग्य संमिश्रणानें सदहू छोटेखानी पुस्तक लिहिलें आहे. दिल्लीची ऐतिहासिक माहिती वीस पानांत आणिली आहे, पुढील साठ पानांत प्रवाशाला उपयुक्त अशी माहिती आहे. आणि शेवटल्या दहा पानांतील पहिल्या परिशिष्टांत युधिष्ठिरापासून पृथ्वीराज चव्हाणपर्यंतच्या प्राचीन हिंदु राजांची नाममालिका आणि दुसऱ्या परिशिष्टांत दिल्लीच्या मुसलमानी बादशहांच्या वंशावळी दिल्या आहेत. पुस्तकाचें एकंदर स्वरूप पाहता तें त्रोटक दिसतें आणि प्रसंग साजरा करण्याकरितां घाईघाईनें लिहून प्रसिद्ध केलें आहे. "प्रत्येक रेल्वेकंपनीच्या मार्ग-

दर्शिकेमध्यें जो शेवटला स्थलवर्णनाचा भाग जोडलेला असतो त्याच धर्तीवर पण त्यापेक्षां किंचित् विस्तृत आणि मनोरंजक असें प्रस्तुत पुस्तकांतील वर्णन आहे."- असा अभिप्राय 'विविधज्ञान विस्तारां'तील लेखकानें दिला आहे तो कांहींसा बरोबर वाटतो. एखाद्या नवाशिक्या लेखकानें असें पुस्तक लिहिलें असतें तर त्याचें कौतुक झालें असतें. परंतु हें पुस्तक ज्या वेळीं लिहिलें त्या वेळीं बापूसाहेबांची इतिहाससंशोधक म्हणून प्रसिद्धि झालेली होती. त्यामुळें सखोल आणि सूक्ष्म अभ्यास करून लिहिलेल्या पुस्तकाची अपेक्षा त्यांच्याकडून केली असल्यास वाचकवृंदाचा काय दोष ?

'सवाई माधवराव पेशव्यांचा दरबार' ह्या पुस्तकाचें जोडनांव 'त्या वेळचे पहिले इंग्रज रेसिडेंट सर चार्लस मालेट' असें आहे; आणि तेंच अधिक सार्थ आहे. कारण या पुस्तकांत सवाई माधवराव यांच्या कारकीर्दीबद्दल विशेष हकी-कत येण्याऐवजीं मालेट साहेब, त्यांचें पुण्यास वास्तव्य व दहा वर्षांच्या अवधींत त्यांनीं पुण्यास राहून केलेलें कार्य याचीच हकीकत अधिक आहे. 'सर चार्लस मालेट यांचें चरित्र' हेंच नांव या पुस्तकाला अधिक शोभलें असतें व तें यथार्थहि पण झालें असतें. इतिहासामधील एखादें विशिष्ट प्रकरण घेऊन तत्संबंधीं जेवढी म्हणून माहिती संकलित करतां येणें शक्य आहे तेवढी जुळवून तिची संगतवार मांडणी करणें व तें ऐतिहासिक प्रकरण सामान्य वाचकालाहि सुबोध व मनोरंजक वाटेल असें लिहिणें हा उद्देश प्रस्तुत पुस्तकाच्या मुळाशीं दिसतो. सर चार्लस मालेट हा कांहीं पहिल्या प्रतीचा मुत्सद्दी नव्हता. त्याला जें कांहीं महत्त्व आलें त्याचें कारण म्हणजे १७८६ पासून १७९६ पर्यंतच्या पुणें दरबार आणि इंग्रज यांच्या प्रत्येक संबंधांत तो मध्यस्थ होता एवढेंच. त्यानें एखादी प्रसिद्ध लढाई मारली नाहीं किंवा तो मुत्सद्दीपणाचे डावहि खेळला नाहीं. तो मुत्सद्द्यांचा हस्तक होता; परंतु त्या काळीं या रेसिडेंटाची बरदास्त फार ठेवावी लागत असे. कारण ते जसे रिपोर्ट धाडीत तशीं वरून सूत्रें हालविलीं जात. प्रस्तुत पुस्तकांत तत्कालीन राज-कारणांत मालेटसाहेबांनीं काय भाग घेतला याची हकीकत आलीच आहे; परंतु त्याबरोबरच – "सर चार्लस मालेट यांच्या आश्रयाखालीं पुण्यांत बड्याबड्या सरदार घराण्यांत इंग्रजी औषधें कशीं शिरलीं, दुसऱ्याहि पाश्चात्य उपयुक्त वस्तूंचा कसा प्रसार झाला, चित्रकार मि. वेल्स हा सरदारात कसा नांवाजला गेला व त्याच्यामुळें व नजरेखालीं पहिल्या चित्रशाळेची स्थापना होऊन पाश्चात्य

चित्रकलेचें ज्ञान पुण्यास कसें फैलावलें" – वगैरे अन्य मनोरंजक माहितीहि आली आहे.

ज्या पुस्तकाबद्दल महाराष्ट्रांत वादाची धुमश्चक्री माजून राहिली होती व ज्याचा निकाल कोणाच्या तर्फे लागला हें अद्यापिहि सांगतां येत नाहीं तो चरित्रग्रंथ म्हणजे '**महापुरुष ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर**' हा होय. हा ग्रंथ १९०१ सालच्या प्रारंभीं प्रसिद्ध झाला. मराठ्यांच्या इतिहासांत ब्रह्मेंद्रस्वामीचें काय स्थान असेल तें असो, पण त्याची तितकीशी प्रसिद्धी केव्हांहि झालेली नव्हती हें कबूल केलें पाहिजे. ब्रह्मेन्द्रस्वामीच्या अमूल्य पत्रव्यवहाराचा उल्लेख ग्रांट डफनें आपल्या इतिहासांत केला आहे. त्यावरून त्यानें यापैकीं बरींचशीं पत्रें पाहिलीं होतीं यांत शंका नाहीं. 'विविधज्ञानविस्तार' व 'काव्येतिहाससंग्रह' या मासिकांनीं जुनीं ऐतिहासिक कागदपत्रें प्रसिद्ध करण्याचें काम अंगावर घेतल्यानंतर स्वामींचीं दहा-वीस किरकोळ पत्रें व एक छोटीशी बखर जनतेपुढें आली. परंतु त्यांचा पत्रव्यवहार विपुल होता. त्या मानानें हीं पत्रें म्हणजे कांहींच नव्हत. इ. स. १८९५ सालीं ऐतिहासिक कागदपत्रांचा शोध करीत असताना सातारचे छत्रपति प्रतापसिंह महाराज यांच्या दप्तरांत बापूसाहेबांना स्वामींचें निवासस्थान जें धावडशी तेथील पत्रव्यवहाराच्या बारनिशीचें एक पुस्तक उपलब्ध झालें. यामध्यें पुष्कळशीं पत्रें अस्सलबरहुकुम नकलाच्या रूपानें दाखल केलीं होतीं. तसेंच धावडशी संस्थानांतील दप्तरांत आणि पिंपरी येथें या पत्रव्यवहाराचा आणखीहि कांहीं भाग मिळाला. येणेंप्रमाणें पांच-सहा वर्षांच्या अवधींत हजार दीड हजार कागद बापूसाहेबांना मिळाले. या पत्रव्यवहारापैकीं ३७५ पत्रें प्रस्तुत पुस्तकाच्या उत्तरार्धांत समाविष्ट केलीं असून पूर्वार्धांत तदनुरोधानें त्यांनीं स्वामींचें चरित्र लिहिलें आहे.

बापूसाहेबांनीं ब्रह्मेन्द्रस्वामींचें चरित्र व पत्रव्यवहार प्रसिद्ध केला त्याच वेळीं म्हणजे १९०१ सालांतच इतिहासाचार्य राजवाडे यांचा 'मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनां'चा तिसरा खंड 'ग्रंथमालें'तून प्रसिद्ध झाला. या तिसऱ्या खंडांत एकंदर ५६८ लेखांक असून त्यांपैकीं २३६ पत्रें ब्रह्मेन्द्रस्वामीसंबंधीं आहेत. राजवाडे यांच्या नेहमींच्या पद्धतीला अनुसरून या खंडाला त्यांनीं ९४ पृष्ठांची विस्तृत प्रस्तावना लिहिली असून, ब्रह्मेन्द्रस्वामीच्या राजकारणाविषयीं आपलें मत दिलें आहे. बापूसाहेब आणि राजवाडे यांच्या याविषयींच्या मतांत दोन ध्रुवांइतकें अंतर

आहे हें खालीं दिलेल्या उताऱ्यांवरून स्पष्ट होईल. बापूसाहेब लिहितात—"शिवाजी महाराजाच्या वेळेला रामदासस्वामींनीं जें कार्य केलें तेंच कार्य शाहू व बाजीराव यांच्या कारकीर्दीत ब्रह्मेन्द्रस्वामींनीं केलें असें म्हणण्यास कोणतीच हरकत नाहीं. ...... रामदासस्वामींच्या कृपासाहाय्यानें मराठी राज्याची संस्थापना झाली. आणि ब्रह्मेन्द्रांच्या कृपाप्रसादानें मराठी राज्याचा अभ्युदय झाला. ... ... स्वामींच्या चळवळी अनंत असून त्यांच्या राजकारणाचा पसारा उत्तर हिंदुस्थानांतील धारा-नगरीपासून दक्षिणेंतील गुत्तीपर्यंत होता." आतां याच ब्रह्मेन्द्रस्वामींबद्दल राजवाडे काय म्हणतात पाहा — " सूत्रधार या नात्यानें मराठ्यांच्या राजकारणात ब्रह्मेन्द्राचा बिलकुल संबध नव्हता. ... ब्रह्मेन्द्रस्वामींच्या पत्रांत स्वामींचें वर्तन राष्ट्रीय नीति-मत्तेच्या दृष्टीनें अत्यंत गर्हणीय होतें याचे दाखले पदोपदीं सांपडण्यासारखे आहेत. राष्ट्रीय व वैयक्तिक दृष्टीनें ब्रह्मेन्द्रांचें आंग्र्याशीं वर्तन अत्यंत निंद्य होतें. इस्टेट करण्याचा ब्रह्मेन्द्राला नाद होता. तो खुनशी व तिरसट स्वभावाचा होता; व्याज-बट्टा सावकारी करी, अचकट विचकट शिव्या देई व शापाची भीति घाली. ब्रह्मेन्द्राला एक वाक्य शुद्ध व सरळ लिहितां येत नव्हतें; ...... ब्रह्मेन्द्रस्वामीचीं जीं आज सहाशे पत्रें उपलब्ध होऊन प्रसिद्ध झालीं आहेत त्यांपैकीं निम्यांत तेल, तूप, चंदन, केशर, किनखाप, घोंगडी, दुलई वगैरे जिनसांची मागणी स्वामीनें त्या वेळच्या मोठमोठ्या लोकाजवळ केली आहे. ... ... ब्रह्मेन्द्रस्वामी निरिच्छ होता, परमहंस होता, सूत्रधार होता, राज्यकार्यकुशल होता वगैरे नानाप्रकारच्या कल्पना आजपर्यंत प्रचलित होत्या; त्या कितपत खऱ्या आहेत हें दाखविताना हीं तेलातुपाचीं पत्रें छापणें आवश्यक झालें आहे. ब्रह्मेन्द्रस्वामींच्या आवक व जावक अशा सहाशें पत्रांत ज्यांत काहीं जिनसांची मागणी केली नाहीं अशीं पन्नासहि पत्रें नाहींत. सारांश जिनसांची मागणी हा स्वामीच्या हृदयांतील मोठा हव्यास होता. "

ब्रह्मेन्द्राच्या चरित्राचें रहस्य व जीवितकार्याचें स्वरूप यासंबंधीं या दोघां इति-हासपटूंच्या दृष्टिकोनांत इतका फरक असल्यामुळे राजवाड्यांनीं जातां-जातां बापू-साहेबांवर कठोर टीका करावी यांत आश्चर्य नाहीं; पण त्यांनीं केलेली ही कठोर टीका वाजवीपेक्षां फाजील जहाल, तुसडी व बोचक झाली आहे. 'ग्रंथमाले'मध्येंच राजवाडे यांच्या टीकेला इंदोरचे श्री. वि. आठल्ये यांनीं विस्तृत उत्तर देऊन त्यांतील पुष्कळशा विधानांचा फोलपणा वाचकांच्या निदर्शनास आणला आहे.

या सर्व वादांत शिरण्याचें येथें कारण नाहीं. एवढें मात्र खरें कीं ब्रह्मेन्द्रस्वामीचें चरित्र लिहितांना बापूसाहेबानीं त्याची अवास्तव स्तुति केली आहे. कोणत्याहि विषयासंबंधीं लिहितांना त्याकडे भक्तियुक्त व प्रेमादरपूर्वक अंतःकरणानें पाहावयाचें हा त्याच्या लेखनांतील दोष येथेंहि प्रतीतीस येतो. त्यामुळें ब्रह्मेन्द्राला रामदासाच्या पंक्तीला नेऊन बसविण्याचा प्रमाद त्यांच्या हातून घडला. परंतु त्याबरोबर हेंहि कबूल केलें पाहिजे कीं राजवाडे म्हणतात त्याप्रमाणें ब्रह्मेन्द्र हा – " भगवीं वस्त्रें पांघरून कृष्ण कर्मे करणारा, परस्परात वैमनस्यें माजविणारा आणि ज्यांनीं विश्वास ठेविला त्यांचे गळे कापण्याचा धडा महाराष्ट्रात प्रथम घालून देणारा " – असा नीचापेक्षां नीचहि नव्हता. शाहू, बाजीराव, चिमाजी अप्पा, आंग्रे मंडळी व इतर सरदार ही तत्कालीन पुढारी व राज्यकर्त्री मंडळी ज्याला गुरुस्थानीं मानितात व ज्यानें आपल्या हयातींत देवस्थानें, विहिरी, तलाव इत्यादिकांकरितां सुमारें दहा लक्ष रुपयांची उलाढाल त्या काळीं केली ती व्यक्ति अगदींच दुबळी, ढोंगी व कर्तृत्वशून्य असेल असें म्हणवत नाहीं. असो.

बापूसाहेबानीं मराठीमध्यें ग्रंथरचना जी केली त्याची हकीकत येथपर्यंत सादर केली. ही सर्व रचना १८९४ ते १९०५ पर्यंतच्या कालावधीमध्यें झालेली आहे. तदनंतरच्या कालांत कांहीं इंग्रजी पुस्तकें खेरीज करून त्यानीं स्वतंत्र ग्रंथरचना बिलकुल केली नाहीं. 'इतिहाससंग्रहा'चें प्रकाशन आणि ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय या कार्याकडे त्यांनीं अधिक लक्ष दिल्यामुळें ते स्वतंत्र ग्रंथरचना करूं शकले नाहींत. परंतु दोन-तीन पुस्तकांकरितां त्यानीं सामग्रीची जमवाजमव केली होती.

**इंग्रजी पुस्तकें** – त्यांनीं लिहिलेलीं इंग्रजी पुस्तकें कांहींशीं प्रासंगिक स्वरूपाचीं आहेत. 'Notes on Satara' या पुस्तकांत साताऱ्यातील व साताऱ्याच्या आसपासच्या इतिहासप्रसिद्ध स्थळांची ऐतिहासिक माहिती दिली आहे. महाबळेश्वराला महत्त्व कोणीं आणलें, त्याची ऐतिहासिक परंपरा कशी आहे, आणि महाबळेश्वरावरील नितांतरमणीय व प्रतिक्षणीं नवनवीन भासणाऱ्या सृष्टिदेवीच्या विलासाचें वर्णन प्रसिद्ध पुरुषानीं कसें केलें आहे वगैरे माहिती त्यांच्या 'Mahabaleshwar' या पुस्तकांत मिळतें. 'Sangli State' या पुस्तकांत सांगली संस्थानाच्या स्थापनेचा इतिहास मुख्यतः दिला आहे. 'Panhala' हें पुस्तक कोल्हापुर दरबारच्या खास विनंतीवरून लिहिण्यांत आलें आहे. या सर्व पुस्तकांत सामान्य वाचकांच्या दृष्टीनें महत्त्वाचें व त्यांना विशेष मनोरंजक वाटेल असें पुस्तक म्हटलें म्हणजे

'Poona in bygone days' हें होय. पुस्तकाचें नांव जरी 'प्राक्कालीन पुणें' असें आहे तरी त्यामध्यें सवाई माधवराव पेशव्याच्या कारकीर्दीतील पुण्याची माहिती प्रामुख्यानें आली आहे. याशिवाय किंकेड यांनीं 'History of the Mahrattas' म्हणून जे तीन भाग लिहिले आहेत त्यांतहि बापूसाहेबांनीं पुष्कळच मदत केली आहे. बापूसाहेबांनीं लिहिलेल्या इंग्लिश पुस्तकांपैकीं महाबळेश्वर आणि पेशवाईतील पुणें हीं त्यांतल्या त्यांत बरीं आहेत. त्यांनीं लिहिलेलीं मराठी पुस्तकें नवीन माहिती उपलब्ध झाल्यामुळें कदाचित् मागें पडतील. परंतु त्यांचें नांव महाराष्ट्राच्या आधुनिक इतिहासांत चिरस्मरणीय होऊन राहिलें आहे तें ऐतिहासिक साधनें मिळविण्यासाठीं व प्रकाशित करण्यासाठीं त्यांनीं जे दीर्घोद्योग केले त्यामुळेंच होय.

( २ ) **ऐतिहासिक कागदपत्रांचें संशोधन व प्रकाशनः**– हें कार्य बापूसाहेबांनीं 'भारतवर्ष' 'इतिहाससंग्रह' आणि 'पेशवे दप्तरांतील निवडक उतारे' अशा तीन मार्गांनीं केलें आहे. 'भारतवर्षा'चा पहिला अंक कार्तिक शुद्ध प्रतिपदा शके १८१८ म्हणजे इ. स. १८९६ सालीं प्रसिद्ध झाला. पहिल्या वर्षाचे बारा अंक प्रसिद्ध होण्यास मार्च १८९९ उजाडला. कारण मध्यंतरीं प्लेगानें पुण्यास एकच कहर उडवून दिला होता. तसेंच रँडसाहेबांच्या खुनामुळें पुण्याचें राजकीय वातावरणहि बरेंच प्रक्षुब्ध झालें होतें. 'भारतवर्ष' हें मासिक 'डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी'च्या तर्फे पुणें येथें प्रकाशित होत असल्यामुळें पुण्यांतील या आपत्तीचा त्याच्यावर परिणाम झाल्यावांचून राहिला नाहीं. दुसऱ्या वर्षाचा आरंभ एप्रिल १८९९ हा धरून मासिक पुढें चालू ठेविलें; परंतु 'भारतवर्षा'चे एकंदर २४ अंक निघून तें बंद पडलें. या मासिकाचें प्रथम जें स्वरूप ठरलें त्यांत इतिहासविषयक कागदपत्रांचें प्रकाशन करणें हा मुख्य हेतु असला तरी केवळ संकलनात्मक असें त्याचें स्वरूप नव्हतें. जवळजवळ निम्मीं पृष्ठें वाङ्मयविषयक आणि चर्चात्मक लेखांना वाहण्याचें ठरलें होतें. तथापि पहिल्या वर्षातील 'ऋग्वेद' आणि 'प्राचीन राज्यपद्धति' हे दोन लेख सोडले तर बाकी सर्व मजकूर मराठ्यांच्या इतिहासाबद्दलच आहे. 'डेक्कन व्हर्नाक्युलर सोसायटी'च्या विद्यमानें हें मासिक प्रसिद्ध होण्याचें ठरलें. 'भारतवर्षा'चे दोन्ही वर्षांचे चोवीस अंक मिळून बरेच कागदपत्र प्रसिद्ध झाले. पहिल्या वर्षीं प्रसिद्ध झालेल्या जुन्या कागदपत्रांत विशेष नमूद करण्याजोगीं प्रकरणें म्हटलीं म्हणजे

' पंतप्रतिनिधींची बखर ' ' होळकर, बुंदेले, बावडेकर व पानसे या घराण्यांच्या कैफियती ' ' न्यायशास्त्री पंडितराव यांची बखर ' ' शिवछत्रपतीची ९१ कलमी बखर ' इत्यादि होत. याशिवाय ' ऐतिहासिक पत्रें, यादी वगैरे ' या सदराखालीं पहिल्या वर्षी ८४ व दुसऱ्या वर्षी १६२ लेखांक प्रसिद्ध झाले आहेत. दुसऱ्या वर्षीहि असेच महत्त्वाचे जुने कागदपत्र प्रसिद्ध झाले आहेत. वर्षद्वयाची आपली कारकीर्द संपवून लोकाश्रयाच्या अभावीं प्रस्तुत मासिक बंद करावें लागलें.

ऐतिहासिक कागदपत्रांच्या प्रकाशनाचा दुसरा प्रयत्न म्हणजे ' इतिहाससंग्रह ' हें मासिक होय. हा प्रयत्न ' भारतवर्षा 'च्या मानानें दीर्घजीवि ठरला आणि पुष्कळच ऐतिहासिक माहिती तद्द्वारा प्रसिद्ध झाली. ऑगस्ट १९०८ पासून जुलै १९१६ पर्यंत म्हणजे सतत सात वर्षे चालून प्रस्तुत मासिक बंद पडलें. आठव्या वर्षाचे पहिले तीन अंक प्रसिद्ध झाले होते असें कळतें. ' इतिहाससंग्रहा 'चा मुख्य उद्देश अस्सल कागदपत्र व अप्रकाशित माहिती प्रकाशित करणें हा होताच; तथापि तो अमलात आणण्याचा प्रयत्न अव्यवस्थित रीतीनें व कंटाळवाण्या पद्धतीनें केला जाणार नाहीं अशी हमी संपादकांनीं पहिल्याच अंकांत घेतली आहे. " आम्हांस प्राप्त झालेला ऐतिहासिक कागदपत्रांचा संचय फार मोठा व विपुल आहे, व तो प्रकाशित करणें आमचें आदिकर्तव्य आहे. तथापि कांहीं विवक्षित इतिहासभक्तांवांचून सर्वसामान्य वाचकांस वाटेल तो कागद व वाटेल तें पत्र समजण्याची शक्ति अद्यापि प्राप्त झाली नसल्यामुळें आम्हीं संगतवार रीतीनें ऐतिहासिक प्रकरणें सादर करण्याचें योजिलें आहे." संपादकांच्या या प्रतिज्ञेप्रमाणें ' इतिहाससंग्रहां 'त उपयुक्तता, मनोरंजकता व वैचित्र्य शेवटपर्यंत कसें कायम ठेवण्यांत आलें आहे हें, ते अंक चाळून पाहिले म्हणजे प्रत्ययास येतें. 'इतिहाससंग्रहा'च्या द्वारा इतकी 'विविध माहिती वाचकांच्या पुढें आली आहे कीं त्याचें संक्षिप्त पर्यालोचन करणें सोपें नाहीं. महाराष्ट्रांतील इतिहाससंशोधनाच्या प्रयत्नांचा कोणी इतिहास लिहिण्याचें मनावर घेतलें तर त्या लेखकाला 'इतिहाससंग्रहा'ला अग्रस्थान द्यावें लागेल यांत शंका नाहीं.

जुन्या कागदपत्रांच्या प्रकाशनाच्या बाबतींतला त्यांचा आणखी एक प्रयत्न म्हणजे पेशवे दप्तरांतील प्रकाशित झालेले कांहीं भाग. न्यायमूर्ति रानडे यांच्या प्रोत्साहनानें वाड यांनीं तें काम आपल्या अंगावर घेतलें. पेशवे दप्तरांतील सुमारें सत्तावीस हजार रुमाल पुणें येथें सरकारच्या ताब्यांत आहेत. त्यांतील

महत्त्वाचे कागदपत्र शोधून काढून प्रकाशित करण्याच्या कार्याचा बोजा वाड, का. ना. साने व पुरुषोत्तम मावजी यांच्याबरोबर बापूसाहेबांनींहि उचलला; खालील आठ भागांचें संशोधन करण्यात त्यांचा हात होता. कित्येक तर त्यांनीं स्वतःच तयार केले होते. ते भाग येणेंप्रमाणें:—

( १ ) पेशव्यांच्या रोजनिशींतील उतारे : शाहूकालीन; ( २ ) व ( ३ ) सदर्हू : बाळाजी बाजीरावकालीन-दोन भाग; शाहू आणि पेशवे यांच्या दप्तरांतील निवाडे; ( ४ ) सनदा व पत्रें; ( ५ ) कैफियती, याद्या वगैरे; ( ६ ) तह, करारमदार आणि सनदा; ( ७ ) तंजावरचें राजघराणें.

'इतिहाससंग्रह' १९१६ सालीं बंद पडला. यूरोपमधील महायुद्धाची झळ त्याला लागली. त्यानंतर पुढील दहा वर्षें ज्या एका कल्पनेनें प्रेरित होऊन बापूसाहेबांचे उद्योग चालू होते ती म्हटली म्हणजे सातारा येथें ऐतिहासिक वस्तुसंग्रहालयाची स्थापना. १९०२ सालीं कोल्हापुरकर महाराजाच्या बरोबर इंग्लंडला जाण्याची संधि त्यांना मिळाली; या प्रवासाची हकीकत कोल्हापुर येथें प्रसिद्ध होण्याऱ्या 'मराठा दीनबंधु' या साप्ताहिकांत विस्तृत रीतीनें त्यांनीं दिली आहे. इंग्लंडमध्यें असतांना निरनिराळीं पदार्थसंग्रहालयें त्याच्या अवलोकनांत आलीं व त्यावरून ऐतिहासिक वस्तुसंग्रहालयाची कल्पना त्यांना स्फुरली. ४ डिसेंबर १९१२ रोजीं सरकारास पाठविलेल्या पत्रांत अशा संस्थेची आवश्यकता प्रतिपादितांना ते लिहि-तात- "इतिहाससंशोधकाच्या कार्यातील पहिली मुख्य अडचण म्हणजे चांगलें ग्रंथालय व वस्तुसंग्रहालय यांची उणीव ही होय. स्वतःस लागणारे जुने कागदपत्र व पुस्तकें मिळविण्यास किती आयास पडतात हें मला स्वतःच्या उदाहरणावरून चांगलें ठाऊक आहे. म्हणून माझी उत्कट इच्छा ही आहे कीं मी एवढ्या परिश्रमानें जमविलेल्या संग्रहाचा माझ्या सहकाऱ्यांस उपयोग होऊं देऊन त्यांच्या अडचणी शक्य तितक्या कमी कराव्या." मध्यंतरीं सरकारबरोबर बरीच वाटाघाट होऊन संग्रहालयाची स्थापना करण्याबद्दलचा सरकारी ठराव ता. २९ ऑगस्ट १९१४ रोजीं जाहिर झाला. सातारा येथील राजवाड्यासमोरील पटांगणांत दुमजली इमारत बांधून ऐतिहासिक कागदपत्रें, पुस्तकें आणि चित्रें या तिन्ही गोष्टींचा समावेश करण्याचें ठरलें. परंतु इतक्यांत महायुद्ध सुरू झाल्यामुळें हा प्रश्न कालावधीवर टाकण्यांत आला. युद्धसमाप्तीनंतर या प्रश्नास पुन्हां चालना मिळाली; तथापि पैशाच्या अडचणीमुळें पूर्वींची योजना सरकारासहि अंमलांत आणतां

येईना. तडजोड म्हणून पुढील मार्ग सुचविण्यांत आला. संग्रहालयाचे एक जुन्या चित्रांचा व दुसरा कागदपत्रांचा असे दोन भाग करून फक्त दुसऱ्या भागाचीच व्यवस्था सरकारनें करावी. त्याप्रमाणें सरकारनें संग्रहालयाकरितां एक इमारत बांधली आणि या इमारतींत ता. ३ नोव्हेंबर १९२५ रोजीं मुंबईचे गव्हर्नर नेक नामदार सर लेस्ली विल्सन यांच्या हस्तें म्युझिअमचा उद्घाटन समारंभ झाला. अनेक अडचणींचें निवारण होऊन अखेरीस म्युझिअमची कल्पना साध्य झाली याबद्दल बापूसाहेबांना आनंद व अभिमान खास वाटला असेल. पुढील कार्याची दिशाहि त्यांनीं ठरविली होती. लेखन, संशोधन व प्रकाशन हीं कार्यें पूर्ववत् जोमानें सुरू करावयाचीं असा त्यांचा निश्चय झाला होता. परंतु म्युझिअमच्या स्थापनेला पुरे पांच महिने लोटतात न लोटतात तोंच करुणाविमुख मृत्युनें त्यांना ओढून नेलें. म्युझिअममध्यें तीस हजार मराठी व सुमारें चार हजार इंग्रजी कागदपत्रें आहेत. त्याखेरीज दोन-तीन हजारापर्यंत ऐतिहासिक ग्रंथ आहेत ते निराळेच.

ग्वालेर-दरबारच्या खास विनंतीवरून ग्वालेरसंस्थानविषयक जुने ऐतिहासिक कागदपत्र त्यांनीं संपादून प्रकाशित केले आहेत त्याचाहि उल्लेख करणें अवश्य आहे. हे भाग संस्थाननें आपल्या उपयोगाकरितां प्रसिद्ध केले असल्यामुळें ते सर्वसामान्य जनतेला तितकेसे माहित नाहींत. त्यांपैकीं एक इंग्रजी कागदपत्रांचा आहे. मराठींत एकंदर पांच भाग आहेत; आणि त्याशिवाय एक लहानसा खंड असून त्यामध्यें संस्थानविषयक महत्त्वाचे कागदपत्र छापिले आहेत.

लेखनकार्य, प्रकाशनकार्य आणि संकलनकार्य या त्रिविध क्षेत्रातील बापूसाहेबांची कामगिरी येथवर पाहिली. त्यांनीं लिहिलेल्या पुस्तकांत 'झांशीच्या राणीचें चरित्र' आणि 'ब्रह्मेन्द्रस्वामीचें चरित्र व पत्रव्यवहार' हीं पुस्तकें अद्यापिहि टिकून राहतील. त्यांची भाषाशैली चित्तवेधक व मनोहारी आहे. जुन्या शब्दांचा निष्कारण भरणा किंवा इंग्रजी धर्तीवरची वाक्यरचना त्यांत नाहीं. तसेंच खडबडीतपणा किंवा राकटपणाहि तिच्यांत दिसून येत नाहीं. हरिभाऊ आपटे यांच्याप्रमाणें त्यांच्या भाषेचें वळण अगदीं रोजच्या व्यवहारांतलें भासत नसलें तरी तिच्यांत फाजील नटवेपणा नाहीं. उपहास, विनोद व मर्मभेदकता यांचें तिला वावडें आहे. क्वचित् प्रसंगीं आवेश दिसून आला तरी ती प्रकृति नव्हे.

रूक्ष विषयसुद्धां मनोरम भाषेंत व सुबोध नि सरळ रीतीनें मांडण्याची त्यांची हातोटी अवर्णनीय होती.

त्यांच्या विवेचनपद्धतींतील ठळक दोष म्हणजे ज्या विषयासंबंधानें लिहावयाचें त्यासंबंधीं प्रशंसापर आणि भक्तियुक्त अंतःकरणानें लिहावयाचें. त्यामुळें कित्येक ठिकाणीं ' काशी गये काशीदास, गया गये गयादास ' असा प्रकार झाल्यासारखा वाटतो. ग्रंथकाराला लेखनविषयाबद्दल एक प्रकारची नितांत सहानुभूति वाटली पाहिजे; ती नसेल तर विषयाशीं एकतानता होणें शक्य नसतें. परंतु इतिहासांतील इतर प्रसंग आणि व्यक्ती व वर्ण्यविषय यांचा परस्पर संबंध आणि यथार्थ दर्शन ( Proper perspective ) याला बाध येतां कामा नये. हा विवेक न राहिल्यामुळें दुय्यम दर्जाच्या ऐतिहासिक व्यक्तींचीं उठावदार चित्रें त्यांनीं रंगविलीं. दुसरें असें कीं इतिहासविषयक लेखनाचें कथन ( narrative ) आणि विशिष्ट तत्त्वानुसार मांडणी ( interpretation ) असे दोन भाग कल्पिले तर त्यांचें बरेंचसें लेखन पहिल्या प्रकारांत मोडण्यासारखेंच आहे. परंतु बापूसाहेबांचें संपादनकार्य विस्तृत व महत्त्वाचें आहे, आणि त्यामुळें त्यांचें नांव चिरस्मरणीय होऊन राहील असा भरंवसा वाटतो. राजवाडे, साने व खरे यांच्या बरोबरीचें बापूसाहेबांचें संशोधनकार्य आहे. त्यांनीं जमविलेला चित्रसंग्रह तर केवळ अमोलिक आहे. या चित्रसंग्रहाची योग्य ती व्यवस्था त्यांच्या हयातींत झाली नाहीं ही एक दुर्दैवाची गोष्ट आहे. नाहींतर तें त्यांचें एक जिवंत स्मारक झालें असतें.

प्रो. श्री. रा. पारसनीस

**पारसनीस द. ब. यांचें वाङ्मयः– मराठी पुस्तकें** – ( १ ) कीर्तिमंदिर, १८९०; ( २ ) झांशीच्या महाराणी लक्ष्मीबाईसाहेब यांचें चरित्र, १८९४; (३) मराठ्यांचे पराक्रम – बुंदेलखंड प्रकरण, १८९५; (४) अयोध्येचे नबाब, १८९९; ( ५ ) मुसलमानी अमदानींतील मराठे सरदार, १९००; ( ६ ) महापुरुष ब्रह्मेन्द्रस्वामी धावडशीकर यांचें चरित्र व पत्रव्यवहार, १९००; ( ७ ) बायजाबाई शिंदे यांचें चरित्र, १९०२; ( ८ ) दिल्ली अथवा इंद्रप्रस्थ, १९०२; (९) मराठ्यांचें आरमार, १९०४; (१०) सवाई माधवराव पेशव्यांचा दरबार, १९०५; (११) स्वल्पमूल्य चरित्रमाला – (अ) परशरामपंत प्रतिनिधि, ( ब ) नाभाजी, ( क ) मुधोळ संस्थानचे घोरपडे; ( १२ ) बाळाजी बाजीराव पेशवे यांची रोजनिशी – भा. १–२ ( वाड यांच्या जोडीनें ); ( १३ ) महेश्वर

दरबारचीं बातमीपत्रें-भाग १–२; कारकीर्द – अहिल्याबाई होळकर, १९१०, १९११; (१४) वतनपत्रें, निवाडपत्रें वगैरे, १९०९; (१५) सनदापत्रांतील माहिती, १९१३; (१६) पं. अयोध्यानाथ – चरित्र, १८९२; (१७) वामन शिवराम आपटे – चरित्र; (१८) ए. ओ. ह्यूम यांचें चरित्र, १८९३; (१९) भारतभाग्योदय; (२०) वाक्पुष्पांजली (कविता), १८८९; (२१) तह व करारमदार १९१४.

**मासिकें** – (१) सुभाष्यचंद्रिका; (२) महाराष्ट्रकोकिळ; (३) भारतवर्ष; (४) इतिहाससंग्रह.

**ऐतिहासिक कागदपत्रांचे खंड** – (१) पेशवे दप्तरांतील निवडक उताऱ्यांचे आठ खंड; (२) ग्वालेरदरबारसंबंधीं कागदपत्रांचे सात खंड.

**चरित्र, चर्चा, अभ्यासः—**

(१) दत्तात्रय बळवंत पारसनीस यांचें चरित्र. रत्नाकर – नोव्हेंबर १९२६, श्री. रा. पारसनीस.

(२) D. B. Parasnis. Jadunath Sarkar, Modern Review, June 1926.

(३) D. B. Parasnis, D. R. Bhandarkar, Bengal past and present.

(४) Main Currents of Maratha History, G. S. Sardesai.

(५) झांशीची राणी, 'लो. टिळकांचे केसरींतील लेख', खंड ४ था, पृष्ठ १७८-१८३.

(६) ब्रह्मेंद्रस्वामींचें चरित्र, बा. ना. देव, विविधज्ञानविस्तार, फेब्रुवारी १९०२.

(७) बायजाबाई शिंदे, विविधज्ञानविस्तार, ऑक्टोबर १९०२.

(८) दिल्ली अथवा इंद्रप्रस्थ, 'प्रज्ञाकर' विविधज्ञानविस्तार, एप्रिल १९८३.

(९) सवाई माधवराव पेशव्यांचा दरबार, विविधज्ञानविस्तार, फेब्रुवारी १९०८.

(१०) अहिल्याबाई होळकर, बा. ना. देव, विविधज्ञानविस्तार, सप्टेंबर १९१०.

(११) राजवाडे खंड तिसरा – प्रस्तावना.

(१२) राजवाडे यांच्या 'ब्रह्मेंद्रस्वामी'वरील टीकेस उत्तर, श्री. वि. आठल्ये, 'ग्रंथमाला'.

# चरित्रसूचि


| | पृष्ठ |
|---|---|
| टिळक बाळ गंगाधर ... | १ |
| टिळक लक्ष्मीबाई ... | १५ |
| टेंगे गोविंद मल्लिनाथ ... | १६ |
| ठोमरे त्र्यंबक बापूजी ( बालकवि ) | १७ |
| डुकले अनंत चंद्रोबा ... | ३५ |
| डुकले माधव चंद्रोबा ... | ३६ |
| डोंगरे पुरुषोत्तम भास्कर ... | ३७ |
| डोंगरे वासुदेव नारायण ... | ३८ |
| ढवळे परशुराम ... | ३९ |
| तर्खडकर दादोबा पांडुरंग ... | ३९ |
| तळेकर श्रीकृष्णशास्त्री ... | ४२ |
| तेलंग मंगेश जिवाजी ... | ४२ |
| तेंडोलकर बाबाजी अनंत ... | ४३ |
| त्रिलोकेकर सोकर बापूजी ... | ४३ |
| दडकर पांडुरंग बाळकृष्ण ... | ४६ |
| दप्तरदार विठोबाअण्णा ... | ४६ |
| दात्ये रघुनाथशास्त्री ... | ४७ |
| दामले मोरो केशव ... | ४८ |
| दामले सीताराम केशव ... | ५३ |
| दामले हरि कृष्ण ... | ५४ |
| दिवाकर ... | ५६ |
| दिवेकर सदाशिव महादेव ... | ६१ |
| दीक्षित शंकर बाळकृष्ण ... | ६२ |
| देव गजानन चिंतामण ... | ६६ |
| देव बाळकृष्ण नारायण ... | ६६ |
| देवधर सीताराम गणेश ... | ७० |
| देवल गोविंद बल्लाळ ... | ७१ |
| देशपांडे रामचंद्र भोजराव .. | ८३ |
| देशपांडे वाग्भट नारायण ... | ८३ |
| देशपांडे सर्वोत्तम वासुदेव ... | ८७ |
| देशपांडे सूर्याजी आनंदराव... | ८७ |
| देशपांडे वामन नानाजी ... | ८८ |
| देशमुख गो. हरि (लोकहितवादी) | ८९ |
| देसाई गजानन त्र्यंबक ... | ११२ |
| देसाई वामन गणेश ... | ११२ |
| देसाई शांताराम अनंत ... | ११३ |
| 'धनुर्धारी' ... | ११४ |
| नवलकर गणपत रघुनाथ ... | १२९ |
| नवाथे विष्णु गोपाळ ... | १२९ |
| नागपुरकर वैजनाथशास्त्री ... | १३० |
| नाडकर्णी पुरुषोत्तम गोविंद... | १३१ |
| नाडकर्णी रामचंद्र वामन ... | १३२ |
| नाडकर्णी विठ्ठल जिवाजी ... | १३६ |
| नातू काशीनाथ गोविंद ... | १३८ |

पृष्ठ

नातू विनायक महादेव ... १३९
'नाथमाधव' ... ... १३९
नेने विष्णु गणेश ... १५५
नित्सुरे शिवराम रामकृष्ण ... १५७
पटवर्धन काशीनाथ नारायण १५७
पटवर्धन पांडुरंग नरसिंह ... १५९
पटवर्धन वासुदेव बळवंत ... १६०
पदमनजी बाबा ... १६२
पदे शंकर दाजीशास्त्री ... १६८
परचुरे हरि बल्लाळ ... १६८

पृष्ठ

परांजपे कृष्णाजी शिवराम ... १६८
परांजपे नारायण माधव ... १६९
परांजपे शिवराम महादेव ... १६९
पाटणकर परशुराम नारायण... १७९
पाटणकर माधवराव ... १८१
पाठारे आत्माराम मोरेश्वर ... १८२
पाध्ये पांडुरंग जनार्दन ... १८४
पारख बळवंत खंडूजी ... १८५
पारखी पांडुरंग गोविंदशास्त्री १८६
पारसनीस दत्तात्रय बळवंत... १८७